... सं. वाचनालय, ठाणे
RBK-0108128



# महाराष्ट्राचीं धारातीर्थें





पं. महादेवशास्त्री जोशी २

दा. क्र. ८१२८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

12 DEC 1970

८९२८ नों. दि
कार्यां

# महाराष्ट्राचीं धारातीर्थें

— भाग दुसरा

पं. महादेवशास्त्री जोशी

८९२८
२५५६३
२१३२
नों. दि
३-४-५९
वाचनालय
IRBK-0108128
IRBK-0108128

ाडीच रुपये

ज्ञानराज - प्रकाशन : पुणें २.

प्रकाशक :

**सौ. सुधा जोशी**
ज्ञानराज - प्रकाशनकरितां
४२१, शनवार, पुणें २.

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

द्वितीय आवृत्ति : ऑगस्ट १९६०

मुद्रक :

**वि. ग. माटे**
विश्वकर्मा मुद्रणालय
३९५ टिळक रोड, पुणें २.

माझे सहप्रवासी सुहृद्वर्य

श्री. गोपाल नीलकंठ दांडेकर

यांस स्नेहभावें समर्पित

# प्रस्तावना

प्रस्तुत पुस्तकांत वर्ण्यविषय झालेले किल्ले-कोट हे सगळे कोंकणांतले आहेत. एक रायगड सोडला तर बाकीच्या सगळ्यांना सागराची जवळीक लाभलेली आहे. महाराष्ट्राचा इतिहास घडवण्यांत देशावरच्या गिरिदुर्गांइतकाच या कोंकणांतल्या जलदुर्गांचाहि वांटा आहे. विशेषतः समुद्रमार्गें भारताच्या भूमीवर उतरलेल्या फिरंगी, इंग्रज, डच आणि च्यांचे या परदेशी आक्रमक शत्रूंना वेळोवेळीं तोंड देण्याची कामगिरी या आणि अशाच इतर अनेक जलदुर्गांनींच बजावलेली आहे. महाराष्ट्राच्या शिवनिर्मित आरमाराचेहि संरक्षक आणि आश्रयदाते हेच.

या पुस्तकाच्या पहिल्या भागांत घाटमाथ्यावरचे आठ आणि या भागांत घाटाखालचे आठ असे एकूण सोळा किल्ले-कोट वर्णून, या सोळा धारातीर्थांतल्या स्नानाचा संकल्प सांगून मी या उपक्रमांतून मोकळा होत आहें. या महान् वास्तूंची आस्थेनें आणि आदरानें पाहणी करीत असतांना मीं महाराष्ट्राच्या गेल्या पांचशें वर्षांतल्या इतिहासावरहि ओझरती, चुटपुटती अशी नजर टाकलेली आहे. कुठें कुठें त्याच्याहि पूर्वीच्या भूतकाळाच्या अंधाऱ्या गुहेंत डोकावून पाहण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या दीड वर्षांत अनुस्यूतपणें केलेल्या या गड-प्रवासाचा चित्रपट जेव्हां माझ्या मनश्चक्षूंपुढें उभा राहतो तेव्हां अंतरांत अनेक भावनांची गर्दी उडते.

या चित्रपटांत अनेक व्यक्ति आहेत, अनेक प्रसंग आहेत. पण त्यांत एक व्यक्ति मात्र ठळक आहे. ती गडाच्या चढणीला माझ्यापुढें चालतांना दिसते. अवघड जागीं माझा हात धरून पावलें टाकतांना दिसते. ती किल्ल्याच्या

अरुंद तटावरून लीलया चालते. टोकांवरून खालीं डोकावते. अवघड जागा सर करते. अंधाऱ्या गुहा तोंडाशीं जाऊन न्याहाळते. गडांच्या चढ-उतारांत मधल्या वाटा शोधून काढतांना कांट्याकुट्यांनीं आग ओरखडून घेते. नवीं नवीं स्थळें शोधून इतरांना प्रोत्साहित करते. कोण ही व्यक्ति ?

महाराष्ट्राचे नामवंत साहित्यिक श्री. गोपाळ नीलकंठ दांडेकर.

गड-किल्ले हीं जणूं त्यांचीं माहेरें आहेत. एका रायगडावर त्यांच्या नऊ वाऱ्या झाल्या आहेत. आपल्या संगतीनें शेंकडों मंडळींना त्यांनीं त्या दुर्गाधिपतीचें दर्शन घडवलें आहे. शिवकालीन इतिहासांत ते अगदीं न्हाऊन, डुंबून निघालेले आहेत. माझ्या गडयात्रा यावच्छक्य सुखकर करण्याचें श्रेय त्यांना आहे.

याच यात्रेंत रायगडावर जात असतां आणखी एक विद्वान् स्नेही मला लाभले. ते म्हणजे महाडचे श्री. शां. वि. अवळसकर. इतिहाससंशोधक म्हणून त्यांचें नांव जिज्ञासूंना सुपरिचित आहे. त्यांचा इतिहास रुमालांत बांधून कपाटांत ठेवलेला नाहीं. तो त्यांच्या धारणेंत सांठवलेला आहे. ते एखाद्या प्रसंगावर बोलायला लागले कीं कार्यकारणभावासह आणि वर्ष, मास, तिथि या तपशिलांसह तो प्रसंग डोळ्यांपुढें उभा करतात. रायगडखोरें तर त्यांनीं चाळून काढलें आहे. कोंकणच्या इतिहासावर त्यांनीं बराच प्रकाश पाडलेला आहे. रायगड आणि इतर कांहीं किल्ले यांच्या वर्णनाच्या कामीं मला त्यांच्या माहितीचा फार उपयोग झाला आहे.

आणखी एक असेच जाणते सद्गृहस्थ म्हणजे मुरुड-जंजिऱ्याचे श्री. द. दा. पेंडसे. सिद्दीच्या जंजिऱ्याविषयीं त्यांनीं मला पुष्कळच तपशीलवार माहिती सांगितली. ते लेखक व कवि आहेत. त्या भागांतील जुन्या बालगीतांचा त्यांनीं बराच संग्रह केला आहे.

या पुस्तकांतलीं सगळीं चित्रें श्री. गंगाधर तातके यांनीं काढलेलीं आहेत. तेहि माझे सहप्रवासीच होते.

कै. गोविंदाग्रज महाराष्ट्राला दगडांचा देश म्हणतात. दगडांचा देश म्हणजे

किल्ले-कोटांचा देश. महाराष्ट्रांत लहानमोठे सुमारें दीडशें किल्ले आहेत. या सर्व किल्ल्यांनीं इतिहास घडवलेला आहे. त्यांतले फक्त सोळा किल्ले या पुस्तकाच्या दोन्ही भागांत अंतर्भूत झाले आहेत. म्हणजे धारातीर्थवर्णनाचें एक-दशांश काम माझ्या हातून पुरें झालें आहे. उरलेलें नऊ-दशांश काम मी पुरें करूं शकेन असें मला वाटत नाहीं. मात्र तें झालें पाहिजे अशी माझी तीव्र आकांक्षा आहे. हे सर्व किल्ले-कोट आतां झपाट्यानें स्मृतिशेष होण्याच्या मार्गाला लागले आहेत. त्यांचें प्रत्यक्षांत संरक्षण करणें आपल्या हातीं नाहीं, म्हणून निदान वाङ्मयांत तरी ते चिरंजीव व्हायला हवेत. हें काम उगवत्या पिढींतील तरुण लेखकांचें आहे असें मी समजतों. या निमित्तानें त्यांचा जो प्रवास होईल त्यांत त्यांना महाराष्ट्राचें समग्र दर्शन घडेल. फार मोठी अनुभवाची शिदोरी त्यांच्या पदरांत पडेल.

बलिप्रतिपदा,
शके १८७५

— महादेवशास्त्री जोशी

# दिग्दर्शन

या पुस्तकांत आठ किल्ले-कोटांचें वर्णन आलेलें आहे. पुणें हें मध्यकेंद्र कल्पून प्रस्तुत किल्ले-कोटांचा मार्ग कसा, त्यांचें अंतर किती, उंची किती आणि प्रत्येक किल्ले-कोटावरचीं प्रेक्षणीय आणि वैशिष्ट्यपूर्ण स्थळें कोणतीं हें या परिशिष्टांत संक्षेपानें दिलें आहे–

१. **जलदुर्गांचा राजा** — म्हणजे मालवणचा सिंधुदुर्ग. मुंबईहून बोटीनें किंवा बेळगांववरून सावंतवाडीमार्गें मोटारनें जातां येतें. पाण्यांतला किल्ला. बंदरापासून एका मैलावर. शिवाजीचें मंदिर, दर्याबुरूज, शिवाजीच्या हातापायाचे ठसे, राणीच्या समुद्रस्नानाची जागा, पद्मदुर्ग हीं स्थळें प्रेक्षणीय.

२. **विजयदुर्ग** — याच नांवाचें गांव आणि बंदर. मालवणहून बोटीनें जावें लागतें. मजल्याचे बुरूज, कोठी, तटबंदी, रामेश्वर, जुनी गोदी, हीं स्थानें प्रेक्षणीय.

३. **शिवछत्रपतीची राजधानी** — म्हणजे रायगड. महाड तालुक्यांत. महाबळेश्वरावरून, भोरच्या वरंध्या घाटांतून किंवा मुंबईहून मोटारमार्गें जातां येतें. महाडपासून चौदा मैलांवर. उंची समुद्रसपाटीपासून २८५१ फूट. डोंगरी किल्ला. पाचाडची जिजाईची समाधि, किल्ल्यावरचा गंगासागर तलाव, कुशावर्त तलाव, दरबार आणि सिंहासन यांची जागा, अंधारकोठड्या, राण्यांचे महाल, जगदीश्वराचें मंदिर, शिवरायाची समाधि, टकमक बुरूज, हिरकणी बुरूज, हीं स्थळें प्रेक्षणीय.

४. **अलिबागचा पाणकोट** — पुण्याहून धरमतरमार्गें मोटारीनें आणि मुंबईहून रेवसमार्गें बोटीनें जातां येतें. जलदुर्ग. नानीसाहेबांचा वाडा, गणपतिमंदिर, तलाव आणि किनाऱ्यावरची वेधशाळा या पाहण्याजोग्या गोष्टी.

५. **चंपावती आणि कोरलई** — चंपावती म्हणजे अलीकडचें चौल-रेवदंडा. अलिबागपासून बारा मैलांवर. मोटाररस्ता. चौलचें रामेश्वरमंदिर. रेवदंड्याचा कोट पाहिल्यावर मग होडींतून कोरलईला जायचें. कोरलईची उंची २७१ फूट. क्रूसाची बातेरी, मोडकें चर्च, दरवाजे या पाहण्याजोग्या गोष्टी.

६. **मुरुडचा जंजिरा** — रेवदंड्याची खाडी ओलांडल्यावर १८ मैल मुरुड. मोटारचा प्रवास. तिथून दीड मैलावर जंजिरा किल्ला. होडींतून किल्ल्यांत जायचें. महाद्वार, प्रमाणबद्ध बुरूज, तोफा, सुरुलखानाचा वाडा, बालेकिल्ला, तिथून दिसणारा कासाकिल्ला, मुरुडचें वल्लाळ विनायकाचें मंदिर या गोष्टी पाहण्याजोग्या.

७. **वसईचा पवाडा** — पश्चिम रेल्वेच्या मार्गावरील वसईरस्ता स्टेशन. तिथून वसई गांव ३ मैल आणि तिथून किल्ला १ मैल. भुईकोट. मात्रिझ, बालेकिल्ला 'नोस्स सिंज्योर द व्हीद' चर्च, कमारा, डॉमिनिकन चर्च, जेसुईट चर्च, फ्रान्सिस्कन चर्च, वज्रेश्वरी व शंकर यांचीं मंदिरें, सॅबास्टिअन बुरूज, मांडवी बंदर हीं प्रेक्षणीय स्थळें.

८. **बिंबस्थान-महिकावती** — म्हणजे केळवें-माहीम. पश्चिम रेल्वेवरील पालघाट स्टेशनपासून ५ मैल. मोटाररस्ता. माहीमचा किल्ला, केळव्याचा किल्ला, महिकावतीचें मंदिर, राम-लक्ष्मणांची शिळा हीं प्रेक्षणीय स्थळें.

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| १ | जलदुर्गांचा राजा | ... | ११ |
| २ | विजयदुर्ग | ... | २७ |
| ३ | शिवछत्रपतींची राजधानी | ... | ४२ |
| ४ | अलीबागचा पाणकोट | ... | ६५ |
| ५ | चंपावती आणि कोरलई | ... | ८१ |
| ६ | मुरूडचा जंजिरा | ... | ९८ |
| ७ | वसईचा पवाडा | ... | ११७ |
| ८ | बिंबस्थान-महिकावती | ... | १३६ |

अ. क्र. २२०६३
वि. प्रा/वा
क्र. 2732
नों. दि 3/7/51

# जलदुर्गांचा राजा

हेमंत ऋतु हा समुद्रप्रवासाला सुखावह असतो. आपला गाज आणि प्रक्षोभ विसरून समुद्र त्या दिवसांत एक प्रकारचा निजानंद अनुभवतांना दिसतो. बोट हालत नाहीं तर नुसती डोलते. एखाद्या योग्यानें आत्मतृप्तींत डोलावें तसें तें डोलणें असतें. त्या डोलण्यानें प्रवाशांना आंदुळल्यागत वाटतें आणि पडल्यापडल्या त्यांचे डोळे मिटतात. आपला पृष्ठभाग चिरीत जाणाऱ्या बोटीकडे आणि मचव्यांकडे समुद्र क्षमाशील संतांच्या दृष्टीनें पाहतो. बोटीच्या नाळीनें पाणी कापावें आणि दरियानें नुसतें ढवळें स्मित करावें.

मालवणला जाण्यासाठीं आम्ही ज्या दिवशीं मुंबईस भाऊच्या धक्क्यावर बोटींत चढलों, त्या दिवशीं तर हवा विशेषच प्रसन्न होती. वारा वाहत होता; पण चळ भरल्यागत नव्हे. मधून मधून समुद्राच्या बगलेंत घुसलेल्या दूरवरच्या टेकड्यांवर धूसर दिसत होतें; पण तें दृष्टीचा मार्ग रोधीत नव्हतें. पाण्याच्या निळ्या वळकट्यांवर उन्हें चमचमत होतीं; पण आम्हांला त्याची बाधा नव्हती. सकाळीं अकरा वाजतां बोट मार्गस्थ झाली. मीं उठून उजवीकडे नजर वळवली तर तिकडे सगळें पाणीच पाणी. सागराच्या पाठीवर आकाशमाउलीचा मायाळू हात कुठें पडला आहे तें सुद्धां कळूं नये इतका त्या दोन महाभूतांचा रंग एकजीव झालेला. एखाद्या दूरवरच्या गलबतानें शिडाची उभी रेघोटी ओढून दाखवावें कीं, 'हें पाहा, इथें तुमचें क्षितिज आहे. यापुढचा सगळा विस्तार अनंताचा.'

उजवीकडे पाहायचा कंटाळा आल्यावर डाव्या अंगाला वळलों. तिकडे भार्गवरामानें निर्मिलेली ती कोंकणपट्टी सारखी मागें मागें सरकत होती. कुठें वाळवंटाचा पांढुरका पट्टा दिसे. जणूं भार्गवानें तिथें आपलें उत्तरीय वस्त्रच धुऊन वाळत घातलें आहे. कुठें डोंगरटेकड्या समुद्रांत पाय धुवायला आल्यागत वाटतें.


सागरबाप्पा त्यांना धडका देत म्हणे, ' चला, हटा मागें. माझ्या लाटांना लोळा-खेळायला इथें मऊ मऊ पुळण बनवायची आहे मला.' कुठें डोंगराला वळसा घालून पाऊल न वाजवतां पुढें उमटून समुद्राला भेटायला आलेल्या खाड्या दिसत. मधेंच एखाद्या खाडीच्या कांठीं डोंगरमाथ्यावर तट किंवा बुरूज असे दुर्गांचे अवशेष लक्ष वेधीत. मधेंच हिरवें रान, मधेंच डोलत्या नारळींच्या बागा, मधेंच रूक्ष मरुभूमि अशीं दृश्यें आलटून पालटून पुढें येत.

सह्याद्रि आणि समुद्र यांच्यामधली सुमारें पंचवीस मैलांची ही कोकणपट्टी एका महान् संस्कृतीचा वारसा सांभाळून बसली आहे. लोकमान्य टिळक, महर्षि कर्वे, डॉ. भांडारकर इत्यादि नरश्रेष्ठांची ही जन्मभूमि. हिनें आजवर अनेक सुपुत्र निर्मून देशाच्या ओटींत घातले आहेत. तांबड्या मातीनें माखून त्यांना घाट-माथ्यावरच्या विशाल आखाड्यांत लोटलें आहे. कौसल्या, यशोदा, कुंती यांच्या मालिकेंतली ती ' पुत्रवती ' आहे.

आमच्या बोटीनें पहिलें बंदर केलें तें जयगड. पण तें येण्यापूर्वींच रात्र पडली. सागर-पृष्ठावर अंधुकशी चंद्रप्रभा पसरली. किनाऱ्याकडची सृष्टि नामरूपें गोठवून एकाकार झाली. कुठेंहि स्पष्ट असें कांहींच दिसेना. बोटीचा खळाळ तेवढा कानीं पडत होता. आतां आम्ही जणू अव्यक्तांतले प्रवासी होणार होतों. ' तमसो मा ज्योतिर्गमय ' अशी जणूं आम्हांला प्रार्थना करावी लागणार होती.

पण त्या तिथीचा विशेष असा कीं, त्या रात्रीं चंद्र-शुक्रांची युति होती. चंद्र म्हणजे पूर्ण नव्हे; तर त्याची इवलीशी धनुकली. त्या दोन दिव्य ज्योती 'आंगडी मांगडी ' घालून खालीं घसरत होत्या. शुक्र हा पश्चिम दिग्वधूच्या नाकांतला बाल म्हटला तर चंद्र तिच्या भाळीं बिजवरा शोभत होता. एखाद्या मूर्धाभिषिक्त सम्राज्ञीसारखा त्या रात्रीं पश्चिमेचा नोकझोक होता. ध्यानीं मनीं नसतां तिच्या तनूवर हा सोनेरी साज चढला होता. बाकीच्या तारका एकमेकींना खुणावून त्या शिणगाराकडे जणूं लुब्ध नयनांनीं पहात होत्या. त्या दोन ज्योतींपैकीं कोणीं कोणाला ग्रासलें नव्हतें. सवाष्णींनीं एकमेकींना संक्रांतीचीं वाणें वाटावीं तशा त्या दोघी आपलें तेज एकमेकींना देत–घेत होत्या आणि त्यामुळेंच त्यांचा सहभाव मोला दुणा ठरला होता. आपण आतां थोड्याच वेळांत बुडणार याची दखल एकीलाहि नव्हती. जणूं जगणें-मरणें तृणवत् लेखून त्या चालू घडी भोगून घेत होत्या. सागराची निळी माया आधीं कोणाला आपल्या पांघरुणांत घेईल, या

उत्कंठेनें मीं तिकडे टक लावलें होतें. पण शुक्रानें आधीं उडी घेतली. त्याचा पालव धरून मग चंद्रकला हळूच बुडाली. तिचें वरचें शृंगहि जेव्हां 'समुद्रास्तृप्यन्तु' झालें, तेव्हां मात्र पश्चिमेइतकाच मीही दुर्मुखलों. सौंदर्य हें क्षणजीवी म्हणूनच त्याचें एवढें आकर्षण. तें विश्वांत पाहायचें आणि मनःकोशांत अमर करायचें, असा कांहींसा विचार करीत मीहि मग इतरांप्रमाणेंच आडवा होऊन डोक्यावरून पांघरूण ओढलें.



सिंधुदुर्गाचें दूरदर्शन

सकाळीं साडेसातच्या सुमारास मालवण बंदरांत शिरून समुद्रांतले जीवघेणे खडक चुकवीत एका विशिष्ट आंखून दिलेल्या मार्गानें बोट आंत जाऊं लागली. तिनें वळतां वळतांच जवळच्या सिंधुदुर्गाचें आम्हांला उभय अंगांनीं दर्शन घडविलें. मालवण हें महाखोडकर बंदर आहे. नवख्या कर्णधाराला त्याचा कांहींच उमज पडत नाहीं. पाणी खोल आहे, निराबाध आहे, म्हणून तो जर हवें तिथून आंत घुसूं म्हणेल, तर त्याची जलांत दडलेल्या काळ्या खडकांशींच गांठ पडायची. जहाजासकट तो प्राणांनींच उत्तीर्ण व्हायचा. 'जॉन्स्टन कॅसल' नांवाची इंग्रजांची एक बोट १८६५ त इथें फुटली होती ती या अनवधानामुळेंच. यासाठींच शिवरायानें इथें जलदुर्ग उभारण्याचें ठरविलें. 'मार्ग कठीण सर्पाकार. तरांडी होडी तितकी मात्र चालते. सभोंवते सारे खडक. दुसरी तरांडी तीन कोशपर्यंत यावयास अगदीं गति नाहीं.'

आम्ही बोटींतून पडावांत उतरलों. पडाव सुटलेले पाहून बोटीनें नांगर उचलला आणि आपला मोहरा वळवला. ती वेंगुर्ल्याच्या दिशेनें आणि आम्ही किनाऱ्याच्या दिशेनें निघालों. इथला धक्का म्हणजे हत्तीच्या सोंडेसारखी लांबच लांब एक पाळंद किनाऱ्यापासून दूरवर समुद्रांत आणलेली आहे. पडाव टेंकतात ते तिच्या तोंडावर.

किती तरी वर्षांनीं मी कोंकणच्या भूमीवर पाय ठेवीत होतों. तांबड्या मातीचा रस्ता तुडवीत मुक्काम गांठावयाला जात होतों. खाजें म्हणजे गोडी शेव ही कोंकणची सर्वमान्य मिठाई. तिचीं दुकानें दुतर्फा मांडलेलीं होतीं. नारिंगी रंगाचीं ताजीं पोफळें, आगरांतल्या विड्याच्या पानांचे पुडे, 'घाटावरसुन आला जोगी, गोबर माखुन बसला ओगी' म्हणून कोंकणांतल्या मुली ज्यांच्याबद्दल उखाणा घालतात ते कोहळे, वाटोळीं गुबगुबीत पपनसें, पिकून गर्द जांभळीं झालेलीं हसोळीं, चिनें, कणगरें, अळकुड्या असा खास कोंकणाचा कंद-फलांचा संभार पुढें मांडून कुळवाडणी रस्त्याच्या कडेनें विक्रीसाठीं बसल्या होत्या. मी ते मांड पाहूनच तृप्त झालों. आमच्या हमालानें आम्हांला नेमकें डॉ. आजगांवकरांच्या दवाखान्यासमोर नेऊन उभें केलें आणि मग त्यांच्याच सल्ल्यानें आमचें भ्रमणचक्र सुरू झालें. मध्याह्न थोडासाच कलला होता ; पण—

'दिशि मन्दायते तेजो दक्षिणस्यां रवेरपि'

'दक्षिणेला गेला कीं सूर्यहि तेजानें मंदावतो' या कालिदासवचनावर विश्वास ठेवून आम्हीं सिंधुदुर्गाचा रस्ता धरला. आणि समजा, उन्हाची तिरीप बाधलीच तर तिचा उपशम करायला सिंधुदुर्गांतले माड शहाळ्यांचे मधुर जलकलश घेऊन उभे आहेत, ही माहिती आम्हीं आधींच काढून ठेवली होती. बरेंचसें मालवण पाठीकडे आणि उरलें सुरलें डाव्या हाताला ठेवून आम्ही पुळण तुडवीत जात होतों. तिथें वाळत पडलेलीं विस्तीर्ण जाळीं आणि तिथला बर्फाचा कारखाना या गोष्टी मालवणला मच्छीमारीचा धंदा फार मोठ्या प्रमाणावर चालतो, हें सुचवीत होत्या. मासे मारायचे, ते बर्फांत घालायचे आणि अशा प्रकारें त्यांचा ताजेपणा कायम राखून ते मुंबई-कोल्हापूरकडे रवाना करायचे, हें मत्स्यसत्र तिथें धूमधडाक्यानें चालतें. मुलांनीं फार गोंगाट चालवला तर 'काय मासळीबाजार मांडला आहे रे' असें वडीलधारीं माणसें म्हणतात. या वाक्प्रचाराची प्रचीति पाहायची असेल तर सायंकाळीं मालवणच्या चौपाटीवर एक खेप टाकावी.

जुन्या काळीं हें मिठाच्या व्यापाराचें केंद्र असावें, असें त्याच्या 'महालवण' यां नांवावरून अनुमान होतें. आजमितीस त्यांतला महाप्राण हकार लुप्त होऊन तें मालवण बनलें आहे. मिठाचेंच कशाला; सोळाव्या शतकांत तें सर्व प्रकारच्या मालवाहतुकीचें मोठें ठाणें होतें. घाटमाथ्यावर माल चढवण्याचा मुख्य मार्ग त्या काळीं याच अंगानें होता.


बंदरापासून सुमारें मैलभर चालल्यावर आमचा खुष्कीचा मार्ग संपला. आतां सुमारें फर्लांगभर होडींतून जावें लागणार होतें. आम्ही येत आहों हें दुरूनच पाहून तिथला नित्याचा 'तारी' होडी घेऊन पुढें आलाच. काळ्या कपिलेसारखी त्याची ती चिमुकली एकसंध होडी आणी पंचपात्रीला शोभेशी पळी असावी तशी तिची नाजूकनार वल्ही. तो नावाडीहि तसाच लहानखुरा. त्या पन्हळांत त्यानें आम्हां चौघांना एकदमच बसवलें. भोजनाची पंगत बसवतात तसें नव्हे; तर एकाच्या पाठीशीं दुसरा अशा पद्धतीनें. सगळ्यांना ताकीद ही कीं, 'होडीच्या दोन्ही कडांवर हात ठेवा आणि तोल संभाळून बसा.'

आम्ही तसे बसतांच होडीनें सुळकांडी मारली. पाण्याचा वरचा थर थोडीशी चुळबूळ करीत बाजूला होऊं लागला. पाण्यांत हालचाल सुरू होतांच सूर्याच्या किरणशलाका थरथरूं लागल्या. शेवाळ्याचे पुंजके गटंगळ्या खात पांगूं लागले. तळ स्वच्छ दिसे; पण वाटला तितका तो उथळ नव्हता. आम्हांला एक धक्का देऊन होडीचें नाक वाळवंटांत रुतलें. गडाच्या ईशान्य कोनास महाद्वाराच्या समोर आम्ही होडींतून उतरलों.

इथलें महाद्वार दर्शनी नाहीं. घेराचा तट दोहीं अंगीं आंत वळतो, मधें एक चिंचोळी तीन पुरुष उंच खिंड तयार होते आणि तिच्यांतून पुढें गेल्यावर किल्ल्याचा मुख्य दरवाजा भेटतो. शत्रूचा मारा झालाच तर दरवाजा अक्षत, अभंग रहावा म्हणून ही चक्रव्यूहाच्या प्रवेशद्वारासारखी रचना आहे. आंत शिरतांच उजव्या हाताला दक्षिणाभिमुख मारुतीचें दर्शन होतें. तिथून मंदिरापर्यंत सरळ रस्ता वळलेला आहे. तिथें उभें राहून चौफेर नजर टाकावी कीं किल्ल्याच्या आकारमानाची कल्पना येऊं शकते. तटप्रदक्षिणा करायला निघाल्यास दोन मैलांहून अधिक चालायला नको. बोलून चालून समुद्रांतून वर आलेलें बेट तें. कुठें उंच तर कुठें सखल. आकार सामान्यतः फणसासारखा. बऱ्याच ठिकाणीं

कुसें बाहेर आलेलीं. त्यामुळें तटहि त्याच पद्धतीनें बांधावा लागला. ' घरासारखा पाव्हणा ' म्हणतात ना, तसा.

सिंधुदुर्गात आल्यावर मनाचें अदष्ठळ तात्रडतोब उमलतें. आणि याला कारण तिथली नारळीची बाग. ते माड उन्हें आपल्या माथ्यावर घेतात आणि तिथल्या



किल्ल्याचें प्रवेशद्वार

बाळगोपाळांना सावली देतात. किल्ल्याचा पूर्वार्ध त्यांनींच व्यापलेला आहे. हे माड तिथले गाभीत अखरखतात. त्यांच्या खालीं कांहीं कुणगे बनवून

भाजीपालाही पिकवतात. इथें जें कांहीं उत्पादन करायचें असेल तें जमीन कुदळीनें खणून. त्या भूमीवर नांगर फिरवायचा नाहीं. कारण ही राजभूमि आहे. आम्ही तिथें गेलों तेव्हां घरागोठ्यांवरचे पावसाळी वेल सुकले होते. मखमलीचीं झाडें तेवढीं उभीं होतीं आणि आपल्या लालचुटुक जिभा दाखवीत होतीं.

१६६५ त शिवरायानें हा जलदुर्ग बांधला. शिद्दीच्या जंजिऱ्याला तोडीस तोड म्हणून. त्याच्या मनांत खरें म्हणजे जंजिऱ्याचाच कबजा करावयाचा होता. सगळी कोकणपट्टी ताब्यांत आणली खरी; पण जोंवर शिद्दीची ही पाचर मधें बसली राहील तोंवर ही पट्टी सुरक्षित नाहीं हें शिवरायाला पक्कें कळलें होतें. त्यानें शिद्दीवर अनेकदां निकराचे हल्ले केले. एकदां तर त्याची दंडाराजपुरी त्याच्या हस्तगत झालीहि. पण जंजिऱ्यापुढें निभाव लागेना. जंजिरा मजबूत तर होताच. शिवाय हबश्याचें मोठें आरमार त्याच्या संरक्षणासाठीं दर्यांत उभें होतें. स्थलमार्गानें येणारी त्याची रसद तोडली तर तो जलमार्गानें तिचा पुरवठा करून घेई. जटायूचें वर्म त्याच्या पंखांत तसें शिद्दीचें वर्म आरमारांत होतें. तें समुद्रांत इतस्ततः फिरे आणि कांहीं कारण नसतांना किनाऱ्यावरच्या गांवांना उपद्रव करी. शिद्दी गबर आणि उन्मत्त झाला होता तो सागरी व्यापारावर शह ठेवून. कोणाचींही मालवाहू जहाजें लुटून तो महामूर धन मिळवी आणि तीं जहाजेंहि पचनीं पाडी. यामुळेंच शिवरायाला शिद्दी हा कपाळशूळ ठरला होता. तो पादाक्रांत झाला तर त्याचें सुसज्ज आरमारहि स्वराज्याच्या कामीं उपयोगी पडेल अशी त्यांची धारणा होती. पण अनेकदां प्रयत्न करूनहि जेव्हां तो फलद्रूप होईना, तेव्हां त्या समर्थ पुरुषोत्तमानें स्वतःचें नवें आरमार उभारण्याचें उदक सोडलें.

आरमार उभारायचें तर त्याला एखाद्या बळकट जलदुर्गाचें पाठबळ हवें होतें. किल्ल्यावांचून आरमार म्हणजे दोरीवांचून धनुष्य किंवा मुठीवांचून तलवार. त्यासाठीं शिवरायाला योग्य स्थळ हवें होतें. मालवण बंदराच्या रूपानें त्याला तें भेटलें. बंदराजवळचें हें 'कुरटें' नांवाचें शुद्ध खडकाचें बेट त्याच्या दृष्टीस पडलें. 'चौऱ्यांयशीं बंदरीं ऐसा जागा नाहीं' असें त्याला वाटलें. अंतरांत न सामावणाऱ्या उत्साहानें तो त्या बेटावर गेला. एखाद्या स्थपतीच्या दृष्टीनें त्यानें त्या बेटाची पहाणी केली. ती दृष्टि केवळ स्थापत्यविशारदाची नव्हती, तर स्वराज्याच्या निर्मात्याची होती. महाराष्ट्राचा महोदय घडवणाऱ्या शिल्पकाराची होती. इथेंच किल्ला बांधावयाचा अशी त्याला अंतःस्फूर्ति झाली. लगेच गांवांतल्या

कोळ्यांना बोलावून त्यानें सभोंवतींच्या सागराचा तळठाव पाहण्याची आज्ञा केली. कोळी–गाभीत म्हणजे दर्यांतले दुसरे मासेच. त्यांचा अभिप्राय अनुकूल पडतांच शिवरायाचा हुरूप वाढला. मनांतला किल्ला लगेच बांधूनहि झाला. आतां जनांत त्याची प्रतिकृति उठवायची एवढेंच बाकी उरलें.

त्यासाठीं गांवांतला उपाध्या जानभट अभ्यंकर यानें शुभमुहूर्त काढून दिला. शिवरायानें गणपतिपूजन केलें. 'कार्यं मे सिद्धिमायातु' म्हणून त्या विघ्नहराला प्रार्थिलें. समुद्रपूजन करतांना वस्त्रें, मंदिल, होन इत्यादि राजोपचार त्याला समर्पिले. सोन्याचा नारळ करून समुद्रांत सोडला. समुद्रानें तो लाटांच्या शुभ्र उत्तरीय वस्त्रांत लगेच गुंडाळून घेतला. त्याच्या वेढ्यांत किल्ला उभा व्हायचा होता आणि त्याच्याच कृपेवर अढळ रहायचा होता. एवढें झाल्यावर शिवरायानें स्वहस्तें पहिला चिरा बसवला. पांचशें पाथरवट, दोनशें लोहार, शिवाय कामाठी, कोळी वगैरे तीन हजार हुन्नरी लोक वेटावरच आणून ठेवून कामाला लावले. पांच खंडी शिशाचा रस करून पायांत ओतला आणि त्यांत पायाचे दगड रुतवून बसवले. कार्यांत कोण्या वैऱ्याचा अडथळा येऊं नये म्हणून पांचशें मावळ्यांचा खडा पहारा बंदरावर ठेवला. त्याच्या मदतीला जहाजें, तोफा, दारूगोळा हें साहित्य सज्ज ठेवलें. शिवरायाला मुख्यत्वें भय होतें तें हबश्याचें. कारण सिंधुदुर्ग हा एकपरी त्याच्याच उरावर उभारला जात होता. तो मनांत जळफळला असेल; पण शिवरायाच्या वाटेला जाण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं. त्याच्या वर्धिष्णु सामर्थ्याचा हबश्याला धाक बसला असावा.

किल्ल्याचे तट आणि बुरूज भूगर्भांतून वर येऊं लागले. तें काम मोलाचें असलें तरी भाडोत्री नव्हतें. कामगार त्या उभारणींत केवळ घामच नव्हे; तर जीव-प्राण ओतीत होते. पुंड, गुंड, भेदी, कारस्थानी, कडवे आणि आक्रमक अशा सर्व वैऱ्यांना दमवून स्वराज्याचा विस्तार करणाऱ्या आपल्या राजाचें हें काम आहे आणि तेंहि मराठी राज्याच्या बळकटीसाठींच आहे, या जाणिवेनें ते श्रमिक तिथें खपत होते. पण तरीहि किल्ला पूर्ण करायला त्यांना पुरतीं तीन वर्षें लागलीं. शिवरायाचे एक कोटी होन पोटांत घेऊन ते भक्कम तट उभे झाले. सुरत आणि हुबळी या समृद्ध पेठा लुटून आणलेली अमाप संपत्ति शिवरायानें या किल्ल्यासाठीं धार धरून ओतली.

किल्ला बांधून झाल्याची सुवार्ता शिवरायाला पन्हाळगडीं कळवण्यांत आली. सगळीं कामें टाकून तो मालवणाकडे दौडला. तो बिलंद किल्ला सागराच्या तुफानी लाटा परतून लावीत उभा राहिला आहे, हें पाहून कल्पनेंतलें प्रत्यक्षांत सहीसही उतरलें याचा त्याला परमानंद झाला.


शिवरायानें थाटामाटानें किल्ल्याची वास्तुशांत केली. देव-भूदेव संतुष्ट केले. कामगारांना कडीं, मंदिल वांटले. अनेक देकार दिले. थैलीचें तोंड मोकळें सोडलें. कुठेंहि हात आंखडला नाहीं. नैषधकर्त्या श्रीहर्षाला काळजी वाटली होती कीं, 'हा दानवीर नळराजा सुवर्णाच्या मेरूचे खंड विखंड करून तर याचकांना वांटणार नाहीं ना? म्हणजे मेरु पर्वत सपाट व्हायचा आणि दानद्रव्य भिजवून द्यायचें असल्यामुळें समुद्र कोरडा पडायचा.' शिवरायाचें त्या वेळचें औदार्य पाहून त्याच्या कारभाऱ्यांनाहि असेंच कांहीं तरी वाटलें असणें शक्य आहे.

त्या किल्ल्याच्या दर्याबुरुजावर उभें राहून सागरावर दृष्टिक्षेप करतांना शिवरायाला असामान्य आत्मविश्वास वाटला असेल. तो मनांत म्हणाला असेल, 'आतां हवशी नरमेल. त्याचा उपद्रव कमी होईल. टोपीकर फिरंग्यांना दहशत बसेल, आणि वाडीचा सावंत चांचेगिरी करून जहाजें लुटतो त्यालाहि पायबंद बसेल.'

शांतिकर्मांत देवता स्थापन करतांना मुख्य देवतेच्या दोहीं अंगांना अधिदेवता आणि प्रत्यधिदेवता अशा आणखी दोन उपदेवता बसवतात. त्यामुळें मुख्य देवतेला शोभाहि येते आणि बळहि चढतें. शिवरायानें विचार केला कीं, सिंधुदुर्गालाहि गरुड-हनुमंत हवेच. आणि म्हणूनच त्यानें बंदराच्या उत्तर टोंकाला राजकोट आणि खाडीच्या मुखावर सर्जेकोट असे आणखी दोन किल्ले उभारले. हे दोन्ही किल्ले सिंधुदुर्गाच्या मानानें अल्पायुषी ठरले. कोणी पुसता, हात फिरवता न भेटल्यामुळें त्यांनीं अंग टाकलें. आजमितीस बोट बंदरांत शिरतांना राजकोटाचा समुद्रांत घुसलेला एक पडित तट तेवढा दिसतो. बाकी सगळा शून्याकार.

सिंधुदुर्गाच्या महाद्वारासमोरच आणखी एक लहानसें बेट आहे. त्यावरहि शिवाजीनें पद्मगड नांवाचा त्याच्या घेराचा एक कोट उठवून टाकला आणि तिथें गलबतें बांधण्याचा कारखाना सुरू केला. एकूण मालवण बंदर जितकें बळकट आणि अधृष्य करतां येईल तेवढें करण्याच्या कामीं त्यानें काडीमात्रहि कसूर केली नाहीं.

तटाच्या आंत आल्यावर मुख्य रस्त्यानें आम्ही प्रथम शिवाजीच्या मंदिराकडे गेलों. या देवळाचे नवे-जुने दोन्ही भाग स्पष्टपणें दिसून येतात. मूळ मंदिर राजारामानें बांधलें असून पुढचा सभामंडप कोल्हापूरच्या शाहूमहाराजांनीं १९०७



**शिवाजीचें मंदिर**

सालीं उभारला. इथें शिवछत्रपतीला नित्य षोडशोपचार होतात. सोमवारीं त्याची पालखी निघते आणि वर्षांतून दोन उत्सवहि नाटकांसहवर्तमान होतात. या सगळ्या खर्चासाठीं कोल्हापूर संस्थान अस्तित्वांत होतें तोंवर वर्षासन मिळत होतें. सिंधुदुर्गाचा आणि कोल्हापूरचा संबंध आला तो स्वराज्याच्या फाळणींतून.

१७१३ त एकाच स्वराज्याच्या सातारा आणि कोल्हापूर अशा दोन गाद्या निर्माण झाल्या. या विभागणींत सिंधुदुर्ग कोल्हापूरच्या वांट्याला आला. सन १८१२ पर्यंत तो त्याच्या अधिकारांत होता. पुढें याच्या आश्रयानें कोळी-भंडारी यांची चांचेगिरी सुरू झाली. मालवण हें चांचे लोकांचें ठाणेंच बनलें. समुद्रावर गलबत दिसलें कीं तोफ रोखून त्याला अडवायचें, गुरासारखें वळवून आणायचें आणि सगळा माल लुटून सोडून द्यायचें. इंग्रजांच्या व्यापाराचें त्यामुळें खूप नुकसान होऊं लागलें. मालवण ही त्यांना इडापिडा ठरली. त्यांनीं कोल्हापूरकरांकडे साम-दाम करून पाहिलें; पण कांहीं उपयोग होईना. कारण चाच्यांचे सरदार कोल्हापूरदरबारालाहि 'नाकापेक्षां मोतीं जड' झाले होते. मग इंग्रज अधिक गंभीर आणि खंबीर झाले. त्यांनीं १७६५ त म्हणजे सिंधुदुर्ग बांधल्यापासून बरोबर शंभर वर्षांनीं मोठ्या तयारीनिशी सिंधुदुर्गावर मोर्चे लावले. चाच्यांनीं त्यांना तोंड दिलें; पण त्यांची मात्रा चालली नाहीं. किल्ला इंग्रजांच्या कब्ज्यांत आला. 'फोर्ट ऑगस्टस्' असें त्यांनीं त्याचें पाश्चात्य नामकरण केलें. पण तो कायमचा हातीं ठेवण्यांत त्यांना हंशील नव्हतें. म्हणून कोल्हापूरकरांशीं आपल्या फायद्याचा तह करून त्यानीं तो त्यांच्या हवालीं केला. पण चाच्यांना लुटालुटीची जी चटक लागली होती ती काय सुखासुखी नष्ट होते! ते चोरून मारून पण उपद्रव देतच राहिले. अखेर १८१२ त कर्नल स्मिथनें पुन्हां एक निकराची धडक मारली, तेव्हां कुठें चाच्यांचा बीमोड झाला.

आम्ही संध्याकाळीं तिथें गेलों त्यामुळें शिवाजीची वीरासन घालून बसलेली पाषाणमूर्ति पोषाख घातलेलीच पाहायला मिळाली. मूर्तीपुढें एक म्यान केलेली तलवार टेकून ठेवलेली आहे. तिलाच तिथले लोक भवानी तलवार समजतात. या तलवारीला चिकटलेली एक आख्यायिका आहे. सतराव्या शतकांत सांख्यायनगोत्री सामंतघराणें कुडाळ प्रांतावर राज्य करीत होतें. तारा ही त्याची कुलदेवता. परुळ्याला तिचें मंदिर आहे. शिवरायानें जेव्हां तो प्रांत हस्तगत केला, तेव्हां या सामंतांनीं तारेच्या विशिष्ट बीजमंत्रानें भारलेली ही तलवार महाराजांना अर्पण केली. आणि तीच आजमितीस त्या मंदिरांत आहे.

संकपाळ हे इथले पुजारी. नवरात्रांत इथें महोत्सव होतो त्या वेळची एक गमतीची हकीकत तिथें राहिलेल्या एका गृहस्थांनीं मला सांगितली. अष्टमीच्या रात्रीं इथें कीर्तन होतें. त्या वेळीं एक वाघ्या आपल्या व्याघ्रचर्माच्या पिशवींत

भंडार भरून घेऊन तिथें बसलेला असतो. कीर्तनांतच एकदम त्याच्या अंगांत अवसर येतो. तो उठतो आणि घुमूं लागतो. लगेच कीर्तन थांबतें. श्रोते बाजूला होऊन त्याला वाट मोकळी करून देतात. तो त्या वाटेनें जाऊन गाभाऱ्यांत शिरतो. आपल्या पिशवींतला भंडार त्या तलवारीवर टाकतो. मग त्याला अधिकच अवसान चढतें. तो खुबळत बाहेर येतो. तिथें एका मोठ्या तोफेला सांखळदंड बांधून ठेवलेला असतो. वाघ्या त्याचें टोक धरून त्याला हिसडे देऊं लागतो. तोफ अवजड असल्यामुळें जाग्यावरच रहाते; पण सांखळदंड मात्र तो तोडतो. त्याचा तुकडा तुटून हातांत आला कीं मग वाघ्या बेशुद्ध पडतो. लगेच संकपाळ देवाचें तीर्थ आणून त्याच्यावर शिंपडतो. मग तो सावध होतो. उठून बसतो. लगेच पुंडलीकवरदेचा जयघोष करून हरिदास खंडित झालेली कथा पुनश्च सुरू करतो. तो तोडलेला सांखळदंडाचा तुकडा खांद्यावर टाकून तो वाघ्या मग वर्षभर भिक्षांदेहि करतो. तो तुकडा हें त्याचें भिकेचें भांडवल होतें.

या मंदिराच्या उत्तर अंगाला जवळच एक सांठवणीच्या पाण्याचें तळें आहे. तिथले चिरे काढून तटाला लावल्यामुळें तिथें जो एक मोठा खड्डा पडला, तोच आतां तळें म्हणून ओळखला जातो. तिथून सरळ दक्षिण दिशा धरली कीं प्रथम विहिरीवरचें शिवमंदिर भेटतें. एका सुंदर चौकोनांत ती विहीर आहे आणि तिच्यावर छप्पर आहे. आंत डोकावलें कीं तिचा तळ स्वच्छ दिसतो. तिला लागूनच शंकराची पिंडी आहे. त्याच पाण्यानें तिला नित्य स्नान होतें. तिथें जवळच आणखी दोन तीन बावी आहेत. त्या समुद्रवेष्टित भूभागांत गोड्या पाण्याच्या विहिरी असाव्या हें केवढें आश्चर्य !

तिथेंच जवळ जुन्या राजवाड्याची जागा दिसते. एक मोडका दरवाजा एवढीच आज त्याची सामक्षा आहे. त्याच्या पश्चिमेला शिवरायाची कुलस्वामिनी जगदंबा राहिली आहे. इथें ती ' भगवती ' या नांवानें ओळखली जाते. या देवळाचा जीर्णोद्धार झालेला आहे. किल्ल्यावरचा सुप्रसिद्ध दर्याबुरूज हिच्या मागेंच आहे. त्यावर उभें राहिलें कीं खालच्या अंगाला मोठा वळणावांकणाचा खोल खंदक दिसतो. त्याचा तळ म्हणजे समुद्रसपाटीच. पाणी आंत शिरत नाहीं तें केवळ समोरच्या तीस फूट उंच तटानें अडवलें आहे म्हणूनच.

पण समुद्राच्या लाटा इतकीं वर्षें कांहीं स्वस्थ बसल्या नाहींत. त्यांनीं दिनरात अविच्छिन्न धडका मारून पश्चिमेच्या बाजूला सुमारें दहा-बारा हात लांबीचा तट

पूर्णपणें पाडण्यांत यश मिळविलें आहे. त्या भगदाडांतून आतां प्रत्येक भरतीच्या वेळीं पाणी किल्ल्यांत शिरतें आणि ओहोटीच्या वेळीं ओसरतें. पावसाळ्यांत तर तिथें उतरायची सोयच नाहीं. एकंदरींत आज सगळ्याच तटबंदींत बिळें होऊं लागलीं आहेत. कांहीं चिरे पडले आहेत, कांहीं त्या पंथाला आहेत. सागर तर पुरातन वस्तूचा अभिजात प्रतिस्पर्धी. आणि आतां त्याच्या जोडीला माणसानेंहि तेंच कर्म आरंभलें आहे. तिथल्या मच्छीमार लोकांना आपल्या जाळ्याच्या कडेला शिशाच्या गोळ्या हव्या असतात. शिवरायानें पांच खंडी शिसें तटाच्या पायांत ओतलें आहे हें ठाऊक झाल्यावर त्यांनीं तें बाजारांतून काय म्हणून विकत आणावें ! दोन दगडांमध्यें थोडेंसें उकरलें कीं आयतें काम. भागतें. 'टाळूवरचें लोणी खाणें' ही म्हण पडली आहे ती अशाच वृत्तीला अनुलक्षून. आपल्याच निपणज्या-खापरपणज्यांनीं इथला एकेक चिरा उभारतांना घाम गाळला आहे हें जर त्यांच्या लक्षांत आलें असतें तर—

दर्याबुरुजावरून खालीं उतरून आम्ही दक्षिण तटावर चढलों. सिंधुदुर्गाच्या तटावर तुम्हांला कुठूनहि चढतां येतें. कारण बांधकाम करणाऱ्या स्थपतींनीं जागोजाग दगडी जिने ठेवलेले आहेत. त्यांना कठडे नाहींत; यामुळें सावकाश चढावें लागतें. तटाचा माथा सहा हात रुंद आहे. अर्धवर्तुळाकृति बुरूज भेटतात तेव्हां ही रुंदी आणखी वाढते. महाकाव्याचा एकेक सर्ग तसे ते बेचाळीस बुरूज वाटतात. आणि त्यांतला एकेक दगड म्हणजे कांतिमान् श्लोक. त्या पांढुरक्या दगडांवर एक विशिष्ट प्रकारची तांबूस झांक आहे. ते इतके स्वच्छ आणि तकाकते आहेत कीं, जणूं कालच त्यांची उभारणी करून गवंडी बाजूला झाला आहे. ते कणाकणानें झिजतील, बारीक होतील, पण मलिन मात्र कधींच होणार नाहींत. तीनशें वर्षें ज्यांनीं आपलें तेज राखलें, तें काय यापुढें मालिन्य स्वीकारतील ! 'प्राणान्ते ऽपि प्रकृतिविकृतिर्जायते नोत्तमानाम् !'

तटप्रदक्षिणा करीत असतां मी सहज एका बुरुजावरून बाहेरच्या अंगाला डोकावलों, तर माझ्या दृष्टीला वेधच लागला. तिथें कांहीं धारदार खडक पाण्यांत मांडले होते. त्यांचा रंग प्रवाळी होता. सागराच्या क्षुद्र लहरी त्यांच्या अंगावर बागडतांना मोत्यांचा चुरा पसरीत होत्या. त्यांच्या अंगाला जडलेलें शेवाळ तंतुमय होतें आणि त्याचा रंग अतिहिरवा होता. लाटांच्या आघातांनीं तें शेवाळ हळुवारपणें डोलें पण जागा मात्र सोडीत नसे. एखाद्या पालीसारखें तें खडकाच्या पाठीला

चिकटून घांस घेऊन बसलें होतें. तीन बाजूंनीं दरियाची निळावंती हेलावत होती. आणि या सगळ्या मनोज्ञ रंगसंगतीवर मावळतीकडे कललेला सूर्यनारायण सोनेरी ओप चढवीत होता. जगन्नाथपंडिताला गंगामैय्याच्या प्रवाहांतला मासा किंवा कांसव होऊन रहावेंसें वाटलें होतें तसेंच मलाहि अन्य कोणत्या तरी रूपानें त्या रंगाच्या खुलावटींत शिरून मनसोक्त डुंबावें असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

पश्चिमेच्या जिन्यानें आम्हीं तटाच्या मुळांत आलों आणि तिथल्या चौकोनी छिद्रांतून पलीकडच्या अंगाला वाळवंटांत उतरलों. तें वाळवंट लहानसेंच होतें. तांबडया भोपळ्याची फाक काढून आडवी ठेवावी तसा त्याचा आकार होता. वाळू ओलसर पण स्वच्छ होती. श्रमल्यामुळें सहजच तिथें हातपाय पसरावेसे वाटले. 'राणीच्या समुद्रस्नानाची जागा' म्हणून तें स्थान प्रसिद्ध आहे. ही राणी म्हणजे कोल्हापूरची ताराबाई. शाहू जेव्हां दिल्लीहून दक्षिणेंत आला, तेव्हां त्याच्या भयानें ती घाटाखालीं पळून आली होती आणि सहा महिने या किल्ल्याच्या आश्रयानें राहिली होती.

तिथून परत फिरतांना एका खोलगट भागांत उभे असलेले दोन मळीव चुन्याचे ढीग पाहिले. किल्ल्याला वापरून उरलेला हा चुना आहे आणि आज-मितीस त्याचा अभेद्य खडक बनला आहे. मला सहज त्याच्यावरून यज्ञावशिष्ट चरूची आठवण झाली. हाच चुना तटाच्या भिंतीवर थापतांना ओल्या स्थितींत शिवरायाची हस्तमुद्रा त्याच्यावर उठली. त्याच्या शेजारींच खालच्या बाजूला डाव्या पायाची निशाणीहि उमटली. तिथें काम करणारा गवंडी भाविक तसाच दूरदृष्टीचाहि असावा. त्यानें त्यावर हातांतली थापी न फिरवतां ते ठसे तसेच राहूं दिले. थोड्याच कालांत ते वाळले नि वज्रलेप झाले. मग लोकांनीं त्यांवर घुमट्या उभारल्या. सीतेनें आंगठ्यावरून दशशिर निर्माण केला होता असें सांगतात. शारीरशास्त्र अवगत असणारा शिल्पकार या दोन ठशांचीं मापें घेऊन तदनुरोधानें महाराजांची यथार्थ प्रतिमा बनवूं शकेल. त्या ठशांवरून वाटतें कीं, यवनपातशाह्यांना कृतांतकाळ ठरलेले शिवराज आंगाबांधानें सडपातळ आणि मध्यम उंचीचेच असावे. त्यांच्या अंगुली लांब सडक आहेत आणि तळपाय मधें पोकळ आहे. सामुद्रिक शास्त्र सांगतें कीं, हीं लक्षणें भाग्यवंताचीं आहेत. माझी भावुक दृष्टि त्या ठशांत कुठें पद्म-चक्रांच्या रेषाकृति दिसतात कीं काय तें

नकळत पाहून आली. गडाच्या ईशान्य अंगाला हे ठसे आहेत. तिथून एकच वळण घेऊन आपण महाद्वाराला लागून असलेल्या नगारखान्याशीं येतों.

सिंधुदुर्गांत एके काळीं पांचशें माणसें नांदत होतीं. आजमितीस त्यांतलीं अवघीं शेंदीडशें उरलीं आहेत. महाराजांनीं गडाच्या संरक्षणासाठीं कायमचे वस्तीकर आणून ठेवले होते, त्यांचेच वंशज आजमितीस तिथें आहेत. या लोकांचें उपाध्येपण आणि देवकृत्यें करण्यासाठीं त्यांनीं एक जोशीसुद्धां तिथें ठेवला होता. त्याचें नांव दादंभट. तो एका पायानें लंगडा असला तरी काळजाचा खंबीर होता. त्याची एक गोष्ट इथें सांगण्यासारखी आहे.

शिवछत्रपतीच्या कारकीर्दींत सिंधुदुर्गाची भरभराट होती. दादंभटाचा चरितार्थ जोसपणाच्या वृत्तीवर टुकीनें चालला होता. पण पुढें संभाजीच्या काळगर्तींत सगळें गाडें उलटलें. कोंकणांतला बहुतेक मुलूख मोंगलांनीं परत काबीज केला. सगळीकडे उद्ध्वस्तपणा आला. मोंगलांच्या भयानें माणसें स्थलांतर करूं लागलीं. कुडाळ प्रांतांत तर खूपच धामधूम झाली. खेमसावंत देसाई यांनीं स्वराज्याची निष्ठा मोडून मोंगलांचा अवलंब केला. मोंगलसरदारांना चूड दाखवून घरांत आणलें. सिंधुदुर्गावरहि त्यांची स्वारी झाली. त्यांनीं तिथलीं माणसें लुटून लुबाडून नागवीं केलीं. कित्येकांना धरूनहि नेलें. नारायण आणि रामेश्वर हीं दोन देवस्थानें तिथें गायींची हत्या करून भ्रष्टविलीं. किल्ल्यांत दाणा-गोटा येईनासा झाला. त्या वेळीं सिंधुदुर्गाचे मुद्राधिकारी रा. कृष्णाजी मोहिते हे होते. त्यांनीं दादंभटाची दुर्दशा पाहून त्याला म्हटलें,

'तूं ब्राह्मण म्हणजे एका पायानें क्षीण आहेस. तुझ्यावस्तु कुठें जावतें असें नाहीं. जंजिरामध्यें अन्नाचें दुर्भिक्ष जाहलें. वाणी उदमी उकडे तांदूळ आणतात ते ब्राह्मणाच्या उपयोगाचे नव्हत. तूं ब्राह्मण कर्नाटकास जाणार तर सुखरूप जाणें. आम्ही निरोप देत असों.'

त्यावर आतां दादंभटाचें उत्तर ऐका.

"तुमचें बरें चाललें होतें, तोंवर तुम्हीं माझें कांहीं उणें पडूं दिलें नाहीं. मग तुमच्यावर संकट आल्यावेळीं कातडी बचावण्यासाठीं तुम्हांला सोडून पळून जावें हें योग्य नव्हे. इथलें उपाध्येपण इथें राहून चालवीन असें मीं महाराजांना वचन दिलें आहे. मी त्याला बट्टा लावणार नाही. जी गत तुमची तीच गत माझी!"

दादंभटाचे हे बोल म्हणजे एकवचनी रामाचे बोल वाटतात. केवढें सत्त्वधैर्य

दाखवलें त्यानें! ते शब्द ऐकून तिथल्या शिपायांच्या डोळ्यांत पाणी आलें. त्यांनीं दादंभटाला कधींच अंतर दिलें नाहीं.

आतां सूर्य खूपच खालीं उतरला होता. लहरत्या सागरावर त्याचा लांबच लांब प्रकाशपट्टा पसरला होता. हेमंत आपल्या शीतास्त्राचा मंत्र जपूं लागला होता. झाडामाडांच्या छाया भुतासारख्या दिसूं लागल्या होत्या. आतां लवकर परत फिरणें इष्ट होतें. किनाऱ्यावर येतों तर आमचा नावाडी तिथें गुहकाच्या डोळ्यांनीं मार्ग प्रतीक्षीत उभा होता. 'The River past and God forgotten' असें आमचें झालें होतें. पण त्याच्या होडीचा आश्रय घेतल्याविना आमचे पाय मालवणच्या किनाऱ्याला लागलेच नसते.

बंदरधक्क्यावर येऊन आम्हीं पुन्हा एकदां सिंधुदुर्गाचें सिंहावलोकन केलें. तिथून फक्त तट दिसत होता आणि आंतल्या माडांचे हिरवे शेंडे. बारक्या होड्या आणि शिडाचीं गलबतें त्याच्या परिसरांत फिरत होतीं. भोंवतीं दरिया नाचत होता. मला वाटलें, हा दुर्ग नव्हेच. हें सागरांत उमललेलें हिरव्या केसरांचें कृष्णकमळ आहे. शिमगा सरतो; कवित्व उरतें. तसेंच माणूस जातो; त्याची भलीबुरी कृति उरते. महाधोरणी पुरुषाचें महत्कृत्य म्हणजे सिंधुदुर्ग. सर्व बाजूंनीं पीछेहाट झाली तरी अखेरचें आश्रयस्थान आणि संग्रामस्थान म्हणून शिवरायानें हा किल्ला निर्माण केला. त्याच्याविषयीं चार ओळी बखरींत लिहितांना चित्रगुप्ताचा ऊर भरून आला आहे.

"चौऱ्यांयशीं बंदरांत हा जंजिरा मोठा. अठरा टोपीकराचे उरावर शिवलंका अजिंक्य जागा निर्माण केला. सिंधुदुर्ग जंजिरा जगीं अस्मानी तारा, जैसें मंदिराचें मंडन श्रीतुलसीवृंदावन, राज्याचा भूषणप्रद अलंकार, चतुर्दश महारत्नांपैकींच पंधरावें रत्न महाराजांस प्राप्त झालें."

## २.

# विजयदुर्ग

मालवणहून विजयदुर्गाला जाण्यासाठीं पडावांत बसलों आणि आभाळांत सूर्य तापूं लागला. अकरा वाजतां आमचे पडाव सुटले. वस्तुतः ते आणखी पंधरा मिनिटें उशीरांनीं निघाले असते तरी चाललें असतें. कारण बोट समोर दिसत असली तरी तिचें वळण पुरें होऊन नांगराचा सांखळदंड खडखडां सुटायला अजून अवकाश होता आणि नांगर तळाच्या वाळूंत रुतला तरी डोलकाठीवर निळा बावटा चढेपर्यंत पडावांना बोटीच्या अंगाला बिलगायला बंदी होती. त्यामुळें आम्हां पडावांतल्या सानथोर उतारूंना एका जागीं डोलत, डचमळत घाम फुटेपर्यंत सूर्यस्नान करावें लागलें.

पण त्यामुळेंच बोटीवर पाय ठेवतांच तिच्या सावलीची खरी किंमत आम्हांला कळली. सावलीचीच कशाला, अन्नाची किंमत कळायलासुद्धां आधीं घाम गाळावाच लागतो. वर चढतांच आधीं पथारी पसरली; पण बसावेंसें वाटेच ना. कुठल्या लोकींचा उल्हास वाऱ्याच्या वाहणींतून माझ्या हृदयांत शिरला होता नकळे! शरिरांतला अणून् अणु फुलला आहे, मनाचा पदरन् पदर उलगडला आहे, असें कांहीं तरी वाटूं लागलें. असा अनुभव क्वचितच घडतो. भोंवतींचें सारें दृश्य आणि श्राव्य नाटक तटस्थपणें पाहण्याची माझी वृत्ति कुठें पसार झाली कोण जाणे! मी आमच्या बोटीचे खालचे-वरचे दोन्ही मजले फिरलों. दूर जाणारें मालवण, लहान होणारा सिंधुदुर्ग आणि किनाऱ्यावरच्या नारळींच्या बागा, वेग-वेगळ्या जागांवरून पाहिल्या आणि अखेर किनाऱ्याच्या बाजूनें कठड्याला टेकून उभा राहिलों.

आगबोट खडकाळ भागांतून अंग चोरीत वाट काढीत होती. अधून मधून तरते दीपस्तंभ आणि कांहीं दगडांचीं डोकीं पाण्यावर दिसत होतीं. किरी नांवाचे बरेच पक्षी समुद्रांत तिथवर येऊन त्या दगडांवर गर्दी करून बसले होते.

कबुतराच्या आकाराचा हा पक्षी वर्णानें शुभ्र खरा; पण त्याला अधिक आकर्षक करण्यासाठीं विधात्यानें त्याच्या पंखांवर हळूच एक निळी कुंचली ओढली आहे. मानेवरचा तुराहि तसाच शबल; पण तो मोराच्या तुऱ्याप्रमाणें उभा नसून मागच्या बाजूला झुकलेला दिसतो. हा समुद्रांत लांबवर जातो. कधीं सागरपृष्ठावर घिरट्या घालीत रहातो, तर कधीं लाटांवर अलगद तरंगतो. त्याच्या सगळ्या हालचाली ऐटबाज असतात आणि त्या मत्स्यवेधासाठीं चाललेल्या असतात. मासा मिळाला कीं चालला किनाऱ्याकडे. माणसाच्या गळ्यांत जर माशाचा कांटा अडकला, तर या पक्ष्याची चोंच उगाळून पाजतात. तात्काळ त्या कांट्याचें पाणी होतें म्हणे !

समुद्र आज मजवर प्रसन्न होता. आपल्या जामदारखान्यांतील कांहीं अलौकिक चिजा त्यानें आज मला दाखवायचें मनांत आणलें होतें. मध्येंच एखादा मासा डोकें पाण्यावर काढी, आपलें चांदीचें पोट लख्खकन् दाखवी आणि झटक्यांत उलटा होऊन पुनश्च त्या अठावांत बुडी देई. माशांना वल्हवण्याचे पंख असतात हें मीं पाहिलें होतें; पण एका विशिष्ट जातीच्या मासोळ्यांना उडण्याचेहि पंख असतात, हें दृश्य मला नवीन होतें. भिंगुरटीसारख्या दोन मासोळ्या जोडीनें पाण्यांतून वर उठल्या आणि जोडीनेंच पांच-सहा हात उडत पुढें जाऊन पुन्हा जळांत घुसल्या. दोन-चार वेळां हा प्रकार मीं पाहिला. आणि मग ठरविलें कीं, यांना उडतां येत असलें तरी तें सरळ रेषेंत. आडवें तिडवें उडण्याची कळ यांच्या पंखांत नाहीं. हरितनील असे आणखी एका जातीचे मासे थव्याथव्यांनीं हिंडतांना दिसत आणि बोटीचें तें अवाढव्य परचक्र अंगावर यायला नको म्हणून द्रुतगतीनें दूर पळत.

तसाच तो आणखी एक मासा. दिवडासारखा लांब आणि निमुळत्या तोंडाचा. बोटीनें बाजूला फेकलेल्या पाण्याचा तडाखा त्याच्यावर बसला कीं काय नकळे ! तो एकाएकीं शेपटीवर उभा झाला आणि तशा स्थितींतच पळत सुटला. थोड्या अंतरावर पुन्हा त्यानें पाण्यांत सूर मारली. पुन्हा शरीर उभें ताठ केलें. त्याच्या वेगवान् गतीनें पाण्यावर क्षणाक्षणाला तुषार उडत राहिले. सुमारें पंचवीस हात असा तो केवळ शेपटीवर उभाच्या उभा पळाला आणि मग अदृश्य झाला. समुद्र म्हणजे ठाव न लागणारें अपरंपार पाणी एवढेंच आपण समजतों. पण तें समजणें अल्प आणि एकांगी आहे. समुद्र म्हणजे पाण्याखालची विचित्र, अगण्य,

अद्भुत अशी एक वेगळी सृष्टि आहे. पाणी हें तिचें जीवन आणि तेंच आवरण. जसें स्थलचरांना आकाश; तसें.

दुपारीं चाराच्या सुमाराला विजयदुर्ग बंदर आलें. प्रथम दिसला तो किल्लाच. त्याची पश्चिमेकडची सबंध आडवी तटबंदी आणि उंच, सुबद्ध बुरूज आमची दृष्टि अडवून उभे राहिले. किल्ल्याचा रुबाब कांहीं न्याराच दिसला. सुरक्षितता, सौंदर्य आणि सुश्लिष्टता अशा तिन्ही दृष्टी जागृत ठेवून त्याची बांधणी झाली आहे, हें सकृद्दर्शनींच कळून आलें. वाटलें कीं, हाहि किल्ला सिंधुदुर्गाप्रमाणेंच समुद्रवलयांकित असावा. पण तें वाटणें खरें नव्हतें, हें बोट वाघोटनाच्या खाडींत शिरली तेव्हां कळलें.



विजयदुर्गाची एक बाजू

या खाडीच्या दक्षिणेस एक मोठें टेकाड भाल्याच्या फाळासारखें समुद्राच्या पोटांत घुसलें आहे आणि त्याच्या टोंकावर हा किल्ला बांधलेला आहे. बोटीचा धक्का किल्ल्याच्या तटाला लागूनच आहे. पाणी बरेंच खोल असल्यामुळें बोट अगदीं धक्क्याजवळ येऊन उभी राहते. पडावांत नाममात्र बसायचें आणि उतरायचें. आम्ही उतरलों तेव्हां सूर्य किल्ल्याच्या तटाआड झाला होता. झाडामाडांच्या सांवल्या बंदरावर उतरल्या होत्या. एक सुंदर अर्धवर्तुळ घेऊन आम्हांला खाडीकांठानें अगदीं जवळच जायचें होतें. श्री. शामराव परुळेकर यांचें

धवळार ही आमची मुक्कामाची जागा ठरली होती. आम्हांला त्यांनीं माडीवरच्या सुसज्ज दिवाणखान्यांतच उतरवलें. ताजातवाना होऊन मी सज्जांत येऊन उभा झालों. समोरच्या भव्य मनोज्ञ दृश्यानें मला तिथें खेंचून आणलें म्हटलें तरी चालेल.

माझ्यापासून अवघ्या पांच हातांच्या अंतरावर ती वाघोटनची खाडी पसरली होती. तिच्या पैलतीरावरचे डोंगर इतके ठेंगणे दिसत होते कीं, जणूं प्राचीन नरपतींच्या उद्यानांतले क्रीडापर्वतच. यावरून खाडीच्या विस्ताराची कल्पना करावी. ती वाहात आहे म्हणावें तर प्रवाहाची दिशा कळत नव्हती. स्तब्ध आहे म्हणावें तर पाण्याची उचंबळ अखंड चालू होती.

'शैलाधिराजतनया न ययौ न तस्थौ'

या कविकुलगुरूंच्या शब्दांतच तिचें वर्णन करावयाला हवें असें मला वाटलें.

पाण्याला ओहोट होती. त्या अर्धवर्तुळाकार किनाऱ्याला मध्यभागीं सुपाच्या आकाराची जागा कोरडी झाली होती. दोन होड्या तिथें उभ्या राहून त्या जागेवर मारून आणलेल्या शिकारीची रास घालीत होत्या. एखाद्या बांधकामावर गाडी-वाल्यानें 'लाभ ऽ ऽ दोन ऽ ऽ' म्हणत विटांच्या जोड्या उचलून फेकाव्या, तसे ते कोळी माशांच्या त्याच वजनाच्या गुबगुबीत जोड्या कोरड्या जमिनीवर टाकीत होते. रास चढत होती, घरंगळत होती. जगांत जिथें जित्या जिवांची कदर उरली नाहीं, तिथें मेलेल्यांचा कोण केवा! भरतीच्या ताणावर मच्छीमारीला गेलेल्या होड्या ओहोटीच्या पाण्यावर सुखेनैव परतल्या होत्या. त्यांचा त्या दिवशींचा कार्यभाग साधला होता. त्यांनीं आपलीं शिडें आवरलीं होतीं. रिकाम्या झालेल्या होड्यांची माझ्या समोरच रांग लागली होती. त्या हेलावत होत्या. लाट आली कीं एकमेकींना भेटत होत्या. खट्ट असा ध्वनि उठवीत होत्या. आणि पुन्हा विलग होत होत्या.

"हिरव्या तटिं नांवांचा कुष्णमेळ खेळे"

ही कवि बोरकरांची काव्यपंक्ति तिथें विराजली होती. फरक एवढाच तिथला तट हिरवा नसून तांबडमातीच्या रस्त्याचा होता.

कांहीं होड्यांतून धूर निघत होता असें मीं म्हटलें तर कोणी आग लागल्याचा संशय घेऊं नये. तो चुलींतला धूर होता. नाळीजवळ ठोकलेल्या फळ्यांवर मांडलेल्या चुलीवर त्यांची भाताची हंडी चढली होती. मागच्या अंगाला उभारलेल्या

ठेंगण्या छपराखालीं त्यांची निजायची जागा होती. विश्रांतीची, पान-तंबाखू खाण्याची जागाहि तिथेंच डोलकाठीच्या मुळाशीं. होडी हेंच त्यांचें घर; पण स्थावर मात्र नव्हे. जाळीं आणि गळ हीं त्यांचीं उपकरणें. माशांचें महामूर पीक पिकवणारा दरिया हें त्यांचें शेत. समुद्रावरच त्यांचा सारा जन्म जायचा. किनाऱ्यावरचें खोपट म्हणजे कधींमधीं टेकण्याची जागा. त्यांच्या गळाला अडकणारे मासे हे वेडे जळचर, तर त्यांची रास घालणारे कोळी हे शहाणे जळचर. भक्ष्य आणि भक्षक एवढाच त्यांच्यामध्यें फरक.

बरोबरची मंडळी पांचाच्या सुमाराला तयार झाली. अंधार पडायला अजून दीड तासाचा अवधि होता. तेवढ्यांत विजयदुर्ग पाहून परतणें सहज शक्य होतें. 'चला, प्रकृतमनुसरामः' म्हणून मीं सगळ्यांना बाहेर काढलें. अर्ध्या फर्लांगावर बंदराच्या वरच्या अंगानें आम्ही तटांत शिरलों. इथें संगमाच्या बाजूनें किल्ल्याला तिहेरी तटबंदी आहे. पहिला तट पाण्याच्या कांठाकांठानें जातो. हा उंचीला वामनमूर्ति आणि बहुतेक पडलेला आहे. त्याच्या आंतल्या तटाला खंदकाचा तट म्हणायचें. आणि तिसरा मुख्य तट तो किल्ल्याच्या अंगाचा. सहस्राक्ष इंद्राप्रमाणें त्याच्या अंगाला ठायीं ठायीं खतें पडलेलीं आहेत. शत्रूच्या गलबतांतून तोफांचे गोळे येऊन आदळले, त्याच्या त्या खुणा आहेत. भीष्माचार्यांच्या अंगावर शिखंडीचे बाण जसे कुचकामी ठरले, तसेच हे गोळे या किल्ल्याच्या अंगावर! त्यांच्या आघातानें त्याचा रोमहि वांकुडा झाला नाहीं. ते नुसते शिवले, खालच्या खंदकांत पडले आणि निवले. तटाला खिंडार पाडण्याचें कार्य त्यांच्या हातून झालें नाहीं तें नाहींच.

सिंधुदुर्गाप्रमाणेंच इथला महादरवाजाहि तट आंत वळवून लपवल्यागत बांधलेला आहे. धोरण हें कीं, शत्रूची बातेरी त्याला बाधूं नये. किल्ल्यांत शिरल्यावर दरवाजापर्यंत जाणारा रस्ता रुंद आणि सौम्यशा चढावाचा आहे. दरवाजाच्या माथ्यावरच एक जुना दिवाणखाना आहे. पण हल्लीं ती जागा धरून आणलेल्या गुन्हेगारांना एक रात्र डांबून ठेवण्याचें ठिकाण म्हणून उपयोगांत आणतात. त्या दृष्टीनेंच हल्लीं तिची बंदिस्ती केलेली आहे. आंत शिरतांच समोर लागतात त्या पोलिस शिपायांच्या खोल्या. त्यांच्या जवळच वृक्षांच्या घनदाट सावलींत एक चिरेबंदी धान्याचें कोठार आहे. हल्लीं त्यांत सरपण सांठवलें जातें. कालमान बदललें कीं वस्तूंचे विनियोगहि बदलतात ते असे. ज्या तोफांनीं गाड्यावरून

मिरवीत जाऊन शत्रूवर आग ओकायची, त्यांनाच जमिनींत उलट्या उभ्या पुरून खांबासारखा त्यांचा उपयोग केला जावा, हा जसा कालविपाक तसेंच या कोठारांचें.

तिथून पुढच्या चढावाला लागलें कीं उजव्या अंगाला आणखी एक लांबच लांब कोठार आहे. कदाचित् ती जुनी घोड्यांची पागा असावी. तिथून पुढें किल्ल्यांतली सपाटी लागते. वाऱ्याचा मुक्तछंद सुरू होतो. प्रकाशाचा थर सर्वत्र सारख्या प्रमाणांत पसरतो. आपण समुद्रतळापासून शंभर फूट उंच चढतों. तिथेंच कांहीं जुने चौथरे दिसतात. त्यांच्या कडा मोडल्या आहेत. वर झुडुपांनीं बोटहि रिगूं नये अशी गर्दी केली आहे. स्वराज्याच्या काळांतली ही कारकुनांच्या फडाची जागा. इथें रोजकीर्दी लिहिल्या जात, ताळेबंद मांडले जात. पेशव्यांच्या दरबारीं थैलीबंद पत्रें रवाना होत. गडावरचा सगळा कारखाना इथूनच चाले.

या फडाच्या पलीकडच्याच अंगाला सिमेंटनें बांधलेले समतळ लंबचौरस कट्टे दिसतात. १८९८ सालीं श्री. लॉकियर या पाश्चात्य ज्योतिर्विदाच्या दुर्बिणी यांच्यावर उभ्या झाल्या होत्या. त्या सालीं खग्रास सूर्यग्रहण होतें आणि तें या स्थळाच्या अंक्षांशावर विशेष चांगलें दिसणार होतें. तेजोनिधि सविता खग्रास झाल्याशिवाय इतर वेळीं आपणाकडे डोळा रोखूंच देत नाहीं. जें कांहीं त्याचें संशोधन करायचें असेल तें ग्रहणाच्या वेळीं. पण अशी पर्वणी चंद्रग्रहणाइतकी स्वस्त नसते. त्यामुळें आकाशाकडे डोळे लावून बसणारे ज्योतिर्वेत्ते अशा संधी-साठीं हपापलेले असतात. लॉकियरहि त्यांतलाच एक होता. त्यानें एक महिना आधीं इथें येऊन आपली छावणी उघडली होती. आणि तो दूरदर्शी रोखून स्पर्शकाळाची वाट पाहत राहिला होता.


पूर्णचंद्रानें सूर्यबिंबाचें आच्छादन पुरें केलें कीं त्याच्याभोंवतीं एक प्रकाशाचें वलय दिसूं लागतें. त्याच्या आंतला भाग आरक्त आणि बाहेरचा छानदार मोतिया रंगाचा असतो. सूर्याचा किरीट ( Corona ) म्हणतात तें यालाच. हें वलयहि सूर्याप्रमाणेंच जळतें–उकळतें असतें. त्यांतून तांबूस–गुलाबी ज्वालांचे लाख लाख मैल उंचीचे लोट उसळतात तीं सूर्याचीं तेजःशृंगें. या सगळ्या सौर घडामोडींचा शोध घ्यायला खग्रास ग्रहणावांचून दुसरी संधि नाहीं.

तिथून थोड्याच अंतरावर पश्चिम अंगाला एक भली भक्कम कोठी आहे. तिला तळघर आहे आणि वर चढायला बाहेरच्याच बाजूनें दगडी जिना आहे. दुसरा

२९९६३

मजला पब्लिक वर्क्स खात्यानें सुखसोयींनीं सजवून ठेवला आहे. इंग्रजी अमदानींत सरकारी बडे अधिकारी विजयदुर्गाला आले कीं तिथें वस्ती करीत. हिच्या शेजारींच एक मोठा थोरला चिरेबंदी हौद आहे. पण आंत पाण्याचा मात्र टिपूससुद्धां नाहीं. पूर्वकाळीं त्यांत पाण्याची साठवण करीत कीं काय नकळे !

इथून किल्ल्याच्या पूर्वद्वारावरचा बुरूज चांगला दिसतो. तो तिमजली असल्यामुळें दर्शनीयहि वाटतो. असे आणखी दोनतीन बुरूज इथें आहेत. कांहींच्यावर चढतां येतें आणि कांहींची ती वाट मोडली आहे. आम्ही एकावर चढलों आणि इतरांची कल्पना केली. 'स्थालीपुलाकन्याय' शिकायचा तो अशा वेळीं उपयोगांत आणण्यासाठींच.



कोठी आणि हौद

हौदाकडून आम्ही खालीं खंदकांत उतरलों आणि तिथून पश्चिम तटावर आरूढ झालों. याच वेळीं भगवान् सविताहि पश्चिम क्षितिजाच्या तटावर टेकला होता. पण त्याला समुद्रांत बुडायचें होतें, तर आम्हाला नुसता दमट, ओलसर खारा वारा सेवन करीत, निळ्या दरियाचें प्रदोषतांडव पाहत, पश्चिमदिग्वधूनें पालथ्या

केलेल्या गुलालाच्या हंड्यांतले रंगप्रवाह निरखीत कोरड्या अंगानें परत मुक्कामाला जायचें होतें. सूर्याला दोन नव्हेत, चार नव्हेत, तर सहस्र 'कर' आहेत. पण पडत्या काळीं त्याला एकाचाहि आधार घेतां येत नाहीं. एकावरहि भार घालून आपलें पतन थांबवतां येत नाहीं. केवढें हें दुर्भाग्य! पण आम्ही मात्र केवळ दोन हातांनीं आपला तोल सांवरीत तटावरून लांबवर परिभ्रमण करणार होतों.



तट आणि खंदक

ज्या तटावरून आम्ही जात होतों तो दहाबारा फूट रुंद होता. उजव्या हाताच्या खंदकांत वड अन् बोरी वाढलेल्या होत्या. तटाला ठायीं ठायीं मारगिरीसाठीं लहानमोठ्या जंग्या ठेवलेल्या पाहिल्या. पहिल्या प्राकारांतून लांब अंतरावरच्चीं गुरबा, दुधोसी असलीं जहाजें तोफेनें उडवायच्चीं आणि दुसऱ्यांतून तटाखालीं पोंचलेला गनीम बंदुकीनें टिपून मारायचा. प्रत्येक बुरुजावर बसण्यासाठीं दगडी सोपा आणि पाण्याची डोण आहे. ही बहुधा पहारेकऱ्याची सुखसोय असावी.

सिंधुदुर्गाप्रमाणेंच इथेंहि समुद्र तटाबुरुजांना मुळांत धक्के देत असतो. पण इथें एक विशेष कळाशी दिसली. प्रत्येक बुरुजाखालीं बऱ्याच मोठमोठ्या धोंडी पडलेल्या आहेत. त्या मूळच्या तिथल्या नव्हेत. बाहेरून आणून त्यांची तिथें रास घातलेली असावी. हेतु हा कीं, लाट त्यांच्या अंगावर फुटावी अन् बुरुजाला इजा पोहोंचूं नये. पण आज शेंकडों वर्षांनंतर त्यांतले कांहीं बुरुज तळाशीं पोखरले आहेत आणि एका ठिकाणीं तर तटालाहि खिंडार पडून त्याची कोसळती कमान बनली आहे. एकंदरींत बोलायचें तर किल्ल्याची प्रत्येक बाजू आपल्यावरून दुरुस्तीचा हात फिरविण्याची अर्जी करीत आहे.

शिलाहारांच्या अमदानींत जन्माला आलेल्या या पुराणपुरुष किल्ल्याची शिवरायानें काय 'अपूर्वाय' केली असेल तेवढीच. सिंधुदुर्ग निर्माण करण्याच्या पूर्वीं अकरा वर्षें त्याचें याच्याकडे लक्ष गेलें होतें. आरमारी दृष्टीनें याचें महत्त्व ओळखून त्यानें याची डागडुजी केली होती. इथला तिहेरी तट, मजल्यांचे बुरूज आणि आंतल्या इमारती ही सर्व उभारणी शिवाजीच्या हातची आहे. १६६४ त मराठ्यांच्या आरमाराची प्राणप्रतिष्ठा झाली ती इथेंच. वाघोटनच्या खाडीनें हा बहुमान मिळवला हें तिचें सौभाग्य.

पुढें या भागांत आंग्र्यांची सत्ता सुरू झाल्यावर त्यांनीं इथें एक गोदी निर्माण केली आणि तिच्यांत लढाऊ जहाजें बांधण्याचा कारखाना सुरू केला. ही गोदी खाडीकिनाऱ्याला विजयदुर्गापासून दोन मैलांवर आहे. तिच्यासाठीं एक डोंगरटेकडीच पोखरून काढली आहे म्हणा ना! तीनशें पंचावन्न फूट लांब आणि दोनशें सत्तावीस फूट रुंद असें तिचें मोजमाप आहे. प्रवेशद्वार उत्तरेला असून तें जांभ्या दगडांनीं बांधून काढलेलें आहे. पांचशें टनी जहाजें त्यांतून सहज यातायात करूं शकत. 'पडला तरी वैराटगड' म्हणतात ना! त्याप्रमाणें आजच्या भग्न, उपेक्षित अवस्थेंतहि ती गोदी त्या काळांतल्या लोकांचें दर्यावर्दीपणाचें ज्ञान किती प्रगत होतें याची साक्ष उत्तम पटवते.

मराठ्यांच्या या आरमारांत त्या काळीं वीसपासून दीडशें टनांपर्यंत वजनाचीं जहाजें होतीं. एका डोलकाठीचीं पंचायशीं, तीन डोलकाठ्यांचीं तीन आणि इतर अशींच लहानमोठीं. पुढें पुढें तर याहून अजस्र अशीं गलबतें बांधण्यांत आलीं. महाराजांच्या वेळीं इब्राहिम दौलतखान हा आरमाराचा प्रमुख होता. शिवराय

जात-धर्म पाहत नसे, तर गुण आणि निष्ठा पाहत असे, याचें हें मोठेंच गमक आहे. ' गुणाः पूजास्थानम् ' हें त्याचें व्यवहारसूत्र होतें.

शिवरायाच्या पश्चात् १६९८ सालीं कान्होजी आंग्रे हा आरमाराचा मुख्य झाला. दीडशें मैल लांब आणि पन्नास मैल रुंद अशा या कोंकणपट्टीवर त्यानें पुढें वीस वर्षें अनियंत्रित सत्ता गाजवली. औरंगजेबानें देशावर हैदोसदुल्ला घातला, गडामागून गड सर करण्याचा सपाटा लावला; पण कान्होजीपुढें कोंकणांत त्याचें कांहीं चाललें नाहीं. परदेशी व्यापारी कंपन्या त्याला थरकांप भीत. कान्होजी समुद्रांतून जाणारीं गलबतें टेहळी, त्यांना अडवून त्यांची कसून झडती घेई, त्यांच्याकडून चौथ वसूल करी आणि मगच त्यांना ' कौल ' देई. त्या वेळीं इंग्रजांचा गव्हर्नर बून नांवाचा होता. कान्होजीच्या भयानें त्याला स्वतःचें आरमार उभें करावें लागलें. हजाराच्यावर त्यानें खलाशी योद्धे तयार केले आणि आंग्र्यांचा पाडाव करण्याची संधि साधण्यासाठीं तो बिथरलेल्या वाघासारखा टपून बसला. हवें होतें तें निमित्त कान्होजीनें १७१७ त त्याला दिलें. इंग्रजांचें ' ससेक्स ' नांवाचें जहाज त्यानें अडवून बंदरांत आणलें. बून खवळला. त्यानें आपलें सगळें आरमार विजयदुर्गावर लोटलें. शिवाय जमिनीच्या बाजूनें घोडेस्वार घातले. बूनचा तोफखाना गर्जू लागला. तटावर गोळे आदळू लागले, पण तट भंगला नाहीं आणि कान्होजीहि खचला नाहीं. त्यानें हें परचक्र बैलानें अंगावरच्या माशा वाराव्या तसें झाडून उडवलें. बून हात दाखवून अवलक्षण झाला. त्याचें अतोनात नुकसान झालें.

बूननें ती डूख धरली. तीन वर्षेंपर्यंत तो पुटपाकासारखा आंतल्या आंत कढत होता. १७२० सालीं त्यानें विजयदुर्गाची पुन्हा खोडी काढली. मात्र ती एकट्यानें नव्हे; तर फिरंग्यांना मदतीला बोलावून. हा जोडहल्लाहि कान्होजीनें रणधीर अर्जुनाच्या सव्यसाचित्वानें परतून लावला. १७२४त डचांचें आरमार विजयदुर्गाला भिडलें; पण त्यालाहि विजयाचा तुरा लावतां आला नाहीं. कान्होजी हयात असेतां कोंकणकिनाऱ्याला गोऱ्या पायांचा स्पर्श झाला नाहीं.

मानाजी आणि तुळाजी हे दोघे त्याचे पुत्र. पण बापाच्या पश्चात् ते भीमार्जुन न ठरतां सुंदोपसुंद ठरले. तुळाजीनें मानाजीच्या तोंडाला पानें पुसून विजयदुर्गासह सारें आरमार आपल्या ताब्यांत घेतलें. कोंकणावर त्याचें अधिराज्य सुरू झालें. तुळाजी हा आरमारी युद्धांत वाघ होता. कोणतेंहि शत्रूचें जहाज त्याच्या दृष्टींतून निसटत नसे. इंग्रज कावून गेले; पण उपाय चालेना. ते फक्त तुळाजीच्या

मराणाचीच वाट पाहत राहिले. तुळाजी हा निमगोरा, उंच आणि रुंद छातीचा होता. त्याच्यासमोर उभें राहणें हें कचदिलाचे काम नव्हतें. इंग्रजांनीं त्याचा विलक्षण धसका घेतला होता. एका इंग्रजानेंच हें लिहून ठेवलें आहे. शाहू-महाराजांनीं याला सरखेल ही पदवी बहाल केली होती.

तो शत्रूवरच जरब ठेवीत होता, तोंवर ठीक होतें. पण पुढें याच्या मस्तीची मजल धन्यावरच उलटण्यापर्यंत गेली. त्यानें पेशव्यांशीं वैर धरलें. तो स्वतःला पेशव्यांचाहि पेशवा समजूं लागला. तो आपणांस मोजीत नाहीं हें पाहून पेशव्यांनीं त्याचा असंतुष्ट भाऊ मानाजी यास हाताशीं धरलें. त्याच्यावर घसरायला निमित्त काढण्यांत आलें तें पुढीलप्रमाणें—

रत्नागिरीचा किल्ला हा बावडेकर अमात्यांचा होता; पण तुळाजी तो बळकावून बसला होता. पेशव्यांनीं तुळाजीकडे त्याची मागणी केली. पण तुळाजीनें महा-भारत ऐकलें होतें. दुर्योधनाचें उत्तर त्याला तोंडपाठ होतें. त्यानें पेशव्यांना तें सुनावलें. 'किल्ला कुठला; सुईच्या अग्रावर राहील एवढी मातीसुद्धां देणार नाहीं!' कान्होजी पेशव्यांना सालाची खंडणी भरी तीहि त्यानें बंद केली. आपण नाम-मात्रसुद्धां कोणाचे अंकित नाहीं, हें त्याला दाखवायचें होतें. पेशव्यांनीं वसुलीसाठीं वकील पाठवले तर या उन्मत्तानें त्यांचीं नाकें कापून त्यांना परत धाडलें. एवंच, पेशव्यांच्या दृष्टीनें तुळाजी असुर मातला. त्याला ताळ्यावर आणणें अत्यावश्यक होतें; पण पेशव्यांच्या पदरीं तेवढें बळहि नव्हतें आणि आत्मविश्वासहि नव्हता. आणि याच कारणामुळें इतिहासाची पुनरावृत्ति झाली. पृथ्वीराजाविरुद्ध महंमद घोरीची मदत मागण्याची 'जयचंदी घोडचूक' पेशव्यांनीं कळत असो, नकळत असो, पण केली. त्यांनीं तुळाजीविरुद्ध इंग्रजांना हाकारून बाहिलें.

इंग्रज तरी त्याचीच वाट पाहत होते. ते 'परोपकार' करायला एका पायावर सिद्ध झाले. इंग्रज आणि पेशवे यांचें संयुक्त सैन्य १७५६ त तुळाजीविरुद्ध उठावलें. ॲड्मिरल वॅाट्सन् समुद्रांतून आणि कर्नल क्लाइव्ह खुष्कीच्या मार्गानें विजयदुर्गावर चाल करून आले. तुळाजीनें आपल्या आरमारानिशीं युद्धाला तोंड दिलें. पण या वेळीं त्याची ग्रहदशा फिरली होती. त्याचीच नव्हे; तर मराठ्यांच्या स्वराज्याचीसुद्धां असें मी म्हणतों. इंग्रजांच्या तोफा किल्ल्यावर आणि आंग्र्यांच्या आरमारावर आग पाखडूं लागल्या. गलबतें पेटूं लागलीं. किल्ल्यांतल्या इमारतीहि धडाधड जळूं लागल्या. तुळाजीला लाक्षागृहात सापडल्या-

सारखें झालें. या वेळीं मात्र तो खचला. परचक्र अनावर समजून त्यानें तें आगींतलें सत्ता-वैभव मानाजीच्या स्वाधीन करून पळ काढला. थोडीं थोडकीं नव्हेत; तर एकूणसत्तर गलबतें त्या सत्रांत अग्नयेस्वाहा झालीं. तुळाजी नेस्त-नाबूत झाला हें खरें; पण शिवरायानें बलाढ्य खटाटोप करून राज्याच्या बळकटी-साठीं उभारलेल्या एवढ्या प्रचंड आरमाराचे कोळसे झाले त्याची वाट काय ? पेशव्यांनीं काय केलें तर उंदराच्या रागानें घर जाळलें, असेंच कोणीहि या प्रकारा-वरून म्हणेल. आरमार जळालें त्याच क्षणीं इंग्रजांना वाटणारा वचकहि संपला. थोड्याच कालांत कोंकण किनाऱ्यावर त्यांचा वरचष्मा सुरू झाला. मराठी राज्याच्या मरणाचें तें पहिलें अवचिन्ह ठरलें.

'अखिलं हि हिनस्ति भूधरं
तरुशाखान्तनिघर्षजोऽनलः'

वृक्षशाखांचा आपसांत संघर्ष होऊन एकदां ठिणगी पडली कीं सगळा डोंगर वणवतो, नाश पावतो, हें भारवीचें वचन पुन्हा एकदां प्रत्ययाला आलें.

विजयदुर्ग हवा होता पेशव्यांना; पण त्याच्यावर कबजा केला इंग्रजांनीं. 'ज्याच्या हातीं ससा तो पारधी' ठरला. त्यांना चांगला दहाबारा लाखांचा ऐवज तिथें मिळाला. त्यांच्या शिवराभिवरा पिकल्या. पेशव्यांनीं किल्ला आपणांस मिळावा म्हणून बहुत साम-दाम केले तेव्हां पुढें दोन वर्षांनीं इंग्रज त्या गोष्टीला राजी झाले. पेशव्यांना एवढ्यांतच बिथरवणें बरें नव्हे, हें त्या धूर्तांनीं ओळखलें होतें. ते मुंग्याचें व्रत आचरणार होते आणि पोखरून पोखरून एक दिवस पेशव्यांचा सगळा इमला गडगडवणार होते.

पेशव्यांनीं हेंच आपलें आरमारी ठाणें केलें आणि आनंदराव धुळप याला आरमाराचा प्रमुख म्हणून नेमलें. हाहि तुळाजीसारखाच पट्टीचा दर्यावर्दी होता. हा मूळचा जावळीच्या मोरे घराण्यापैकीं. शिवरायानें जावळीचीधूळधाण केल्यावर याचे पूर्वज विजापूरच्या आश्रयाला गेले. तिथें समशेर गाजवून 'धुळप' हा किताब मिळवला आणि त्याच नांवानें ते पुढें प्रख्यात झाले. सरदारकी मिळतांच आनंदरावानें पुढील तीनचार वर्षांत समुद्र गाजवला. त्यानें चांचेगिरीच सुरू केली. इंग्रजांना 'त्राहि भगवन्' म्हणायला लावलें.

पण आतां इंग्रज बरेच सांवरले होते. त्यांनीं हळूहळू हातपाय पसरणें सुरू केलें होतें. इकडे पुण्यांत नारायणरावाचा वध झाला होता. पेशवाई दुहीनें

आंतून धुमसूं लागली होती. या परिस्थितीचा इंग्रज फायदा न घेते तर ते इंग्रज कसले ! त्यांनीं मुंबई लुटून साष्टीस आपला चांगलाच जम बसविला होता. त्यांचें पारिपत्य करण्याबद्दल पेशव्यांकडून आनंदराव धुळपाला हुकूम आला. रघुजी आंग्रे त्याला मदतगार म्हणून धाडण्यांत आला. धुळपानें रत्नागिरीजवळ इंग्रजाशीं गांठ घातली. आणि मग काय घडलें तें भिकु बाळ या शाहीराला विचारा. तो छाती फुगवून सांगेल.

**“ इंग्रजाला धास्ती नव्हती कधीं काळाची**
**अवचित गांठ पडली आनंदराव धुळपाची**
**नदी वाहते, वाहते हो अशुद्धाची**
**तीन साठ शिरें उडविलीं त्यानें * ***
**घायाळ मुर्दे घुमती राव फार**
**धोशा धुळपाचा अति आनंदराव रणशूर ”**

तें १७८३ साल होतें. आनंदरावानें त्या सालीं इंग्रजांना खडे चारले. त्यांच्या लढाऊ गलबतांचा पाडाव केला. ही विजयवार्ता पेशव्यांस कळली. या बहादुरी-बद्दल पेशव्यांनीं खासगीचा पोशाख आणि कंठी पाठवून त्याचा बहुमान केला आणि पत्रद्वारें त्याची पाठ थोपटली.

विजयदुर्ग गांवांत किल्ल्याजवळच धुळपांचा वाडा आहे. किल्ल्याशेजारीं शोभण्याजोगा तो असला तरी त्याला आतां जीर्ण वास्तूची कळा आली आहे. माणसें आंत राहतात, सडासंमार्जन होतें, तुळशीपुढें दिवा लागतो म्हणूनच आंत पाऊल टाकवतें. राजांगणांत उभें राहिल्यावर सभोंवतीं प्रशस्त चौक दिसतो. एका सोप्यांत जुन्या काळचे पालखी-मेणे वर अडकवून ठेवले आहेत, तेहि आतां मोडकळीस आले आहेत. पण तेच त्या वाड्याच्या गतवैभवाचे साक्षीदार ठरतात. इथें माडीवरच्या दिवाणखान्यांत भिंतीवर बरींच जुनीं रंगीत चित्रें पाहिलीं. दीड शतक लोटलें, पण अजून त्यांचा रंग उडालेला नाहीं. अशाच प्रकारचीं पण याहून किती तरी विपुल अशीं भित्तिचित्रें मीं पाहिलीं तीं तळेगांव येथें श्री. दाभाडे यांच्या जुन्या वाड्यांत. भिंती भंगल्या पण त्या चित्रांचा रंग मात्र अभंग राहिला आहे, हें पाहून ते चित्रकार अजिंठ्याच्या कलावंतांचे वारस असावेत असें वाटतें. धुळपांच्या वाड्यांतल्या चित्रांत आणखी मनोहर कुसर आहे. इथें एक पालखी आहे आणि ती अनेक रमणींची मिळून बनवली आहे. म्हणजे

सुंदरींच्या कृश तनू, त्यांचे हस्तपादादि अवयव आणि मस्तकें विशिष्ट पद्धतीनें एकमेकांत गुंफून चित्रकारानें त्या स्त्रीसमूहालाच पालखीचा आकार आणलेला आहे. ही नारीरूप पालखी स्त्रियाच आपल्या खांद्यावरून वाहून नेतात आणि तिच्यांतून मिरवत जाते तीहि एक शृंगारसम्राज्ञीच. मला वाटलें, या अनामिक चित्रकाराच्या कल्पनाविलासाचें यथायोग्य कौतुक करायला एखादा खुल्या दिलाचा चित्रकारच हवा.

विजयदुर्गाला जाणाऱ्या प्रवाशानें किल्ला पाहून झाल्यावर रामेश्वराचें दर्शन घेतल्यावांचून आपला गाशा गुंडाळूं नये. देऊळ मोठेंसें भव्य, कलाकुसरीचें, थाटामाटाचें आहे, असें नाहीं. पण तें एका डोंगरदरींत बांधलेलें आहे, हें त्याचें वैशिष्ट्य. शिवाला एकान्त आवडतो, हें जाणूनच जणूं नाना फडणिसांचे बंधु श्री. गंगाधरपंत भानु यांनीं हें मंदिर इथें बांधलें आहे. खाडीकांठच्या रस्त्यानें एक मैल चालल्यावर आधीं एक जांभ्या दगडाचें विशाल पठार लागतें. रामेश्वराकडे जायला तिथून दुसऱ्या अंगाला उतरायला हवें. त्यासाठीं तांबडा दगड फोडून सुमारें पांचशें हात लांब खिंडीचा रस्ता बनवलेला आहे. तो थेट महाद्वारांत जातो. मागें गाभारा, पुढें कौलारू सभामंडप, सभोंवतीं फरसबंदी आवार आणि त्याबाहेर वृक्षांची दाटी असें तें शिवस्थान आहे. देवळाच्या उजव्या अंगाला आवाराबाहेर आंग्र्यांची एक छत्री आणि कांहीं सतीशिला आहेत.

त्या दिवशीं उत्तररात्र काळोखी होती. गगनमंडळाचें राज्य तारकांच्या लोकसत्तेवर सोंपवून वद्य सप्तमीचा चंद्र समुद्रबाष्पाच्या कुशींत जाऊन झोंपला होता. मला केव्हां तरी रात्रीं जाग आली आणि मी उठून माडीच्या सज्ज्यांत गेलों. प्रकाश हा अभिजातसुंदर आहे हें खरें; पण अंधारालासुद्धां त्याच्या घनतेचें एक आगळेंच सौंदर्य असतें हें अशा वेळीं प्रत्ययाला येतें. समुद्रवलयांकित पृथ्वीला अंधारानें आपल्या पोटांत घातलें होतें. तारका त्याच्या पोटांत निरर्थक सुया टोचीत होत्या. पौषांतली ती रात्र सारखे अश्रू ढाळीत होती. पण तिचें तें मूक रुदन पाहायला चराचर जागें होतें कुठें! डावीकडच्या अपरंपार सागरावर आणखी एक सागर पसरला होता आणि तो म्हणजे गांभीर्याचा. त्याला क्षोभ नव्हता, उच्चंबळ नव्हती, त्यामुळें तो रहस्यमय वाटत होता. त्या मध्यरात्रीजवळ सौंदर्यहि होतें आणि दुःखहि होतें. ती खिन्नहि करीत होती आणि सांत्वनहि देत होती.

समोर पांच हातांवर पसरलेली ती वाघोटनची खाडी. पण तिचें पाणी अंधाराशीं एकरस झाल्यामुळें वेगळें दिसत नव्हतें. भोंवतोंचें तें चिमुकलें सुंदर गांव झोंपलें होतें; पण ती खाडी मात्र जागृत होती. ती आपल्या लाटांच्या अनंत हस्तांनीं तटाला धक्के देत चुबुक् चुबुक् आवाज उठवीत राहिली होती. तिनें झोंपावें अशी जगचालकाची आज्ञाच नव्हती, त्याला ती काय करील! तिच्या दुसऱ्या तीरावरचे डोंगर केवळ छायामात्र दिसत होते. जणूं भूतयोनीचे मुकादमच! संध्याकाळीं किनाऱ्याला येऊन हारीनें हेलकावणाऱ्या होड्यांपैकीं आतां एकहि तिथें जाग्यावर नव्हती. ओहोटीच्या ताणावर त्या सगळ्या समुद्रांत जाऊन दूरवर पांगल्या होत्या. मला वाटलें, ते सागरपुत्र नाखवे आतां गळ टाकून माशांची झुंड केव्हां येते त्याची वाट पाहत बसले असतील. त्यांनीं शिडें गुंडाळलीं असतील. दिवेबाती बारीक केल्या असतील. डोळ्यांवरची पेंग उडावी, थंडीवाऱ्यानें शिरशिरणाऱ्या देहाला आंतून ऊब द्यावी, म्हणून शृंगाररसानें रसरसलेलीं 'चकवा' गीतेंहि सुरू केलीं असतील—

"दुधाचां आधण ठेव गे सोंवळे
चल जाऊं कोंवळे तुझ्या वनांत."

## ३.

# शिवछत्रपतींची राजधानी

रायगडावर जाण्याचा आमचा पहिला बेत फसला आणि दुसरा मात्र साधला. जो फसला त्याचें मला दुःख नाहीं; कारण जो साधला तो कल्पनेच्या पलीकडे यशस्कर ठरला. ठरल्याप्रमाणें श्री. दांडेकर हे काठीसारखे माझ्या आधाराला होतेंच. शिवाय 'सुश्लोक' डॉ. श्रीखंडे आणि महाडचे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. अवळसकर हे आणखी सोबतीला भेटल्यामुळें आमच्या प्रवासाला काव्याचें माधुर्य आणि इतिहासाचा आधार मिळाल्यासारखें झालें.

मुंबई किंवा पुणें यांपैकीं कुठूनहि रायगडला जायचें म्हटलें तरी मध्यें महाडला उतरणेंच भाग. पुण्याहून दोन मार्गांनीं इथें येतां येतें. पहिला मार्ग महाबळेश्वरावरून पारघाटांतून आणि दुसरा भोरवरून वरंध्या घाटांतून. पहिला पिपीलिका मार्ग म्हटला तर दुसऱ्याला विहंगम मार्ग म्हणावें लागेल. कठिण खरा; पण जवळचा असल्यामुळें आम्हीं दुसराच पत्करला. या घाटाचीं वांकणें पुष्कळ ठिकाणीं चिमट्याच्या आकाराचीं आहेत. आगे-पीछे असें केल्यावांचून बसगाडी एका दमांत कांहीं वळूं शकत नाहीं. आमचा चक्रधर चलाख होता, शल्याच्या कौशल्यानें सारथ्य करीत होता, तरी आम्ही मात्र जीव मुठींत घेऊन गाडींत बसलों होतों. ज्याला जिवाच्या काळजीनें घेरलें त्याला ज्ञानेंद्रियें असून नसून सारखींच. तो दऱ्याखोऱ्यांत थाट मांडून बसलेलें सौंदर्य पाहणार काय अन् त्याचा ठसा आपल्या मनावर उमटवून घेणार काय! पण असें असलें तरी कांहीं कांहीं सौंदर्यस्थळें अशीं गहिरीं असतात कीं, दर्शन देतां देतांच तीं जीवभाव हरवतात. वरंधा घाटांतली ती शिवतर घळ त्यांपैकींच एक आहे.

अर्ध्या घाटांत आल्यावर उजव्या हाताला जणूं पाताळांत असल्यासारखी ती दिसते. गांभीर्य हेंच तिचें जातिनाम म्हटलें पाहिजे. दोन्ही अंगीं तुटलेले काळे-

भोर कडे अन् पायथ्याशीं दाट हिरवी झाडी, अशा स्वरूपांत ती वरून दिसते. खालच्या वरंधें गांवापासून ती सहा मैलांवर आहे, खडकांत लेण्यासारखी खोदलेली आहे, तिची लांबी सव्वाशें फूट अन् रुंदी पाऊणशें फूट आहे, एक लहानगा जलप्रपात अवखळ बालकासारखा तिच्या कुशींत जीव लोटीत आहे, हा तिचा सगळा तपशील पुस्तकांत वाचून आपणांस माहीत झालेला असतो, आणि या विहंगमदर्शनांत त्याची अंशमात्रासुद्धां दिसली नाहीं तरी त्या बाजूस मस्तक झुकतें. ग्रंथराज दासबोधाची ती जन्मभूमि हेंच एकमेव त्याचें कारण !

समर्थांना मोकळ्या ऐसपैस जागेपेक्षां गिरिकपाटेंच फार आवडत. घळी हीं त्यांच्या निजानंदाचीं स्थळें. त्यांनीं इथल्या मठाला सुंदरमठ असें नांव दिलें आणि त्यांत बसून गुरु-शिष्यसंवादरूपी दासबोधाची रचना केली. एकान्ताचें पावित्र्य, कडेतळवटींचें गांभीर्य, वृक्षवल्लींचें सौंदर्य आणि गिरिशिखरांचें दिव्यत्व घेऊनच तें शारदेचें देशीकार लेणें घडलें. शिवतरची घळ ही समर्थसंप्रदायाची गंगोत्री आहे असें म्हटलें तर तें उचितच ठरेल.

घाट उतरल्यावर महाड अठरा मैल राहतें. वाटेंतच उजव्या हाताला बिरवाडी लागते. तिथून काळ नदीच्या कांठाकांठानें महाडचा रस्ता जातो. महाडाला जुन्या लोकगीतांत 'मैकावती' म्हटलेलें आहे. तिथें महिकावती देवीचें मंदिरहि आहे. महाड ही देशावरच्या मालाची मोठी उतारपेठ आहे. बंदर असल्यामुळें गलबतांतूनहि माल उतरतो. इतिहासकालापासून त्याची ख्याति आहे. इथून रायगडाचा पायथा बारा मैल आहे. पूर्वी बैलगाडींतून तो प्रवास करावा लागे. पण हल्लीं एस्. टी. ची गाडी एका तासांत आपणांस कोंझर मुक्कामीं नेऊन सोडते. रस्त्याबद्दल बोलायचें तर कोंझरला उतरेपर्यंत शरीराचे सांधे खिळखिळे होतात, एवढें सांगितलें म्हणजे पुरे !

आम्ही गेलों ते माघांतले पानगळीचे दिवस होते. शिशिरानें त्या कामावर वाऱ्याची सक्त नेमणूक केली होती. तो झाडांचीं पिकलीं पानें प्रथम मुळांत झडवीत होता आणि तिथून मग रानभर इतस्ततः लोटीत होता. मात्र वाऱ्यानें एवढी लूटमार करूनहि झाडें मात्र अगदींच कफल्लक झालीं नव्हतीं. कांहींची जुनी पर्णसंपदा अजून थोडीबहुत टिकून राहिली होती, तर कांहीं वृक्षांच्या अंगावर नव्या आरक्त लुसलुशीत पालवीचा साजहि चढला होता. पण त्या रानांत खरी केविलवाणी अवस्था दिसली ती ऐनांच्या वृक्षाची. त्यांचीं नुसतीं

पानें नव्हेत; तर डहाळीन् डहाळी तिथल्या शेतकऱ्यांनीं तोडून नेली होती. असे शेंकडों ऐन तिथें नुसते अस्थिपंजर होऊन राहिले होते. मृत नव्हेत; पण मृतप्राय! मला त्या दृश्यानें क्षणभर अस्वस्थ केलें. हें छेदनकर्म माणसानें आपल्या उपजीविकेसाठीं केलें होतें. त्या डहाळ्या तोडून, त्यांचे भारे बांधून, ते सुकवून मग कुणग्यांत नेऊन पसरले होते. आणि एक दिवस त्यांना आग लावून जमीन भाजून घेतली होती. कोंकणच्या भूमीला शाप आहे कीं, 'जाळल्या भाजल्यावांचून पिकूं नको!' त्यासाठीं हा सगळा खटाटोप होता. आणि हें जेव्हां माझ्या लक्षांत आलें तेव्हां अंगाला जडलेलीं कवचकुंडलें सोलून याचकाला देणाऱ्या कर्णासारखे ते मला वाटले. इतकी तोडातोड झाली असूनहि ते जगणार होते, पावसाची वाट पाहणार होते, 'कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें' हें वचन सार्थ करणार होते, आणि पुढच्या वर्षीं याच दिवसांत याच शेतकऱ्यांना म्हणणार होते, "या बाबांनों, तुमचे कोयते पाजळून लखलखीत करून या. आमचा हा शाखाभार तुमच्या जीवनासाठीं हलका होऊं दे!" त्या रानांत सौंदर्य शोधण्यासाठीं फिरणाऱ्या माझ्या दृष्टीला मीं सांगितलें कीं, इथें खरे सुंदर आणि दर्शनीय कोण असतील तर हे भुंडे बोडके ऐनाचे वृक्ष!

नातें गांव सोडलें आणि आपण हळूहळू डोंगरांच्या पोटांत जाऊं लागलों असें वाटलें. रायगड घाटांतून दिसतो आणि महाडहूनहि दिसतो. पण त्याचें सुव्यक्त दर्शन होतें तें कोंझरजवळ पोंचल्यावर. करवतीच्या दातांसारखीं किंवा नांगराच्या फाळासारखीं तीन पुढें आलेलीं टोंकें आणि मधल्या दोन खांचा असा जो एक थराथरांचा, कंगोऱ्याकडदोऱ्यांचा काळाकभिन्न डोंगर समोर दिसतो तो रायगड. त्याला वाटल्यास तीन शिरांचा दत्तात्रेयहि म्हणावें. कुलाबा जिल्ह्याच्या पूर्व सीमेवर उभ्या असलेल्या सह्याद्रीच्या रांगेला समांतर अशी दुसरी एक पर्वतराजी छत्रीनिजामपूरपासून खांभारगडापर्यंत पसरली आहे. सह्याद्रीच्या मानानें ही ओळ ठेंगणी आहे. तिच्यावर पण तिच्यापासून सुटा असा शिवळ्या घाटाच्या उताराजवळ रायगड उभारलेला आहे. रायगड म्हणजे एक दुःसाध्य प्रकरण आहे. शत्रु चढाई करूं म्हणेल तर पायथ्याशीं पोंचायलाच आधीं सहाशें फूट चढावें लागतें. वेढा द्यायचा तर सभोंवार डोंगरघळी. वर जायला एकुलती एक वाट आणि तीहि सुगम नव्हे. पश्चिमेला गांधारी नदी आणि उरलेल्या तीन दिशांना काळ नदी त्याला वेढून राहिली आहे. जणूं त्याची निसर्गनिर्मित परिखाच.

आणि म्हणूनच शिवरायानें आपल्या स्वराज्याची राजधानी राजगडाहून इथें आणली.



रायगडाचें दूरदर्शन

तो स्वतः आधीं हा गड पाहायला आला होता हें सांगणें नलगे. ‘गड बहुत चखोट’ असें त्याला वाटलें. कडे तासल्यासारखे, ओळंबा लावल्यासारखे उभे, वरचा दगड एकसंध, अशा अनेक उपयुक्त गोष्टी त्याला इथें दिसल्या. शिवरायाचे त्या प्रसंगींचे विचार सभासदानें लिहून ठेविले आहेत. ‘रायगड पहाडी किल्ला चांगला. आजूबाजूस शत्रूची फौज बसावयास जागा नाहीं. घोडे, माणूस जाण्यास महत्‌संकट. वरकड किल्ले पन्हाळे वगैरे बहुत. पण खुलासेंवार व मैदान मुलखांत. यास्तव आजच्या प्रसंगास हीच जागा बरी. येथें लवकर उपद्रव होऊं न शकेल.’ शिवरायाची ही धोरणी नजर कोण्याहि राजकारणपटूनें अथवा सेनापतीनें

वाखाणण्याजोगी होती. पुढें युरोपियन रणपंडितांनीहि 'पूर्वेचें जिब्राल्टर' या नांवानेंच रायगडाला गौरविलें आहे.

कोंझरला उतरलों तेव्हां आमच्याजवळ साटल्या पोटल्या ऱ्याच होत्या. मुख्य म्हणजे उदरस्थ वैश्वानराचें हविर्द्रव्य. गडावर जायचें म्हणजे तिथें मुक्काम करावाच लागतो आणि त्यासाटीं महाडहून शिधा न्यावा लागतो. आम्ही तर सगळे मिळून एकादश रुद्र होतों आणि गडावर दोन दिवस वास्तव्य करणार होतों. अर्थात् पिठापासून मिठापर्यंत केवढी तयारी आम्हांला न्यावी लागली असेल याची कल्पना करा. त्यासाटीं आम्हीं तीन गडी ठरविले. त्यांनीं आपल्या जिवाला तोशीस न बाधेल एवढें ओझें उचललें. पैसे मात्र भरपूर घेतले आणि वर रात्रीचें पंक्तिभोजन!

सूर्य क्षितिजाखालीं उतरला अन् आम्ही गडाच्या चढणीला लागलों. आज आम्हांला रात्रीचें भय नव्हतें. एक तर पौर्णिमेचें चांदणें अन् दुसरें म्हणजे समुदायाचें बळ. रायगडाची उंची समुद्रसपाटीपासून साडेअठ्ठावीसशें फूट आहे. मोजणीदाराच्याच भाषेंत बोलायचें तर वर आणखी एक फूट. सिंहगड त्रेचाळीसशें, तर तोरणा शेचाळीसशें फूट भरतो. पण हे गड मुळांतच पठारावर असल्यामुळें पठारापर्यंतची अर्धीमुर्धी उंची न चढतांच आपल्या पदरांत पडते. रायगडाचें तसें नाहीं. त्याच्या उंचीचा इंचन् इंच मोजून चढावा लागतो. इथें हातचें शून्य. पण एक गोष्ट मात्र सोयीची आहे. देशावरचे बहुतेक किल्ले उभ्या चढणीनें चढावे लागतात. रायगडची चढण विळख्याची आहे. पहिली पाचाडपर्यंतची अवघड वाट सोडली तर पुढें विशेषसा त्रास होत नाहीं.

महाडपासून डोळ्यांआड न होणारा रायगड पहिल्या चढावाला थोडा वेळ अदृश्य होतो. तो जणूं बाह्य सृष्टींतून अंतःसृष्टींत येतो. वाटतें कीं, आज शतकानुशतकें ही वाट वाहती आहे. लोक चढतात, उतरतात. पण हें राज-नैतिक क्षेत्र निर्माण केलें कोणीं? कोण याचा विधाता? इतिहासाच्या पुस्तकांतून वाट काढीत मागें मागें जावें, तर ती पुसट होत जाते. आंध्र राजांनीं कित्येक महत्त्वाच्या डोंगरांवर नि घाटांच्या तोंडावर किल्ले बांधले आणि राज्याची बळकटी केली. त्यांतलाच हाहि एक असावा काय? शक्य आहे. शिवरायाची राजधानी होण्यापूर्वी याला रायरी म्हणत. आणि रायरी हें नांव राजगिरि या संस्कृत शब्दाचें अपभ्रष्ट रूप आहे, हें व्युत्पत्तिशास्त्रज्ञ बहुधा नाकारणार नाहींत. अर्थात् त्यापूर्वीहि

इथें कोण्या राजाचें निवासस्थान असावें आणि तेंहि एखाद्या हिंदु राजाचेंच. दक्षिणेंत मुसलमान येण्यापूर्वी हा किल्ला एका मराठे पाळेगाराच्या ताब्यांत होता आणि चवदाव्या शतकांत त्यानें विजयानगरचें मांडलिकत्व पत्करलें होतें असें कळतें. पुढें त्याच शतकांत बहामनी आणि निजाम अशा दोन राजांनीं त्याची मालकी आपणांकडे घेतली. निजामशाहीच्या काळांत रायगड सरदार शिर्के यांच्या ताब्यांत होता. गडावरचें शिर्काईचें छोटेंसें मंदिर त्यांनींच बांधलें आहे. निजामशाही नष्ट झाल्यावर विजापूरकरांच्या वतीनें चंद्रराव मोरे इथें सत्ता चालवूं लागला.

शिवरायानें रायगड घेतला तो या चंद्ररावाकडूनच. चंद्ररावाचें पारिपत्य करण्यासाठीं त्याला प्रथम जावळीवर स्वारी करावी लागली. तिथून त्याला हुसकल्यावर तो रायरी चढून तेरी उपर मेरी करूं लागला. पण शिवरायानें त्याचा पिच्छा सोडला नाहीं. 'महाबळेश्वरचा निसणीचा घाट दरियाचा उतरून जावळीस वेढा घातला. जावळी अवघड वाट, जाळ्या कळकीच्या दाट, तेथें महिनाभर झुंज जाहलें. महिन्या एका महिन्यांनीं कृष्णाजी बाजी मोरे (चंद्रराव) जावळी सोडून आपले हासमसुद्धां रायगडास गेले. रायगड बळकावून राहिले. तेथें शिवाजी महाराजे चढाई करून गेले. रायगड तीन महिने चंद्ररावांहीं भांडविला. मग सला जाहला.' सन १६५६ त शिवरायानें रायगडाचे धनी म्हणून गडावर घोडा फेकला. तो दिवस चैत्र वद्य सप्तमीचा होता.

तीनशें वर्षांपूर्वीचा हा भूषणभूत इतिहास उजळीत आम्ही वर चाललों होतों. चंद्र आमची पायवाट उजळींत तसाच वर येत होता. दोन मैलांची ती मुख्य चढण चढून आम्ही पाचाडला आलों. पाचाड हा रायगडाचा खरा पायथा. गडाचा राखणदार इथेंच वाटेच्या कडेला आपलें तणार उभारून रहातो. आम्ही त्याच्या मांडवाखालीं थोडा वेळ टेकलों. आमची सोय लावण्यासाठीं आमच्या आधींच तो वर निघाला. शिवकालीं पाचाड ही गडाची पहिल्या मुक्कामाची जागा होती. वर जाऊं इच्छिणाऱ्या लोकांची इथें पूर्वचौकशी व्हायची अन् मग त्यांना पुढच्या मार्गाचा परवाना मिळायचा.

गडावर पाऊस अनुधार आणि थंडीहि जीव गोठवणारी. त्यामुळें मातुःश्री जिजाबाईला तिथली हवा सोसत नसे. म्हणून तिच्या सुपुत्रानें तिला इथें पाचाडला एक गढीवजा वाडा बांधून दिला. एक मोठी विहीर खोदली. आंब्या-

फणसांची बागहि लावली. जिजामाता इथें राहून स्वास्थ्य उपभोगूं लागली. शिवराय वरचेवर खालीं उतरून तिला भेटे. तिचें देहावसानहि इथेंच झालें. पाचाडची मुख्य वाट सोडून थोडें आडव्या वाटेनें गेलें कीं त्या वाड्याचे अवशेष पाहायला मिळतात.

आतां आमचा मार्ग थोडा अधिक रुंदावला होता. ज्याच्यावर आरोहण करण्यासाठीं आम्ही चाललों होतों तो काळ्या कातळाचा रायगड आतां आमच्या-समोर आडवा पसरला होता. मला वाटलें, तो आपल्या टाचांवर उभा राहिला आहे. वास्तवापेक्षा अधिक उंच होऊन विश्वंभराकडे जणूं उडण्यासाठीं पंख मागतो आहे. चांदण्याच्या रुपेरी रसांत न्हाऊन त्याचें काळेंपण अधिक स्वच्छ झालें होतें. 'पुष्पसंगें मातीस वास लागे' म्हणतात; पण इथला प्रकार उलटा होता. त्या कातळानें आपल्या अंगावरचें चांदणेंच श्याम-शबल करून टाकलें होतें. त्याचें तें दर्शन छातीवर दडपण आणणारें होतें. त्याच्यावरचा मुक्काम गांठायला आम्हांला कोंबडा तर आरवणार नाहीं ना, असें मला वाटलें आणि ही शंका 'खूपलढा' बुरूज गांठीपर्यंत टिकली.

खूपलढा बुरूज किल्ल्याच्या वायव्येस डोंगराच्या एका सोंडेवर आहे. पुढचा मार्ग त्याच्यावरूनच जातो. तिथें गेल्यावर गडाचें दुसरें पालथण दिसूं लागतें. रायगड उंचीप्रमाणेंच आपली खोलीहि दाखवूं लागतो. त्या बुरुजाजवळच एक पाटी लावलेली असून तिच्यावर रायगडाचा संक्षिप्त इतिहास लिहून ठेवलेला आहे. विजेरीचा झोत टाकून आम्ही तो वाचीत होतों, एवढ्यांत खालच्या अंगानें एक माणूस देवचारासारखा तिथें उपटला. माणूसच ना, म्हणून मीं क्षणभर संशयानें त्याच्याकडे पाहिलें. आमच्यापैकीं कोणीं तरी त्याला विचारलें, 'कुठून आलांत?' त्यावर त्यानें उत्तर दिलें, 'वाडीहून.' 'कुठें आहे ही वाडी?' 'ही काय खालच्या उतारावर.' आम्हीं त्या बाजूला तोंडें वळवलीं. ज्योत्स्नेच्या झिरझिरीत अवगुंठनांत झोंपीं गेलेली ती ग्रामरचना अस्पष्टशी आम्हांला दिसली.

शिवकालांत पाचाडपेक्षांहि या वाडीचें महत्त्व अधिक होतें. गडाचें पोटच इथें होतें म्हणा ना! धान्याचीं कोठारें इथें असत अन् इथूनच रोजचा शिधा वर जाई. भाजीपाला, फळफळावळ वगैरे खाद्य वस्तूहि इथूनच जात. अठरापगड वस्तीचें हें गांव होतें. बारा कारखाने इथें चालत. गांव नेहमीं गजबजलेलें असे,

पण शिवाजीच्या पश्चात् याचे ग्रह फिरले. औरंगजेबानें मराठ्यांकडून रायगड घेतला; पण तो हातीं ठेवणें त्याला जड जाऊं लागलें. कारण गायकवाड सेनाधारी आणि गोळे सेनासहस्री यांनीं कांगोरी किल्ल्यावरून मोंगलांना सतावण्याचें काम अव्याहत चालू ठेवलें. गड मिळूनहि स्वस्थता लाभेना. औरंगजेब या कटकटींना कंटाळला. त्यानें जंजिऱ्याचा शिद्दी खैरियतखान याला म्हटलें, 'तुला रायगडाची हांव होती ना? मग सांभाळ हा.' त्यानें रायगड आपल्या हवालीं घेतला. सन १७३३ पर्यंत सुमारें चाळीस वर्षें त्यानें इथली सत्ता उपभोगली. त्यानें वाडीगांवाभोंवतीं तट उभारला खरा; पण गांवाचा मात्र निकाल लावला. त्या तटाच्या खुणा आजहि तिथें दिसतात.

खूपलढा बुरुजावरून पुढें गेलें कीं आपले पाय खुद्द गडाला लागतात. पुढची कांहींशी वाट डोंगर कोरूनच तयार केलेली आहे. कांहीं ठिकाणीं तर खडक आपल्या माथ्यावर येतो. खालच्या बाजूला घळी आपलें व्याघ्रमुख उघडून असतात. रात्रीं सोडाच; पण दिवसांसुद्धां जपून चालावें लागतें. माणूस विशेष थकतो तो या वाटेवर. अवग्रहचिन्हासारखें वळण घेऊन ती गडाच्या महाद्वारांत जाते. तिथले द्वारपाळ बुरूज चांगलेच स्थूल आणि सर्वांगीं परिपुष्ट आहेत. त्यांच्यावरून गडाच्या भव्यतेची कल्पना अवश्य करावी. एकाची उंची पाऊणशें फूट नि दुसऱ्याची पांसष्ट फूट आहे.

इथें आल्यावर माणूस 'पोंचलों एकदांचे' म्हणून सुस्कारा सोडतो; पण आंत शिरतांच त्याचा तो भ्रम ठरतो. पुढें आणखी पाऊण मैल वाट उरते. दोन-तीन फूट उंचीच्या पंधरा-सोळा पायऱ्यांची निसण चढावी लागते. मग कुठें धर्मशाळेला पाय लागतात. हत्तीतलावाच्या कांठावरूनच धर्मशाळेची वाट आहे. हा तलाव बराच लांबरुंद आहे. कोरडा, रसहीन असल्यामुळें त्याची खोलीहि कळते. शिवकालीं तो भरलेला होता. महाराजांचे गजराज इथें जलक्रीडेसाठीं उतरत आणि शुंडादंडानें पाणी वर खेचून त्याचे आपल्या तप्त गंडस्थलांवर फवारे सोडीत. इथें शेजारीं ज्याची कबर आहे तो मदारशहा या हत्तींचा मुख्य माहूत असावा.

आमच्या आधीं गडावर पोहोंचलेली पहिली तुकडी हातपाय ताणून स्वस्थ बसली नव्हती. तिनें चुलीची आराधना मांडली होती. मी मागच्या तुकडींत होतों. पहिलीच्या मागून तब्बल एका तासानें आम्हीं मुक्काम गांठला. धर्मशाळेच्या अंगणांत टेकून जरा हुऽश्श करतों तोंच दांडेकर आतिथ्यशील यजमानाच्या अभिनिवेशांत

पुढें येऊन म्हणाले, 'मंडळी, पाय धुवा, नळपाक सिद्ध आहे.' खरोखरच तें भात-पिठलें आम्हांला नळपाकासारखें वाटलें. आणि तें 'उतरवणी' म्हणजे तर अमृतच. उतरवणी हें भात पुरता शिजायच्या आंत ओनून काढलेल्या पेजेचें कोंकणी नांव. त्याच्यांत चार मिठाचे कण टाकून पातेलें निखाऱ्यावरच ठेवलेलें होतें. त्या कढत पेजेनें घसा शेकतां शेकतां माझा तरी शीणभाग उतरला. मी तिचें जें वर्णन करूं लागलों तें ऐकून डॉ. श्रीखंडे म्हणाले, "तुम्ही 'उतरवणी' ची बरीच 'चढवणी' चालवली आहे." आणि मग त्या पेयाला पंगतींत जो भाव आला तो कांहीं विचारूं नका.

पंचवीस-तीस माणसांची पंगत बसेल असें इथलें पाकगृह प्रशस्त आहे. समोरच चार खोल्यांची धर्मशाळा आहे. तिच्यांतल्या तीन खोल्या प्रवाशांसाठीं असून चौथ्या खोलींत भांडींकुंडीं ठेवलेलीं आहेत. पाण्यासाठींहि लांब जायला नको. गंगासागर तलाव तिथें जवळच आहे. त्याचें पाणी स्वच्छ आणि गोड असून तें कधींहि आटत नाहीं. गडावरच्या बांधकामासाठीं इथून दगड काढले आणि त्याच खाणींत खालीं पाणी लागलें. चारशें फूट लांबी आणि तीनशें फूट रुंदी एवढा त्या तलावाचा विस्तार आहे. खोली कळायला मार्ग नाहीं. कारण स्नानासाठीं आंत उतरण्याची बंदी आहे.

आम्ही हातपाय धुवायला तिथें गेलों त्या वेळीं चंद्रिका त्या संथ जळावर तरंगत होती. गंगासागर तिच्याशीं कसलीं तरी गुपितें करीत होता. पलीकडचा बालेकिल्ला त्यांतलें कांहीं आपल्या कानांत पडतें का म्हणून स्तब्धपणें आंत प्रतिबिंबित झाला होता. पश्चिमेच्या दरींत रुपेरी रसधारा सांडत होत्या, तर उत्तर बाजूच्या रानावर तेंच चांदणें एखाद्या क्षौमवस्त्रासारखें पसरलें होतें. सकाळी पाहिलें तर सूर्य त्याच जलाशयावर सुवर्णाभिषेक करीत होता. आम्ही तिथूनच गडसंचाराला निघालों तर तिथल्या वस्तीकर धनगरांच्या गायी-म्हशी तिथें आलेल्या दिसल्या. त्यांपैकीं कांहीं महिषींनीं कांठावर पुढचे पाय दुमडून तलावांत तोंड बुडवलें होतें आणि त्या आपली तहान शमवीत होत्या. हें दृश्य सर्वांनाच कौतुकावह वाटलें.

तलावाला लागूनच पलीकडे चाळीस फूट उंचीचे दोन मनोरे आहेत. पूर्वी ते पांच ताळांचे होते असें सांगतात; पण सांप्रत त्यांचे दोनच मजले उभे आहेत. हे मनोरे बारा कोनी असून त्यांची रचना नकसदार आहे. वरचें बांधकाम विटांचें दिसतें, त्यावरून त्यांची दुरुस्ती झाल्याचें समजतें. त्यांच्याच

म. ह. वि. ग्रंथ, वाचनालय शाखा
प्र. क्र. ६९२८ कॉ. ति.
वि. बाळ:वा क्र.

पश्चिमेला बालेकिल्ल्याचा दरवाजा असून त्याच्या वत्तीसहि सुबद्ध पायऱ्या अक्षत आहेत. याला पालखी दरवाजा असें नांव आहे. आंत शिरतांच आपण ज्या मध्यमार्गावर पाय ठेवतों तो सरळ सुतासारखा दक्षिण दरवाजांत गेला आहे.

याच रस्त्याच्या उजव्या हाताला ओळीनें एकाच रचनेचे सात महाल आहेत, त्यांना 'राण्यांचे महाल' असें म्हणतात. पुढें दिवाणखाना, मागें शयनगृह, दोन्ही बाजूंच्या भिंतींना लागून दासीबटकींच्या खोल्या, मागें परसदार अन् पुढें आंगण, अशी त्यांची बांधावळ आहे. आंत गवत वाढलें आहे. वर आच्छादन नाहीं. फक्त भिंती तेवढ्या उंचच उंच दिसतात. त्यांवर विटांचा थर दिसतो. अर्थात् तो पेशवाईच्या काळांत चढलेला आहे. ही सर्व दुरुस्ती नाना फडणिसांच्या हातची आहे. त्यांचा हात गडावर सर्वत्र फिरला आहे.


राण्यांच्या महालांसमोर एका विस्तीर्ण चौरसांत शिवछत्रपतीचा राजवाडा आहे. पण ही केवळ रहायची जागा नव्हे. इथें अष्टप्रधानांच्या कचेऱ्या होत्या. माझ्या मनांत आलें कीं, इथें शिवछत्रपति कुठें वसत असेल? त्याचा राजमहाल कोणता? पण श्री. अवळसकरांनीं सांगितलें कीं, 'हें या कडेला जें प्रशस्त स्नानगृह आहे, त्याच बाजूचा महाल हा छत्रपतीचा असावा असा तर्क आहे. त्याला खासगी असें जीवन नव्हतेंच. तो इथेंच एका दिवाणखान्यांत बसे. त्याला लागूनच एक पडखोली (ante room) होती तिथें पोषाख चढवी आणि मग बाहेर येऊन लोकांच्या गांठीभेटी घेई. इथेंच कुठें तरी जिवाची विश्रांति करी.'

राजवाड्याच्या दक्षिण अंगाला खोलगट भागांत प्रधानांचे वाडे दिसतात, तेहि सारख्या बांधणीचे आहेत. शिवकालांत रायगडावर लहानमोठ्या एकूण तीनशें इमारती उठल्या असें सांगतात. आबाजी सोनदेव यांजकडे हें राजधानी उभारण्याचें काम दिलेलें होतें. वाडे, कोठ्या, पेठा, रस्ते, तलाव, तट, बुरूज, पागा, मंदिरें, सभागृहें अशा प्रकारें त्यानें ही छत्रपतीची राजधानी उभी करून दिली. एकूण पन्नास हजार होन या कामीं खर्ची पडले. कवि भूषण म्हणतो कीं, 'हा विशाल रायगड म्हणजे त्रिभुवनाची प्रतिकृति आहे. खालचा जलवेष्टित खोल भाग म्हणजे पाताळ, माची म्हणजे पृथ्वी आणि बालेकिल्ला म्हणजे साक्षात् अमरपुरी.'

राजवाड्याच्या तटाला लागून गंगासागराच्या अंगानें एक खोली आहे. तिच्यांत विशेष आढळणारी गोष्ट म्हणजे देवदेवतार्चन मांडण्याचा ओटा. त्यावरून

संशोधक दोन तर्क करतात. एक म्हणजे असा कीं, समर्थ रामदासस्वामींसाठीं राखून ठेवलेली ही खोली असावी अथवा राज्याभिषेकाच्या वेळीं गडावर आलेल्या गागाभट्टासाठीं ही नेमून दिलेली असावी. कांहींहि असलें तरी त्या खोलीला महाजनसंसर्ग लाभला होता एवढें खरें !

राजवाडा आणि प्रधानांचे वाडे याच्या मध्यभागीं तटाच्या बाह्य अंगाला तीन कोठड्या पोटांत अंधार सांठवून बसलेल्या आहेत. त्यांना कोठड्या म्हणण्यापेक्षां



टकमक व हिरकणी टोक

बिनपाण्याच्या विहिरी म्हणणेंच अधिक शोभेल. त्यांची खोली पंचवीस-तीस फूट भरेल इतकी आहे. ओळीनें असल्या तरी त्यांचा एकमेकींशीं कांहीं संबंध नाहीं. दोघींना दक्षिण बाजूनें झरोका आहे आणि तिसरी तशीच आहे. शिवराज महान् अपराधांचे कैदी वरून या अंधारकोठड्यांत सोडी आणि इथें त्यांना कृतकर्मांचीं फळें भोगायला लावी. मि. गिफर्ड, रेव्हिंग्टन्, टेलर इत्यादि सातआठ गोऱ्या इंग्रजांना या काळ्या कोठड्यांचा जीवघेणा अनुभव एक वर्ष घ्यावा लागला हें विशेष. हे लोक म्हणजे राजापूरचे वखारवाले. सिद्दी जोहारानें पन्हाळ्याला वेढा घातला तेव्हां हे त्याच्या मदतीस आपला बावटा फडकवीत गेले. यांनीं सिद्दीला

दारूगोळा विकला, इतकेंच नव्हे तर स्वहस्तें तो पन्हाळ्यावर उडवला. त्यांनीं हा व्यापार केला खरा; पण तो ' अव्यापारेषु ' झाला. शिवरायानें त्याचें चांगलेंच उट्टें काढलें. तो सुजनांशीं जितका मृदु तितकाच दुर्जनांशीं कठोर होता. त्यानें राजापुरावर म्हणजे त्यांच्या मुळावरच धाड घातली, त्यांची वखार लुटली आणि त्याबरोबरच या उपद्व्यापी लोकांच्या मुसक्याहि आंवळल्या. पुढें १६६३ त त्यांची सुटका झाली.

राण्यांचें हवा खाण्याचें पठार म्हणून सांगितलें त्यावरूनच पुढें हिरकणी बुरुजावर जावें लागतें. एकाखालीं एक असे तीन टप्पे उतरून त्या बुरुजाला पाय लावायचा म्हणजे अर्धा गडच उतरायचा म्हणा ना! वाट दगड-धोंड्यांची. मधेंच रुसून बसल्यासारखी संकोचलेली. मधेंच घसरती, कुठें मूठभर गवत तर कुठें एखाद्या झुडपाचें शाखा-मूळ पकडून एकेक पाऊल खालीं टाकायचें. दिव्यच आहे तें एक. पण आम्ही सगळे सुखरूप उतरलों. बुरुजावरच्या तोफेजवळ बसलों. खालीं वांकून पाहिलें तों डोळे फिरले. शिवरायानें हा बुरूज बांधून इकडची बाजू निःशंक करून टाकली. हिरकणी नांवाच्या एका गवळणीचें साहस पाहून त्याला हें बांधकाम करावें लागलें.

खालच्या वाडींतून ती कोजागरीला दूध घालायला गडावर आली होती. घरीं तिचें तान्हें बाळ होतें. गडावर त्या दिवशीं थाटमाट होता. बालेकिल्ल्यावर ' नवलाख बत्ती ' पाजळत होती. जगदीश्वराची दीपमाळ झगमगत होती. भालचंद्र कवि म्हणतो—

**" नटली नगरी शिवरायाची इंद्रपुरीच जशी**
**बघतां गुंगे गवळ्यांसंगें हिरकणि ती न कशी ! "**

एवढ्यांत रात्रीच्या पहिल्या प्रहराची तोफ धडाडली. किल्ल्याचा दरवाजा बंद होऊन त्याला आंतून अर्गला पडली. खालीं जाण्याचा मार्ग खुंटला. गयावया करूनहि द्वारपाल तिला दार उघडीना. आतां तान्हुल्याची काय दशा, या विचारानें तिचें चित्त सैरभैर झालें. ती वावटळीसारखी गडावर भ्रमूं लागली. कुठें वाट सांपडेल ? कुठून उडी घेतां येईल ? जीव उडून घरीं पोंचला; पण जड देह कसा पोंचायचा ! अखेर या टोकावर येऊन तिनें देवाचें नांव घेतलें आणि आंग लोटून दिलें. ती घसरत घसरत खालीं पडली आणि नेमकी एका झुडपांत अडकली. पोराचें नशीब, सुपाएवढें म्हणून हातींपायीं सुरक्षित अशी घरीं

पोंचली. दुसऱ्या दिवशीं शिवरायाला ही अद्‌भुत वार्ता कळली. त्यानें तिला आपल्यासमोर बोलावलें. कौतुकाच्या दृष्टीनें तिला न्याहाळलें. मातृहृदय'ही काय चीज आहे, त्याचें सामर्थ्य काय आहे तें जिजाबाईंचें वात्सल्य अनुभवून शिवरायाला कळलें होतें. त्यानें चोळीलुगडें देऊन त्या हिरकणीचा सत्कार केला आणि मग हा बुरुज उभारून तिचें नांव अमर केलें.

रायगडाचें दुसरें भयासुर टोक म्हणजे टकमक. तें वायव्य बाजूला आहे. वारा पडलेला असेल त्याच वेळीं तिथें जाणें सुरक्षित. गडाला केवढी लांबच्या लांब अशी ती सोंड फुटली आहे! तिच्या टोकावर जाऊन उभें रहाणें म्हणजे जीवनाच्याच टोकावर उभें राहणें. वाऱ्यानें जर एक धडक मारली अन् पाय लटपटले तर पुढची अवस्था काय तें न बोलणेंच बरें! कडेलोटासाठीं इथें आणून उभे केलेले फितूर, राजद्रोही खालच्या पाताळदरीकडे 'आ' वासून नुसतें टकमक पाहत रहात, म्हणून याला 'टकमक' असें नांव पडल्याचें सांगतात. गडाच्या तिसऱ्या ईशान्य टोकाला भवानीटोक म्हणतात. शिवकालांत गडावरची शिबंदी या भागांत रहात होती. तिथें शिलेदारांचे अनेक घरटे दिसतात. शिवरायानें भवानीचें देऊळ बांधलें तेंहि याच बाजूला. इकडची वाट मुळींच मळत नाहीं. विशेष जिज्ञासा नसलेला प्रवासी इकडे येतोच कशाला! आम्ही तिथें पोंचलों त्या वेळीं सूर्याला अर्घ्य देण्याचा समय होता.

टोकावर पोंचतांच समोरची सह्याद्रीची रांग अगदीं जवळ दिसूं लागली. रायगड आणि सह्य पर्वत यांच्यामधलें तें काळनदीचें खोरें दृष्टीला वेध लावूं लागलें. नदीचा प्रवाह आटला होता; पण पात्र दिसत होतें. पावसाळ्यांत डोंगराच्या अंगावरून खालीं धोधावणाऱ्या पाणलोटांचे चर त्या नदीला जिथें जिथें येऊन मिळाले आहेत तिथें तिथें त्यांच्या खोलगट खुणा दिसत होत्या. पात्राच्या दोन्ही अंगांचे जमिनीचे पट्टे काळसर वर्णानें चकाकत होते. कौलांनीं शाकारलेल्या घराच्या छपरांत उजेडासाठीं म्हणून मधें मधें हिरवीं कांचेचीं कौलें बसवावीं तसे त्या कृष्ण भूभागावर अधून मधून हिरवे कुणगे शोभत होते. त्या खोलांतल्या ग्रामवस्तीचीं तीं तुरळक घरें, ते घन-विरल वृक्षपुंज, तीं नांगरून टाकलेलीं खाचरें आणि आतां त्यांवर क्षणाक्षणाला सांद्र होत जाणाऱ्या सांध्य छाया हें सगळें लोभसवाणें दृश्य उंचावरून पाहतांना आमचें मन फुलून आलें.

सह्याद्रि हा त्या खोऱ्यांतल्या वस्तीचा बाप अन् काळनदी ही आई. वाटलें,

२९९६३ ५५ पा. भा. २७३२ ३१२१६७

कीं असें इथूनच खालीं उतरावें आणि काळच्या कांठाकांठानें खालून गडप्रदक्षिणा करावी. वाटेंत भेटतील त्या माणसांना म्हणावें, 'तुम्हीं निसर्गाचें वरदान मिळविलें आहे. तुम्ही हात फिरवाल तिथें लक्ष्मी प्रगटते. दृष्टि घालाल तिथें सुंदरता नटनाच करते. तुम्ही फेकलेला ध्वनि, प्रतिध्वनीच्या रूपानें दशगुणित होऊन तुम्हांला परत मिळतो. सूर्य माथ्यावर येईल, तेव्हांच काय तो तुम्हांला उन्हाचा ताप. पावसाळ्यात द्यौ आणि पृथ्वी यांच्या लग्नासाठीं ढग तुमच्या उभ्या खोऱ्यावर मांडव घालीत असतील. शरदांत धुक्याचे थर जगाच्या लोभाविष्ट दृष्टीपासून तुमच्या शेतांतली पिवळी लक्ष्मी लपवीत असतील. उन्हाळ्यांत संध्याकाळची 'खार' तुमच्या घराचें मलमलीचें वस्त्र होत असेल. तुमच्या-सारखे सुखी तुम्हीच!'

तिथूनच 'जरा नजर उजवीकडे वळवा नि मला पहा' म्हणून लिंगाणा किल्ल्यानें आम्हांला हटकलें. तिथल्या सह्यराजींत हिरवें वस्त्र नेसलेला तो काळा किल्ला म्हणजे जणूं बिल्वपत्रांच्या संभारांतून डोकें वर काढणारें शिवलिंगच. तसाच वाटोळा आणि वर चपटा असा आकार आहे त्याचा. लिंगाणा हें नांव त्यामुळेंच त्याला मिळालें आहे. त्याच्या पायथ्याशीं वस्तीहि आहे. रायगडाचा तो बंधु भरत शोभतो. तिथून एकेका सह्यशिखरावर क्षण दोन क्षण विश्रांति करीत दृष्टि पश्चिमेला आली कीं ती कावल्याबावल्याच्या खिंडींत पोंचते. ती इतकी चिंचोळी आहे कीं, जणूं सह्याद्रीच्या अंगावर उठलेला लहानसा ओरखडाच. वरघाटाहून तिच्या मार्गें खालीं सांदोशी गांवांत येऊं इच्छिणाऱ्या माणसाला बसत, टेकत ढोपरीं कोपरींच उतरलें पाहिजे. जेमतेम एकाच माणसाची वाट. शिवकालांत लमाण लोक बैलावर गोण्या लादून घांटावरचा माल याच खिंडींतून खालीं उतरीत. सांदोशी ही त्या वेळीं मोठी पेठच वसली होती. अनेक व्यापाऱ्यांनीं सधन होऊन इथें मंदिरें उभारलीं होतीं. दूर देशांतून सुंदर सुंदर मूर्ती आणून त्यांत बसवल्या होत्या. अजूनहि त्यांचे भग्न अवशेष त्या परिसरांत दिसतात.

पण मीं जें या खिंडीचें स्तवन मांडलें आहे तें ती पावन खिंडीची दुसरी बहीण शोभते म्हणून! शिवरायाच्या पश्चात् संभाजीचा अमानुष वध करून औरंगजेब असमान ठेंगणें समजूं लागला. त्यानें महाराष्ट्रभर थैमान सुरू केलें. तो गडांमागून गड सर करूं लागला. त्याला रायगडाचीहि तहान होतीच. त्याचा पाडाव करण्यासाठीं त्यानें झुलफिकारखान याला मोठ्या सैन्यानिशीं रायगडावर


घातलें. पण दहा महिने वेढा बसवूनहि किल्ला त्याच्या हस्तगत होईना. धनाजी आणि संताजी त्याला पुरून उरले. तें समजतांच शहाबुद्दीन नांवाच्या दुसऱ्या एका सरदाराला पांच हजार सैन्य देऊन त्याच्या कुमकेला धाडण्यांत आलें. त्यानें या कावल्याबावल्याच्या खिंडींतून सैन्य उतरवण्याचा बेत केला. ही बातमी सांदोशीचा नाईक सर्कले याला समजली. तो खिंडींत येऊन काळपुरुषासारखा उभा राहिला. खिंडींत पाय ठेवणाऱ्या प्रत्येक शत्रुसैनिकाला टिपून मारायचें सत्र त्यानें चालू केलें. जो जो पुढें डोकावेल त्याची त्याची कवटी फुटलीच म्हणून समजावें. असे तीनशें सैनिक त्यानें त्या खिंडींत निजवले. अखेर त्या कुमकीच्या सरदाराला सैन्य मागें घेऊन पाठ दाखवावी लागली. पुढें रायगड झुलफिकारखानानें सर केला, रायगडावरचें छत्रसिंहासन विटाळलें, राणी येसूबाई अन् बालराजा शिवाजी यांना गडावरून खालीं उतरवून दिल्लीस रवाना केलें, ही गोष्ट अलाहिदा. तो झुल्फिकारच्या बळाचा विजय नव्हता. तिथें सूर्याजी पिसाळाची फितुरी यशस्वी झाली होती.

गडाच्या आग्नेयीला श्रीगोंदें नांवाचें आणखी एक टोक आहे. त्याच्या जवळच कुशावर्त तलाव आहे. या बाजूला रान खूप माजलें आहे. तलावाच्या अलीकडे एक पडका वाडा दिसतो तो संभाजीचा शकुनि ठरलेल्या कलुशा कबजीचा. पलीकडचे चौथरे पोतनीस, कारखानीस या अधिकाऱ्यांच्या वाड्यांचे. तलावाच्या पूर्वेस पुढें गडाचा चोरदरवाजा आहे. पण तिकडे जाणें हें सामान्य माणसाच्या आटोक्याबाहेरचें आहे.

तिथून वर येतांना गडाच्या ऐन मध्यभागीं होळीचा माळ आणि त्याला लागूनच शिवकालीन बाजारपेठ दिसते. आजच्या उद्ध्वस्त अवस्थेंतहि ती आपला रुबाब सोडीत नाहीं, यावरून तिच्या वैभवकाळांत ती कशी गाजत असेल याची कल्पना करावी. एकच रुंद आणि सुतासारखा सरळ रस्ता आणि दुतर्फा एकवीस दुणे बेचाळीस दुकानें. चौथरे इतके उंच कीं, घोड्यावरूनहि माल खरेदी करावा. शिवकाळांत गडावर बारा हजार लोकवस्ती होती आणि तिच्या सर्व गरजा ही पेठ पुरवीत होती. प्रत्येक दुकान सारख्या लांबीरुंदीचें. नागप्पा हा या पेठेचा नगरशेठ. त्याच्या नांवानेंच ही पेठ प्रसिद्ध आहे. त्याचें दुकान मध्यभागीं होतें. त्याच्या दुकानापुढें पांच फणांच्या नागाचें चित्र कोरलेली एक शिळा होती ती आजहि तिथें आहे. या नागप्रतिमेवरूनच लोक त्याला नागप्पा

म्हणत असावे. तिथले दगड उचकटतांना कित्येक लोकांना 'तांबडीं-पांढरीं नाणीं गवसल्याचें सांगतात. या पेठेजवळच दारूकोठ्या आहेत. तिथेंच पूर्वी शिर्क्यांचा वाडा होता. याला ' मामाचा वाडा ' म्हणतात. प्रत्येक गडावर खास बांधलेला ' मामाचा वाडा चिरेबंदी ' असे, असें श्री. अवळसकर म्हणाले.

आतां आमचीं दोनच स्थळें पाहावयाचीं राहिलीं होतीं. एक छत्रपतींचा



नगारखाना आणि सिंहासनाची बैठक

राजदरबार आणि दुसरें जगदीश्वराच्या मंदिरापुढची त्याची समाधि. राजसभा पाहण्यासाठीं आम्ही पुन्हा एकदां बालेकिल्ल्यांत गेलों आणि नगारखान्याच्या महाद्वारांतून आंत प्रविष्ट झालों. राजसभा म्हणजे तें शंभर हात लांबीरुंदीचें पटांगण आहे. बाजूनें भिंती आहेत. दक्षिणोत्तर भिंतींना लागून पडव्या आहेत. पश्चिमेच्या भिंतीला लागून पूर्वाभिमुख सिंहासनाची जागा आहे. तिथें एकावर एक दोन चौथरे दिसतात. पहिला चौथरा प्रशस्त असून तो प्रधानमंडळासाठीं आहे आणि त्यामागची लहान वेदिका ही सिंहासनाची जागा आहे. याच दरबारांत शिवराजाला पट्टाभिषेक झाला. इथेंच महाराष्ट्रवसुंधरेला चिरवांच्छित पति मिळाला. इथेंच मराठी प्रजेला गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपति लाधला. इथेंच एक प्रतापी, धर्माधिष्ठित राजसत्ता उदयाला आली. याच नगारखान्यानें तिचा डंका वाजवला. समोरच्या सह्याद्रीनें तो दुंदुभिनाद मोठा करून औरंगजेबाच्या कानांवर आदळला कीं, 'तूं समजतोस तसा शिवाजी कोणी भुरटा, उपद्रवी नाहीं. तो हिंदवी स्वराज्याचा मूर्धाभिषिक्त महीपति आहे. तो आधीं मराठी जनतेच्या हृदयसिंहासनावर विराजमान झाला आणि आज सुवर्णसिंहासनावर बसत आहे.'

ज्या गोष्टी चर्मचक्षूंना दिसत नाहींत त्या मनश्चक्षूंना दिसूं शकतात. थोडें अंतर्मुख मात्र व्हायला हवें. मग स्थल-कालाचें बंधन तुटतें. इतिहासांतल्या आपणांस हव्या त्या घटना वर्तमानांत येऊन आपल्यापुढें उभ्या टाकतात. आपण जणूं त्या प्रसंगाचे साक्षी होतों. याच अंतर्दृष्टीनें शिवराज्याभिषेकाचा तो महोत्सव आजहि आपल्याला पाहतां येईल.

शके १५९६ (सन १६७४) ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीस राज्याभिषेकाचा मुहूर्त ठरला. त्याआधीं चतुर्थीस शिवरायाचें उपनयन झालें. षष्ठीस पट्टबंधन झालें. काशीहून मुद्दाम आणवलेला प्रकांडपंडित गागाभट्ट हा या सर्व विधिविधानांचा मुख्य पुरोहित होता. त्यानें प्रथम ऋत्विजांकडून विनायकशांति करविली. दूतांनीं सागर आणि पुण्यसरिता यांचें जल आणलें. मोरोपंत पिंगळे, बाळाजी आवजी यांनीं सर्व सिद्धता केली. बत्तीस मण सोन्याचें हिरेजडित सिंहासन बनवलें. त्यावर श्वेत छत्र बसविलें. खालीं मृगचर्म, त्यावर सुवर्णनाणीं आणि त्यावर गादी, लोड अशी व्यवस्था केली. सौ. सईबाई आणि युवराज संभाजी यांच्यासह प्रथम शिवरायानें मंगल स्नान केलें. नंतर शुभ्र वस्त्रें लेवून अलंकार धारण केले.

त्यानंतर श्रीविष्णूच्या सुवर्णप्रतिमेची षोडशोपचार पूजा केली. आणि एवढ्यांत मुहूर्ताची घटका भरली.

शिवराज सव्य घालून पाय न लावतां सिंहासनावर बसला. त्याच्या उजव्या हाताला युवराजासह सईबाई आसनस्थ झाली. पूर्वेस सुवर्णाचा घृतकलश घेऊन मोरोपंत पिंगळे, दक्षिणेस रुप्याचा दुग्धकलश घेऊन हंबीरराव मोहिते, पश्चिमेस दधिपूर्ण ताम्रकलश घेऊन रामचंद्रपंत अमात्य आणि उत्तरेस मधुपूर्ण सुवर्णकलश घेऊन रघुनाथ पंडित उभे झाले. अण्णाजी दत्तो यांनीं छत्र धरलें. बाळाजी पंडितांनीं चामर उचललें. बाळाजी आवजी लेखनपात्र घेऊन सिद्ध झाले. वेदोनारायणांनीं स्वस्तिमंत्र उद्घोषले. मंगलतुरें झडलीं. तोफांची सरबत्ती झाली. आवीक्षित मरुत्ताला संवर्तानें, पारीक्षित जनमेजयाला तुरकावपेयानें, दाशरथी रामचंद्राला वसिष्ठानें, तसा शाहपुत्र शिवाजी याला गागाभट्टानें ऐंद्राभिषेक केला. जिजाबाईच्या आनंदाश्रूंचा अभिषेक त्याआधींच सुरू झाला होता. आपल्या सुपुत्राच्या मस्तकावर छत्र-चामरें ढाळलेलीं पाहून कौसल्येप्रमाणेंच तिचेहि डोळे निवले. तिला आपल्या जन्माचें आणि पुत्राला जन्म दिल्याचेंहि सार्थक वाटलें.

जमलेल्या सहस्र, दशसहस्र कंठांतून छत्रपतीचा जयघोष उठला. त्याच्यावर सोन्याचीं फुलें उधळलीं गेलीं. सोळा सुवासिनींनीं त्याला मंगलारती ओवाळल्या. ब्राह्मणांचे आशीर्वाद झाले. मग शिवराज मोत्यांची झूल घातलेल्या हत्तीवरून जगदीश्वराच्या दर्शनाला निघाला. ती प्रचंड मिरवणूक परत राजवाड्याशीं येऊन विसर्जन पावली. राजद्वारांत त्याच्यावरून लिंबलोण उतरलें गेलें. आंत येऊन त्यानें जिजाबाईच्या चरणावर मस्तक ठेवलें. पुत्राचे डोळे भरले. मातेचा कंठ दाटला. मायलेक जणूं कांहीं काल आनंदाच्या, कृतार्थतेच्या डोहांत बुडले.

नंतर अन्नसंतर्पण झालें. याचक-भिक्षुकांना देकार झाले. अधिकारी वर्गाला वस्त्रें-भूषणें मिळालीं. गागाभट्टाची एक लक्ष रुपयांच्या दक्षिणेनें संभावना झाली. शिवछत्रपतीनें आपली सुवर्णतुला केली. तिला सोळा हजार होन लागले. त्यानें नवा राज्याभिषेक शक सुरू केला. अष्टप्रधानांची नेमणूक झाली. आणि हा सर्व महद्भाग्यानें पाहायला मिळणारा राज्यभिषेकाचा महोत्सव पाहून भूषण कवीच्या जिव्हेवर शारदा नाचूं लागली.

"चंदनमें नाग, मदभऱ्यो इंद्रनाग
विषभऱ्यो सेसनाग कहै उपमा अबसको ?"

'चंदन सुवासिक; पण सर्पवेष्टित. ऐरावत थोर; पण मस्त. शेष पृथ्वी धारण करतो; पण विषारी. अरुणराग नितान्त रमणीय; पण क्षणजीवी. कापूर शुभ्र; पण उडून जाणारा. मेघ परोपकारी; पण शरद्वायूपुढें न टिकणारा. क्षीरसागर अपरंपार; पण तळाशीं चिखल. चंद्र शांत, सौम्य; पण कलंकित. छेः छेः! शिवराजाच्या धवल यशापुढें यांपैकीं कोणतेंहि उपमान तुच्छ आहे!'

रायगडाच्या दरबारांतली विशेष गोष्ट म्हणजे ध्वनि योजना. सिंहासनाजवळ उभे राहून तुम्ही जरी एखाद्याच्या कानाशीं कुजबुजलां तरी तें नगारखान्याशीं उभ्या असलेल्या माणसाला स्पष्ट ऐकूं जातें. नगारखान्याकडे बोललेलें सिंहासनाजवळ कानांत भरतें. जणूं तिथें बिनकर्ण्यांचे ध्वनिक्षेपकच बसविले आहेत. अर्थात् हें त्या स्थपतीचें कसब आहे. या ध्वनियोजनेमुळें त्या वेळचा दरबार किती शांत रहात असेल आणि कुठल्याहि कोपऱ्यांतली कुजबूज शिवराजाच्या कर्णपथावर कशी सहजपणें येत असेल त्याची कल्पना येते. दुसरी गोष्ट म्हणजे दरबारची ती भूमि सहज थोडीशी उकरली तरी चिलखताच्या लोखंडी, नाजुक, एकमेकींत गुंतवलेल्या कड्या हातीं लागतात. त्यावरून कळतें कीं, इथें किती तरी वीर पुरुष मारितां मारितां मरण पावले आहेत. राज्याभिषेकाच्या जलधारा, शिवराजाच्या दानधारा आणि रणमर्दांच्या रुधिरधारा अशा त्रिविध धारांनीं बनलेलें हें महान् धारातीर्थ आहे, याचा प्रत्यय येऊन रायगडावर मन गंभीर होतें, उदात्त होतें.

माझ्या मतें रायगडासारखा भाग्यवंत गड नाहीं अन् त्याच्यासारखा दुर्भागीहि गड नाहीं. शिवाजीला मेखला-यज्ञोपवीत मिळालें तें इथें. त्याची सोयराबाईशीं सोयरीक झाली, ती इथें. राज्याभिषेक हा तर सर्व मंगलांचा मुकुटमणि. राजारामाची मुंज लागली ती या ठिकाणीं. त्याचें प्रतापराव गुजराच्या मुलीशीं लग्न लागलें तें इथें. राजाराम आणि मागाहून संभाजी यांचे मचकारोहण झालें तेंहि याच ठिकाणीं. ही झाली शुभशोभनांची मांगलिक बाजू. आतां याच्या उलट ऐका. जिजाबाईनें इथेंच देह ठेवून शिवरायाला पोरकें केलें. हिंदुपदपादशाहीच्या कंठांतून शिवराज हा कंठमणि इथेंच निखळला. मोरोपंत पिंगळे हा मुख्य प्रधान इथेंच निवर्तला. येसूबाई इथेंच यवनांच्या अंकित झाली. आणखी काय सांगायला हवें!

आम्ही ज्या मार्गानें जगदीश्वराच्या मंदिराकडे चाललों होतों, त्याच मार्गानें

इतिहासांत दोन मिरवणुकी गेल्या होत्या. पहिली राज्याभिषेकाच्या वेळची अन् दुसरी शिवरायाच्या अंतकालची. पहिलींत शिवराज हत्तीवरच्या अंबारींत झुलत होता, लोक आमोद्–प्रमोदानें उचंबळत होते, तर दुसरींत शिवरायाचा अचेतन देह रथांत ठेवलेला होता आणि जन-वन अश्रू ढाळीत होतें. पहिली आनंदाची पूर्णिमा तर दुसरी शोकाची अमावास्या. पहिलींत महाराष्ट्राचा भाग्यसूर्य मध्यान्हीं तळपत होता तर दुसरींत त्याचा अस्त झाला होता. शिवरायानेंच बांधलेल्या त्या जगदीश्वरमंदिराच्या महाद्वारांत बाहेरच्या अंगाला ती अंतिम यात्रा थांबली. तिथेंच चंदनकाष्ठाची चिता रचण्यांत आली. आणि महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं तिळतिळ झिजलेला तो पुण्यवंत देह अग्नीच्या अधीन करण्यांत आला. राज्याभिषेकानंतर अवघ्या सहा वर्षांनीं सन १६८० त ही दुर्घटना घडली. शिवराज कर्नाटकाच्या मोहिमेहून परत येतो काय, त्याच्या पायाला गुडघी रोग होतो काय, सात दिवस ताप फणफणतो काय अन् अकस्मात् त्याच्या पंचप्राणांचें बिरडें मोकळें होतें काय, सगळेंच अघटित ! सभासद लिहितो, 'राजियाचें देहावसान जालें ते दिवशीं पृथ्वीकंप जाहला. गगनीं धूमकेत उदेला. उल्कापात आकाशाहून जाला. रात्रीं जोड इंद्रधनुष्यें निघालीं. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्रीशंभुमहादेवीं तळ्याचें उदक रक्तांबर जालें.'

वज्रचुडेमंडित सौभाग्यवती पुतळाबाई या शिवराजाच्या एका पत्नीनें त्याच्याबरोबर सहगमन केलें. भारतीय साध्वींच्या बाबतींत हें आश्चर्य नव्हे. पण तिथें दुसरें एक महदाश्चर्य घडलें तें हें कीं, शिवराजाच्या वाघ्या कुत्र्यानें धनी आगीच्या डोंबाळ्यांत सांपडला हें पाहून स्वतः त्या चितेंत उडी घेतली.

**" शिवराजे निजधामा गेले**
**राष्ट्र अश्रुंनीं साचें न्हालें**
**भग्नहृदय जन अवघे झाले**
**परी एकटा एकनिष्ठ तो**
**त्यांच्यासह जातो ! कुत्रा त्यांचा तो "**

म्हणून भालचंद्र कवीनें त्याला तिळांजलि वाहिली आहे.

त्या महाप्रस्थानाच्या वाटेंत युधिष्ठिराचे चारी भाऊ पडले. प्रिय पत्नी द्रौपदीहि पतन पावली. पण एक कुत्रा युधिष्ठिराला सोबत करीत थेट स्वर्गद्वारापर्यंत आला अशी महाभारतांत कथा आहे. तो कुत्रा म्हणजे साक्षात् धर्म

होता. मला वाटलें कीं, तोच धर्म पुनरपि कुत्र्याच्या रूपानें शिवरायाकडे येऊन राहिला असेल आणि तोच देहार्पण करून त्याच्यासंगें स्वर्गांत गेला असेल. ही कल्पना येण्याचें कारण हें कीं, शिवराजाचें समग्र जीवन महाभारतांतून घडलेलें आहे. महाभारत हा त्याचा आदर्श होता. शांतिपर्वांत भीष्मानें युधिष्ठिराला राजधर्म कथन केले त्यांत राजाला आठ प्रधान असावे असें सांगितलें आहे. शिवराजानें तीच गोष्ट केली. आणि त्यानें सगळ्या राज्याचें दानपत्र समर्थांच्या झोळींत टाकलें, असें सांगतात, तोहि भीष्माचाच आदेश. त्यानें युधिष्ठिराला सांगितलें होतें कीं,

**“ यदि स्वर्गे परं स्थानं धर्मतः परिमार्गसि**
**यत्किंचिज्जयसे भूमिं ब्राह्मणाय निवेदय ”**


शिवरायाची ही समाधि अष्टकोनी आहे. तिच्यावर मेघडंबरी उभारलेली असून आंत ब्रॉंझ धातूचा प्रतिमाफलक पश्चिमाभिमुख बसवलेला आहे. याहि स्थानाची आजवर उपेक्षाच होती. पण लो. टिळकांनीं या प्रश्नाला जाहीर चालना दिली आणि त्यांच्याच प्रेरणेनें रायगड स्मारक समिति स्थापन होऊन तिच्याद्वारां हें शिवस्मारक उभारलें गेलें. १८९५ सालीं लोकमान्यांनींच रायगडावरचा पहिला शिवमहोत्सव साजरा केला.

शिवरायाच्या समाधीसमोरच वाघ्या कुत्र्याचेंहि स्मारक श्रीमंत तुकोजीराव होळकरांच्या देणगींतून उभारण्यांत आलें आहे. तिथें एका शिलास्तंभावर तो इमानी जीव ब्रॉंझ धातूच्या रूपांत आपल्या धन्याच्या प्रतिमेचें रक्षण करीत जागरूकपणें उभा आहे. तिथेंच एक लहानसें पारिजातकाचें झाड आहे. सगळा आसमंत शांत, निर्जन आहे. अक्षरशः चिटपांखरूंसुद्धां तिथें फिरकत नाहीं. फक्त अस्तगामी सूर्यनारायण तेवढा सोनेरी करांनीं आपल्या कुलभूषणाच्या त्या प्रतिमेला कुरवाळतो आणि डोंगराआड होतो. आम्ही त्या समाधीला प्रदक्षिणा घालूं लागलों तर डॉ. श्रीखंडे यांची तिथेंच काव्यसमाधि लागली. त्यांच्या झरणींतून वहीच्या पानावर झरझर आर्या-श्लोकांच्या पंक्ती उतरूं लागल्या—

**“ शिवपदपद्मरजःकणपवित्र ही भूमि वंदुं अम्हि माथा**
**स्मरतो संतत चित्तीं सर्व महाराष्ट्र त्याच नरनाथा ”**

शिवरायाच्या देहावसानानंतर सुमारें दीडशें वर्षे रायगड बोलका होता, जिवंत होता. अनेकदां त्याच्यावर हल्ले आले; पण मराठ्यांनीं त्याला आपल्या

हातचें सोडलें नाहीं. पण १८१८ सालीं कर्नल प्रॉथर हा इंग्रजांचा सेनानी जेव्हां रायगड घेण्यासाठीं त्या खोऱ्यांत दाखल झाला तेव्हां मात्र त्याचे नवग्रह वक्री झाले. इंग्रज सैन्यानें गडाची नाकेबंदी करून तोफांचे मोर्चे बांधले. गडाला वेढा पडला. त्या वेळीं बाजीरावाची बायको वाराणशीबाई किल्ल्यावर होती. शेख अबदुल हा किल्लेदार होता.



शिवछत्रपतीची समाधि

आपली पूर्वतयारी होताच क. प्रॉथरनें वाराणशीबाईला निरोप धाडला कीं, 'ताबडतोब किल्ला खाली करा.' पण तिनें तो जुमानला नाहीं. किल्लेदारानें वरून तोफांचा भडिमार सुरू केला. मराठी सैन्यानें शर्थ चालवली. पण इंग्रज सर्व बाजूंनीं बलवान् होता. त्यानें आपल्या तोफा पूर्व बाजूच्या पोटल्याच्या डोंगरावर चढवल्या. तिथून जे गोळे सुटले ते बारा टाक्यांजवळच्या दारू-कोठ्यावरच नेमके आदळले. कोठ्यांचा भडका उडाला. पाठोपाठ आणखीहि गोळे आले. सगळा रायगडच ज्वालाग्राही बनला. किल्लेदार किंकर्तव्यमूढ बनला. वाराणशीबाई हतबुद्ध झाली. आतां कसलाच उपाय चालण्याजोगा नाहीं

हें पाहून तिनें किल्ला खाली करून देण्याचें ठरवलें. प्रॉथरला तसा निरोप गेला. श्री. वि. वा. जोशी लिहितात—

" १० मे रोजीं दुपारीं क. प्रॉथर वर गेला. तो वर जात असतां मराठी सैन्य खालीं उतरत होतें. इंग्रजांच्या शंभर सैनिकांनीं किल्ल्याचा दरवाजा आपल्या ताब्यांत घेतला. क. प्रॉथर वर गेला, तों त्याला सर्व किल्ला बेचिराख झालेला आढळला. कित्येक इमारती अद्याप पेटत होत्या. मात्र धान्याचा संग्रह व कांहीं इमारती शाबूत होत्या. इंग्रजांच्या माऱ्यानें किल्ल्याची अगदीं धुळधाण उडविली. क. प्रॉथर किल्ल्यावर वाराणशीबाईचे भेटीस गेला. ती बाई निराशा, दुःख, उद्विग्नता यांनीं खिन्न झाली होती. तिच्या आजूबाजूला अग्नीनें सर्व हलकल्लोळ मांडला होता. नंतर तिला तिच्या खाजगी मालमत्तेसह पुण्यास जाण्याची परवानगी देण्यांत आली. तिच्याबरोबर शंभर शिपायांची एक तुकडी बंदोबस्तसाठीं देण्यांत आली. त्या बाईच्या पावलांबरोबर रायगडाला व अखिल महाराष्ट्राला स्वातंत्र्यलक्ष्मी सोडून गेली. इंग्रजांनीं आपला बावटा – युनियन जॅक – रायगडावर फडकविला! किल्ल्यांत पांच लक्ष रोकड नाण्यांच्या रूपानें इंग्रजांच्या हातीं आली. संपला रायगडाचा इतिहास! "

# ४.

# अलीबागचा पाणकोट

‘ सब भूमि गोपालकी ’ हें वस्तुतः खरें असलें तरी कांहीं विशिष्ट भूप्रदेश असे असतात कीं, तिथें आपल्या मनाचें अष्टदळ एकाच फुंकरानें उमलून जातें. कितीहि वेळां तिथें गेलें तरी त्या प्रदेशाचा अनादर होत नाहीं. कुलाबा जिल्ह्यांतलें अष्टागर हें माझ्या वांट्याला तसें आहे. धरमतरच्या वाफोरांतून उतरून धक्क्याला पाय लावला कीं वायुलहरींच्या रूपानें प्रसन्नता चोहोंकडून धांवत अंगावर येते. पळत पुढें जाऊन पुढच्या मोटारींत जागा पकडतां आली नाहीं अन् मोटार डोळ्यांदेखत आपल्याला न घेतां फरारत गेली तरी वाटतें कीं, ‘ येथें कोणाचें काय बा गेलें ! ’ दुरून का होईना, पण सह्याद्रि आपली पाठी राखीत आहे, बाष्पनौका आणि तराफे आल्या-गेल्यांना पैलपार घालीत आहेत, एवढासुद्धां खळाळ न करतां खाडी गंभीरपणें वाहत आहे, दोही अंगांना दृष्टि पोंचत नाहीं एवढीं विस्तीर्ण भात-खाचरें पसरलीं आहेत आणि एकच मोड घेऊन मग सुसाट जाणारा रस्ता बारा मैल अंतर तोडून थेट अलीबागेला पोंचतो, हें आपल्याला ठाऊक आहे; मग चिंता कशाची !

मीं ज्याला अष्टागर म्हटलें त्याचा इथूनच प्रारंभ होतो. पंचवीस मैल लांबीची ही किनारपट्टी अलीबाग तालुक्यांत मोडते. पूर्वेला सह्याद्रि, पश्चिमेला समुद्र, दक्षिणेस रेवदंड्याची खाडी आणि उत्तरेस रेवसची खाडी या त्याच्या चतुःसीमा. नारळी-पोफळींच्या बागांना आगर अशी संज्ञा आहे. मीठ पिकतें त्या जागेलाहि आगरच म्हणतात. आणि एक आगर म्हटलें कीं त्यांत अवांतर अनेक वस्तू येतात. अलीबाग, नागांव, थळ, चौल, सासवणें, साखर, आक्षी आणि किहीम अशीं आठ आगरें इथें शेजारीं शेजारीं वसल्यामुळें त्यांच्या संघाला अष्टागर असें नांव मिळालें आहे.

अग्नागर समथळ, पाणथळ आणि सुपीक आहे. इथल्या निसर्गाच्या सौंदर्य-पटावर मानवानें आणखी बागबगीच्यांची कलाकुसर निर्मिली आहे. किनारा सपाट; त्यामुळें समुद्राच्या लाटा जणूं त्यावर लोळण घेत आहेत असें वाटतें. शेतांवरून खारा वारा वाहूं लागला कीं भाताच्या रोपांची लवलव नकळत नजर ओढून घेते. केव्हां केव्हां तर कोस कोस पसरलेल्या हिरव्या भूमीवरून जणूं एखादी समुद्राची लाटच निघून गेल्याचा भास होतो. वाऱ्याच्या खारटपणांत कित्येकदां बागांतून येणारा पुष्पगंध मिसळतो आणि त्या मिश्रणाचा एक निराळाच खुषबू नाकाशीं दरवळतो. पश्चिमेला सागरावर आणि दक्षिणोत्तर दिशांना खाड्यां-वर शिडांचीं शुभ्र गलबतें पदरांत वारा भरून घेऊन सलील हंसगतीनें तरंगतांना दिसतात. इथला आगरी तांबूस, रेताड जमिनींत राबतो. कोळी जाळीं पसरून समुद्रावर जागतो. आणि भंडारी गाडग्यांत ठिबकणारी नीरा जमविण्यासाठीं माडांच्या शेंड्यांशीं सलगी करतो. बायका या सगळ्यांच्या सहधर्मचारिणी होतात.

गोव्यांतल्याप्रमाणेंच इथल्या नगरपुरंध्रींना आणि ग्रामललनांनाहि फुलांची भारी हौस. त्यांच्या परसांत अबोली बारा मास फुलते. अबोलीची वेणी नसली तरी फिकट तांबूसपिवळ्या अशा त्या फुलांची एक लहानशी डिकशी तरी अंबाड्यांत खोंचायलाच हवी अशी त्यांची धारणा असते. हिंवाळ्यांत अबोलीच्या वेणीवर सुरंगीचा वळेसर चढतो आणि वसंतांत मोगरीचे सघर्ण तुरे त्यांचा तुकतुकीत केशकलाप शोभवतात. श्री. स. आ. जोगळेकरांनीं अग्रागराचें वर्णन करतांना एक सुवासिक वाक्य लिहिलें आहे. ' बांधीव, भरदार वेण्या माळलेल्या अटकर व सडपातळ हलिक स्त्रिया एकट्या दुकट्या किंवा गटानें सकाळींच स्नान उरकून ताजेंतवानें माळव घेऊन बाजाराला निघाल्या कीं त्या जणूं स्वतःची टवटवीत प्रसन्नता भोंवतालीं दरवळीत जातात! अपरांतांतील स्त्रियांच्या पुष्पासक्तीची प्रशंसा प्राचीन पाश्चिमात्य प्रवाशांनींहि केलेली आहे.'

अग्नागर ही मूळ च्यवनऋषींची तपोभूमि. भगवान् श्रीकृष्णाचेहि पाय इथें लागले असल्याचें पुराणें सांगतात. इथें साक्षात् शंकरानें रामाच्या नांवें लिंग स्थापलें. इथें बौद्धांनीं धर्मप्रचारासाठीं डोंगर-टेंकड्या पोखरून लेणीं निर्मिलीं. जैनांनीं मंदिरांची उभारणी केली. नजीकच्या इतिहासांत शिवछत्रपतींचा वरदहस्त इथें वावरला. एक अतुबळी दर्यावर्दीसत्ता इथें उत्कर्ष पावली. अग्नागरांतले हिराकोट,

सागरगड, रामदरणें, खांदेरी-उंदेरी, अलीबागचा जलदुर्ग, रेवदंड्याचा भुईकोट, चौलचा राजकोट हे सगळे जळांतले आणि स्थळांतले दुर्ग आजहि आपल्याला अनेक बऱ्यावाईट ऐतिहासिक घटनांची साक्ष पुरवतात.

पोयनाड डाव्या हाताला टाकून पुढें गेलें कीं एक डोंगरघाटी लागते. ती उतरल्यावर तुरळक मनुष्यवस्ती सुरू होते. दोही अंगांना तोंडल्याचे मांडव दिसूं लागतात. इथल्या भाजीपाल्यांत तोंडल्याची पैदास विशेष आहे. तोंडल्याला बिंबफळ असें संस्कृत नांव आहे. संस्कृत वाङ्मयांत रमणीच्या अधराचें उपमान म्हणून तें ख्याति पावलें आहे. पक्व तोंडलें उभें चिरलें कीं त्यांतला तांबडा रंग दृष्टीला मोह घालतो आणि मग कवींनीं अधराच्या सादृश्यासाठीं त्याचा उपयोग कां केला, तें बरोबर कळतें. योगिराज शंकराला उमेच्या मुखाचें आकर्षण वाटलें आणि त्यानें आपले तीनहि नेत्र तिच्या मुखावर रोखले, त्याचें कारण तिचें अधरबिंब हेंच नेमकें कालिदासानें सांगितलें आहे.

आम्रवृक्षांच्या घनदाट छायेंत उभारलेल्या एस्. टी. च्या स्थानकावर उतरून आम्ही तिथल्या ब्राह्मणआळींत गेलों. श्री. रा. वा. दातार यांचें घर हें आमचें तिथलें मुक्कामाचें ठिकाण होतें. त्यांचें दर्शन झालें आणि सगळा शीणभाग हरला. 'सुहृद्दर्शनमौषधम्' हें कविवचन तात्काळ पटलें. अतिथीनें अचानक जायला हरकत नाहीं; पण अवेळीं जाऊन यजमानाला संकटांत घालूं नये, हा शिष्टाचार त्यांच्या घरीं मोडतांना मला कांहींच वाटलें नाहीं. सुग्रास भोजनानंतर थोडी विश्रांति घेतल्यावर त्यांनाच पुढें घालून आम्ही किल्ला पाहायला निघालों.

कार्यारंभीं नमन करायला गणपति दारांतच होता. त्याच्यासमोर शमीच्या झाडाखालीं जी विहीर आहे, ती अडीचशें वर्षांइतकी जुनी आहे. त्या काळीं अली नांवाचा एक धनकनकसंपन्न मुस्लिम गृहस्थ इथें रहात होता. आजचें अलीबाग शहर ही त्याची मोठी थोरली बाग होती आणि तिच्या पोषणासाठीं त्यानें अनेक विहिरी खोदल्या होत्या. त्यांपैकीं एक मामलेदार कचेरीजवळची आणि ही दुसरी गणपतीच्या देवळापुढची, अशा दोन विहिरी आजमितीस दिसतात. अलीचें थडगेंहि कचेरीजवळच आहे. इथली वस्ती पूर्वी हिराकोटाच्या उत्तरेस रामनाथी होती. ती कान्होजी आंग्र्यानें इथें आणली आणि बागेचें रूपांतर नगरांत केलें.

अलीबागचा किल्ला पाहायला जायचें तर समुद्राची मर्जी सांभाळूनच जावें


लागतें. किनाऱ्यापासून किल्ला एका फर्लांगाच्या अंतरावर नैर्ऋत्य दिशेला आहे. पण भरतीच्या वेळीं तिथें कंबरभर पाणी होतें आणि वाट अडते. आम्ही ओहोटीचा अंदाज घेऊन गेलों होतों; पण पाणी पुरतें ओसरलें नव्हतें. प्रत्येक लाटेचा जोर कमी कमी होत होता, ती मागें मागें फुटत होती; पण अजून अर्धा तास तरी थांबणें भाग होतें. महासागरच तो. 'तिथें मानवा किंकरा कोण केवा!'

पण ती तिष्ठत मुळींच कंटाळवाणी झाली नाहीं. वाळल्या पुळणींत पाय कढत झाले म्हणून आम्ही ओल्या वाळूवर गेलों. तिथें लहान लहान किरवे कणे-रांगोळ्या काढीत होते तें पाहिलें. समुद्रफेण, शिंपा, विविध रंगछटांचे शंख अशा वस्तू हाताळल्या नि फेंकल्या. आमच्या उजव्या हाताला किल्ल्याच्या वरच्या भागीं सूर्याचे सुवर्णकिरण लाटांवर स्वार झाले होते. तिकडचा जलरंग सोनेरी बनला होता. किल्ल्याच्या खालच्या अंगाला सागरावर फिकट हिरवी वर्णछटा पसरली होती. त्या रंगाची सचेतन कांति डोळ्यांना भुरळ घालीत होती. तिकडील किनाऱ्यावरचे माड अन् सुरूचे वृक्ष यांच्या हिरव्या रंगाला त्यानें केव्हांच जिंकून टाकलें होतें. दक्षिणेस कोरलईचा किल्ला धीरोदात्तपणें उभा होता. त्याच्या मागच्या अंगाला रेवदंड्याची बागशाही हिरवी असूनहि दूरत्वामुळें निळसर दिसत होती. पाठीकडे अलीबाग शहर माडांच्या शेंड्यांचीं छत्रचामरें मिरवीत उभें होतें आणि उत्तरेस दूरवर समुद्राच्या कुशींत शिरलेल्या एका टेंकडीच्या टोंकावर बोटींना मार्गदर्शन करणारा दीपस्तंभ विराजत होता. आणि त्याच्या अलीकडे किनाऱ्याला लागूनच अलीबागची वेधशाळा माडांच्या उंचीशीं स्पर्धा करीत उभी होती.

या वेधशाळेच्या अंतर्भागांत पूर्णपणें काळोख असून सात-आठ यंत्रें बसवलेलीं आहेत. भूगर्भांत ज्या कांहीं घडामोडी होतात त्यांचे आलेख या यंत्रांच्या साह्यानें आपोआप निघतात. ही वेधशाळा ग्रहनक्षत्रांचा वेध घेणारी नाहीं. हिचें कार्य मुख्यतः भूगर्भांतल्या उलाढाली जाणण्याचें आहे. पृथ्वीच्या पोटांत एक भला मोठा चुंबकाचा दांडा असावा असा शास्त्रज्ञांचा साधार तर्क आहे. या चुंबकामुळेंच भूगर्भांत विलक्षण घटना चालू असतात. त्यांचा परिणाम वरहि दिसतो. सर्व यंत्रसामग्री सुसज्ज असूनहि रेडिओचें कार्य एकाएकीं थांबतें. कांहीं वेळां तारायंत्र व्यवस्थित काम देत नाहीं. बिनतारी संदेशहि स्थगित होतात. त्यामुळें विमानवाहतुकींत व्यत्यय येतो. आणि याचें कारण म्हणजे भूगर्भांतल्या

चुंबकाचें आकर्षण. असा कांहीं तरी अडथळा येण्याचा संभव असेल तर त्याची पूर्वसूचना या वेधशाळेंत मिळते. दिवसांतील ठराविक वेळीं इथें निघणाऱ्या आलेखाचें वाचन होतें आणि मग ते आलेख त्यांवरून निघणाऱ्या फलितासह मुंबईला पाठवले जातात. तिथें त्यांची पुनश्च विचिकित्सा होऊन अखेरचा निर्णय जगांतील अशा प्रकारच्या वेधशाळांकडे रवाना होतो.

जगांत अशा वेधशाळा ( Magnetic Observatory ) एकूण पंचावन्न आहेत. त्यांमध्यें सर्व प्रकारच्या यंत्रसामग्रीनें सुसज्ज अशा फक्त वीसच असून अलीबागची वेधशाळा ही त्या विसांत येते. भारतांतली हीच एकमेव संस्था आहे. १९०७ सालीं मुंबईहून आणून इथें तिची प्रतिष्ठा करण्यांत आली. अशा वेधशाळेला वीज आणि लोहसांटा यांचें वावडें असतें. या दोन अंतरायांमुळें तिचें कार्य नीट चालत नाहीं. त्यामुळेंच अलीबागकरांना विजेची गैरसोय सोसावी लागते. पण या वेधशाळेमुळेंच अलीबागला आंतरराष्ट्रीय महत्त्व आलें आहे. भूगर्भशास्त्रज्ञांच्या नकाशांत त्याच्या नांवाचा एक ठिपका आहे. विषुववृत्ताच्या पट्ट्यांत भूगोलांतर्गत घडामोडी काय नि कशा प्रकारच्या चालतात, त्या दाखवणारें तर जगाच्या पाठीवर अलीबाग हेंच एकमेव ठिकाण आहे. त्यामुळें जगांतील शास्त्रज्ञांचा अलीबागेवर नेहमींच डोळा असतो.



अलीबाग किल्ल्याचें स्थूलदर्शन

पांच वाजण्याच्या सुमाराला पूर्ण ओहोटी झाली. ओल्या घट्ट पुळणीवर उरले ते फक्त वेडेवांकडे कंगोरे. पाऊलभर पाण्यांतून चुबुक् चुबुक् करीत आम्हीं प्रथम सर्जेकोटाची दिशा धरली. ही एक लहानशी गढी आहे. मध्यें वर्तुळाकार मोकळी जागा, भोंवतीं तट, त्याला कडेनें दगडी कठडा आणि त्यांत मारगिरीसाठीं जंग्या अशी तिची रचना आहे. किनाऱ्याकडून हल्ला आला तर तो प्रथम इथून परतवायचा. इथून मुख्य किल्ल्याच्या तटापर्यंत एक सेतु बांधलेला आहे. रामाच्या सेतूसारखाच तोहि आजमितीस मधून मधून खंडित झालेला असला तरी त्याच्यावरून किल्ल्याच्या महाद्वाराशीं जातां येतें. हें महाद्वार ईशान्येला असून सागवानी आहे. त्याच्या आंतल्या अंगाला आणखी एक लहान दरवाजा आहे. त्याला खालीं तळघर आहे. त्यांत दोन कोठ्या आहेत. पैकीं एकींत तांदुळाचा सांठा करीत आणि दुसरींत तेल, तूप, गहूं इत्यादि किराणा भुसार माल सांठवीत.

" दुर्गाणि राज्ञा कार्याणि सजलानि दृढानि च
द्रव्यमन्नं च तेष्वेव स्थापनीयं प्रयत्नतः "

राजानें दुर्ग बांधावे. ते बळकट करावे. त्यांत पाणी मुबलक असावें. आणि हरप्रयत्नानें द्रव्य आणि अन्न त्यांत जेवढें सांठवतां येईल तेवढें सांठवावें, या राजनीतीच्या तत्त्वानुसार आंग्रे वागत.

१६६१ सालीं शिवरायानें आरमाराची स्थापना सरकारीरीत्या केली. नंतर हळूहळू कोंकणपट्टी काबीज करण्यास प्रारंभ केला. एकेक करीत दर्याकिनारींची बंदरें कबजांत आणलीं. सगळ्या कोंकणकिनाऱ्याचें निरीक्षण करून मोक्याच्या खंबीर जागा शोधून काढल्या. तिथें सिंधुदुर्ग, अंजनवेल वगैरे नवे किल्ले बांधले आणि कुलाबा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, हे जुने किल्ले दुरुस्त केले. सिंधुदुर्ग हें आरमाराचें मुख्य ठाणें आणि कुलाबा हें तोफा नि दारूगोळा ठेवण्याचें ठिकाण बनवलें. एक शिद्दीचा जंजिरा तेवढा सोडला तर बाकीचा सर्व किनारा शिवरायानें आपल्या आरमाराच्या बळावर परचक्रापासून अलिप्त ठेवला.

पुढें संभाजीच्या वधानंतर पुनश्च मराठी राज्यावर मोंगलांचें गंडांतर आलें. त्याचें अस्तित्व संपुष्टांत येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. अशा वेळीं देशावर दोन धुरंधर रणझुंझार पुढें आले, ते म्हणजे संताजी घोरपडे अन् धनाजी जाधव. त्यांनीं यवनांच्या दाढेंतून स्वराज्य ओढून काढलें आणि महाराष्ट्राची इभ्रत

राखली. त्याचप्रमाणें कोंकणांत समुद्रकिनाऱ्यावर इंग्रज, फिरंगी, डच, शिद्दी इत्यादि सत्तालोलुप परकी लोकांचा पाडाव करून दर्यायुद्धांतल्या शौर्यानें सर्वांना दिपवून टाकणारा एक महारथी निर्माण झाला, त्याचें नांव कान्होजी आंग्रे. अलीबागचा इतिहास कथन करतांना कान्होजीचें नांव सर्वप्रथम घ्यायला हवें.


आंग्र्यांचें मूळ गांव आंगरवाडी. त्यांचा मूळ पुरुष तुकोजी संकपाळ. यानें शिवरायाचे पदरीं नोकरी धरली. शिवरायानें तुकोजीला आरमारांत एका मोठ्या जागेवर नेमलें. याचाच मुलगा कान्होजी. तो दर्याच्याच अंगाखांद्यावर खेळला, वाढला. सिधोजी गुजर हा आरमाराचा मुख्य सेनापति निवर्तल्यावर राजारामानें १६९८ सालीं कान्होजीला त्याची जागा दिली. पुढें शाहू व ताराबाई यांच्यांत सत्तासंघर्ष सुरू झाला. त्यांत कान्होजीनें ताराबाईचा पक्ष धरला. पण शाहूनें बाळाजी विश्वनाथ याला मध्यस्थी घालून अष्टागरांतले खांदेरी, कुलाबा नि सागरगड हे किल्ले आणि त्यांखालचा मुलूख आणि शिवाय 'सरखेल' ही पदवी देऊन आपल्या बाजूस वळवलें.

कान्होजी म्हणजे साहसाचा पुतळा. पहिल्या प्रतीचा दर्यावर्दी. त्याची महत्त्वाकांक्षा दांडगी तसेंच धोरणहि खंबीर. त्यानें विजयदुर्ग हें आरमाराचें मुख्य ठिकाण केलें आणि सगळ्या बंदरी किल्ल्यांची उत्तम तटबंदी केली. मुंबईपासून गोव्यापर्यंतच्या किनाऱ्यावर त्यानें एकहि खाडीचें तोंड अथवा बंदर तटबंदीवांचून दुर्बळ आणि शत्रूचें बोट शिरण्याजोगें असें ठेवलें नाहीं. त्यानें आरमारांतहि पुष्कळच सुधारणा केली. सगळ्या कोकणकिनाऱ्यावर आपला शाक निर्माण केला. हशम म्हणजे समुद्रावर लढणारे लोक आणि दर्यावर्दी म्हणजे गुराबा, तिर्कटी इत्यादि जहाजें चालवणारे लोक, यांना त्यानें उत्तम शिक्षण देऊन वाकबगार केलें. मराठी व्यापारी गलबतांचें चाच्यांकडून संरक्षण करणें, शिद्द्याच्या स्वाऱ्यांपासून रयतेला संभाळणें आणि दर्यावर स्वामित्व मिळवणें असें त्याच्या आरमाराचें त्रिविध उद्दिष्ट होतें.

कोणत्याहि युरोपियन राष्ट्राच्या गलबतावर तो बेधडक धाड घाली. इंग्रजांचीं किती तरी जहाजें त्यानें कान धरून पकडून आणलीं. कान्होजी हा आपल्या व्यापाराला मूर्तिमंत धोका आहे असें त्यांना वाटूं लागलें. इंग्रज, पोर्तुगीज इत्यादि टोपीकरांना त्याच्या नांवाचा वचक उत्पन्न झाला. कंसाला कृष्ण तसा फिरंगी व्यापाऱ्यांना कान्होजी समुद्रांत सगळीकडे दिसूं लागला. पोर्तुगीज ग्रंथकार

बारबॅरोसाशीं त्याची तुलना करूं लागले. इंग्रजांच्या तत्कालीन कागदपत्रांतून तो 'शिवाजी' या नांवानेंच उल्लेखिला जाऊं लागला. मरेपर्यंत परद्वीपस्थ लोकांवर त्यानें आपला धाक कायम ठेवला होता. श्री. तात्यासाहेब केळकर म्हणतात कीं, 'कान्होजी आंग्र्यासारखा दर्यावर्दी, युद्धामधें पुरा निपुण, अद्वितीय पराक्रमी आणि अचाट साहसी पुरुष राजारामाच्या कारकीर्दीत बिकट राजकारण-प्रसंगीं निर्माण झाला नसता, तर सर्व समुद्रकिनारा मराठ्यांच्या ताब्यांतून नाहींसा झाला असता, ह्यांत तिळमात्र शंका नाहीं.'

१८ व्या शतकाच्या आरंभीं कान्होजी या किल्ल्यांत राहूं लागला. त्याच सागरझुंजाराच्या निवासस्थानावर आम्ही आतां फिरत होतों. तें सत्तावैभव आतां आंत दिसत नव्हतें. तीं तोफा चढवलेलीं दोन-तीन शिडांचीं मोठीं गलबतें



थोरला वाडा


आतां बाहेरच्या सागरलहरींवर डुलत नव्हतीं. आंत-बाहेर सगळें उजाड, उदास अन् उद्ध्वस्त दिसत होतें. सगळीकडे रान वाढलेलें. कांटेरी झुडपें अंगाशीं

सलगी करतील ही भीति. एक ठराविक मळलेला रस्ता सोडला तर बाकीच्या वाटा मोडलेल्या. हा किल्ला एका खडकावर दक्षिणोत्तर मांडलेला आहे. लांबीला नऊशें फूट अन् रुंदीला साडेतीनशें फूट. तट सुमारें पंचवीस फूट उंच आहे. तटाचे दगड चुन्यांत बसवलेले नाहींत, तर खोबणी तयार करून एकमेकांत जडवलेले आहेत. तटाच्या दक्षिण अंगाला लागूनच एक पांचमजली वाडा होता. त्याला थोरला वाडा किंवा नानीसाहेबांचा वाडा म्हणत. आज त्याचीं दोन मजली भिंताडें तेवढीं उरलीं आहेत. 'घर मोडून मांडव करणें' म्हणतात तशी त्याची दुरवस्था इंग्रजांनीं केली. १८१६ त त्याची वास्तुशांत झाली, तर पुढें अवघ्या सव्वीस वर्षांत १८४२ सालीं इंग्रजांनीं त्याचें लांकूडसामान निखळवून तें लिलांवांत काढलें. दगड खणून कालव्याला लावले. ते एखाद्या श्रीमंत विलासी पुरुषाचा रंगमहाल उठवायला गेले नाहींत, त्या अर्थीं निदान त्या दगडांचें तरी सार्थक झालें म्हणायचें !

या पडीक वाड्याच्या अलीकडच्या अंगाला भवानीचें देऊळ आहे. तिचा पुजारी तिथेंच राहतो. देवळाजवळ विहीर आहे आणि तिच्याशेजारीं दीड हात उंचीची सुंदर सुघटित अशी महिषासुरमर्दिनीची मूर्ति आहे. ना धड आसरा, ना उपचार, ना नैवेद्य अशा उपेक्षित अवस्थेंत ती पडल्यामुळें तिला 'बिचारी' असें म्हणायची पाळी येते. थोरल्या वाड्याला लागूनच पलीकडे मोठा थोरला हौद आहे. त्याची बांधावळ मात्र चांगल्या स्थितींत आहे. पाण्याला विशेषसा उपसा नसल्यामुळें तें सांचवणी झालें आहे आणि त्यावर हिरवा तवंग चढला आहे. मधल्या रुंद कट्ट्यावरून त्याला प्रदक्षिणा घालतां येते आणि वरचा कट्टा आपल्या डोक्याहून उंच राहतो.

याच हौदाला लागून पूर्वीं आंग्रे सरकारचे दिवाण, फडणीस, पोतनीस राहात असत. त्यांच्या वास्तूंचा आज निकाल लागला आहे. जिथें खुद्द आंग्रे सरकारचा वाडाच कोसळून भित्तिमात्र उरला, तिथें इतर इमारतींबद्दल काय बोलावें ! त्या वाड्याची पुढची सदर अन् आंतलीं दालनें प्रशस्त होतीं, चितारलेलीं होतीं याचा आजहि अंदाज लागतो. वाड्यासमोरचें तें दारूगोळ्याचें कोठार आतां आपल्या पोटांत जंगल वाढवून बसलें आहे. वाड्याजवळची ती पायऱ्यांची विहीर तेवढी शाबूत आहे. तिच्यावर आच्छादन असल्यामुळें तिला अंधारबाव म्हणणें शोभून दिसेल. कांहीं पायऱ्या सरळ अन् कांहीं तिरक्या उतरून गेल्यावर

दोर अन् कळशी यांच्यावांचून, केवळ ओंजळीनें आपण तिचें पाणी पिऊं शकतों. किल्ल्यांत येणाऱ्या प्रवाशाची तृषा आपल्या थंड गोड्या पाण्यानें शमवण्याचें तिचें कार्य आज शेंकडों वर्षे अविच्छिन्न चालू आहे. सत्ता जाते, वैभव परास्त होतें आणि आयुष्यहि संपतें; पण या सर्वांच्या मागून चिरकाल टिकतें तें माणसाचें सत्कृत्य, त्या आप्तवचनाचें ती विहीर हें जणूं मूर्तिमंत प्रतीक आहे.



गणपतीचें मंदिर व हौद

याच वाड्याजवळ स्वतंत्र तटबंदीच्या आवारांत थोरला राघोजी आंग्रे यानें १७५९ त बांधलेलें गणपतीचें देऊळ आहे. तासीव, घडीव पाषाणांनीं बनवलेलें तें डुमदार मंदिर फारच सुंदर आहे. गाभाऱ्यांत केवळ एकटा गणपतीच नाहीं, तर

गणेशपंचायतन आहे. सगळ्या मूर्ती शुभ्र, संगमरवरी आणि चांगल्या घडणीच्या आहेत. गणपतीच्या उजव्या हाताला शंकराचें मंदिर आहे. पण त्याचा सभामंडप कोसळला आहे. डाव्या हाताला मारुतीची घुमटी आहे ती मात्र चांगली आहे. याहि आवारांत कांट्याकुट्यांचेंच राज्य आहे खरें; पण समोरच्या अंगाला कांहीं पांढऱ्या चाफ्याचीं झाडें आहेत, तीं तेवढीं कधीं पानांच्या तर कधीं फुलांच्या संभारानें दृष्टीला संतोष देतात. त्यांच्यामुळेंच त्या देवद्वारीं थोडा वेळ टेकावेंसें वाटतें.

शिपायांना बंदुकीच्या नेमबाजीचें शिक्षण देण्यासाठीं इंग्रज सरकारनें इथली एक लांब-चिंचोळी जागा पसंत केली होती. तिथें ठराविक अंतरावर एकापुढें एक असे चौकोनी कट्टे केलेले आहेत, ते जवळून आणि लांबून लक्ष्यवेध करण्यासाठीं. लक्ष्य उभें करण्यासाठीं एका बाजूला लोखंडी रूळ घातलेले आहेत. त्यांवरून तें डावीकडे किंवा उजवीकडे जरुरीप्रमाणें ढकलतां येतें.

या किल्ल्याला एकूण सतरा बुरूज आहेत. चार कोपऱ्यांवर दिग्गजांसारखे चार, समुद्राच्या बाजूनें पांच, किनाऱ्याच्या बाजूनें चार, उत्तरेस तीन आणि दक्षिणेस एक. नगारखानी, तोफखानी, दारुखानी, गणेश, सूर्य, हनुमंत, भवानी अशीं त्यांचीं नांवें आहेत. त्यांवर नांवाच्या पाट्या लिहिलेल्या नाहींत; पण आपण स्थलसंदर्भावरून त्यांचीं नांवें निश्चित करायचीं. प्रत्येक बुरुजावर चार चार पहारेकऱ्यांची योजना असे.

आंतून सगळे पाहून झाल्यावर आम्ही तटावर चढलों आणि वरूनच थेट दक्षिण टोंकाला जाऊन तिथल्या बुरुजावर बसलों. किल्ल्याचा धाकटा दरवाजा तिथेंच आहे. यशवंत दरवाजा हें त्याचें नांव. त्याच्या बाहेरच्या अंगाला खोलगट भागांत एक शेंदूर फासलेला दगड आहे, ती त्याची संरक्षक द्वारदेवता. आंतल्या अंगाचें कान्होबाचें देऊळ पडलेलें आहे. दक्षिण तटाला लागूनच दीडशें फूट लांब आणि त्याच्या निम्म्यानें रुंद अशी एक मोकळी जागा आहे, ती कान्होजीची गोदी होती असें सांगतात. त्याच्या रणनौका याच बाजूला लागत असत म्हणे!

कुलाबा उजाड करण्याच्या कामीं अग्निनारायणानें फार मोठा हातभार लावला आहे. एकदोनदां नव्हे, तर पांचदां इथें आग धडकली. १७७० तल्या अग्नि-प्रलयाचें स्वरूप भयानक होतें. पिंजार बुरूज प्रथम पेटला. तिथून फडणिसांचें

घर, सूर्य बुरूज अशा क्रमानें दावाग्नि भडकत चालला. चार बुरूज, दोन कोठ्या, दोन घोड्यांच्या पागा, हवेली, जुना वाडा, कान्होबाचा मठ इत्यादि अनेक इमारती भस्मसात् झाल्या. फडणिसांकडचीं कांहीं माणसें, कांहीं शिपाई जळून मेले. अनेक लाखांचें नुकसान झालें. त्यानंतर पुन्हा १७८७ त लागलेल्या आगींत तर खुद्द आंग्र्यांचा वाडाच भक्षून अग्नीनें पूर्णाहुति घेतली.

पण याहिपेक्षां हानिकारक अशी दुसरी एक आग सुमारें शंभर वर्षें कुलाब्यांत धुमसत होती, ती म्हणजे अंतःकलहाची, भाऊबंदकीची. आंग्र्यांच्या पांच पिढ्या कुलाब्यांत नांदल्या. सेखोजी, मानाजी, संभाजी, तुळाजी असे मोठे निधडे कर्तबगार पुरुष कान्होजीच्या पश्चात्हि आंग्रकुलात निर्माण झाले. पण त्यांच्यांत ऐक्य न राहतां सत्तेसाठीं चुरस सुरू झाली. त्यांची राष्ट्रदृष्टि अधू झाली आणि स्वार्थदृष्टीला तेज चढलें. जें कर्म शत्रूबद्दल करतांनाहि हात कचरावा, तें त्यांनीं भावाभावांत केलें. कान्होजीचा एक मुलगा सेखोजी. बापाच्या मागून तो कारभार पाहूं लागला. त्याच्याच सत्ताकालांत ही विषवल्ली रुजली. तो अल्पवयी मेला पण ती मात्र न मरतां अधिकच फोंफावली.

तुळाजी हा सेखोजीचा सावत्र भाऊ. सेखोजी मरण पावला, त्या वेळीं तो विजयदुर्गास होता. त्यानें आपले दोन्ही भाऊ येसाजी-मानाजी यांस कुलाब्याच्या कामगिरीवर धाडलें. येसाजी मुलकी व मानाजी आरमारी काम पाहूं लागला. थोड्याच दिवसांत दोघे बंधु आपसांत महामारीस प्रवर्तले. आरमार मानाजीच्या हातीं होतें; पण तेवढ्यानें भागणार नाहीं, म्हणून त्यानें पोर्तुगीजांची मदत घेतली आणि येसाजीस कैद केलें. एवढ्यावरच भागतें तर ठीक; पण त्या राक्षसानें येसाजीचे डोळे काढले. फिरंगी अलीबागेहून केव्हां हालतील आणि मानाजी एकटा केव्हां सांपडेल, याची सेखोजीचा सख्खा भाऊ संभाजी हा वाटच पाहत होता. अनुकूल संधि येताच त्यानें कुलाबा वेढून मानाजीवर स्वारी केली. पण पेशव्यांनीं मानाजीचा कैवपक्ष घेतला होता. त्यांच्या मदतीनें मानाजीनें तो वेढा उठविला. संभाजी प्रथम हताश झाला; पण लगेच त्यानेंहि फिरंग्यांची कुमक घेतली. पुनश्च कुलाब्याला वेढा पडला. मानाजीनें त्याहि वेळीं 'धाव रे शाहूराया' म्हटलें. शाहूनें खुद्द बाजीरावाला त्याच्या मदतीस धाडलें. त्यानें फिरंग्यांचें कांडात काढलें आणि किल्ला मानाजीसाठीं मोकळा करून दिला.

मानाजी १७५९ त मरण पावला. मागाहून त्याचा पुत्र राघोजी गादीवर

२२९६३

बसला. तो वारला, तेव्हां त्याचे मानाजी व कान्होजी असे दोघे पुत्र अल्पवयी होते. जयसिंग हा दासीपुत्र मात्र जाणता होता. त्यानें पेशव्यांस न कळवतां मानाजीस गादीवर बसवून कारभार सुरू केला. त्यामुळें पेशवे बिथरले. घरांत, मानाजीची आई आनंदी हिलाहि जयसिंगाचा अधिकार सहन होईना. तिनें कारस्थानें सुरू केलीं. त्यावरून मानाजीनें तिला किल्ल्यांतून उठविलें. पेशव्यांनीं माधवराव फडके आणि जिवाजीपंत यांस जयसिंगावर स्वारी करावयाला धाडलें. त्यांनीं त्याचें आरमार जाळलें. शिवाय आनंदीबाई किल्ल्यांतून गेली, तीहि कांहीं स्वस्थ बसली नव्हती. तिनेंहि बराच फौजफांटा गोळा करून कुलाब्यावर चाल केली. जयसिंगास कैद करून तिनें किल्ल्याचा ताबाहि घेतला. जयसिंग कैदेंतून निसटला आणि बाहेर जाऊन आपला पक्ष सबळ करूं लागला. त्याची सहधर्मचारिणी सकवारबाई हिनेंहि त्याला जोरकस साहाय्य केलें. आणि पतिपत्नींनीं मिळून १७९६ त आनंदीबाईचा पुरता मोड केला. ती महाडास पळाली म्हणून जिवानिशीं सुटली.

आतां आणखी एक खलपात्र कुलाब्याच्या रंगभूमीवर आलें तें म्हणजे बाबूराव. जयसिंगानें त्याच्या रूपानें चूड दाखवून वाघच घरांत आणला. पेशवे मानाजीवर कृपाछत्र धरून आहेत हें पाहून जयसिंगाला वाटलें कीं, आपण दौलतराव शिंद्याची मदत मागावी. त्यानें तसें केलें. शिंद्यानें बाबूरावाला त्याच्याकडे फौजेनिशीं रवाना केलें. बाबूराव आंग्रेकुलोत्पन्नच होता. थोरल्या मानाजीनें ज्याचे डोळे काढले, त्या येसाजीचा तो पुत्र. त्याच्या अंतरांत सूड उगवण्याची भावना जीव धरून असली तर नवल नाहीं. त्याला ही आतां आयती संधि मिळाली. त्यानें थोड्याच अवधींत जयसिंगाची कुरापत काढली आणि जयसिंगाच्या मुसक्या आंवळून कुलाब्याचा अधिकार बळकावला.

पण जयसिंगाची वीरपत्नी सकवारबाई याहि वेळीं स्वस्थ बसली नाहीं. बाहेर निसटून तिनें उद्योगपर्व आरंभलें. तिनें बरेंच सैन्य जमा केलें आणि खांदेरीच्या किल्ल्यावर धाड घातली. तो तिच्या कब्ज्यांत आला. बाबूरावाला शर्थ करूनहि तो परत मिळवतां आला नाहीं. खांदेरी म्हणजे कुलाब्याचें नाक. तें दुसऱ्याच्या हातांत गेलें कीं केव्हां घात होईल त्याचा नेम नव्हता. भेद-दंडांनीं काम साधत नाहीं, असें पाहून त्या कणिकनीतीच्या पुरुषानें सामाचा उपाय अवलंबिला.

त्याने सकवारबाईला कळवलें कीं, 'तूं खांदेरीचा किल्ला सोड; मी तुझ्या नवऱ्याला सोडतों.'

तिला आपलें सौभाग्य काळाच्या दाढेंतून सोडवण्यापलीकडे कांहीं कर्तव्य नव्हतें. तात्काळ तिनें खांदेरी खाली केली. बाबूरावानें दगाबाजी करून मुलांसह सकवारबाईला पकडलें आणि जयसिंगाला सोडण्याऐवजीं ठार मारलें. एवढ्या धामधुमींत एक प्यादें तिथून निसटलें, तें म्हणजे सकवारबाईचा थोरला मुलगा. त्यानें मुंबईस जाऊन दोन हजार फौज जमा केली. बचाजी नांवाच्या रेवदंड्याच्या एका सोनाराला त्या मोहिमेचें सेनापतित्व देऊन अष्टागरांत धाडलें. त्यानें सागरगड आणि अलीबागेला लागून असलेला हिराकोट, हीं दोन्ही ठाणीं एका धडकीसरशीं सर केलीं. बाबूरावाच्या पोटांत आंवळे शिजले. त्याचा पीळ कायम असला तरी या अंतःकलहांत बळ मात्र बरेंच कमी झालें होतें. त्यानें बचाजीला तोंड देण्याचें सोडून त्याच्या हस्तकांना मुखलेप चालू केला. तोबरा भरतांच ते फितले आणि एक दिवस बचाजी अलगद त्याच्या हातीं सांपडला. बाबूरावानें इथेंहि आपली राक्षसी वृत्ति पुरेपूर दाखवली. जे फितूर झाले, त्यांनाच त्यानें फांसावर चढविलें. शिवाय इतर कित्येकजणांना सागरगडावरून लोटून दिलें.

असा हा बाबूराव १८१३ त काळाचें भक्ष्य झाला. कुलाब्याचे अधिकार मानाजीस मिळाले. पुढें चार वर्षांनीं १८१७ त तोहि आटोपला. त्याच वर्षी संस्थानचा कारभार इंग्रजांच्या हातीं गेला. त्यांनीं राघोजीला गादीवर बसवून बिवलकर यांस त्याचे कारभारी नेमले. तो मरतांच त्याचा पुत्र कान्होजी याला कळसूत्री बाहुलें केलें. कान्होजी निपुत्रिक निवर्तला. इंग्रजांना तेवढें निमित्त पुरलें. संस्थानाला औरस वारसदार नाहीं या सबबीवर त्यांनीं १८४० सालीं संस्थान खालसा करून टाकलें. यादवीचा परिणाम शेवटीं आत्मनाशांत झाला. त्यामुळेंच परकी सत्तेला 'चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः' करतां आला. आंग्र्यांचा इतिहास म्हणजे मराठ्यांच्या सागरी सत्तेचा उगम, विकास आणि ऱ्हास यांचा इतिहास होय. 'आंगरेकालीन अष्टागर' लिहिणाऱ्या श्री. अवसळकरांनीं म्हटलें आहे, 'मराठ्यांच्या सागरी सत्तेचें नाटक रोमांचकारी व वीररसप्रधान खरें; पण तें शोकपर्यवसायी आहे.'

आतां आमच्यासमोर सूर्यास्ताचा देखावा मांडला होता. ढगांचें परचक्र निवारून सूर्यनारायण मोकळा झाला होता; पण तो खालीं जाण्यासाठीं, सागरांत

मारण्यासाठीं. आतां समुद्र आणि सूर्य यांच्यामध्यें फक्त एका वितीचें अंतर होतें, पण त्यांत डोळे दिपवणारी प्रखरता उरली नव्हती. त्याच्या सहस्र किरणांचाहि संकोच झाला होता. एका पाश्चात्य कवीनें त्याच्या या अवस्थेला शरमेची अवस्था म्हटल्याचें स्मरणांत आलें. तो म्हणतो कीं, 'नेहमींच सूर्य अस्ताला जातांना असा शरमिंदा होऊन आमच्याकडे पाहतो. कां बरें? आमच्या गोलार्धांतून फिरत असतांना मानवाचीं जीं दुष्कृत्यें त्याला पाहायला मिळालीं, त्याची तर त्याला शरम वाटली नसेल ना?' शक्य आहे. सूर्य हा माणसाच्या प्रत्येक कृतीचा आणि अंतरांतल्या वृत्तीचाहि साक्षी आहे.

'अन्तः पश्यन्ति वृजिनोत साधु'

या चरणाच्या द्वारें एक वैदिक ऋषिहि हेंच सांगतो.

महाद्वारांतून बाहेर पडून आम्ही किनाऱ्याच्या वाटेला लागलों. उत्तर बुरुजावरून खालीं पाहतांना आम्हांला दिसलें होतें कीं, त्या बाजूला समुद्रांत दगडांचे गडगे रचून कांहीं कुणगे तयार केलेले आहेत. प्रत्येक कुणग्याला एकच लहानसें खिंडार होतें. भरतीच्या वेळीं लोटत्या पाण्याबरोबर मासे त्या कुणग्यांत येतात आणि जाळ्यांत अडकतात. पाणी ओहोटलें कीं मग ते जालजीवी धीवर तिथें जाऊन सावकाशपणें ती शिकार टोपल्यांत भरून आणतात. आतांहि तसेच त्या बाजूनें कांहीं लोक परततांना दिसत होते. येतांना पाऊलभर पाण्यांतून आम्ही आलों होतों; पण जातांना पायांखालचें वाळवंट पूर्णपणें कोरडें झालें होतें. अलीबागचा किल्ला पाण्यांत आहे, असें त्या वेळीं कोण म्हणूं शकला असता! चालतां चालतां डावीकडून सागरी पांखरांचा एक थवा आवाज न करतां आमच्यापुढें आला, क्षणभर खालींवर असा नाचला आणि एखाद्या रागिणीच्या स्वरमालेच्या आरोहावरोहांप्रमाणें 'उड्डीन' गतीनें उजव्या हाताच्या अंतराळांत भरारला. किती शिस्त होती त्यांच्या त्या संघांत! एकहि पांखरूं घोटाळलें नाहीं, कीं चुकलें नाहीं. वाटलें कीं, त्या इवल्याशा शेंकडों पक्षिशरीरांत एकच प्राण खेळतो आहे.

समोर पाहिलें तों जाता प्रकाश आणि येता अंधार यांच्या संधींत अलीबाग शहर रहस्यमय दिसत होतें. डाव्या हाताच्या खांदेरीवर दिवा लुकलुकूं लागला होता. मधेंच रुंद, मधेंच आंखडलेला असा तो समुद्रकिनारा आतां रिकामा होऊं लागला होता. दक्षिणेला नागांवकडच्या किनाऱ्यावर कसलीच दिवेवात

नव्हती. आग्नेयीची गिरिमाला कोरलईच्या किल्ल्यासह अव्यक्तांत जमा होऊं लागली होती. पश्चिमेच्या अनंत जलविस्तारानें रंग पालटून विलक्षण गांभीर्य धारण केलें होतें. पण अजूनहि तिकडे दूरवर गेलेलीं शिडांचीं गलबतें मात्र परतीला लागल्याचें दिसत नव्हतें. दिवस आणि रात्र, प्रकाश आणि अंधार हीं त्या सागरपुत्र नाखव्यांच्या वांट्याला सारखींच असतील का ? आज वद्य पंचमी होती. प्रहररात्र होईपर्यंत अंधकार सागरासह धरित्रीवर आच्छादन घालणार होता. त्यानंतर पूर्वेच्या टेकड्यांतून चांदोबाची स्वारी वर येणार होती. मग रुपेरी पारदर्शक आवरणांतून तीच सृष्टि एक निराळेंच ऐंद्रजालिक रूप दाखवणार होती. समुद्र उचंबळणार होता, लाटा तारुण्याच्या मस्तींत वाळूवर लोळायला धावणार होत्या. तीरावरचे माड ती सागरलहरींची उन्माद क्रीडा टक लावून पाहणार हो त आणि कोंकणची एखादी प्रतिभावंत नारी त्या वेळीं तिथें आली, तर एक ओवी सहज म्हणून जाणार होती—

“ समुद्रा ग मध्ये । लाटांचें उभें शेत
फेसाचें पीक येत । अपरंपार ”

## ५.

# चंपावती आणि कोरलई

कोरलईला जायचें तर आधीं रेवदंड्याला जावें लागतें.

रेवदंडा अलीबागेच्या दक्षिणेस अवघ्या बारा मैलांवर आहे; पण एवढाच रस्ता मुंगीच्या पायानें तोडायला एस्. टी. च्या गाडीला तब्बल एक तास लागतो. गाडीचाहि गुन्हा नाहीं. रस्ता जुना आणि प्रादेशमात्र. त्यांतून जागजागीं उखणलेला. शिवाय कडेनें खडीच्या राशी. ती माणसांना सुखरूप नेऊन पोंचवते हेंच भाग्य. वेळ मोडतो खरा; पण दुसऱ्या दृष्टीनें मोटारच्या या गजगतीचा प्रवाशाला फायदाच होतो. त्याला सावकाशपणें दोन्ही बाजूंचा प्रदेश न्याहाळतां येतो. तो रसिक असेल तर म्हणतो कीं, या भागांत दृष्टीला सुख होण्याजोगें पुष्कळच आहे.

नागांवला येतांच आपण केळी-पोफळींच्या हिरव्या बागशाहींत प्रवेश करतों. देशावर जिला आळी किंवा गल्ली म्हणतात, तिलाच कोंकणांत पाखाडी असें नांव आहे. दुतर्फा घरें, पण तीं भिंतीला भिंत चिकटलेलीं नव्हेत. मधून रस्ता जातो. रस्त्याच्या कडेला कुंपण असतें. कुंपणांतच फुलझाडें दिसतात. त्याला लागून आंगण असतें. पाऊसकाळ सोडला तर इतर दिवसांत त्यावर मांडव घातलेला असतो. दारापुढें सावली आणि वर वाळवण असा त्याचा दुहेरी उपयोग होतो. आंगणांत नसला तर पडवीवर तरी झोंपाळा हा हवाच. पावसाचें पाणी पूर्णपणें निचरून जावें म्हणून घराचीं कौलारू पाखीं उतरतीं असायचीं. परसदारीं वेडें म्हणजे गुरें बांधायची आणि गवतकाडी सांठवायची जागा आणि त्यामागें आगर. तिकडची ग्रामरचना ही बहुधा अशा पद्धतीची असते.

आगरांतल्या पोफळी चार-पांच हात अंतर सोडून पुरलेल्या असल्या तरी वर त्यांचे शेंडे एकमेकांशीं मंडपघसणी करतात. हिरवीं, सुडौल चुडतें एकमेकांशीं कानगोष्टी कुजबुजतात. त्यामुळें पोफळीच्या आगरांत बारा मास गर्द सांवली

असते. प्रत्येक पोफळीच्या मुळांत आळें केलेलें असतें. वरच्या खावट्यांतून आळ्यांत पाणी शिरायचें, मुळाला वळसा घालून थोडा वेळ तिथें खेळायचें आणि मग दुसऱ्या खावट्यांतून खालच्या पोफळींची तहान भागवायला चालतें व्हायचें. पोफळ ही नाजूक नार आहे. एकांत्राड तरी तिचें मूळ भिजलेंच पाहिजे. नपेक्षां ती लगेच त्रावते. फळ धरायला दुबळी होते. त्यामुळें आगरांतल्या सावलींत तिच्या जोडीला गारवाहि असतो.

प्रत्येक आगराला एक विहीर असतेच. शिंपणें काढायचें ठरलें कीं तिच्यावरच्या रहाटाला बैल जोडायचा. तो बहुधा बारीक चणीचाच असतो. विरीच्या द्रोणानें डोळ्यांवर झांपड बांधलें कीं तो खालच्या मानेनें विलंबित लयींत पायांखालची वाटोळी वाट मळवीत फिरूं लागतो. दुसऱ्या बाजूनें रहाटाचें 'कुई कुई' संगीत सुरू होतें. तो गाडग्यांची भरली माळ पाटाच्या तोंडांत रिती करतो, पुन्हा भरतो, पुन्हा ओततो. मोटेच्या नादापेक्षां रहाटाचा नाद कानांना स्निग्ध-मधुर वाटतो. कोंकणचें जीवन देशावरच्यापेक्षां कष्टाचें. तें कर्मयोग्याचें जीवन आहे. श्रम जीवघेणे नव्हेत; पण ते सतत करावे लागतात. त्यामुळें तिथलीं माणसें सोशीक, चिवट अन् चपळ असतात. माझ्या मतें आगर बाळगणें म्हणजे अग्निहोत्र बाळगण्यासारखें आहे.

नागांव सुटलें आणि पुढें चौल लागलें. नागांवसारखीच त्याचीहि रचना आहे. एक सामान्य आगरी गांव यापलीकडे आज त्याला महत्त्व उरलेलें नाहीं. पण या गांवानें भूतकाळांत अनेक अवसा-पुनवा पाहिलेल्या आहेत. एका काळीं हें अष्टागराचें काळीज होतें. सुमारें दोन हजार वर्षांचा इतिहास याच्या मागें दडलेला आहे. त्या काळीं हें गांव नसून नगर होतें आणि चंपावती या नांवानें गाजत होतें. इथें चाफ्याचीं झाडें रथासारखीं फुलत म्हणून आणि चंप नांवाचा राजा इथें राज्य करीत होता म्हणून याला चंपावती असें नांव पडलें, अशा दोन्ही प्रकारच्या दंतकथा चौलाविषयीं प्रसिद्ध आहेत.

चौलला लागून असलेलें रेवदंडा म्हणजे प्राचीन रेवतीक्षेत्र. रेवती ही नांगर-मुसळ वागवणाऱ्या बलभद्राची भार्या. श्रीकृष्णानें हें क्षेत्र तिला आंदण दिलें होतें अशी कथा आहे. धर्मराजानें अश्वमेधासाठीं सोडलेला यज्ञाश्व इथवर पोंचला होता, इथल्या हंसध्वज राजानें त्याला बांधलें होतें आणि त्याच्या रक्षणार्थ पाठविलेल्या अर्जुनाशीं त्याचें इथें युद्ध झालें होतें अशी पुराणें ग्वाही देतात. प्राचीन ग्रीक

व्यापारी इथें आपल्या वखारी उघडून व्यापार करीत. त्यांच्या लेखांतून चौलाचें नांव सिमुल्ला-तिमुल्ला असें आढळतें. बाराव्या शतकांत इथें उतरलेले अरब व्यापारी याला सैमूर-जैमूर म्हणत. अरबांप्रमाणेंच पार्शीहि इथें येऊन व्यापारासाठींच स्थायिक झाले होते आणि त्यांनीं इथें अग्निमंदिरें उभारलीं होतीं.

सहाव्या शतकांत मौर्यांच्या राजवटींत चौल हें बंदर म्हणून भरभराटूं लागलें. दहाव्या शतकांत त्याच्या उत्कर्षानें शिखर गांठलें. चौलच्या उत्तरेस अंबा आणि दक्षिणेस कुंडलिका या खाड्यांचीं मुखें आहेत. चौलच्या बंदरांत येणारा माल या खाड्यांतून वर चढून कार्लें, तगर, पैठण इथवर पोंचे. व्यापार आहे तिथें लक्ष्मी असायचीच. त्यामुळें अष्टागर हें सुवर्णभूमि म्हणून ख्याति पावलें. त्या सहा कोसांच्या परिघांत चंपावती सोन्याच्या द्वारकेसारखी लखलखूं लागली. रेवदंडा, थेरवंडा, मळा इत्यादि स्थळें आज स्वतंत्र गांवें म्हणून उल्लेखलीं जातात, पण त्या काळीं तीं चौलाचीं उपनगरें होतीं. तीनशें देवमंदिरें इथें बांधलीं गेलीं होतीं त्यावरून तुम्ही तत्कालीन चौलाच्या लोकसंख्येची कल्पना करा. ती लाखाच्या वर होती, हें निःसंशय. किती तरी पुष्करिणी इथें कमळें फुलवीत होत्या. किती तरी क्रीडोद्यानें इथें थाटलीं होतीं. दिव्यांची रोषणाई, राउळांतले घंटानाद, यात्रा–महोत्सव, नगारे, चौघडे इत्यादि यामतुरें, स्वस्ति-कल्याणांचे उद्घोष, यांमुळें चंपावतीला भूस्वर्गाची कळा चढली होती.

या कळेची-अवकळा झाली ती तेराव्या शतकापासून. अष्टागराचीच नव्हे, तर उभ्या कोंकणावरची हिंदु राजाची सत्ता ढिली होऊं लागली. तुर्क चाल्हून आले अन् अतुर्बळी झाले. पुढें १५०५ त फिरंग्यांचे पांढरे पाय चौलच्या बंदराला लागले. त्यानंतर तीनशें वर्षांच्या काळांत इथें बऱ्याच राज्यक्रांत्या झाल्या. गुजरातच्या सुलतानानें फिरंग्यांना हांकलून लावण्यासाठीं १५९८ त मोठें रणकांड केलें. फिरंग्यांचा पराभव झाला खरा; पण ते उखडले मात्र गेले नाहींत. बहामनी राज्य मोडल्यावर त्यांतूनच दोन नव्या शाह्या उगम पावल्या. एक आदिलशाही आणि दुसरी निजामशाही. दोघींचीहि कोंकणावर काकदृष्टि वळली. कोंकण कबजांत आणण्यासाठीं दोघींची स्पर्धा सुरू झाली. त्या स्पर्धेत आदिलशाहीनें यशाचा तुरा लावला. १६४० त शहाजीनें तिच्यासाठीं चौलबंदर फिरंग्यांकडून जिंकून घेतलें. त्याला त्यासाठीं निकराची झुंज द्यावी लागली. अतोनात रक्त सांडावें

लागलें. चौलच्या भूमीनें जेवढा रक्तपात पाहिला, तेवढा कोंकणांत दुसऱ्या कोणत्याहि धारातीर्थानें पाहिला नसेल.

उत्तर कोंकणांत आपले पाय स्थिर होत नाहींत असें पाहून फिरंग्यांनीं गोव्यांत आपलें बस्तान बसवलें आणि त्यामुळें चौलचें बंदर या दृष्टीनें महत्त्व घटलें. ईस्ट इंडिया कंपनीनें मुंबई वाढविल्यावर तर चौलला कांहींच किंमत राहिली नाहीं. व्यापार नाहीं; मग बंदराची डागडुजी कोण ठेवतो! त्यामुळें तें उथळ होऊं लागलें. पुढें त्याचें खाजण बनलें. आणि त्यानंतर तीच खारी जमीन तयार झाली. बाहेरचा व्यापार बसला तसाच आंतलाहि बसला. फिरंग्यांच्या क्रूर उत्पातीपणानें तें इतिकृत्य केलें. चौलांत त्या काळीं रेशीम उत्पादनाचा धंदा बऱ्याच प्रमाणावर चाले. फिरंगी म्हणाले, 'तुम्ही सुखानें जेवतां काय? थांबा, आम्ही तुमचीं तुतीचीं झाडेंच तोडून टाकतों.' गोव्याप्रमाणेंच इथेंहि त्यांनीं आपली 'कीर्ति' केलीच. एकूण तीन वेळां त्यांनीं चौल लुटलें. रयतेची खूनखराबी केली. अनेकांना बाटवलें. अनेकांना कैद केलें. अगदीं नंगा नाच घातला.

त्यांच्या प्रतिकाराला असमर्थ ठरलेले चौलचे रहिवासी मग 'यःपलायते, स जीवति' या मार्गाला लागले. कोळी पळाले, सावकार पळाले, वाणी, उदमी सगळे पळाले. फिरंग्यांनीं त्यांचीं घरेंहि जाळून टाकलीं. चौल असें अनेकदां मोडलें अन् अनेकदां जोडलें. औरंगजेबानेंहि या विध्वंसाच्या कामीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. वरचें म्हणजे नागांवकडचें चौल त्यानें उद्ध्वस्त केले आणि खालचें म्हणजे रेवदंड्याकडचें चौल फिरंग्यांनीं पाड घातलें.

१७३९ त चिमाजीअप्पानें फिरंग्यांना वसईतून चंबूगबाळें उचलायला लावलें. उत्तर कोंकणांतली त्यांची सत्ता अन् सद्दी संपली. उरलें तें फक्त चौल. पुढच्याच वर्षीं मानाजी आंग्र्यानें सर्व शक्तीनिशीं त्यावर धाड घातली. मोठें अटीतटीचें युद्ध झालें. फिरंग्यांचा सर्व बाजूंनीं कोंडमारा झाला. चौल मानाजीच्या हातीं आलें. पण 'रेड्यापाड्याचें झुंज अन् झाडावर काळ' अशी म्हण आहे ना! तिथल्या रयतेला वाटलें कीं, आतां आपली दामटी वळणार. प्रजेंतली ती अस्वस्थता आणि पळण्याची प्रवृत्ति लक्षांत घेऊन नानासाहेब पेशव्यानें लगेच एक अभयपत्र काढलें.

'कोणेविसीं शक अंदेशा न धरितां वस्ती करणें व उदीम व्यापार जलमार्ग व खुशकीनें जसा जो करील तो सुखरूप करणें. कोणेविसीं शंका न धरणें. अभये असे.'

चौलांत आसा नांवाची जी मशीद आहे, तिथें पूर्वी कोट होता. त्याला राजकोट म्हणत. १६८३ त संभाजीनें तो बांधला. आंग्र्यांची राजवट सुरू होण्यापूर्वी तो चौलच्या सुभेदाराच्या ताब्यांत होता. सागरगडाच्या पायथ्याशीं कान्होजी आंग्र्यानें एक ब्राह्मणी गांव वसवलें होतें. फिरंग्यांच्या तें डोळ्यांत खुपलें. एका रात्रीं त्यांनीं त्यावर अवचित घाला घातला. कान्होजीला तें कळतांच तो जमदग्नी-सारखा खवळला. पोर्तुगीजांची पाठ वळते न वळते तोंच त्यानें वज्रमार सुरू केला. त्यांचे पांचशें लोक ठार केले. राजकोटच्या हकीम सुभेदारानें त्याला कोटांत आश्रय दिला, म्हणून ते बचावले. शत्रूला बिळ सांपडतें म्हणून हा कोट पाडून टाकावा असें बरेच दिवस पेशवे आणि आंग्रे यांच्यामध्यें घाटत होतें. अखेर १७४८ त त्याच्या खालीं सुरुंग लागले. 'आंग्रेकालीन अष्टागर' या ग्रंथांत यासंबंधीं आणखीहि बरीच माहिती श्री. अवळसकर यांनीं दिलेली आहे.

चौलाच्या अधिकाऱ्यांचें दप्तर उपलब्ध झालें आणि कोंकणांतल्या फिरंगी-मराठे यांच्या संघर्षाच्या अनेक बारीकसारीक घटनांवर प्रकाश पडला आहे. १४५० पासून पुढें तीनशें वर्षे त्यांनीं या भागांतील घडामोडींची नोंद ठेवलेली होती. किंबहुना तेंच त्यांचें नेमून दिलेलें काम होतें म्हटलें तरी चालेल. पांचकळशे माळी जातीचें हें घराणें चौलांत कसें अन् कुठून आलें, तो इतिहासहि अद्भुत आहे—

माहीम हें गांव आजमितीस मुंबईचें एक उपनगर आहे. पण आठशें वर्षांपूर्वी महिकावती या नांवानें तें प्रसिद्ध होतें. यादवांच्या राजधानीचा मान त्याला मिळाला होता. इ. स. १२१२ नंतर यादवांचें राज्य अस्तमलें. त्यानंतर केळवें, डहाणू, तारापूर, चिंचणी, आवास, सासवणें, मरोळ अशीं छोटीं छोटीं स्वतंत्र राज्यें त्या भागांत निर्माण झालीं आणि अडीच-तीनशें वर्षे नांदलीं.

अधिकारी हे त्यांपैकीं मरोळच्या राज्यांतले. त्या वेळचें त्यांचें आडनांव ठाकूर होतें. कर्मधर्मसंयोगानें गुजरातचा राजा बहादुरशहा याचें दुसऱ्या एका राजाशीं युद्ध जुंपलें. त्या वेळीं या ठाकूर घराण्यांत एकाहून एक सात कर्ते पुरुष होते ते सातच्या सात रणभूमीवर गेले. त्यानीं तिथें अप्रतिम शौर्य गाजवलें. पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, ते सगळे वीरपुंगव त्या धारातीर्थी पडले. युद्ध मात्र बहादुरशहानें जिंकलें.

पुढें विजयी वीरांना बक्षिसें वांटण्याच्या प्रसंगीं प्रश्न उपस्थित झाला कीं, ज्या

कुटुंबाचे सातहि खांब रणभूमीवर कोसळले, त्याच्या वंशजांना इनाम काय द्यावें? राजा बराच वेळ घोटाळ्यांत पडला. शेवटीं कोण्या तरी बुद्धिवंतानें एक नामी युक्ति सुचवली आणि ती राजाला एकदम पसंत पडली.

राजानें तसे हुकूम सोडले. राजदूत त्या कामगिरीवर निघाले. रणांगणांत जाऊन त्यांनीं तीं सातहि प्रेतें एकत्र केलीं. त्यांना स्वच्छ करून त्यांच्या अंगावर सरदारी पोषाख चढवला. त्यांच्या मस्तकीं मंदिल बांधले. मग ते शृंगारलेले अचेतन देह वाजत गाजत समुद्रकिनाऱ्यावर आणले. तिथें त्यांच्यासाठीं एक गलबत तयार ठेवललें होतें. ते मृत देह त्या गलबतांत ठाकठीक बसवण्यांत आले. नांगर तोडून तें गलबत समुद्रांत वाऱ्याच्या हवाल्यावर ढकलून देतांना बहादुरशहा प्रतिज्ञोत्तर बोलला—

"हें गलबत ज्या गांवच्या किनाऱ्याला लागेल त्या गांवचे अधिकार मी यांच्या वंशजांना बहाल केले आहेत. जर हें गलबत कुठल्याहि किनाऱ्याला न लागतां वाऱ्यावर भटकून अदृश्य झालें, तर मी समजेन कीं, ईश्वरानें त्यांची सेवा रुजू करून घेतली आहे आणि त्यांच्या वंशजांना कांहीं देण्याचें त्याच्या मनांत नाहीं."

तें गलबत तिथून सुटलें तें समुद्रांत तरंगत, वाऱ्याचे धक्के खात एके दिवशीं चौलच्या किनाऱ्याला येऊन लागलें. लोक पाहायला जमले. त्यांना त्या अजब दृश्याचा उलगडाच होईना. ती वार्ता वणव्यासारखी सर्वत्र पसरली आणि शेवटीं बहादुरशहाच्याहि कानांवर आली. आतां त्या राजाला आपला शब्द खरा करायला हवा होता. चौल हें कांहीं त्याच्या सत्तेखालीं नव्हतें. पण तो पुढील कार्याला सज्ज झाला. युद्धानें अथवा सामानें तें न कळे; पण चौलचा प्रदेश त्यानें घेतला आणि त्या मृत वीरांच्या वंशजांना तिथलें अधिकारपत्र देऊन तिथें नेऊन बसवलें. त्यांनीं पालखी, अब्दागीर, छत्री मिरवावी, प्रतिसाल दोनशें लारी त्यांना सरकारांतून मिळाव्या, त्यांनीं तिथल्या मंदिरांची व्यवस्था ठेवावी, न्यायनिवाडा करावा आणि मुख्य म्हणजे त्या भागांत घडणाऱ्या राजकीय, सामाजिक, भौतिक अशा सर्व घटनांची तीथवार नोंद ठेवावी, असें आज्ञापत्र त्यांना देण्यांत आलें. चौलांतल्या अधिकाऱ्यांची मूळ कथा ही अशी आहे, आणि तिला अस्सल कागदपत्राचा आधार आहे.

चौलांतलें प्रसिद्ध पुरातन मंदिर रामेश्वराचें. त्याच्या शेजारूनच मोटारचा

रस्ता जातो. या मंदिरासमोर पुष्करणी, दीपमाळ आणि तुळशीवृंदावन दिसतें. या मंदिराची अष्टागरांत प्रसिद्धि आहे ती विशेषतः त्यांतल्या तीन कुंडांमुळें. अग्नि, वायु आणि पर्जन्य अशा तीन देवतांचीं तीं कुंडें आहेत. सभामंडपांत उत्तरेला कमानीखालीं पर्जन्यकुंडाची वेदी आहे. जेव्हां अवर्षण पडेल, तेव्हां कुंडांतली माती उपसून तें मोकळें करायचें आणि त्यांत अग्नि सिद्ध करून स्वाहाकार करायचा म्हणजे पाऊस पडतो अशी तिथली प्रचीति सांगतात. १७२१ च्या जूनमध्यें सेखोजी आंग्रे यानें हें कुंड उघडायला लावलें असा दाखला मिळतो. त्यानंतर वेगवेगळ्या काळीं तीन-चारदां तें उघडलें गेलें आहे आणि त्यांत पर्जन्याच्या उद्देशानें होमहवन झालेलें आहे. जो ब्राह्मण या कुंडावर कुदळ मारील तो सहा महिन्यांच्या आंत आटोपतो अशी लोकवार्ता आहे; पण नेहमींचा अनुभव मात्र तसा नाहीं. काकतालीय न्यायानें एखादे वेळीं घडलेली गोष्ट लोकांनीं कायमचीच त्या कुंडाला चिकटवून टाकलेली दिसते.

चौल सोडल्यावर थोड्याच वेळांत आम्ही रेवदंड्याला पोंचलों. मोटारींतून उतरतांच बंदराची वाट धरली. तिथल्या कोटांतूनच बंदराचा रस्ता जातो. आम्ही एका कमानींतून आंत शिरून दुसऱ्या कमानींतून बाहेर पडलों. रस्ता सावलीचा होता आणि ती सावलीहि कांहीं वन्यवृक्षांची नव्हती. जिकडे नजर टाकावी तिकडे माडच माड. त्यांवर शहाळ्यांच्या हिरव्या, टवटवीत अन् जून नारळांच्या वरून सुकलेल्या पेंडी लटकलेल्या. माडांखालीं मांडलेल्या पोफळी. पण त्या मात्र ओक्या होत्या. त्यांची गर्भपुटें नुकतीच फुगोरा धरीत होतीं. आंबाड्याचे ठिसूळ वृक्षहि उलगून मोकळे झाले होते आणि नवी पालवी पांघरून बसले होते. मधून मधून आंब्यांच्या झाडांवर नुकत्याच बाठ धरूं लागलेल्या कैऱ्यांचे घड झोके घेत होते. फणस बाहीं बाहीं फुटले होते. विलायती फणसाच्या नितळ अंगावर रुंद पानांच्या आडून कांटेदार वाटोळी फळें बिलगलेलीं दिसत होतीं. क्वचित् आढळणारीं उभीं सोट अन् बारक्या बारक्या डहाळ्यांनीं सहस्रार्जुनासारखीं दिसणारीं कोकंबाचीं झाडें पिकून रंग पालटण्याच्या बेतांत होतीं. पण अजून ही फलसंपदा पक्क झाली नव्हती, त्यामुळें रसनेला दुष्काळच होता. दृष्टि तेवढी सुख भोगीत होती. चंपावतींत चांफ्याचीं झाडें अजूनहि आहेतच. त्यांच्या सुगंधाची लहर मधेंच दरवळून जात होती अन् ती कोंकणश्रीच्या सद्भावनेसारखी वाटत होती.

पण या सगळ्या सुंदरतेला, मंगलतेला, माझ्या दृष्टीनें एकच गालबोट किंवा

ऱ्हासें होतें तें तिथल्या कोटाच्या पडक्या भिंताडांचें. एका ठिकाणच्या तटांत बसवलेला तो शिलालेखहि मला अभद्र वाटला. मांगल्य आणि फिरंग्यांची धर्मवेडी रक्तपिपासा यांचें सख्य कालत्रयीं जमायचें नाहीं. फिरंग्यांचा हिंदुस्थानांतला इतिहास हा शरमेचा, लांछनाचा आहे, असें त्यांच्यांतल्याच हृदय शाबूत असलेल्या विचारवंतांनीं लिहून ठेवलें आहे.

आतां इथेंच पाहा. अठरा पाखाड्यांचें चौल; पण त्यांतल्या तीन पाखाड्यांचा लचका तोडून त्यांनीं इथें स्वतःसाठीं कोट बांधला. मला वाटलें कीं, आतां आपण ज्या रस्त्यानें चाललों आहों, त्याच रस्त्यावर येशूच्या या गोऱ्या बाळांनीं निरपराध जनतेचे त्या काळीं मुडदे पाडले असतील. याच कोटांत त्यांचें मांजरदेसचें मंदिर आहे. मांजरदेस म्हणजे ' माद्रि द देउस् ' अर्थात् देवाची माता. बाळ्याभोळ्या लोकांना फुसलावून तिथें न्यायचें, जादूटोणा करायचा, डोळ्यांत धूळ फेकणारे शिस्तबद्ध चमत्कार दाखवायचे आणि त्यांना म्हणायचें, ' पाहा आमचा देव कसा सर्वश्रेष्ठ आहे तें. तुम्ही त्यांच्या कळपांत या कीं तुमचं कोटकल्याण व्हायला उशीर नाहीं. ' अर्धवट भयानें अर्धवट भ्रांतीनें दडपले जाऊन मग त्या बापड्यांनीं मान तुकवायची कीं बाप्तिस्मा देण्यासाठीं पाद्री क्रूस घेऊन समोर हजर !

या कोटांत त्यांचीं अशीं अनेक मंदिरें होतीं. त्यांच्या आश्रयानें फिरंगी भिक्षू आणि जोगिणी यांचा बराच मोठा तांडा तिथें राहात असे. दुष्कृत्यें आणि दुराचार वाढत असत आणि तिथल्या अनेक गुप्त जागांतून बेमालूम लपवलेहि जात असत.


पोर्तुगीजांनीं हा कोट बांधला आणि त्याच्या अधिक सुरक्षिततेसाठीं त्याला जंजिऱ्याचें स्वरूप आणलें. पश्चिमेला समुद्र आणि दक्षिणेला कुंडलिका खाडी असा त्याला नैसर्गिक जलाश्रय होताच. उरलेल्या दोन दिशांना त्यांनीं खंदक खोदला आणि तो थेट पाण्याला नेऊन भिडवला. एका अंगानें खाडीचें आणि दुसऱ्या अंगानें समुद्राचें पाणी त्यांत ओतप्रोत भरलें आणि तो जलदुर्ग बनला. या कोटाचें महाद्वार वायव्येस होतें आणि गलबतें खंदकांतून थेट त्या द्वाराला भिडत. गलबतांतून पाय काढायचा तो दरवाजाच्या पायरीवरच टाकायचा. तूर्त हा खंदक पार बुजून गेलेला आहे. निसर्गावर केलेला अत्याचार निसर्गानें त्या परकी सत्तेसह नष्ट केला आणि उट्टें फेडलें असें म्हटलें पाहिजे.

आम्ही रेवदंड्याच्या बंदरावर पोंचलों तेव्हां सकाळचे नऊ वाजले होते.

ओहोटी असल्यामुळें पाणी बरेंच मागें गेलें होतें. मुंबईहून मालानें भरून आलेलीं दोन गलबतें तिथें मधला मुक्काम करून खाडींतून वर रोहें-अष्टमीकडे जाण्याची तयारी करीत होतीं. आणखीहि लहान मोठ्या होड्या तीरावर डहुळत राहिल्या होत्या. त्यांवर वैशाखाचीं उन्हें नाचत होतीं. पूर्वेला कुंडलिकेचा प्रवाह समृद्ध, संथ आणि सुंदर दिसत होता. तिचा जन्मदाता सह्याद्रि त्याच बाजूला खडा होता. आणि पश्चिमेला तो कोरलईचा किल्ला. आम्ही उभे होतों तिथून अवघ्या दीड-दोन मैलांवर. जिथें कुंडलिकेनें सागराला मुखार्पण केलें त्या प्रीतिसंगमावरचा जणूं तीर्थोपाध्याय. पश्चिमेच्या डोंगराला नांगराच्या फाळासारखी जी एक तिरकस सोंड फुटली आहे, तिच्या टोकावर त्याची उभारणी झालेली आहे. त्या बाजूला तोच एक डोळ्यांत भरतो. श्रीमंतीनें, डामडौलानें नव्हे; तर निःसंग, निरासक्त वृत्तीनें. त्यावर झाडांची हिरवळ नाहीं कीं दगडांची अडगळ नाहीं. भगवी छाटी पांघरून अनंताचें ध्यान धरून बसलेला जणूं तो एक ज्ञानभिक्षुच !

किल्ला जवळ होता, दिसत होता; पण जीव आणि शिव यांच्यामध्यें जशी मायानदी तशी त्याच्या आमच्यामध्ये कुंडलिका आडवी पडली होती. पलीकडे जायचें तर होडी ठरवणें भाग होतें. एक नावाडा आम्हांला भेटला. घासाघीस करून शेवटीं सव्वादोन रुपयांत तो आम्हांला किल्ल्याच्या पायथ्याशीं पोंचवायला तयार झाला. आम्ही चार-पांच माणसं आंत चढून ऐसपैस बसलों. तोंड वळवून होडी किल्ल्याच्या दिशेला लागतांच नावाड्यानें शीड सोडलें. अवखळ वाऱ्यानें तें लगेच फुगवून टाकलें. उन्हाचा ताप सोडला तर फार गमतीचा जलप्रवास होता तो ! आम्ही जसजसे पुढें जाऊं लागलों, तसतसा समुद्र जवळ येऊं लागला. किल्लाहि मोठा होऊं लागला. समुद्राला भरती चढूं लागली तशीच आमच्या मनालाहि. उणापुरा एक तास आम्ही होडींत होतों. कोरलईच्या डाव्या अंगाला कोळीवाडा वसला आहे, तिथल्या किनाऱ्याला आमची होडी लागली. जिथें उतरायचें तिथें गुडघ्याच्या वर पाणी होतें. पण होडी आणखी पुढें जाणें शक्य नसल्यामुळें आम्हांला तिथेंच उतरावें लागलें. उतरतांना कोणी डुबकले तर कोणी घसरले. बायकांची तर त्रेधाच झाली. या पडझडींतून सहजच हास्यरस निर्माण झाला. चिखल तुडवीत भरल्या पायांनीं आम्ही एकदांचे कोरड्या जमिनीवर पोंचलों.

आमची होडी लागत होती त्याच वेळीं तिथल्या कोळ्यांचीं आठ-दहा मुलें आपली होडी पाण्यांत ढकलण्याच्या उद्योगांत गुंतलीं होतीं. सगळीं सात-आठ वर्षें वयाचीं आणि एकजात शाळिग्रामाचीं घडवलेलीं. त्यांच्या अंगाला वस्त्राचा



कोरलई किल्ला

तर संपर्क नव्हताच; पण कमरेला लंगोटीहि नव्हती. दोघे वल्हीं हातांत घेऊन होडींत उभे होते. दोघे-चौघे दोन्ही बाजूंनीं आंत चढण्याचा प्रयत्न करीत होते. एकेका लाटेनें पाणी भरत होते. होडी हेलकावत होती. एकदां या बाजूला तर एकदां त्या बाजूला कलंडत होती. चढणाऱ्या नि पडणाऱ्या मुलांच्या पाठींना लाटांचे सपके बसत होते. त्यांचीं उघडीं-वागडीं शरीरें पाण्यानें निथळत होतीं. होडी काढून तीं कुणीकडे जाणार होतीं नकळे! मात्र त्यांनीं चांगलाच गलका माजवला होता. आम्ही अपरिचित अशीं चार-पांच माणसें तिथें उतरलों; पण त्यांना त्याची दखलहि नव्हती. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, कोणी हटकील, प्रसंगीं हात देईल, असें एकहि मोठें माणूस किनाऱ्यावर नव्हतें. मला वाटलें, यांच्या आई-बापांनीं या अवखळ पोरांना असें कसें मोकाट सोडलें! कदाचित्

त्यांची अशी समजूत असावी कीं, मुलें समुद्रावर आहेत म्हणजेच सुखरूप आहेत !


कोरलई–बोरलई हीं गांवें अति रूक्ष आहेत हें तिथें पाऊल ठेवायच्या आधींच समजतें. अष्टागराच्या जवळिकेनें ही रूक्षता अधिकच भकास वाटते. अशा रूक्षतेंत वैशाखाचें उन्ह म्हणजे तो प्रवास कसा काय होईल याचा कोणींहि अंदाज करावा. दुपारच्या कढावर आम्ही गड चढायला निघालेले पाहून तिथल्या लोकांनींसुद्धां आश्चर्य दर्शवलें. पण प्रवाशाला कुठली आली आहे काळ-वेळ ! प्रवास आणि ऐषआराम यांचें नेहमींच वांकडें असतें. कालापव्यय न करतां अधिकांत अधिक पाहातां येईल तेवढें पाहणें हें तर अशा प्रवासाचें मूळ सूत्र. मन रडत-राऊत नसलें तर उन्हांतहि सांवली सांपडते आणि गैरसोयींतहि एक वेगळाच सुखानुभव घडतो.

पायथ्याशीं असलेल्या बाबास्वामींच्या समाधीपासून आम्ही वर निघालों. कोरलईची टेकडी आम्हांला गणपतीच्या बृहदुदरासारखी वाटली आणि तिच्यावरचे मातीचे थर हे त्यावरच्या वळ्यांसारखे दिसले. इथें पायवाटाहि बऱ्याच मळलेल्या आहेत. त्यांतलीच एक चांगलीशी दिसणारी वाट आम्हीं धरली आणि तीच नेमकी चुकीची निघाली. पण खालच्याच अंगाला खाडींतून होडी हाकारणाऱ्या नाखव्यांनीं कुकारा घालून आमचें लक्ष खेंचून घेतलें आणि ओरडून सांगितलें कीं, ‘ वाट वरच्या अंगाला राहिली. डाव्या हातानं वर चढा. ’

आम्हीं मनोमन त्यांचे उपकार मानून योग्य वाट मिळवली आणि न बसतां, न थांबतां एका दमांत प्रवेशद्वारापाशीं आलों. त्यांत कांहीं मोठासा पराक्रम नव्हताच. अवघी २७१ फूट तर टेकडी ! शेवटची एक चढण तेवढीच काय ती उभी. किल्ल्याच्या पूर्व अंगाला कुंडलिकेकडे तोंड करून तें प्रवेशद्वार आहे. आंत जाऊन प्रथम विश्रांतीसाठीं आम्ही सावली शोधूं लागलों; पण ती फक्त आमच्या पायाखालीं तेवढी होती. वरहि सगळाच रखरखाट. तिथल्या विहिरी-समोर कोण्या एका बुवाची झोपडी होती. पण तिथें कांहीं टेकावेंसें वाटेना. तशांत तो बुवाहि त्या दिवशीं परगांवीं गेलेला. शेवटीं बालेकिल्ल्याच्या उत्तरद्वारांत त्याच्याच तटाची छाया आम्हीं पसंत केली. पण तिथें बसायला जागा चांगली नव्हती. तात्पर्य, एक आहे तिथें एक नाहीं. सगळ्यांत चांगलें होतें तें तिथल्या विहिरीचें पाणी. त्यानेंच आम्हांला खरी शांति दिली.

कोरलईचा किल्ला दक्षिणोत्तर बांधलेला आहे. लांबीला सुमारें तीन हजार फूट आणि रुंदीला अवघा नव्वद फूट. तीन बाजूंना पाणी आणि दक्षिण बाजूचा तेवढा भूमीशीं संबंध. कात्री उघडल्यावर तिचीं दोन पातीं जशीं विलग दिसतील तशी ती दक्षिण बाजू दिसते. तिच्या खालीं कोरलई गांव. या किल्ल्याचें जुनें नांव 'चौलचा खडक' असें होतें. मुसलमानी राजवटींत याला थोडाबहुत किल्ल्याचा आकार आणलेला होता; पण पुढच्या काळांत याचें मुख्यतः बरें वाईट केलें तें फिरंग्यांनीं.

इ. स. १५२१ त दियोगु लोपिप् दि सिकैर हा पोर्तुगीजांचा इथला गव्हर्नर होता. अहमदनगरच्या बुऱ्हाण निजामाजवळ त्यानें इथें किल्ला बांधायला परवानगी मागितली. ती मिळतांच त्यानें पहिला मजबूत धक्का बांधला आणि



क्रूसाची बातेरी

बातेरी उभी केली ती या टेंकडीच्या उत्तर टोकावर. किल्ल्याची ही सर्वांत सखल म्हणजे जवळजवळ समुद्रसपाटीला असलेली बाजू आहे. हिला सांताक्रूझ किंवा क्रूसाची बातेरी असें म्हणतात. इथें धक्क्याच्या ऐन तोंडावर क्रूस उभारलेला

आहे. सभोंवतीं नऊ फूट उंचीची तटबंदी केलेली आहे. तिच्यांतच पश्चिम अंगाला दारूगोळ्याचीं कोठारें केलेलीं आहेत. वर पश्चिम आणि उत्तर या दिशांना तोंडें करून बऱ्याच तोफा बसवलेल्या आहेत त्या अजूनहि तिथें आहेत. फिरंगी आपलीं गलबतें थेट या धक्क्याला लावीत आणि वर चढत.

कोरलईची हीच बाजू सर्वांत रमणीय आहे. पूर्व बाजूनें खाडी तटाला धक्के देते. पश्चिमेकडून सागर फेसाची उधळण करतो. सरितासागरांच्या संमीलित लाटा त्या क्रूसाशीं दंगामस्ती करतात. ईशान्येला रेवदंड्याच्या कोटांतली ती फिरंग्यांचीं मनोऱ्यासारखी उंच इमारत दिसते. उत्तरेचा तो निळा सांवळा किनारा किती तरी दूरवर पाहतां येतो. अलीबागचा किल्ला आणि त्यापुढचें खांदेरी-उंदेरी हे जलदुर्गहि दृष्टिपथांत येतात. पश्चिमेला तर सगळा अनंताचा पसारा. वर आकाश निळें. खालीं समुद्र निळा. उन्हाच्या वेळीं त्या निळावंतीवर वेगवेगळ्या रंगांचे पट्टे ओढले जातात. कुठें कुंकू ओतल्यासारखा तांबडा. कुठें गंभीरसा काळा. कुठें फेसाळ पांढरा. निळ्यांतला धूसर. हिरव्या रंगांच्या गडद, फिक्या छटा तर किती तरी! जणूं आकाशांतलें इंद्रधनुष्यच समुद्रांत पडून विरघळलें आहे. आणि या रंगाच्या साम्राज्यांत गलबतांतून शिडांचे पंख उभारून माणसें तरंगत आहेत.

किल्ल्याच्या या समुद्रसपाटीपासून बालेकिल्ल्याची चढण सुरू होते. प्रथमच पंधराफुटी एक बुरूज लागतो. तो बंदुकीच्या मारगिरीसाठीं आहे. तिथून वर निघाल्यावर दोन्ही बाजूंच्या तटबंदींत समोरासमोर आणखी दोन बुरूज दिसतात. पैकीं समुद्राकडचा तो सां. दियोगु आणि खाडीकडचा तो सां. फ्रांसीष्कु. हीं फिरंगी संतांचीं नांवें आहेत. इथल्या प्रत्येक बुरुजाला त्यांनीं असें मारून मुटकून संत बनवलें आहे.

क्रूसाच्या बातेरीवरून बालेकिल्ल्यांत यायला सात दरवाजे ओलांडावे लागतात. बालेकिल्ला सुमारें तीस हात रुंद आणि तीनशें हात लांब आहे. त्याच्या दक्षिणोत्तर गच्चीचे मोठे दोन बुरूज आहेत. त्यांवर चढायला आंतून जिना आहे. त्याचा कोट बाहेरून पंधरा आणि आंतून पांच फूट उंचीचा आहे. या तटावरून तोफा तर डागीतच; शिवाय शत्रु अगदीं पायथ्याला भिडला तर मोठमोठ्या शिळा वरून लोटून देत. या शिळांच्या सपाट्यांत सांपडेल त्याचा

चेंदामेंदा होऊन तो ' समुद्रास्तृप्यन्तु ' व्हायचा. याच बालेकिल्ल्यांत पाण्याच्या सांठवणीसाठीं बांधून काढलेला एक हौद आहे. पोर्तुगीजांनीं बांधलेलें ' माद्रि द देउस् ' चें एक उत्तराभिमुख चर्चहि आहे. पडीक अवस्थेंत कां होईना, पण अजूनहि तें उभें आहे.

हें झालें सगळें फिरंग्यांच्या काळगतींतलें. पण त्यापूर्वीं किल्ला कसा होता आणि तिथली व्यवस्था काय होती, त्याचें वर्णन द कौतु या पोर्तुगीज इतिहासकारानें तपशीलवार केलेलें असून डॉ. मो. गं. दीक्षित यांनीं दिलेल्या त्याच्या भाषांतराचा एक उतारा पुढें उद्धृत करीत आहें—

" हा किल्ला फारच भव्य असून त्यावर फक्त जमिनीच्याच बाजूनें हल्ला चढविणें शक्य आहे. समुद्र व खाडी यांच्यामधून एक खंदक खणलेला असून त्याच्या वरच्या पुलावरूनच फक्त आंत प्रवेश करतां येतो. हा पूल उडवून टाकला कीं किल्ला अगदीं अभेद्य आहे... त्याच्या प्रवेशद्वारावर एक मोठा सिंह काढलेला असून त्याखालीं ' येथें लढल्याशिवाय आंत प्रवेश नाहीं ' अशीं अक्षरें कोरलेलीं आहेत. किल्ल्याच्या माथ्यावर मध्यवर्ती बालेकिल्ला असून त्याच्या शिखरावर एक गरुड पक्षी काढलेला आहे. ह्या पक्ष्याच्या खालींच ' येथें पोहोंचण्यापूर्वीं अंतरिक्षाचा मार्ग पत्करावा लागेल ' असें दर्पोक्तिपूर्ण वचन कोरलेलें आहे..."

वाल्मीकिनें रावणाचें एवढें भरघोस वर्णन केलें तें तो लंकापति त्याला प्रिय होता म्हणून नव्हे; तर त्याला लोळवणाऱ्या रामाचें मोठेंपण भव्य दिसावें म्हणून. वर उल्लेखिलेल्या प्रवासी फिरंग्याचीहि तशीच कांहीं तरी भावना असावी. ' एवढा अभेद्य आणि सदर्प किल्ला जिंकून घेणारे आमचे देशबांधव केवढे रणमर्द असतील त्याची कल्पना करा ' असेंच त्याला सुचवायचें असावें. बाकी एवढें खरें कीं, निजामशाहीकडून १५९४ सालीं हा किल्ला हिसकावून घेतांना त्यांना आपलें बरेंच रक्त इथें सांगावें लागलें आहे आणि आपले प्रमुख एकवीस सरदार गमवावे लागले आहेत. तो इतिहास खरोखरच रोमहर्षक आहे—

अहमदनगरचा बादशहा बुऱ्हाण निजाम मरण पावल्यावर त्या राज्यांत अव्यवस्था माजली. ही संधि अनुकूल आहे असें जाणून फिरंग्यांनीं आपलें घोडें पुढें दामटलें कीं, ' कोरलई आम्हांला पृथक् तोडून द्या. ' पण बुऱ्हाणच्या मागून गादीवर आलेल्या हुसेनशहानें ती मागणी धुडकावून लावली. फिरंगी हे महा-

उपद्रवी आहेत आणि रेवदंड्याच्या आश्रयानें कारस्थानें करीत आहेत हें तो जाणून होता. त्यांना शह बसविण्यासाठीं त्यानें स्वतःच कोरलईची मजबुती करून तिथें सैन्य ठेवायचें ठरवलें. किल्ला बांधण्यासाठीं माणसें रवाना झालीं आणि कामहि सुरू झालें. पण फिरंग्यांना हें कसें पाहावणार! कोरलईवरून रेवदंड्यावर मारा चांगलाच लागू पडतो हें त्यांना चांगलें ठाऊक होतें. अर्थात् आपल्या उरावर हा शत्रु डोळ्यांदेखत घेणें त्यांना परवडण्याजोगें नव्हतें. म्हणून त्यांनीं किल्ल्याच्या बांधकामांत अडथळे सुरू केले. उभयपक्षीं झटापटी होऊं लागल्या. हुसेनशहा जिकिरीस आला. मग दोन्ही पक्ष तहाला तयार झाले. फिरंग्यांनीं समुद्रावर निजामाला त्रास देऊं नये आणि निजामानें कोरलईवर किल्ला बांधूं नये असें त्या तहांत ठरलें. लगेच झालेलें बांधकाम फिरंग्यांनीं मोडून टाकलें. पण तेवढ्यानें कटकटी मिटल्या नाहींत. पुढें गादीवर आला दुसरा बुऱ्हाण निजाम. त्यानें फिरंग्यांची पर्वा न करतां किल्ला बळकट बांधून काढला. फत्तेखान नांवाच्या एका सरदाराला तिथला किल्लेदार नेमून त्याच्या हाताखालीं बरीचशी शिबंदीहि ठेवून दिली.

फत्तेखानालाहि लढाईची खुमखुम होतीच. त्यानें एक दिवस कोरलईच्या बुरुजावरून रेवदंड्यावर तोफा डागल्या. फिरंगीहि निकरावर उठले. युद्धाला तोंड लागलें. फत्तेखानानें जोर केला. फिरंग्यांचें बळ अपुरें पडलें. त्यांचें दुसरें महत्त्वाचें ठाणें म्हणजे वसई. तिथला दों. आल्वारु आब्रान्चेस नांवाचा ठाणेदार निधड्या छातीचा झुंजार होता. त्याला त्यांनीं पाचारण केलें. तो दीड हजार फौज घेऊन उफाळत आला. यवनी भांड्यांचा भडिमार छातीवर झेलीत त्यानें रेवदंड्याच्या खाडींत प्रवेश मिळवला. ही ताज्या दमाची कुमक आलेली पाहून चौलचा कप्तान लाफितार याला बळ चढलें. त्यानें कोरलईकडे मोर्चा वळवला. कितीहि जंग पछाडले तरी किल्ला आपल्या हातीं येईल अशी पुसटशीसुद्धां त्याला कल्पना नव्हती. किल्ल्याखालचा बाजार लुटून फस्त करावा आणि साधेल तेवढी कत्तल करून मुसलमान आपल्या वाटेस जाणार नाहींत एवढा बंदोबस्त करावा, एवढीच त्याची मामुली महत्त्वाकांक्षा होती. कॅ. लाफितार हा ससाच्या शिकारीसाठीं निघाला होता; वाघाच्या नव्हे. पण दैवानेंच या लढाईचें घसघशीत यश त्याच्या पदरांत बांधायचें ठरवलें, त्याला तो काय करील!

मुसलमान उंचावर होते, आपल्या जोसांत होते. खालच्या बाजारांत फिरंग्यांनीं

गदारोळ उठवलेला पाहून ते एकदम त्यांच्यावर तुटून पडले. तोफा दणाणल्या. बंदुका गरजल्या. वातावरण धुरानें कोंदटलें. उभयपक्षीं हातघाई सुरू झाली. पण त्या ऐन धुमश्चक्रींत मुसलमानांचा एक हत्ती जायबंदी होऊन खंदकांत उलटला. त्यामुळें मुसलमानी फौजेंत गोंधळ माजला. अवधान न राहून सगळे शिपाई हत्तीची अवस्था पाहण्यासाठीं खंदकाच्या पुलाकडे धावले. फिरंग्यांना ही आयतीच संधि मिळाली. बाहेरच्या तटाचें दार दैवानेंच त्यांच्यासाठीं निर्मक्षिक केलें. कांहीं फिरंगी सैनिक लगेच आंत घुसले. दरवाजा तरी बंद करावा म्हणून मुसलमानांनीं शर्थ केली; पण फिरंगी रेटा त्यांना आवरला नाहीं. आन्तोनियु नांवाचा फिरंग्यांचा एक पाद्रीहि भाला घेऊन त्या रणधुमाळींत दाखल झाला होता. दरवाजाजवळच्या चकमकींत त्याला वार लागला आणि तो मरून पडला. तें पाहून फिरंगी अधिकच चेवले. त्यांनीं मुसंडी मारुन कोटाचा आंतला भागहि काबीज केला. आतां फक्त बालेकिल्ला तेवढा सर व्हावयाचा उरला होता, आणि खुद्द फत्तेखान तो लढवीत होता.

पण थोड्या वेळांत तोहि जखमी होऊन फिरंग्यांच्या हातीं जिता सांपडला. मग चौलाहून उंच शिड्या मागवून ते बालेकिल्ल्यावर चढले. उरलासुरला प्रतिकार मोडून काढला. किल्ला त्यांच्या स्वाधीन झाला. वर आल्यावर त्यांनीं प्रथम फत्तेखानाच्या आईला आणि मुलीला कैद केलें. फत्तेखान कांहीं दिवसांनीं मेला; पण मरायच्यापूर्वीं त्याला बाटवण्यांत आलें. खानाची मुलगीहि बाटली. त्याच्या बायकोला तिच्या भाऊबंदांनीं सुवर्णप्रयोग करुन कशीबशी सोडवून नेली. गड सर झाला खरा; पण त्याचें संरक्षण करण्याइतकी शिबंदी त्यांच्याजवळ नव्हती. मग त्यांनीं काय केलें असेल असें तुम्हांला वाटतें ? दुसरें काय ? बाहेरचा सगळा कोट पाडून टाकला आणि माथ्यावरचा बालेकिल्ला तेवढा शिल्लक ठेवला. चौकट मोठी होऊं शकत नाहीं ना, मग चित्र कापा अशांतलीच ही मनोवृत्ति.

१६८३ सालीं संभाजीनें हा किल्ला घेण्याचा प्रयत्न केला होता; पण त्याला यश मिळालें नाहीं. त्या यशाचा, म्हणजे उत्तर कोंकणांतून फिरंग्यांचें समूळ उच्चाटन करण्याच्या यशाचा मानकरी झाला तो तळेगडचा हवालदार सुभानजी माणकर. वसईप्रमाणेंच कोरलईलाहि शह देऊन फिरंग्यांना दोन्ही ठिकाणीं एकदमच अडचणींत आणावयाचें अशी मसलत करून चिमाजीअप्पानें सुभानजीला कोरलईवर घातलें. १७३९ च्या मार्चमध्यें तो निघाला. निवडक पांच-सहाशें

माणसें त्यानें चिमाजीअप्पाकडून मिळवलीं आणि कोरलईवर धाड घातली. त्यानें किल्ल्याला वेढा बळकट बसवला. फिरंग्यानीं बालेकिल्ल्यांतून बातेरी सुरू केली; पण हा तसूभर हालला नाहीं. त्यानें फिरंग्यांची चांगलीच कोंडी केली. अखेर १७४० च्या पौष मासांत फिरंग्यांना किल्ला खालीं करावा लागला. इकडे त्याच वेळीं मानाजी आंग्र्यानें रेवदंडाहि जेर केला. दोन्ही ठाणीं सर झालीं आणि पेशव्यांचें निशाण किल्ल्यावर चढलें. इथें मराठ्यांचा तोफा बनवण्याचा कारखाना होता असें इतिहास सांगतो.

किल्ला हातीं येतांच मराठ्यांनीं पहिली गोष्ट केली ती म्हणजे तिथल्या बुरुजांची फिरंगी नांवें बदलण्याची. पेद्रो, फिलीप, फ्रांसीष्कु गेले आणि त्या जागीं गणेश, राम इत्यादि आपले देव आरूढ झाले. पुढें पेशवाईच्या शेवटा-पर्यंत हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यांत राहिला. १८१८ त पेशवाई समाप्त झाली त्या वेळीं इकडचे इतर किल्ले इंग्रजांच्या स्वाधीन झाले तसेंच याचेंहि समर्पण झालें.

आम्ही कोरलईवर दुपारचेच चढलों आणि दुपारचेच उतरलों. ऊन म्हणजे चांदणेंच असें मानून आम्हीं ही सहल केली. खालीं उतरल्यावर दीड मैल वाट चालून मुरुड-जंजिऱ्याच्या रस्त्यावर एका चिंचेच्या झाडाखालीं विसावा घेतला. आतां आमचें चित्त जंजिऱ्याला सन्मुख झालें होतें. दोन मोटारी आमच्या समोरून गेल्या; पण एकींतहि आमच्यासाठीं जागा नव्हती. चार तास आम्हीं तिथें काढले. तें बसणेंच शेवटीं आम्हांला असह्य झालें. शेवटीं सूर्यास्ताच्या सुमारास शेवटची गाडी आली तिनें आम्हांला कसेंबसें आंत कोंबलें. तीहि आमच्या डोक्यावर धुरळा उडवीत निघून गेली असती तर ? ' देव ना संसार ! तुका दोहींकडे चोर ' अशीच आमची अवस्था झाली असती !

६.

# मुरुडचा जंजिरा

पूर्वेला उत्तुंग सह्याद्रि उभा आहे, पश्चिमेला अथांग सागर गरजतो आहे आणि दक्षिणोत्तर सावित्री आणिं कुंडलिका या सह्यकन्या सागराला आत्मार्पण करण्यासाठीं उतावीळपणें धांवत आहेत, अशा चतुःसीमांनीं जंजिरा संस्थानचा हा मुलूख बांधलेला आहे. प्राचीनकाळची ही शैवभूमि आहे. इथें श्रीवर्धनजवळ हरेश्वर वसला आहे. त्याची अर्धांगी माहेश्वरी, जुनें मसापळी पण सांप्रतचें म्हसाळें येथें राहिली आहे. अष्टविनायकांपैकीं बल्लाळ हा सांप्रत पालीचा रहिवासी असला तरी त्याचें मूलस्थान मुरुड. ग्रहलाघवकार गणेश दैवज्ञ याचा उपास्य सिद्धि-विनायक हा या भागांतल्या नांदगांवचा वस्तीकर. अशी ही कोंकणांतली पुण्यभूमि कालचक्राचे फेरे उलटे फिरून सिद्दीच्या ताब्यांत गेली आणि तिच्यावर विधर्मी राज्य थाटलें.

तिला त्याच्या सत्तेंतून मुक्त करण्यासाठीं छत्रपति शिवाजी, नंतर संभाजी, पुढें पेशवे, प्रतिनिधि, आंग्रे यांनीं भगीरथ प्रयत्न केले. पण सिद्दी जो पाळेंमुळें खोल रुतवून बसला तो कांहीं कोणाला हालला नाहीं. सर्वांची शक्ति आणि युक्तिसुद्धां विफल झाली. कधीं औरंगजेबाची मदत घे, कधीं फिरंग्यांच्या दाढीला हात लाव, कधीं इंग्रजांच्यापुढें नाक घांस, अशा प्रकारें कधीं नम्र तर कधीं ताठ होऊन त्यानें आपलें बस्तान कायम ठेवलें.

हा सिद्दी कोण अन् आला कुठून ? आला अरबस्तानशेजारच्या ॲबिसीनि-यांतून. एकटाच नव्हे; तर अनेक आले अन् कोंकणकिनाऱ्याला लागले. कोणी व्यापारी म्हणून तर कोणी गुलाम म्हणून. पोर्तुगीजांची सरशी होईपर्यंत यांचा व्यापारउदीम चांगला चालला. पुढें हे लोक बहामनी राज्याच्या नोकरींत शिरले. अंगाबांध्यानें दणकट, शूर अन् गुणी असल्यामुळें नोकरींतहि त्यांनीं नांव कमावलें.

ते मोठमोठ्या हुद्यांवर चढले. पुढें निजामशाहीच्या काळांत त्यांतल्याच एकानें स्वतःच्या पराक्रमावर भारतांतलें हें नवें छोटें हबसाण तयार केलें. १६१७ पासून पुरतीं तीनशें तीस वर्षें या प्रदेशावर सिद्दीचें राज्य चाललें.

रेवदंड्याची तर ओलांडली कीं या हबसणांत आपला पाय पडतो. तिथून मुरुड हें सिद्दीच्या राजधानीचें ठिकाण अठरा मैलांवर रहातें. रस्ता समुद्राच्या किनाऱ्याकिनाऱ्यानेंच जातो. संध्याकाळीं सहा वाजतां आम्ही मुरुडच्या मोटारींत बसलों. साडेसात वाजतां ती मोटार आम्हांला मुरुडांत नेऊन घालील असा आम्हीं अंदाज बांधला होता. पण नेमकी त्याच फेरींत तिच्या चाकांतली हवा गेली. तब्बल एक तास, गडहि नाहीं अन् सासवडहिं नाहीं अशा अवस्थेंत आम्ही लोंबकळत राहिलों. मुक्कामाच्या वरीं आम्ही अवेळीं पोंचणार, दुर्वासाच्या जातीचे छळक अतिथी ठरणार, याची माझ्या मनाला रुखरुख लागली; आणि झालेंहि तसेंच. रात्रीं नऊ वाजतां आम्हीं श्री० गंगाधरराव पाळंदे यांच्या द्वारीं ‘ दत्त ’ म्हणून उभे ठाकलों.

श्री. पाळंदे हे तिथल्या हायस्कूलचे मुख्याध्यापक आहेत हें मला ठाऊक होतें. पण ते आणि त्यांचें सगळें घर इतकें अतिथिपरायण असेल याची मला कल्पना नव्हती. एक प्रकारच्या संकोचानेंच मीं त्यांच्या घरांत प्रवेश केला होता. पण त्यांनीं आपल्या स्नेहार्द्र वृत्तीनें माझ्या मनाच्या पाटीवरचीं ‘संकोच’ हीं अक्षरें केव्हां पुसून टाकलीं तें मला कळलेंच नाहीं. आमचा उद्देश कळल्यावर लगेच त्यांनीं शेजारचे श्री. अण्णा साठ्ये यांना पाचारिलें आणि किल्ल्यावर केव्हां जायचें, आजूबाजूला काय पाहायचें तें सगळें ठरवूनहि टाकलें. मग भरल्यापोटीं सुखनिद्रा घ्यायला आम्हांला कसलीच अडचण उरली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळ उगवली ती काळ्या ढगांचा बुरखा पांघरून. मधून मधून पाऊसहि गुलाबपाणी शिंपडूं लागला. पूर्वेला सूर्य उगवला होता हें निश्चित् पण ढगांनीं त्याच्या दर्शनांत व्यत्यय आणला होता. चैत्रांतला पाऊस म्हणजे आवडता पाहुणा. पण तो सकाळींच आल्यामुळें बेभरंवशाचें कूळ समजून आम्ही त्याची पर्वा न करतां मार्गस्थ झालों. भिजलों असतों तरी तेंहि ‘ अयं विशेषः ’ च होतें.

आमच्या पायांखालचा पिवळसर रस्ता भक्तिमार्गासारखा सरळ अन् सुगम होता. दुतर्फा घरांपुढें आंगणें दिसत होतीं. आगरांतून चालू झालेल्या रहाटाचें

संगीत कानांना सुखवीत होतें. कुंपणाकुंपणांतून वासंतिक फुलें उगवलीं होतीं. 'अवचिता परिमळु झुळकला अळुमाळु' हा ज्ञानियांच्या राजाचा अनुभव पदोपदीं येत होता. माडांचीं चुडतें फताडीं अन् पोफळींचीं अटकर, पण दोन्हीं-चाहि रंग सतेज, हिरवा. तीं आगरें म्हणजे सागरशयन करणाऱ्या श्रीविष्णूच्या निळ्या आस्तरणाला जणू हिरवी वेलबुट्टीची किनार! पुढें तर आम्ही रस्ता सोडून माडांच्या बागेंतच शिरलों. आमच्यावर हिरवीं छत्रचामरें ढळूं लागलीं. एवढें राजवैभव मिळाल्यावर आम्हीं तरी चालण्याची लगबग कां करावी!

याच बागेंतून आम्ही गांवाच्या पश्चिम सीमेला उमटलों. तिथें एक खाडी आहे अन् किल्ल्यावर जायचें तर ती आधीं ओलांडावी लागते. पुढच्या रस्त्याला थोडा चढ आहे. तो ज्या टेकडीच्या पायथ्याशीं जाऊन संपतो तिच्यावरच सामराजगड आहे. आजमितीला त्याचें कांहींएक शिल्लक उरलें नाहीं. पण इतिहासकाळांत मराठी सैन्याचा तळ पडे तो इथेंच. इथूनच जंजिऱ्याच्या मोहिमेच्या योजना आंखल्या जात. तिथून पुढचा रस्ता डाव्या हाताला वळून टेकडीच्या पायथ्यानेंच जातो. ओलांडलेली खाडी आपल्या डाव्या हाताला राहते.


मीं सहज म्हणून तिकडे पाहिलें तर खाडीच्या कोरड्या पात्रांत पांच-पन्नास मेंढ्या इतस्ततः उभ्या. कांहीं काळ्या, कांहीं तांबड्या तर कांहीं चित्रविचित्र. मला वाटलें, इतक्या मेंढ्या इकडे कुठून आल्या! त्या पाणी पीत आहेत म्हणावें तर पात्र कोरडें अन् पुन्हा खारें. पण तो एक विलक्षण दृष्टिभ्रम होता. त्या मेंढ्या नसून कोळणी होत्या. त्यांच्या लुगड्यांचे रंग चित्रविचित्र होते. आणि त्या एकीपुढें एक ओणव्या होऊन कालवें का कांहीं तरी वेचीत होत्या. दूरत्वामुळें आम्हीं त्यांच्यावर मेंढ्यांचा भ्रमात्मक आरोप केला आणि मृगजळाला पाणी समजणाऱ्या हरिणांच्या अन् चांदण्याला दुधाच्या धारा समजून गायींच्या कासेखालीं चरव्या नेऊन ठेवणाऱ्या मुग्ध गवळ्यांच्या पंगतीला जाऊन बसलों.

आमचा रस्ता पुन्हा उजवा वळला आणि टेकडीच्या माथ्यावर गेला. आम्ही तिथें उभे झालों आणि समोर अनंत जलाचा विस्तार लहरतांना पाहिला. तिथेंच तो सावित्री नदीचा सागरसंगम आणि त्याच संगमावरच्या अटाव जळांत तो जंजिरा किल्ला. जणू सरिता-सागरांच्या प्रीतीचें एकमेव पुष्प! लंबवर्तुळ आकाराचें एक सुंदर, रुबाबदार शिल्प. जणू तें सागराच्या उदरांतच नागांनीं घडवलें आणि तसेंच वर उचलून सागरपृष्ठावर निळ्या आभाळाखालीं उभें केलें.

६१२८
बा. वा.

समुद्राची प्रत्येक लाट त्याला धडक देते आणि मागें फिरतांना खदखदां हसते. त्याच्याभोंवतीं सदासर्वदा धारोष्ण दुधावर दिसतो तशा समुद्रफेणाचें शुभ्र, कांतिमान् वलय मांडलेलेंच आहे. सकाळीं सूर्याचा पहिला किरण त्यालाच सोनेरी मुलामा द्यायला धांवतो आणि सायंकाळीं शेवटचा किरण त्याचाच निरोप घेऊन 'पुनरागमनायच' अदृश्य होतो. दिवसभर सूर्यानें तापवावें आणि रात्रीं चंद्रानें निववावें असा क्रमत्याच्या जन्मापासून चालत आलेला आहे. झुंजतां झुजतां त्याला झालेल्या लहानमोठ्या जखमांवर वारा अद्याप फुंकर घालीत राहिला आहे. रात्रीं तारामंडळाचा चांदवा पसरुन आकाशमाउली त्याला 'निज नीज माझ्या बाळा' म्हणत राहिली आहे. जंजिरा एकट्या सागराचा पुत्र नाहीं; तर पंचमहाभूतांचा पुत्र आहे.

कल्याणखजिन्यांतली लूट म्हणून एक लावण्यवती यवनतरुणी पुढें उभी केल्यावर तो नीतीचा पोशिंदा शिवराज म्हणाला होता, 'माझी आई अशी सुंदर असती तर...' मलाहि जंजिऱ्याबद्दल प्रथमदर्शनीं तसेंच वाटलें. 'ही यवनराजधानी होती ती आपल्या शिवछत्रपतींची असती तर...' इथें उभा



जंजिऱ्याचें महाद्वार

राहून त्यानें सह्याद्रीहि सांभाळला असता आणि समुद्रावरहि नजर ठेवली असती. व्यापाराच्या मिषानें किनाऱ्यावर उपद्व्याप करणाऱ्या परदेशी आक्रमकांना जरब बसविली असती. इंग्रजांची भारतांतली सद्दी संपली हें खरें असलें, तरी

फिरंगी सत्ता अजून भारताच्या भूमीचा घांस घेऊन चिकटून बसली आहे. तसें झालें असतें तर या दोन्ही सत्तांच्या मुळांतच नांग्या मोडल्या असत्या. नाहीं तरी सिद्दीला वेळोवेळीं हाताशीं धरूनच त्यांनीं इथें आपले पाय रोवले.

आम्ही आता ईशान्येकडून पूर्वेला निघालों होतों. कारण किल्ल्याचें प्रवेश-द्वार त्या दिशेला होतें. आमच्या पायांखालीं ओहोटीच्याच वेळीं फक्त मोकळा होणारा समुद्रकिनारा होता. वाळू चांगलीच ओली होती. पाय पडला कीं त्या दाबानें सभोंवतीं पाणी जमे आणि उचलला की तत्क्षणीं वाळूंत मुरे. दगडांच्या सांदीकोंदींत राहिलेलें भरतीचें पाणीहि ओहोळांच्या रूपानें पुनश्च समुद्राकडे झुळझुळतांना दिसे.

आम्ही चालत असलेला किनारा म्हणजे राजपुरीच्या टेकडीचा पायथाच. याच टेकडीच्या टोकाला खालच्या अंगीं राजपुरी आणि तिच्या पूर्वेला थोड्या अंतरावर दांडें आहे. इतिहासांत 'दंडाराजपुरी' असें जोडनांव नेहमीं वाचावें लागतें तें या दोन गांवांचें मिळून आहे. राजपुरी या नांवाच्या अर्थाकडे ध्यान दिलें कीं ही कोणत्या तरी काळीं कोणाची तरी राजधानी असली पाहिजे हें उघड दिसतें. पण ती कोणाची ? संशोधक म्हणतात कीं, शिलाहारांची. शिलाहार हें राष्ट्रकूटांचे मांडलिक. दहाव्या शतकांत ते कोंकणपट्टीवर राज्य करूं लागले होते. त्याच्या तीन घराण्यांपैकीं एका घराण्याची राजधानी राजपुरी असावी. पण संशोधकांत कधीं एकमत झालें आहे ! कांहींच्या मतें ती राजपुरी नसून घारापुरी आहे. पण राजपुरीवाल्यांचा तर्क असा कीं, इथें म्हसाळ्याजवळ कुड्याच्या डोंगरांत बौद्धांचीं लेणीं आहेत. म्हसाळें हें या भागांतलें व्यापारी केंद्र असलेलें खाडींतलें मोठें बंदर आहे आणि तिथेंच माहेश्वरी जगदंबा असून तेंच शिलाहारांचें कुलदैवत आहे. म्हसाळ्याच्या बंदराचें महत्त्व तर टॉलेमी आणि प्लिनी या प्राचीन प्रवाशांनींहि लिहून ठेवलें आहे. कोणताहि राजा आपली राजधानी करील ती अशा सगळ्या व्यापारी, लष्करी इत्यादि सोयी पाहूनच. मग या राजधानीचें झालें तरी काय ? तिचे अवशेष तरी कां दिसूं नयेत ? संशोधक याहि प्रश्नाचें उत्तर देतात कीं, ती समुद्राच्या पोटांत गडप झाली असावी. त्या भागांत पाण्याखालीं अजूनहि कांहीं शिवलिंगें हाताला लागतात तोहि या गोष्टींचा पुरावा म्हणून मानायला हरकत नाहीं. याचा अर्थ

असा कीं, हजार वर्षांपूर्वींच्या एका वैभवशाली हिंदु राजधानीच्या कांठावरून आम्ही चाललों होतों.

पुढें आमच्यासाठीं होडी तयार होती. सावित्रीचें हें मुखच असल्यामुळें इथें तिचें पात्र बरेंच रुंद आहे. आम्ही ऐसपैस होडींत बसलों. आमची होडी किल्ल्याच्या प्रवेशद्वाराच्या रोखानें निघाली. सकाळचा पाऊस आतां नव्हता. पण ढगांनीं सूर्यापुढें उगाच तट उभारून ठेवला होता. अधून मधून तो ढांसळे आणि किल्ल्यावर प्रकाशाचा लोंढा ओते. पण पुन्हा तो ढगाआड झाला कीं समुद्राच्या पृष्ठभागासह तो उदासवाणा बने. 'तुष्टा रुष्टाः क्षणे क्षणे' अशी त्याची आणि त्याला उत्सुकतेच्या डोळ्यांनीं पाहणाऱ्या आमची अवस्था होत होती. त्याच्यांकडे दृष्टि लावतां लावतां मन भूतकाळांत शिरून इतिहासाची चांचणी करूं लागलें. त्याला तिथें दगडी कोटाऐवजीं एक मेढेकोट दिसूं लागला.

पंधराव्या शतकाच्या अखेरीचा तो काळ. मलीक अहमदनें निजामशाहीची प्राणप्रतिष्ठा केली आणि तो राज्यविस्तारासाठीं चौफेर दौडूं लागला. त्यानें उत्तर कोंकणावर स्वारी करून इकडचे बहुतेक किल्ले पादाक्रांत केले. जिंकलेल्या मुलखाचें दंडाराजपुरी हें मुख्य ठाणें बनवलें. त्याच्या वतीनें इथें पहिले ठाणेदार म्हणून आले ते मिरझाअली आणि कलबअली. त्या वेळीं राजपुरीला प्रामुख्यानें कोळ्यांची वस्ती होती. लुटारू आणि चांचे त्यांना उपद्रव देत आणि त्यांच्या योगक्षेमांत विघ्नें आणीत. या जाचाला कंटाळून त्यांनीं ठाणेदाराच्या परवानगीनें इथें मेढेकोट उभारला. जमिनींत मोठमोठे ओंडके किंवा माडाचे करवे एकापुढें एक पुरून जें कुंपण उभारतात त्याचें नांव मेढेकोट. बेटाचा हा सगळा खडक त्यांनीं असा बंदिस्त करून घेतला आणि ते त्याच्या आश्रयाला आले.

या कोळ्यांचा म्होरक्या राम पाटील नांवाचा होता तो मोठा महत्त्वाकांक्षी व बलदंड पुरुष होता. मेढेकोटाचा आश्रय मिळतांच त्याला राज्य मिळाल्यासारखें वाटलें. प्रथम प्रथम तो ठाणेदाराला नमून वागे; पण पुढें तो एकदम ताठ झाला. त्यानें ठाणेदाराला मेढेकोटांत पाय ठेवायलासुद्धां बंदी केली. त्याच्याजवळ मनुष्यबळ तर होतेंच; शिवाय थोडेंबहुत शस्त्रबळहि असावें. ठाणेदारानें त्याचा धाक घेतला. त्याच्या पुंडपणाची कागाळी नगरला कळवली. निजामशहाला राग आला. राम पाटलाचें पारिपत्य करण्यासाठीं त्यानें पिरमखान नांवाच्या सरदाराला धाडलें. तो आला पण त्यालाहि राम पाटलावर उघड हल्ला

करण्याचें धाडस होईना. त्यानें आपलें लष्कर तीन गलबतांत भरलें आणि तो राजपुरीच्या खाडींत वरवा करून राहिला. राम पाटलाचे लोक भेद काढायला आले. त्यांना त्यानें आपण दारूचे व्यापारी असल्याचें सांगून गलबतावरचे मोठ-मोठे पेटारे दाखविले. परत जाते वेळीं त्यांना बरीच दारू पाजली आणि दोन बाटल्या राम पाटलालाहि धाडल्या. पाटलाला त्या दारूंतलें कपट उमगलें नाहीं. तो खुष होऊन त्याला सामोरा गेला. पिरमखानानें कोटांत येण्याची इच्छा प्रदर्शित करतांच त्यानें स्वहस्तें त्याचीं गलबतें मेढेकोटाला आणून लावलीं.

पिरमखानानें आंत जाऊन सर्वांना यथेच्छ दारू पाजली. राम पाटीलहि मनसोक्त प्याला. सगळे बेहोष होऊन पडले. पिरमखानाला जें हवें होतें तें झालें. त्यानें गलबतांवर इशारा दिला. त्यांतल्या भल्या मोठ्या पेटाऱ्यांतून भराभर सैनिक बाहेर पडले आणि शस्त्रें परजीत कोटांत घुसले. जे आडवे आले त्यांची त्यांनीं सरसहा कत्तल केली. पिरमखानानें राम पाटलाला पकडलें तेव्हां तत्क्षणीं त्याची नशा उतरली. पण आतां त्याच्यावर डाव पुरता उलटला होता. ट्रोजन युद्धांत ग्रीकांचा प्रचंड कळींचा घोडा विजयचिन्ह म्हणून ट्रोजनांनीं शहरांत मिरवीत आणला, रात्रीं त्याच्या पोटांतून ग्रीक सैनिक बाहेर पडले, त्यांनीं दरवाजे उघडून बाहेरच्या सैन्याला आंत घेतलें आणि अखेर दहा वर्षें ग्रीकांशीं युद्ध देणारें ट्रॉय शहर एका रात्रींत पडलें, तशांतलाच हाहि प्रकार झाला.

पिरमखानानें ताबडतोब राम पाटलाची नगरला रवानगी केली. तिथून तो परत आला पण स्वधर्म गमावून. निजामशहानें प्रथम त्याला बाटवलें. मग किताब अन् छत्री-निशाणाचा मान दिला. त्याचें मेढेकोटांतलें वास्तव्य मान्य केलें आणि आपला एक चाकर म्हणून परत धाडलें. राम पाटील आतां पिरमखानाचा धर्मबंधु होऊन आला होता. त्याला त्याचें आगमन रुचलें नसलें तरी तें मानून घ्यावें लागलें. राम पाटील पुढें कांहीं काळ यांच्याशीं सलोख्यानें वागला; पण नंतर त्याच्या रक्तांतलें पुंडपण पुनश्च जागृत झालें. तो हवा तसा वागूं लागला. हवें तें करूं लागला आणि मनगटाच्या जोरावर सत्ता-अधिकार भोगूं लागला. पुन्हा नगरला कागाळी गेली. हें 'नाकापेक्षां मोतीं जड' बरें नव्हे म्हणून बादशहानें पाटलाला शिरच्छेदाची शिक्षा फर्माविली आणि लगेच ती अमलांतहि आणली. मग मात्र पिरमखानाला कोणी प्रतिस्पर्धी उरला नाहीं.

पिरमखान मेल्यावर त्याच्या जागीं बुऱ्हाण आला. त्यानें पाहिलें कीं, या


मेढेकोटानें काम निभायचें नाहीं. तो अधून मधून ढांसळतो आणि कित्येकदां जळतोहि. इकडचा प्रांत काबूंत ठेवायचा तर इथें याच जागीं एक मजबूत पाणकोट बांधायला हवा. त्याचा हा विचार वरिष्ठ सत्तेला मानवला आणि नगरहून त्याला तशी परवानगी मिळाली. १५६७ सालीं त्यानें कोटाच्या बांधणीस प्रारंभ केला आणि १५७१ सालीं तें काम पुरें केलें. अर्धा मैल लांबीचा, दीड मैल परिघाचा आणि एकोणीस बुरुजांचा हा काळा जलदुर्ग चौफेर लाटांचे तडाखे झेलीत उभा राहिलेला पाहून बुऱ्हाणची छाती अभिमानानें फुगून आली. ' किल्ले महरूब ' असें त्याचें नामकरण करण्यापूर्वी त्यानें महादरवाजाच्या कमानींत वाघाचें एक चित्र कोरून बसवलें. त्यानें चारी पंजांत चार हत्ती नखें रुतवून धरले आहेत, एक हत्ती जबड्यांत पकडला आहे अन् एक शेपटींत गुंडाळला आहे. बुऱ्हाणचा गर्वच जणूं त्या चित्राच्या रूपानें आकारला होता. तो जणूं प्रतिस्पर्धी सत्तांना बजावीत होता, ' तुम्ही हत्ती असाल तर मी शेर आहें. या किल्ल्याकडे वांकड्या डोळ्यानें पाहाल तर याद राखा... ..! '

१६१७ त सिद्दी अंबर हा इथला स्वतंत्र जहागिरदार म्हणून निजामशाहीकडून सनद घेऊन आला. या पुरुषाच्या अंगीं विशेष कर्तृत्व होतें. त्यानें नवे गांव वसवले. नवे कसबे स्थापले. राज्यांतली अव्यवस्था नाहींशी करून अधिकाऱ्यांनाहि शिस्त लावली. जंजिरा संस्थानचा मूळ पुरुष तो हा.......

सिद्दीच्या या अभेद्य जलदुर्गाच्या प्रवेशद्वारांत आम्ही सगळीं विनासायास उतरलों, तीं समुद्राला ओहोटी होती म्हणूनच. भरतीच्या वेळीं होडी पायऱ्यांना स्पर्श करते; पण स्थिर होत नाहीं. ' लागीं ये, पण हापडूं नाका ' अशी एक कोंकणी म्हण आहे. तिचें प्रत्यंतर इथें दिसतें. लाटा त्या होडीला ' गोविंदु घ्या कुणि गोपाळु घ्या ' करावें तशा एकदां पुढें लोटतात अन् लगेच मागें खेचतात. उतरणाऱ्यानें होडी पायरीला लागते न लागते एवढ्यांत उडी टाकली पाहिजे. जर का तें संधान चुकलें तर मग लाटांच्या हिंदोळ्यावर झोके घेणें नशिबीं आलेंच म्हणून समजावें. आपल्या चपलतेची ती एक परीक्षाच असते म्हणा ना! पावसाळ्यांत तर म्हणे पाणी दाराच्या कमानींत शिरून पुरुषभर उंच होतें. आंतल्या देवडीपर्यंत लाटांचे सपके बसतात. खाडी नुसती उधाणत असते. आणि मग अशा त्या उन्मत्त तांडवांतून होडी हाकारणें आणि बुरुजावरून उड्या मारणें या कामीं साहसी पुरुषांच्या अंगांत वारें संचरतें.

महाद्वाराला डावीकडे आणखी एक उपद्वार आहे. तें ओलांडल्यावर किल्ल्यांत प्रवेश होतो. तिथेंच उजव्या हाताला पंचायतनपीराची खोली आहे. पूर्वी ते रामपंचायतन होतें आणि कोळ्यांनीं स्थापलेलें होतें. मुसलमान तिथें येतांच त्याचें 'पीरपंचायतन' व्हायला उशीर लागला नाहीं. तिथेंच सिद्दी राजघराण्यांतल्या कांहीं कबरी आहेत. समोरच्या पटांगणांत जहाजांचे तीन नांगर गंजलेल्या स्थितींत दिसतात. राम पाटलाला पकडण्यासाठीं पिरमखान ज्या जहाजांतून मेढेकोटांत उतरला त्यांचे ते नांगर विजयाचें स्मारक म्हणून तिथें ठेवलेले आहेत.

किल्ल्यांत एकूण तीन मोहल्ले आहेत. एक कोळी, महार वगैरेंचा आणि दोन मुसलमानांचे. किल्ल्यांत एक हवालदार आणि दुसरा एक जकातीकडील शिपाई




तळें व हवेली

असतो. जंजिऱ्यांत पूर्वी वस्ती बरीच होती; पण इनामें जप्त झालीं आणि राजाश्रय तुटला, त्यामुळें तिला आतां ओहोटी लागली आहे.

किल्ल्याच्या मध्यभागीं दारुगोळ्याचें कोठार आणि त्याच्या पश्चिमेस खजिन्याची कोठी आहे. दक्षिणेला एक आणि वायव्येला एक असे दोन जलाशय आहेत. सांठवणीचा एक हौदहि आहे. दक्षिण तळ्याला लागूनच दुमजली हवेली आहे. गोषांतल्या स्त्रियांनीं खिडकीच्या आडून कळशी खालीं सोडावी आणि तळ्याचें पाणी वर ओढून घ्यावें. आम्ही गेलों त्या वेळीं तें पाणी हिरवा रंग ओतल्यासारखें दिसत होतें. त्या तसल्या पाण्यानें तिथल्या लोकांचें आरोग्य कसें सुरक्षित राहात असेल देव जाणे !

सुरुलखानाचा चौखणी वाडा बालेकिल्ल्यांत दोनशें फूट उंचीवर आहे. सिद्दी अंबर हा जसा जंजिऱ्याचा मूळ पुरुष तसा सुरुलखान हा तिथला पहिला लोकनियुक्त नबाब. याच्यापासून तिथली गादी वंशपरंपरेनें चालू लागली. चौखणीच्या खालच्या अंगाला कोळीवाडा आहे. त्याच ठिकाणीं जुन्या हिंदु पद्धतीच्या शिल्पाचे अवशेष दिसतात. ते बहुधा यादवकालीन असावे. किल्ल्याचा मूळ देव तिथेंच होता. किल्ला बांधतांना बुरूज हे ढांसळायलाच हवेत आणि खालीं एखादें जोडपें



बालेकिल्ला

जिवंत गाडल्यावांचून ते वर उठतांच कामा नयेत, हा सार्वभौम संकेत इथेंहि वावरतो. इथला त्याहून विशेष म्हणजे तटाच्या बांधकामाचा चुना माणसाच्या

रक्तांत कालवलेला आहे, ही आख्यायिका. अशा कांहीं अद्‌भुत आख्यायिका मागें असल्यावांचून लोकमानसाला त्या वस्तूकडे अथवा वास्तूकडे आकृष्ट होतांच येत नाहीं. इथेंच पूर्वीं देवीला रेडा बळी देत. या ठिकाणीं जी एक वाटोळी शिळा आहे तिला सिद्दी घराण्यांत विशेष महत्त्व आहे. प्रत्येक नवा नबाब प्रथम या शिळेवर बसून मगच राज्यगादीवर आरूढ होई, असें सांगतात.

सिद्दीचें राजचिन्ह म्हणजे दोन हबशी आणि एक जहाज. ते काळे हबशी दोन्ही हातांत रुंद पात्याचीं खड्गें घेऊन अन् ते हात कमरेवर उलटे ठेऊन उभे आहेत आणि त्यांच्यामागें एक जहाज आहे. यावरून त्यांचें मूळचें रानटीपण आणि नंतरचें दर्यावर्दीपण हीं दोन्ही सूचित होतात. हे सगळे हबशी म्हणजेच सिद्दी भारतांत आले तेव्हा 'अतिकृष्ण' होते. इथें आल्यावर इकडच्या स्त्रियांशीं संबंध येऊन कालांतरानें त्यांचा मूळ वर्ण पालटला. जंजिऱ्याच्या सिद्दींनीं तर हिंदु समाजांतल्या स्त्रियांशीं लग्नें आणि निके लावले आहेत. त्यामुळें जंजिऱ्याच्या सिद्दी घराण्यांत एक हिंदु-मुस्लीम अशी मिश्र संस्कृति निर्माण झाली आहे. चंद्रग्रहणीं दानें देणें, ब्रह्मसमंधाची मानतूक करणें, मुलांना देवी काढल्यावर सवाष्णींच्या ओट्या भरून त्यांना शिधे देणें, लग्नप्रसंगीं नथच नव्हे तर तात्पुरतें मंगळसूत्रहि घालणें, या चाली हिंदूंतून म्हणजे हिंदु स्त्रियांकडूनच त्यांच्यांत गेलेल्या आहेत. संस्कृतीचें वहन स्त्रियांकरवींच विशेष होत असतें असें म्हणायला हवें.

या सिद्यांचा मंत्रतंत्र आणि चेटकें यांवर भलताच विश्वास असे. केवळ त्या निमित्तानें त्यांनीं अनेकांना क्रूर शिक्षा दिलेल्या आहेत. नाक-जीभ कापणें, डोळे काढणें, हातपाय तोडणें असे मध्ययुगीन शिक्षाप्रकार त्यांच्या राज्यांत चालत. मोरोबा सबनीस नांवाचे एक गृहस्थ कासा किल्ल्यावर राहात होते. त्यांनीं श्रावण-मासांत जिवतीचें चित्र पूजेसाठीं आणलें आणि भिंतीवर चिकटवलें. कोणा तरी हलकट माणसानें त्याबद्दल सिद्दीकडे चुगली केली कीं, सबनीस पिवळा कागद चिकटवून कासा किल्ल्यावर तुमच्या वाइटासाठीं चेटूक करतो आहे. सिद्दीनें लागलीच त्याला बोलावून आणलें आणि वस्तुस्थितीचा काडीमात्र विचार न करतां त्या बिचाऱ्याला तोफच्या तोंडी उडवलें. आबजी हरि चित्रे या स्वामिनिष्ठ सेवकाचीहि तीच गत. तो आपल्या बायकोसह खंडोबाच्या दर्शनासाठीं जेजुरीस गेला होता. त्याचा गुन्हा काय तर परत येण्यास विलंब. सिद्दी अंबर त्या वेळीं बराच आजारी

होता. आवजीच्या हितशत्रूंनीं त्याच्याविरुद्ध सिद्दीला चिथावलें कीं, आवजी हा खंडोबापुढें तुमच्या मृत्यूसाठीं जंतर-मंतर करतो आहे. मृत्युभयानें पोखरलेल्या सिद्दीला तेवढेंच पुरलें. आवजी जंजिऱ्यास परत येतांच त्याला आणि त्याच्या भावाला गोणत्यांत भरून समुद्रांत लोटून देण्याची शिक्षा मिळाली. सिद्दीच्या या किल्ल्यांत सहल करीत असतांना अशा अनेक घटना स्मृतिपथांत येणें अपरिहार्य होतें.

आता आम्हांला तटावरून जंजिऱ्याची प्रदक्षिणा करायची होती. एका जिन्यानें आम्ही वर चढलों आणि तटावर आरूढ झालों. या तटाला एकूण एकोणीस बुरूज आहेत आणि ते प्रत्येकीं नव्वद फूट अंतर सोडून बांधलेले आहेत. महाराष्ट्राच्या मीं पाहिलेल्या सगळ्या किल्ल्यांत ही बांधावळ लयबद्ध आहे. बहुधा ही फिरंगी स्थपतीची कल्पकता असावी. प्रत्येक बुरुजाला कमानी आहेत आणि कमानीवरची भिंत समतळ न बनवितां ती कमळपाकळ्यांच्या आकाराची ठेवलेली आहे. प्रत्येक बुरूज म्हणजे एकेक प्रफुल्ल कमळ, अशी कविकल्पना या



तीन प्रसिद्ध तोफा

बांधणीच्या मुळाशीं दिसते. पण या कमळांत मधु-मकरंद नाहीं आणि म्हणूनच भ्रमरपंक्तीहि नाहींत. आहेत त्या प्रत्येक कमानींत तोंड बाहेर काढून बसलेल्या आगओक्या तोफा! जंजिऱ्याचा एकूण एक बुरूज असा यंत्रसज्ज आहे. ध्वज

उभारण्याच्या जागेजवळ जी एक शतघ्नी तोफ विसावली आहे, तिचें नांव कलालबांगडी. कलाल म्हणजे कोल्हाळ. तिला एकदां बत्ती दिली कीं ती गर्भपाती कोल्हाळ माजवते, म्हणून तो कोल्हाळ शब्द आला आहे. पंचरसी कांचीचीं वलयें एकापुढें एक जोडून आणि अग्नितापानें एकजीव करून बनवलेली म्हणून बांगडी हें दुसरें जोडनांव. तिच्याच शेजारीं कीर्तिमुख जडवलेली दुसरी एक तोफ आहे. तिचें नांव चावरी आणि तिसरी पुढें लांब नि मागें बिनशेपटीच्या नागोबागत तोकडी दिसणारी ती लांडाकासम. किल्ल्यावरच्या सगळ्या तोफांत याच तिघीजणी आपल्या व्यक्तिवैशिष्ट्यानें डोळ्यांत भरतात. इथल्या पितळी तोफा युरोपियन बनावटीच्या असून लोखंडी तोफांची घडण देशी आहे. एक फ्रेंच तोफ तर फ्लँडर्सच्या रणांगणावर धुमाळी खेळून आलेली आहे. ती इंग्रजांकडून सिद्दीला मिळाली असें सांगतात.

वायव्येच्या बुरुजावर आल्यावर आम्हांला समोर समुद्रांत कासावेटावरचा तो पद्मदुर्ग अस्पष्टसा दिसूं लागला. याची पहिली मुहूर्ताची शिळा शिवरायानें बसवली. जंजिऱ्याला हतप्रभ करण्यासाठीं शिवरायानें ज्या अनेक गोष्टी केल्या, त्यांतच हा पद्मदुर्ग येतो. शिवरायानें एकूण तीन वेळां जंजिऱ्याची मोहीम काढली. सिद्दी हा त्याच्या वांट्याला अंतःशल्य झाला होता. त्याला कसेंहि करून उखडलेंच पाहिजे या निर्धारानें त्यानें १६५७ त शामराव नीळकंठ पारसनीस याला सिद्दीवर घातलें. सिद्दीनें घाबरल्याचें मिष करून त्याला सन्मानानें किल्ल्यांत नेलें आणि तिथें कैद केलें. पुनश्च जंजिऱ्याची आगळीक करणार नाहीं, असें वचन दिल्यावरच त्याची मुक्तता झाली.

त्या वेळीं सिद्दी फत्तेखान जंजिऱ्यावर राज्य करीत होता. हा पुरुष म्हणजे व्यसनांचें माहेरघर होता. शिवाय आपस्वार्थी, लोभी अशा 'नृपांगणगत खलांनीं' त्याला वेढलें होतें. ते त्याचे कान भरीत होते आणि हा त्यांच्या तालावर नाचत होता. हबशी लोकांचीं मनें तुझ्याविषयीं शुद्ध नाहींत, ते तुझ्या घाताला टपले आहेत असें त्यांनीं भरवून दिल्यामुळें हा स्वजनांचींच मुंडकीं मारीत सुटला. सुमारें पाऊणशें हबशी त्यानें जगाच्या पटावरून उडवले. सिद्दी खैरियत आणि सिद्दी कासीम हे त्या काळचे दोन रणझुंजार पुरुष. पण तेहि जिवाच्या भयानें जंजिऱ्यांतून पळाले. जंजिरा अंतःकलहानें धुमसूं लागला. ही संधि उत्तम आहे असें जाणून शिवरायानें पुन्हा त्याच्यावर धाड घातली. तळें, घोसाळें इत्यादि

सिद्दीच्या अंमलाखालचे किल्ले एकेका धडकेंत काबीज करून त्यानें जंजिऱ्याभोंवतीं बळकट वेढा बसवला. फत्तेखानाची म्हातारी कांपली. व्यसनी आणि नीतिभ्रष्ट पुरुष पडत्या प्रसंगीं नेट धरूं शकत नाहीं हें काय सांगायला हवें! पण तरीहि जंजिऱ्याचें दैव बळकट होतें. खैरियत आणि कासीम हे परागंदा झालेले वीर आपल्या भूमीवरचें संकट ऐकून आणि वैयक्तिक राग-द्वेष विसरून परत फिरले आणि वेढ्यांतून नकळत सुळकांडी मारून किल्ल्यांत शिरले. फत्तेखान किल्ला शिवरायाच्या चरणीं ओपून जीव वांचवायला निघाला होता, त्याला त्यांनीं निखंदून म्हटलें, 'आम्ही हबशी लोकांनीं मोठी मेहनत घेऊन ही जागा संपादन केली आहे. तेव्हां ती आपण होऊन शत्रूस देण्यापेक्षां मृत्यु बरा!' पण तरीहि तो शेंदाडशिपाई बळ धरीना, तेव्हां त्याला कैद करून जंजिऱ्याचें नेतृत्व त्यांनीं स्वतःकडे घेतलें आणि ते किल्ला चौफेर लढवूं लागले. या प्रसंगीं वस्तुतः किल्ला शिवरायाच्या हातीं यायचा. फक्त आणखी कांहीं दिवस वेढा आंवळून बसायला हवें होतें. पण त्याच वेळीं विजापुराहून अफझुलखान प्रचंड फौजेनिशीं महाराष्ट्रावर लोटत आहे असें कळल्यामुळें सिद्दीशीं तह करून किल्ला न घेतांच शिवरायाला ती मोहीम संपवावी लागली.

शिवरायाची तिसरी मोहीम १६६७ सालांतली. पुढील पांच वर्षें जंजिऱ्याचें हें राजकारण चालू होतें. मराठी सैन्य राजपुरीला ठाण मांडून बसलें होतें. असें सांगतात कीं, त्या वेळीं मराठ्यांनीं आंबे खाऊन फेकून दिलेल्या बाठी रुजल्या, त्यांचे वृक्ष झाले आणि त्यांचीं मधुर फळें त्यांनाच खायला मिळालीं. त्या वेळीं सिद्दीचें सगळें राज्य मराठ्यांच्या हातीं आलें होतें. फत्तेखान केवळ किल्ल्यापुरता आक्रसून बसला होता. त्याला फार दिवस दम काढवेना. मागच्याप्रमाणेंच याहि वेळीं त्यानें जंजिरा मराठ्यांच्या स्वाधीन करून शिर सलामत राखण्याचा बेत केला. अर्थात् इतर सरदार त्याला विरुद्ध गेले. त्यांनीं फत्तेखानाला ठार करून भयांतून मोकळें केलें आणि किल्ल्याचे अधिकार आपल्या हातीं घेतले. पुढें होळीच्या रात्रीं मराठी सैन्यांत गाफीलपणा आला आहे हें पाहून त्यांनीं त्यांच्या तळावर निकराचा हल्ला चढविला आणि दारूगोळ्याला आग लावून दिली. त्याचा स्फोट इतका गगनभेदी होता कीं, तो आवाज रायगडावर शिवरायाला झोपेंत ऐकूं गेला असें म्हणतात. थोड्याच वेळानें बातमी आली कीं, सिद्दीनें राजपुरी

घेतली आणि मराठी सैन्याचें अतोनात नुकसान केलें. अशा प्रकारें इजा बिजा तिजा होऊन शिवरायाच्या तिन्ही मोहिमा विफल ठरल्या.

जंजिऱ्यावर भगवा झेंडा न फडकतां शिवछत्रपतींचा मृत्यु झाला. पण 'मम व्रते हृदयं ते दधामि' म्हणून शिवरायानें संभाजीच्या हृदयावर हात ठेवलेला होताच. पित्याचें अपुरें कार्य तडीस नेण्यासाठीं संभाजीनें कंबर बांधली. तसें करायला आणखीहि एक कारण घडलें. औरंगजेबाची फूस मिळाल्यामुळें सिद्दी मराठ्यांच्या राज्यांत धुडगूस घालूं लागला होता. पनवेल ते चौलपर्यंतचा समुद्रकिनारा त्यानें उद्ध्वस्त केला होता. संभाजीला त्याची दखल घेणेंच भाग होतें. त्यानें दौलतखानासारख्या दर्यासारंगाच्या हाताखालीं दीडशें गलबतांचें आरमार तयार केलें आणि या सर्व मोहिमेचें आधिपत्य दादजी रघुनाथला देऊन म्हटलें,

"तुम्ही सीदीचा पाडाव करून या. म्हणजे तुम्हांस अष्टप्रधानांत एक पद देऊं."

त्यानें महत्त्वाकांक्षा धरून १६८२ सालीं जंजिरा वेढला. सतत महिनाभर किल्ल्यावर गोलंदाजी केली. तट जागोजागीं कोसळला. पण तरीहि सिद्दीचा प्रतिकार थांबेना. अन्तर्भेद करून सिद्दीचें दारूगोळ्याचें कोठारच पेटवून द्यावें, म्हणजे तो दांतीं तृण धरील अशा कल्पनेनें दादजीनें खंडोजी फर्जंद या चतुर धाडसी पुरुषाला किल्ल्यांत धाडलें. 'मी संभाजीचा हाडवैरी' असें सांगून त्यानें सिद्दीकडे चाकरी मिळविली. पण तिथली एक बटकी चोरावर मोर ठरली आणि तिनें खंडोजीचें सत्य स्वरूप ओळखून सिद्दीपुढें त्याला उघड केलें. मग खंडोजी आणि त्याचे साथीदार हालहाल होऊन प्राणास मुकले, हें सांगणें नकोच.

त्यानंतर सिद्दी कासमनें असा कांहीं जोर केला कीं, संभाजीच्या आरमाराला खाडींतून पळ काढणें भाग पडलें. संभाजीला हा पराभव जिव्हारीं लागला. त्यानें मग अतर्क्य, अघटित अशी एक योजना मनाशीं आंखली. संभाजीच्या स्वभावाशीं ती अगदीं सुसंगत होती. प्रभु रामचंद्र जर समुद्रावर सेतु बांधूं शकतो, तर आपल्याला राजपुरीची एवढीशी खाडी भरून काढणें काय अशक्य आहे! तसें झाल्यास जळांतून नि स्थळांतून नि एकदम दाब आणून सिद्दीची दामटी वळवतां येईल. आणि लगेच हुकूम सुटले. संभाजीचे नळ, नीळ, जांबुवंत राजपुरीच्या डोंगरावरचे दगड वाहून खाडींत टाकूं लागले. अर्धी-पाऊण खाडी हां हां म्हणतां

भरून निघाली. जंजिऱ्याचा स्थलमार्ग पुरा होण्याच्या वेतांत आला. सिद्दीच्या पोटांत आवळे शिजूं लागले. आणखी थोड्या दिवसांत राजपुरीचे दगड थेट तटाला जाऊन भिडले असते; पण इथेंहि सिद्दीचें सुदैव मराठ्यांच्या मार्गांत आडवें पडलें. मराठी मुलुखांत औरंगजेबाचा एवढा जबरदस्त रेटा आला कीं, संभाजीला उरलेली खाडी भरून काढायला सवडच मिळाली नाहीं. निरुपायानें ती मोहीम एकट्या दादजीवरच सोंपवून संभाजी औरंगजेबाला सामोरा होण्याला धांवला. मागाहून कांहीं काळ दादजी टेक धरुन राहिला. पण संभाजीच्या जाण्यानें त्या मोहिमेंतलें चैतन्यच गेलें. पावसाळ्यांत त्याच्या जहाजांना लाटांच्या मारापुढें टिकाव धरतां आला नाहीं आणि एक दिवस दादजीला वेढा उठवावा लागला. सिद्दी त्याच क्षणाची वाट पाहत होता. त्यानें किल्ल्यांतून बाहेर पडून दादजीला महाडपर्यंत पिटाळीत नेलें आणि सूड म्हणून त्याची बायकोच पळवून आणली.

संभाजी गेला; पण त्याच्या त्या अफाट कृत्याची सामक्षा अजून तिथें आहे. पूर्वेकडे तोंड करून आम्हीं ती भरावाची जागा पाहिली. तिथून राजपुरीच्या डोंगराचें टोंक आम्हांला दिसत होतें. ज्या वेळीं समुद्र शांत असतो, त्या वेळीं आगबोटी सामराजगडाच्या पायथ्याशीं येतात आणि वादळाचें चिन्ह दिसतें, तेव्हां त्या जंजिऱ्याला वळसा घालून राजपुरीसमोर नांगरल्या जातात. राजपुरीची खाडी मुखाशीं चार मैल रुंद असून उगमापासून समुद्रापर्यंतची तिची लांबी वीस मैल आहे. आंतल्या भागांत दोन फांटे फुटून तिचें दुवेळकें झालें आहे. दक्षिण फांट्याला तळखाडी आणि उत्तर फांट्याला मांदाडखाडी म्हणतात. पूर्वेकडून दक्षिणेकडे तोंड वळवलें कीं नानवलीच्या डोंगरटोकावरून बोटींना मार्गदर्शन करणारें दीपगृह दिसतें. जंजिरा आणि दीपगृह यांच्यामध्यें पाण्याखालीं लपलेला एक भलामोठा कातळ आहे, त्याला म्हणतात चोरकासा. अवसे-पुनवेची मोठी ओहोट पडते, त्याच वेळीं तो वर डोकावतो. कासा म्हणजे कासवाच्या आकाराचा आणि लपलेला म्हणून चोर. जंजिऱ्याच्या कातळापेक्षां हें प्रस्थ मोठें आहे. किनाऱ्याची माहिती नसलेल्या कप्तानानें गलबत हाकारावें आणि तें नेमकें या कातळाला आदळून फुटावें, असा प्रकार तिथें घडतो.

तिथून पश्चिमेला आल्यावर जंजिऱ्याचा दर्यादरवाजा आहे. त्याच्याजवळच धक्का आहे. कितीहि भरती आली तरी तो वीस फूट वर रहातो. हें पश्चिमद्वार शत्रूच्या वेढ्यांतून निसटून जाण्याच्या कामीं अनेकवार उपयोगी पडलें आहे.

पेशवे, आंग्रे यांच्या संयुक्त वेढ्यांतून सिद्दी पसार झाला आणि इंग्रजांना जाऊन मिळाला, तो बहुधा याच दरवाजानें पळाला असावा.

संभाजीनंतर पेशव्यांनींसुद्धां सिद्दीला कधीं सुखानें अन्न खाऊं दिलें नाहीं. पेशवे हे मूळचे श्रीवर्धनचे म्हणजे सिद्दीच्याच मुलुखांतले. तेव्हां त्यांना त्या भूमीविषयीं विशेष प्रेम असणें स्वाभाविक होतें. तेहि सिद्दीला तिथून उपटायला पाहत होते. १७१६ त आंग्र्यानें त्याच्यावर आरमारी हल्ला चढविला त्या वेळीं बाळाजी विश्वनाथानें कान्होजीला फार मोठी मदत केली. सिद्दी नरमला, तहाला आला; पण निखळला मात्र नाहीं. १७४६ सालांतहि तोच प्रकार. 'सिद्दी सात रावणासारखा दैत्य' पण नानाजी सुर्वे यानें त्याला ठार केलें. त्यामुळें सिद्दी रहमान गर्भगळित झाला आणि बाजीरावाला शरण आला. आपल्या बारा महालांपैकीं सहा महाल त्यानें पेशव्यांना बहाल केले. पण इतकें होऊनहि त्याचें देवक मात्र उठलें नाहीं.

त्यानंतरची सिद्दीविरुद्ध उसण्या घाईची झुंज म्हणजे १७५८ ते १७६१ या काळांतली. रामजी महादेव बिवलकर, नारो त्र्यंबक, राघोजी आंग्रे असे झुंजार पुरुष मराठ्यांच्या बाजूनें जंजिऱ्यावर धडकले होते. कांहीं उणें पडायला नको, म्हणून पेशव्यांनीं त्या वेळीं फिरंग्यांचीहि मदत घेतली होती. सर्वांनीं सिद्दीची कोंडी केली आणि ते सिद्दी केव्हां शरण येतो त्या क्षणाची मार्गप्रतीक्षा करीत राहिले. पण सिद्दी कसला वस्ताद! त्यानें एका रात्रीं शत्रूचा डोळा चुकवून किल्ल्यावरून सुळकांडी मारली आणि थेट मुंबई गांठली. तिथें जाऊन इंग्रजाला 'घालीन लोटांगण' म्हटलें. इंग्रजानें लगेच आपलें आरमार सजवलें आणि सिद्दीला बरोबर घेऊनच तो राजपुरीच्या खाडींत शिरला. येतांक्षणींच त्यानें मराठ्यांना जाब विचारला. 'तुमचें आमचें सख्य ठरलें आहे. सिद्दी हा आमचा मित्र आहे. त्यानें जंजिरा आणि कासा किल्ला हे केव्हांच आम्हांला देऊं केले आहेत. असें असतां आम्हांला न विचारतां तुम्हीं जंजिऱ्यावर हल्ला कसा केलात? हा उघड मित्रद्रोह आहे.' आणि मराठ्यांच्या उत्तराची कदर न करतां त्यानें आपलें आरमार पुढें घुसवलें. लगोलग किल्ल्याचा ताबा घेऊन तिथें युनियन जॅकहि फडकविलें. हातीं ससा तो पारधी ठरून इंग्रज पेशव्यांना ठणकावून बोलला,

"तात्रडतोब इथून चालते व्हा. अन्यथा आम्ही तुम्हांला शत्रु समजून तुमच्या जहाजांवर तोफखाना सुरू करूं."

ही इंग्रजांची दमदाटी कोणत्या वेळची, ठाऊक आहे? उदगीरच्या लढाईत निजामाला धूळ चारून मराठ्यांनीं त्याचा साठ लाखांचा मुलूख संपादन केला त्या काळांतली. चित्रदुर्ग, सौंधें, हरपनहळ्ळी इत्यादि दख्खनच्या संस्थानांकडून खंडण्या कसूल केल्या त्या काळांतली. अजून पानिपत व्हावयाचें होतें. मराठे मध्यान्हीच्या सूर्यासारखे सर्वत्र तळपत होते. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे कीं, याच परमोत्कर्षकालांत इंग्रज त्यांच्यावर अशी कुरघोडी करूं शकला, तो केवळ आरमारी सामर्थ्याच्या जोरावर. चारच वर्षांपूर्वी पेशव्यांनीं विजयदुर्गास आंग्र्यांचें प्रचंड आरमार याच इंग्रजांच्या मदतीनें जाळून भस्म केलें होतें. आपल्या पायांवर आपणच धोंडा घालून घेतला होता. त्याचें प्रायश्चित्त इतक्या त्वरित मिळेल अशी पेशव्यांना कल्पनाहि आली नसेल. पण तें यथास्थित मिळालें. हातातोंडाशीं आलेला जंजिरा सोडून देऊन खालच्या मानेनें त्यांना तिथून परतावें लागलें.

आणि त्यानंतर तें १७९१ मधलें नाना फडणिसांचें राजकारण! जिथें कुऱ्हाड उपयोगी पडत नाहीं, तिथें सुई काम करते. जिथें शक्ति हात टेकते, तिथेंच युक्ति हात दाखवते. नानांना वाटलें कीं, बाळूमियाला हाताशीं धरून आपण जंजिरा युक्तीनें हस्तगत करूं. सिद्दी बाळूमिया हा सिद्दी अब्दुल्लानंतरचा गादीचा वारस. पण सिद्दी जोहार या सेनापतीनें बाळूमियाला गुंडाळून ती स्वतःच बळकावली. बाळूमियाला काळ्या रात्रीं पळ काढावा लागला. तो सरळ पुण्यास पेशव्यांच्या आश्रयाला आला. नानांनीं त्याला हितोपदेश करून म्हटलें कीं, 'एवींतेवीं आतां तुझे पाय जंजिऱ्याला लागत नाहींतच. तेव्हां तूं जंजिरा पेशव्यांच्या नांवें करून दे; आम्ही तुला त्याबदलीं स्वतंत्र जहागीर देऊं.' सांडलेलें कृष्णार्पण करायला त्याचें काय खर्च होत होतें! पुण्याचा इंग्रज वकील मॅलटसाहेब याच्या विद्यमानें तसा करार झाला. पेशव्यांनीं बाळूमियाला सुरतेजवळ असलेली सचिनची जहागिरी दिली आणि त्यानें जंजिरा पेशव्यांना दिला. पण हे सगळे घोडे नाचले ते कागदीच. पेशव्यांना जंजिऱ्याचा ताबा मिळवून देण्याच्या कामीं इंग्रज बांधलेला होता. पण त्यानें ती गोष्ट केली नाहीं. पेशव्यांना एकट्यानें ताबा घेण्याचा धीर झाला नाहीं. या सगळ्या कारस्थानाचा

निष्कर्ष हा कीं, जंजिरा पेशव्यांना मिळाला नाहींच; उलट पेशव्यांचा सचिनचा समृद्ध मुलूख मात्र फुकटांत बाळूमियाच्या पदरांत पडला !

पण या सगळ्या पराभवपरंपरेची भरपाई झाली ती भारत स्वतंत्र झाल्यावर. संस्थानविलीनीकरणाच्या लोंढ्यांत जंजिऱ्याचें हें टीचभर संस्थान भारतांत बिन-तक्रार विलीन झालें. आज जंजिरा भारताचा अशोकचक्रांकित ध्वज मिरवतो आणि त्याला कव घालून राहिलेला निळा दरिया त्याच्या भाग्याचें अभिनंदन करतो !

# ७.

# वसईचा पवाडा

पुण्यांतल्या शनिवारवाड्यांत सवाई माधवरावांची बैठक बसली आहे. कांहीं खासा मंडळी सभोंवतीं दिसत आहेत. घडीभर राजकारणाच्या गाथागोवींतून अंग काढून घेऊन संगीत-कलेंत मन रमवावें असा श्रीमंतांचा बेत दिसतो. कारण समोर तुणतुणें 'तुंई तुंई' करूं लागलें आहे. घागऱ्या लावलेल्या डफावर थापा बसत आहेत. आतां लवकरच शाहिराचा फड उभा राहणार. तो पहा गंगू हैबती, समला पाठीवर सोडून श्रीमंतांना नमनाचा मुजरा करीत आहे. वाजत्या गाजत्या पेशवाईचा पोवाडा प्रभाकर शाहिरानें नुकताच त्याला रचून दिला आहे. 'श्रीमंत ईश्वरी अंश, धन्य तो वंश परमपुरुषार्थी' म्हणून त्यानें आंकडकडवें ऐटींत झोंकून दिलें आहे. बाजीराव-साहेबांनीं उत्तरेस रणयात्रा काढली, माळवा सरसलूख केला, बुंदेलखंड 'थंड सही' केलें, भुवनसुंदरी मस्तानी काया कुरवंडून त्या रणमर्दाच्या चरणीं लागली. इत्यादि प्रसंग वर्णून तो चिमाजीअप्पांच्या वसईवेढ्यावर येऊन ठेपला आहे.

"तीन वर्षें राज्य वसवून मोर्चे बसवून सभोंवते धमामी
सुरुंगांनिं पाडिला अलगत बुरुज बदामी
हल्ल्यांत उडाले लोक, करिति किति शोक, पडुन संग्रामीं
नऊ लक्ष बांगडी फुटली वसई मुक्कामीं"

'नऊ लक्ष बांगडी' फुटली खरी; पण ती निरर्थक गेली नाहीं. चिमाजी-अप्पांना विजयहि तसाच घसघशीत मिळाला. उभ्या मराठी राज्यांत 'वसई फत्ते' हा जयघोष सर्वत्र दुमदुमला. खुद्द अप्पासाहेब आपल्या पुतण्याला या संग्रामाबद्दल छाती फुगवून लिहितात, 'या मागें युद्धें बहुत प्राप्त झालीं; परंतु मराठी फौजेस यासारखें युद्ध पडलें नाहीं. सीमासीमाच केली. त्याचा विस्तार लिहितां विस्तार आहे. हा जागा फत्ते होणें देवाची दया आहे.'

अप्पासाहेबांनीं लिहिलें त्याला दुजोरा देणारे सरदार-दरकदार किती तरी सांपडतात. रा. त्रिंबक हरि पटवर्धन लिहितात : " यैसें कर्म मागेंहि कोणास न जालें, अथवा पुढेंही न होणार, ऐसी गोष्टी स्वामीच्या हातून जाली. ' रा. अमृतराव शंकर अप्पासाहेबांचें अभिनंदन करतांना ऊर भरून लिहितो : ' ...स्वामीचा निश्चय थोर. तन्मुळेंच वसई फत्ते होऊन देव-ब्राह्मण-जोसी-गणिक या सर्वांस खरें केलें '

इन्द्रानें वृत्रासुराचा निःपात केला, अर्जुनानें समुद्रवासी निवातकवच दैत्यांची शांती केली, श्रीहरीनें भौमासुराचा कांटा काढला, त्या जातीचा हा बलपराक्रम होता. मराठेशाहीच्या अंगांत चरत, भिनत जाणारा फिरंगी रोग त्यामुळें शमला. समूळ नष्ट झाला असें म्हणत नाहीं. कारण अजून तो भारताच्या पादांगुष्ठांत दबा धरून राहिला आहे. पण त्या काळीं तरी उत्तर कोंकणांतून फिरंग्यांचें उच्चाटन झालें. वसई आणि रेवदंडा हस्तगत झाल्यामुळें मराठ्यांची समुद्रावर दहशत बसली आणि ' चौऱ्यांयशीं बंदरें ' संचाराला मोकळीं झालीं.

इ. स. १५०० त फिरंगी लोक भारताच्या किनाऱ्याला लागले आणि १७३९ त त्यांची सद्दी संपली. म्हणजे त्यांचा अधिकार गोवा-दमण-दीवपुरता मर्यादित झाला. या सुमारें अडीचशें वर्षांत त्यांनीं निरपराध हिंदु जनतेवर जे अनन्वित जुलूम, अत्याचार केले, त्यांना इतिहासांत तोड मिळणें कठिण ! त्यांनीं आपला पवित्र क्रूस अक्षरशः हिंदूंच्या रक्तानें न्हाणला. आपलें साम्राज्य वाढवणें आणि खिस्ती धर्माचा प्रसार करणें या दोन महत्त्वाकांक्षा धरून ते भारतांत प्रविष्ट झाले. पण अतिरेकीपणामुळें त्यांचे दोन्ही हेतु साध्य झाले नाहींत. माणुसकीला कलंक लावणें एवढा एकच फायदा त्यांनीं आपल्या पदरांत पाडून घेतला. केवळ आपला रानटीपणा जगजाहीर करण्यासाठींच जणूं ते भारतभूमीवर आडवे तिडवे नाचले. येतांना ते अवघीं दोन तारवें घेऊन आले. प्रथम त्यांनीं कोचीन बंदर काबीज केलें. मग गोवें घेतलें. पुढें बारा वर्षांनीं ते दमणास पोंचले. गुजरातच्या सुलतानांपैकीं महमदशहा त्या वेळीं या प्रदेशावर राज्य चालवीत होता. ' तुला खूप नफा होईल ' असें आमीष दाखवून त्यांनीं वसईस फॅक्टरी उघडण्याची त्याजकडे परवानगी मागितली. महमदशहा धनलोभाला बळी पडला. त्यानें परवानगी दिली आणि पंचतंत्रांतली ' वाघ आणि सोन्याचें कडें ' ही गोष्ट कल्पनेंतून प्रत्यक्षांत

आली. ब्राह्मणाला कडें तर मिळालें नाहींच; उलट चिखलांत रुतून वाघाचें भक्ष्य-भोज्य मात्र व्हावें लागलें.

फिरंग्यांनीं वसईत फॅक्टरी उघडली. तळ्याजवळ मांडवी म्हणजे बाजार उभारला. पुढें फॅक्टरीवर हळूच सोळा तोफा आणून मांडल्या. मग थोड्या दिवसांत गोव्याहून आरमार आणलें. त्यानंतर कांहीं दिवसांनीं वसई प्रांताच्या सुभेदाराला फुसलावून गलबतावर नेलें. बिचाऱ्याचीं जातीं पावलें तेवढीं दिसलीं; पण येतीं मात्र दिसलीं नाहींत. पाठोपाठ दमणावर चाल करून तें जिंकलें. वसईची एकदां नव्हे, तर दोनदां नासाडी केली. तिथें पूर्वी मुसमानांचा एक लहानसा कोट होता. समुद्र आणि खाडी या दोहीं अंगीं त्याला तट होता. तटाच्या बाहेर खाऱ्या पाण्याचा खंदक होता. किल्ल्याच्या संरक्षणार्थ मोठी शिबंदीहि होती. पण फिरंग्यांचा गव्हर्नर नूनु द कुंज्य यानें दीडशें लढाऊ गलबतें आणून मुसलमानांचा पराभव केला. वसई घेतली, मारली नि लुटली. त्यांचा किल्लाहि जमीनदोस्त करतांना मागेंपुढें पाहिलें नाहीं.

आणि पुढें याच कुंज्यानें स्वतःच्या हातांनीं मोडलेल्या त्याच भग्न वास्तूवर आपल्या नव्या किल्ल्याची पायाभरणी केली. आपण दुसऱ्याचें मोडलें तर आपण उभारलेलें तरी टिकेल का, याचा विचारसुद्धां साम्राज्यतृष्णेनें पेटलेल्या त्या महाभागाला सुचला नसेल. त्याचा किल्ला उठला. त्याच्या परिसरांत सुबद्ध नगररचना झाली. रस्ते, चौक यांची प्रमाणबद्ध आंखणी झाली. धनवंतांनीं इथें वाडे बांधले. पाद्र्यांनीं मठमंदिरें उभारलीं. निरनिराळ्या सरकारी कचेऱ्या थाटल्या. वसई शहर सुंदर सजलें. गोव्याखालोखाल त्याची प्रसिद्धि झाली. फिरंगी अमीरउमरावांनीं आसपासच्या प्रदेशांत वाड्या घेतल्या. कारखाने उभारले गेले आणि त्या निमित्तानें मजूर आणि कसबी लोक इथें रहायला आले. व्यापार वाढला. एकंदरींत वसईचा झगमगाट सुरू झाला. गार्सिय द सा हा किल्ल्याचा पहिला कप्तान झाला. त्याच्या हाताखालीं बारा दुय्यम अधिकारी नेमले गेले. चारशें फिरंगी आणि दोनशें देशी सैनिक किल्ल्याभोंवतीं जागता पहारा ठेवूं लागले. वसईचा धर्माधिकारी म्हणून विगारिओ द वरा याची नेमणूक झाली. पाद्र्यांचें एक मंडळ त्याच्या हाताखालीं वसईत आणि वसई जिल्ह्यांत धर्मप्रचाराचें काम करूं लागलें. शहराच्या बाहेरचा तट बांधण्याचें काम १५९० त सुरू होऊन दहा वर्षांनीं संपलें. प्रत्येक बुरुजावर सोळा ते अठरा तोफा बसवण्यांत आल्या.

एकवीस जहाजांचें आरमार त्याच्या रक्षणासाठीं खाडींत फिरूं लागलें. या भक्कम तटामुळें वसईकडे कोणींहि वांकड्या डोळ्यांनीं पाहूं नये, इतका त्याचा दरारा वाढला.

सध्यां ज्याला आपण वसईचा किल्ला म्हणतों तो हा कोट आणि आंतला दीड मैल परिघाचा प्रदेश. कोटाचा आकार सामान्यतः दशकोनी आहे. त्याची पूर्वपश्चिम लांबी पाऊण मैल असून दक्षिणोत्तर रुंदी अर्ध्या मैलापेक्षां कमीच भरते. तटाची उंची कुठें तीस तर कुठें पस्तीस फूट आहे. वरची रुंदी सामान्यतः पांच फूट आहे. पश्चिमेला समुद्राच्या बाजूनें दुहेरी तट असल्यामुळें तिथली रुंदी मात्र बरीच आहे. तटाच्या दहा कोनांवर दहा बुरूज मांडलेले आहेत. 'नोस्स सिनोर दु रमेदिउ', 'रैझमागु', 'सांतु गोंसालु', 'माद्रि द दीय', 'एलिफान्ति' अशीं त्याचीं नांवें आहेत.

वसईरोड स्टेशनापासून शहर तीन मैल आणि तिथून पुढें किल्ला एक मैल असें अवघें चार मैलांचें अंतर. शहरापर्यंत एस्. टी.च्या बस गाड्या मिळतात. पुढची वाटचाल पायीं सहज होऊं शकते. मी वसईला एकूण दोनदा गेलों. एकदां उन्हाळ्यांत आणि एकदां पावसाळ्यांत आर्द्रा नक्षत्राच्या तोंडावर. पहिल्या पाळींला दहा-पंधरा माणसें माझ्याबरोबर होतीं. त्यामुळें त्या वेळचें पाहणें हें माझ्या दृष्टीनें न पाहणेंच ठरलें. दुसऱ्या खेपेस मी 'एकला चलो रे'चा मंत्र जपला. वसईच्या तळावर उतरलों आणि कोणाला गम लागूं न देतां बाणासारखा पुढें चालूं झालों. मी चालत असलेला रस्ता किल्ल्याचा तट फोडून मधला प्रदेश दुभागीत थेट मांडवी बंदराला जाऊन भिडला होता.

जिथें रस्ता कोटांत शिरतो, तिथेंच उजव्या हाताला कोटाचा खुष्कीचा दरवाजा आहे. हें किल्ल्याचें जमिनीकडचें प्रवेशद्वार दुहेरी आहे. बाहेरच्या दाराला लोखंडी सुळे ठोकलेले आहेत. आंतल्या दरवाजाला दोन सुबद्ध स्तंभ धीर देत असून वर कमानदार चौकोनी दुसरा मजला आहे. मी या दरवाजानें आंत न जातां रस्त्याच्या उजव्या अंगानें कोसळलेल्या दगडांना पायऱ्या मानीत सरळ तटावर चढलों. पूर्व, पश्चिम आणि दक्षिण या तिन्ही दिशांचा अंतर्बाह्य विहंगम देखावा त्या तटावरून मला दिसणार होता. अर्थात् ही प्रदक्षिणा उलटी होती यांत शंका नाहीं. पण मनांत म्हटलें कीं, इतिहासाची सहल हा नाहीं तरी उलटाच प्रवास आहे.

तटावरून बुरुजावर अन् बुरुजावरून पुन्हा तटावर असा माझा तो प्रवास चालू झाला. मी एकटाच होतों, त्यामुळें पाहिलेल्या गोष्टीबद्दल मनाशींच संवाद करीत होतों. उजवी बाजू निसर्गाची होती. तटाखालीं कांहीं ठिकाणीं कुणगे दिसत होते. त्यापुढें खाडीच्या किनाऱ्यावर कोळीवाडा वसला होता. झापाच्या भिंती आणि वर तांबडीं लाल मंगलोरी कौलें अशीं तीं घरें, नेसायला गोणपाट अन् डोक्यावर मुकुट असा विसंवाद दाखवीत होतीं. त्यांच्या उपजीविकेचें साधन असलेल्या लहानमोठ्या होड्या त्यांनीं आतां पाण्याबाहेर काढून नीट शाकारून ठेवल्या होत्या. लहान मुलांना खेळायला, लपायला, बाहेर अनुधार पाऊस पडत असतां गोधडी पांघरून गुरंगटून बसायला त्या होड्या ही चांगली जागा होती. एका बाजूनें तट, दुसऱ्या बाजूनें खाडी आणि मधें तशीच लांबट असलेली ती ग्रामरचना मन वेधून घेत होती.

त्यापलीकडे वसईची खाडी लांबरुंद पसरली होती. पावसाळ्यामुळें पाण्याचा निळा रंग पालटत मातट पिवळा झाला होता. इतर सगळ्या सोंगट्या पिकून घरांत जाव्या, आणि सारीपाटावर चार-दोनच, दान पडेल त्याप्रमाणें, फिरत रहाव्या, तशीं चार-दोनच होडगीं खाडीच्या पृष्ठभागावर लहरत होतीं. दूर अंतरावर खाडीवरचा आगगाडीचा पूल दिसत होता. पलीकडच्या तुंगारच्या डोंगरावरची वनश्री काळ्यानिळ्या ढगांनीं आच्छादून टाकली होती. त्या काळ्या ढगांवर आणखी एक धूसर मेघवलय फिरत होतें. पाऊस नव्हता; पण आभाळ भरलेलें होतें. पण तशांतहि सूर्यकिरणांना कुठें तरी फट सांपडली होती आणि ते आपली सौम्य सुवर्णप्रभा घोडबंदरच्या डोंगरावर टाकीत होते. असें वाटे कीं, वाल्मीकि तप करीत बसला आहे आणि त्याचा उपास्य रामप्रभु प्रतिभेचा दिव्य झोत टाकून त्याचें अंतर्बाह्य उजळीत आहे. तुंगारचा डोंगर अंधारांत लपला होता तर घोडबंदरचा प्रकाशांत. शेलीच्या शब्दांत सांगायचें तर—

> 'Like a poet hidden
> In the light of thought'

विचारांच्या प्रभेंत लपलेला कविच जसा.

भाईंदरचीं मिठागरें आतां पाण्यानें भरून गेलीं होतीं आणि त्यांच्या मेरेवर हारीनें घातलेल्या टेंकडीवजा मिठाच्या राशी भाताचीं उडवीं शाकारतात, तशा शाकारून ठेवल्या होत्या. एखाद्याला वाटावें कीं, तीं आफ्रिकेंतल्या निग्रो लोकांचीं

वाटोळीं तणारेंच आहेत. डोंगराच्या रांगेपर्यंत तो मधला सगळा प्रदेश कसा छान समतळ होता ! कुठेंहि दृष्टीला अटकाव होत नाहीं. वाऱ्यासारखीच तीहि सर्वत्र अनिरुद्ध संचार करूं शकते. आणि तिला तो छंद कधींच पुरेसा वाटत नाहीं.

पण तिला प्रयासानें मुरडून डाव्या हाताला तटाच्या आंत आणली, तर तिथें काय दिसतें ? एका गर्विष्ठ राजवटीच्या विध्वंसाचे सर्वत्र विखुरलेले अवशेष. ते फिरंगी 'फिदाल्गां 'चे जमीनदोस्त झालेले वाडे. कोणाच्या भिंती कोसळून केवळ दगडांच्या राशी बनल्या आहेत. कोणाची अर्धीच भिंत, त्याची मूळची उंची दाखवण्यापुरती उभी आहे. कोणाच्या द्वारचौकटीच तेवढ्या डोक्यावर गवताचे केस उभवून राहिल्या आहेत. कोणाच्या चौकटीचे मधले दगड सुटून लोंबकळत राहिले आहेत. जिथें त्या उमरावांचीं उपवनें होतीं, तिथें कांटेरी झाडें वाढलीं आहेत. जिथें त्यांचीं विलासी शयनगृहें होतीं, तिथें घुशींनीं बिळें केलीं आहेत. ज्या दिवाणखान्यांत त्यांचे स्त्रीपुरुष परस्परांच्या कमरेला कव घालून बॉल नाचले, तिथें आज कावळीं-कुत्रींसुद्धां जायला भीत आहेत. काय दिमाख होता त्या फिरंगी उमरावांचा ! फिरंग्यांशिवाय इतर कोणाला तटाच्या आंत वसती करायला परवानगी नव्हती. त्यांनीं छळून नि लुटून संपत्ति जमा केली होती. मद्याच्या नशेपेक्षांहि त्यांना सत्तामद अधिक चढला होता. वसई म्हणजे एक नवें फिरंगाण बनवून ते इथें राहिले होते आणि आज त्याचीच ही मोडतोड तटावरून हिंडतांना पावलापावलाला मी पाहत होतों.


केवढीं तीं उत्तुंग मंदिरें ! केवढे विशाल मठ नि वाडेहुडे ! पोर्तुगीज संस्कृतीची भव्यता, विलासिता, कलाप्रियता हें सर्व त्या भग्न अवशेषांतहि वाचायला मिळतें. पण या सर्व गुणांची माती करणारी आणखी एक गोष्ट तिथल्याच दगडांवर, न कोरतांहि वाचतां येते. ती म्हणजे हिंसकता, अमानुषता. वसईच्या संस्कृतीचे दगड निरपराध्यांच्या मांसाच्या चिखलांत बसवलेले आहेत. त्यांच्या वास्तूंना त्यांनीं अनेक मनमोहक रंग दिले असतील. पण पहिला रंग दिला तो निरपराध हिंदूंच्या रक्ताचा. अहिंसा, प्रेम, दया, सौजन्य या सद्गुणांच्या पायावर उभारलेलें संस्कृतीचें मंदिर कालाच्या तडाख्यांत चिरकाल टिको वा न टिको ; पण हिंसेच्या, निर्दयतेच्या, क्रूरतेच्या पायावर उभारलेलें मात्र निश्चितपणें धुळीस मिळतें हें वसईनें सिद्ध करून दाखविलें आहे. दैवी संपत्तीचें पतनहि ऊर्जस्वल असतें, हें

रायगडावरचे अवशेष दाखवतात. आणि आसुरी संपत्तीचें पतन किती घृणास्पद वाटतें, तें हे वसईतले अवशेष सांगतात. ज्या फिरंग्यांनीं एका रात्रीं गोमंतकांतलीं दीडशें हिंदु मंदिरें हिंदूंच्या हस्तें पाडून देवमूर्तींचे तुकडे तुकडे केले ते आणि हे फिरंगी एकच, हें जर किल्ला पाहायला येणाऱ्याच्या मनांत जागत असेल तर वसईच्या किल्ल्याची ही दुर्दशा पाहतांना त्याला काय वाटेल, हें सांगायला कोणी मानसशास्त्रज्ञ नको !

कोटाच्या आंत आतां गच्चकल रान माजलें आहे. तटा–बुरुजांवर झुडपें आणि ताडाचीं झाडें उगवलीं आहेत. माड अन् आंब्यांचीं झाडेंहि बरींच आहेत. कांहींची उंची नेमकी तटाइतकीच आहे. पंधरा दिवसांपूर्वी मी आलों असतों तर तटावरून आंबा तोडून घेऊन तो चोखीत मला पुढें जातां आलें असतें. किल्ल्यांत एक मिशनरी अनाथालय आहे. त्यानें आंतला कांहीं भाग लागवडी-करितां घेतला असून तिथें केळींची लागवड केली आहे. ती मंडळी भाजीपालाहि करतात. दक्षिण तटाला लागूनच मारुतीच्या देवळाच्या अलीकडे त्यांचा आश्रम आहे. आश्रमांतले लोक हीच काय ती किल्ल्यांतली लोकवस्ती. बाकी सगळें निर्मनुष्य.

जलद्रवाजांतून मारुतिमंदिरावरून पुढें आलें कीं एक मोठें मंदिर लागतें, त्याचें नांव सेंट जोसेफचें मात्रिझ. मात्रिझ म्हणजे कॅथीड्रल नव्हे; तर मुख्य चर्च. किल्ल्यांत जाणाऱ्या प्रवाशाला हें चर्च चुकवतांच येणार नाहीं. कुठल्याहि बाजूला फिरत असलांत तरी त्याच्या प्रवेशद्वाराचा तो मनोरा तुमच्या नजरेचा वेध घेईल. आकाशाच्या पोटांत शिंग खुपसायला निघालेला तो अत्युच्च मनोरा आहे. त्याच्या भोंवतींचे उंच उंच माड त्याच्या खांद्यालाहि लागूं शकत नाहींत. त्याच्या शिखरावर 'सुखाच्या पाउलीं' जातां येत नाहीं. आंतून नागमोडी जिना आहे. त्याच्या मधल्याच कांहीं पायऱ्यांनीं शेजारणींशीं असहकार पुकारून जमीन गांठल्यामुळें, वर जाणाऱ्याला जपूनच चढावें लागतें. शिवाय त्याची भिंत खालपासून वरपर्यंत उभीच्या उभी भेगाळलेली आहे. पहिल्या खेपेला गेलों तेव्हां आम्हीं बरोबरीच्या बायकांना म्हटलें कीं, तुम्ही वर येण्याच्या भरीस पडूं नका. पण आम्ही वर जाऊन श्वास घेतों तों पाठीमागून जिन्यांत कांकणांचा आवाज. अर्ध्या जिन्यापर्यंत येणें सोपें होतें; पण पुढच्या मार्गांत त्यांना आधार देऊन वर काढतांना आमच्या नाकीं नव आले. आम्ही

मनोऱ्यावर गेलों, याचा अर्थ स्वर्गमार्गांतलें एक शिखरच चढलों असा होता. तिथें वारा अनिर्बंध खेळत होता. कांहीं मोठे पक्षी त्या वायुसागरांत लीलेनें पोहत होते, तरंगत होते. वर काळ्या पांढऱ्या ढगांचें आच्छादन, वाटोळ्या सुदूर क्षितिजावर निळी गूढ अशी किनार. आणि मधें सगळा अव्यक्तांत विलीन होणाऱ्या नाम-रूपांचा विस्तार. झाडें डोंगरांच्या कुशींत लपलीं होतीं. खाड्यांनीं



**सेंट जोसेफचें मान्त्रिझ**

अंग चोरलें होतें. पृथ्वीच्या हिरव्या शालूवर मिठागरांनीं पांढरी खडी काढली होती. शिडांचीं गलबतें बदकें होऊन खाड्यांतून विहरत होतीं. सगळ्याच निसर्गानं लहान होऊन, ठेंगणें होऊन आपल्या भूमातेचें महत्त्व वाढवलें होतें. भगवान् श्रीकृष्ण जणूं आम्हांला सांगत होता, ' ही पाहा सर्वत्र पसरलेली माझी

दैवी माया. हिच्यांतून तरून जाण्यांत गंमत आहे. पण त्यासाठीं माझ्या कृपेचे पंख लावावे लागतील!' हा आगळा आनंद अनुभवण्यासाठीं धीटपणा दाखवून नि धोका पत्करून बरोबरच्या स्त्रियाहि आमच्या शेजारीं येऊन उभ्या राहिल्या याचें आम्हांला मोठें समाधान वाटलें. नाहीं तर खालीं उतरल्यावर आम्हीं वर काय पाहिलें, तें त्यांना वाणीनें सांगू शकणार नव्हतों. 'बोलाबुद्धीसि अटक' असल्याचें वर्णन कसें करायचें!

खालीं उतरून मग आम्ही मात्रिझच्या अंतर्भागांत शिरलों. ही इमारत फार मोठी आहे. छप्पर बहुतेक पडलें असलें तरी भिंती अजून टेक धरून आहेत. मात्र आल्टरमागची भिंत निजली असून तिच्या मागचें चिंचेचें झाड आंतून स्पष्ट दिसतें. हेंहि मात्रिझ विध्वंसावरच उभारलें आहे. प्रथम इथें मशीद होती. ती आडवी घालून तिच्या पाठीवरच याची उभारणी झाली आहे. ज्या पेद्रु गाल्वांव या पाद्र्याच्या देखरेखीखालीं हें मंदिर उभारलें, त्याच्या अस्थि याच मंदिराच्या मध्यभागीं पुरलेल्या आहेत.

कोटाच्या थेट दक्षिणेस बालेकिल्ला (Citadel) येतो. मुसलमानी अमदानींत त्यांचाहि किल्ला याच जागेंत होता. फिरंगी गव्हर्नरानें तो पाडला आणि त्या जागीं आपला बांधला. पण कालपुरुष म्हणाला, 'दुसऱ्याचें उभारलेलें मोडून तिथें आपलें स्थापन करणें, हें मलाहि मंजूर नाहीं.' त्यामुळें हा बालेकिल्लाहि आज पडीकच आहे. बांधला त्या वेळीं याच्या महाद्वाराला दोन्ही अंगीं दोन दोन स्तंभ होते. आज त्यांचे फक्त अवशेषच दिसतात. आपल्या मंदिराच्या द्वारचौकटींवर जिथें कीर्तिमुख असतें, त्याच जागीं इथें पोर्तुगालच्या राजाचा मुकुट आणि त्याचीं राजचिन्हें कोरलेलीं आहेत.

प्रवेशद्वारांतून आंत गेलें कीं दुसरा दरवाजा लागतो. तो त्याहून भिन्न आहे. आंत पाहायचें काय, तर दारूचें कोठार आणि लष्करी बराकी. याच्या उजव्या बाजूला असलेल्या प्रशस्त जिन्यावरून चढून गेलें कीं ईशान्येच्या कोपऱ्यांतल्या एका भव्योत्तुंग वाड्यांत प्रवेश होतो. हा पूर्वींचा इथल्या जनरलचा वाडा.

वसईतला बाजार त्या काळीं बालेकिल्ल्यासमोरच्या विस्तीर्ण मैदानांत भरे. इथली पेठ सदा गजबजलेली असे. अनेक देशांतून नाना प्रकारच्या मालाचें केणें इथें उतरे. याच मैदानांत एक भरपूर पाण्याची विहीर आहे. किल्ल्याच्या दक्षिण तटाच्या बाहेर वसलेल्या कोळी वस्तींतलीं माणसें हिचेंच पाणी नेतात.

आम्ही तिथें पोंचलों तेव्हां बऱ्याच स्त्रीपुरुषांची तिथें गर्दी होती चोहों बाजूंनीं पाणी ओढलें जात होतें. तरुण-तरुणींच्या चेष्टाटवाळ्यांना ऊत आला होता.



बालेकिल्ला

आपण स्त्रीला विनयवती म्हणतों, पण तें नागर विशेषण आहे. ग्रामीण स्त्रीच्या बाबतींत विनयाचें अवगुंठन बहुधा गळलेलेंच असतें. आतां इथेंच पाहा. एका अटकर बांध्याच्या श्यामलेनें एका तरुणाच्या अंगावर पाणी उडवून त्याची

आगळीक केलेली आहे. तो तरुण म्हणतो कीं, 'ठीक आहे. आतां घे त्याची परतफेड!' त्यानें आपल्या बादलीला हात घालतांच ती मत्स्यगंधा तटाकडे पळत सुटली आहे. पळतां पळतां ती हंसत आहे आणि पुनःपुन्हा मागें वळून पाहत आहे. बरें, त्या तरुणानें तरी जगन्नाथाच्या दाक्षिण्यानें 'करिण्यः कारुण्यास्पदम्' म्हणावें. पण छे! त्याला कुठें संस्कृत येत होतें! तो तिच्यामागून झेंपावतो आहे. त्याच्या पदाघातांचा दुमदुम आवाज होतो आहे. शंभर पावलांच्या आंतच तिला पकडण्याचें शतकृत्य त्यानें केलें आहे. 'पौरव, रक्षाविनयम्' म्हणून दुष्यन्ताला सबूर म्हणणाऱ्या शकुंतलेप्रमाणें ती धीवरकन्या त्याला 'हात सोड' असें दटावते आहे. पण तो कसला खटनट! तो तिचा दंड पकडून तिला निर्दयपणें विहिरीकडे ओढून नेत आहे. त्याची बादली तिथें भरलेलीच आहे. तो ती सगळीच्या सगळी तिच्या मस्तकावर धो धो ओततो आहे. एवढीं माणसें समोंवतीं आहेत; पण एकालाहि तिची करुणा नाहीं. सगळे खोखो हसत तिच्या शहारत्या, कुडकुडत्या कायेची गंमत पाहत आहेत. एखाद्या नागर माणसाला वाटेल कीं, ती बिचारी तरुणी डोळ्यांतून माणकेंमोतीं गाळण्याच्या बेतांत आली असेल. पण कसचें काय? इतरांबरोबर तीहि आपल्या कुंदकळ्या दाखवून हसते आहे. नाकासमोर तर्जनी नाचवून त्या तरुणाला दम भरते आहे, 'थांब तूं. गावशील कधीं तरी!'


हें सगळें 'मृच्छकटिक' आमच्यासमोरच घडलें. तो निरोगी जीवनाचा समुल्लास मला मनोहर वाटला. तिथल्या नीरवतेनें, पडझडीनें आणि इतिहासाच्या उद्वेगजनक स्मृतीनें भारावलेला माझा जीव एका क्षणांत पालवला, मोहरला.

बालेकिल्ल्याला उलटी प्रदक्षिणा घालून आपण ईशान्येला आलों, कीं 'नोस्स सिंज्योर द व्हीद' (Our lady of life) या नांवाचें चर्च भेटतें. हें खास सैनिकांसाठीं बांधण्यांत आलें आहे. याचें प्रवेशद्वार कुसरीचें असून दरवाजा काळवत्री दगडाचा आणि कमानदार आहे. चौकटीवर प्रथम चतुष्कोणी आणि त्यावर वर्तुळाकार अशीं दोन गवाक्षें आहेत. सभामंडपाच्या उजव्या अंगाला जो लहानसा दरवाजा आहे, त्याच्या पलीकडे भुयार असल्याचें सांगतात. लष्करी अधिकाऱ्यांच्या विलासवती स्त्रिया आपलें नखहि कोणास न दिसावें, म्हणून सेनापतीच्या वाड्यांतून या गुप्त मार्गानें चर्चच्या प्राकारांत उगवत अशी आख्यायिका आहे. पण फिरंगी ललनांनीं इतका पडदानशीनपणा स्वीकारला असेल,

हें खरें वाटत नाहीं. चर्चच्या मागील बाजूस पाद्र्यांना राहण्यासाठीं बांधलेला मठ मागच्या अर्धवर्तुळ बुरुजाला जाऊन भिडला आहे.

या चर्चच्या समोरच तांबड्या विटांनीं बांधलेली एक दीर्घ इमारत आहे, तें त्या वेळचें ' मिझरीकोर्दिय ' रुग्णालय. आज तिथें खूपच रान माजलें आहे आणि पडक्या भिंताडावरहि झाडें वाढलीं आहेत. ' सेंट जॉनचे बंधू ' या संस्थेनें हें रुग्णालय चालवलें होतें. लढाईत जखमी झालेल्या सैनिकांचीच इथें शुश्रूषा होई.

रुग्णालयाच्या मागें एक भव्य इमारत पडीक अवस्थेंत कुठें कुठें उभी आहे, तें फिरंग्यांचें न्यायालय. तिथली ती एकच भिंत त्या इमारतीच्या सुश्लिष्ट आणि कलापूर्ण रचनेबद्दल साक्ष पुरवते. याच भिंतींत उंच जागीं कोनाडा आहे. तिथें फळ्या ठोकलेल्या आहेत, त्या बहुधा ग्रंथ ठेवण्यासाठीं असाव्या आणि न्याय-देवतेचें पीठ तिथेंच खालीं असावें, असा तर्क आहे. मुख्य दरवाजाच्या उजव्या अंगाला आणखी एक कमान दरवाजा आहे, तो कैद्यांना अंधारकोठडींत नेण्याचा मार्ग असेल, असें सांगतात. एक ' ओविदोर ' म्हणजे कज्जा ऐकणारा



कमारा

न्यायाधीश, एक पोलिस अधिकारी, एक सॉलिसिटर, मयताच्या उत्पन्नाची व्यवस्था ठेवणारे दोवे अधिकारी, एक वेलिफ आणि दहा शिपाई इतका न्याय-खात्याचा सरंजाम होता.

'नोस्स सिंज्योर चर्च 'च्या उत्तरेस एक पांच कमानींची इमारत दिसते तिचें नांव ' कमारा ' किंवा ' टाउन हॉल. ' एकावर एक दोन कमानी असलेलें त्याचें प्रवेशद्वार राजेशाही आहे. याच्याच डाव्या अंगास फिरंग्यांचा तुरुंग होता. याचीं पडकीं भिंताडें एवढीं अवाढव्य आहेत कीं, त्यावरूनच तो कैदखाना असल्याची खात्री पटते.

' कमारा ' आणि तुरुंग यांच्या समोरच्या खुल्या पटांगणाला ' प्रासा ' असें नांव आहे. तो एक त्या वेळचा सार्वजनिक चौक होता. क्रीडांगण म्हणून त्याचा उपयोग होई आणि किल्ल्यांतले धार्मिक, सामाजिक उत्सवहि इथेंच साजरे होत. अलीकडच्या काळांत इथें कोणीं तरी साखरेचा कारखाना काढला होता म्हणतात. सांप्रत तो अस्तित्वांत नाहीं. पण त्याच्या पाणीपुरवठ्यासाठीं म्हणून खोदलेलें एक नांगराच्या आकाराचें तळें मात्र शिल्लक आहे. या तळ्याचें खोदकाम चालू असतां माणसांचीं बरींचशीं हाडें सांपडलीं, तीं बहुधा लढाईत मेलेल्या सैनिकांचीं असावीं. तसेंच ' नोस्स सिंज्योर चर्च 'च्या प्राकारांत खोदाई करीत असतांना एक थडगें मोकळें झालें आणि त्यांत माणसाबरोबरच एका घोड्याचाहि सांगाडा आढळला. याचा अर्थ त्या मृत घोडेस्वाराला पुरतांना त्याच्याबरोबर त्याच्या घोड्यालाहि जिवंत गाडण्यांत आलें असलें पाहिजे, असा होतो. मध्ययुगीन काळांत युरोपमध्यें एखादा सरदार वा राजपुरुष मेला म्हणजे त्याच्या बायकांनाहि जिथें त्याच्याबरोबर जिवंत पुरीत, तिथें घोड्यासारख्या मोनजातीची काय कथा!

वर उल्लेखिलेल्या चौकांतच दोन मंदिरें आहेत. पैकीं एक वज्रेश्वरीचें आणि दुसरें शंकराचें. शिवमंदिर टुमदार, चतुष्कोणि, चार पडव्यांचें आहे. त्याच्या समोरचा नंदीहि सुबक, ठेंगणा आहे. वज्रेश्वरीचें मंदिर नानासाहेब पेशव्यांनीं चिमाजीअप्पांच्या प्रतिज्ञापूर्तीसाठीं बांधलें. या वज्रेश्वरीनेंच अप्पासाहेबांच्या तलवारीला वज्राची शतधार दिली. या किल्ल्यांतलें तिसरें मंदिर बलभीमाचें. तें मांडवी बंदराकडून बालेकिल्ल्याकडे येतांना वाटेंत लागतें. आजमितीस तिथले कोळी लोक मच्छीमारीसाठीं समुद्रावर जातांना या मारुतीपुढें नारळ फोडून त्याचा प्रसाद घेतात.

या सार्वजनिक पटांगणाच्या ईशान्येस एक मोठा बुरूज आणि दगडामातीचा ढीग दिसतो. तिथें पूर्वीं डॉमिनिकन पंथीयांचा आश्रम होता. त्यांचें चर्च आजमितीसहि भव्यतेनें डोळ्यांत भरतें. याला ' सेंट गोंसालो 'चें नांव दिलेलें आहे.

याचें छप्पर तर उडालेंच आहे. शिवाय आल्टरच्या पाठीमागची भिंतहि कोसळली आहे. दक्षिण दरवाजावर एक ढाल दाखवली असून तिच्यावर 'मानवांना तारणारा येशू' या अर्थाचीं 'IHS' अशीं आद्याक्षरें कोरलेलीं आहेत. ढालीच्या दोन्ही अंगांना दोन कुत्रे जळत्या मेणबत्त्या तोंडांत घेऊन उभे आहेत. 'डॉमिनिकन' पंथाचें हें अभिज्ञानचिन्ह आहे. 'सेंट डॉमिनिक' ची माता गर्भवती असतां, तिनें स्वप्नांत मेणबत्ती तोंडांत धरलेला एक कुत्रा पाहिला. तो त्या मेणबत्तीनें जगाला प्रकाश द्यायला निघाला होता. तेंच दृश्य मग तिच्या मुलानें आपल्या पंथाचें प्रतीक म्हणून प्रसिद्ध केलें. आपण सर्व ईश्वराचे विश्वासू कुत्रे, असें त्या पंथाचे लोक समजतात.

याच डॉमिनिकन चर्चच्या दक्षिणेला सेनेटहाउसचे कांहीं खांब हारीनें उभे दिसतात. ते त्याच्या पूर्ववैभवाची कल्पना देतात. त्या वेळीं सरकारी कामकाज या इमारतींत चाले. फिरंगी गव्हर्नर आपल्या अमीरउमरावांशीं राजकारणाचीं खलबतें इथेंच करी. उत्तर प्रांताचा जनरल हा या सेनेटचा मुख्य होता. वसईचा कप्तान याची उस्तवारी करी. शहरांतील कांहीं प्रतिष्ठित गृहस्थ त्याला मदतगार असत.

किल्ल्याच्या नैर्ऋत्य कोणांत तटाच्यालगत आणखी तीन प्रार्थना-मंदिरें असून तीं वेगवेगळ्या पंथांचीं आहेत. दक्षिणेकडून पश्चिमेला जातांना पहिलें जेसुइटाचें, दुसरें ऑगस्टिअनांचें आणि तिसरें फ्रान्सिस्कनांचें, अशी त्यांची मांडणी आहे. जेसुइट चर्च म्हणजे येशूचें चर्च. ही इमारत बाहेरून बरीच यथास्थित आहे. वसईतलें हें सर्वसुंदर मंदिर म्हणायला हवें. शिल्पशास्त्राच्या अनेक कलाकुसरी इथें आविष्कृत झाल्या आहेत. प्रवेशद्वारावरची कमान आणि तिच्या दोन्ही अंगांचे स्तंभ कोरीव आहेत. इथेंहि एक मनोरा आहे आणि त्यावर चढण्यासाठीं आल्टरच्या उजव्या हाताला वाटोळा जिना आहे. या चर्चला लागूनच जेसुइटांचा आश्रम आहे. या दोहोंचाहि पाया सेंट झेवियर याचा मित्र गोंसाल्वेज यानें घातला. जुनी इमारत ठेंगणी आणि चिखलमातीची होती. छप्पर म्हणजे तणारच होतें. पुढें फादर काब्राल यानें इतर भिक्षूंच्या मदतीनें याचा खूप मोठा विस्तार केला. वसईतल्या धनंतर बायकांनीं आपलें वैभव समर्पून या चर्चचें वैभव वाढवलें. जेसुइटांनीं या चर्चला जोडून एक कॉलेजहि चालवलें होतें. या कॉलेजांत नव-खिस्त्यांना धर्मप्रवचनें देणारे पाद्री तयार केले जात. इतिहास, नीति आणि धर्म या विषयाचा बराच मोठा ग्रंथसंग्रह त्यांनीं इथें केला होता.

सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धांत पोर्तुगालांतून या पाद्र्यांचें इकडे पेंव फुटलें. प्रथम फ्रान्सिस्कन, नंतर डॉमिनिकन्स आणि त्यानंतर जेसुइट्स आले. गोव्यांतला साष्टी महाल आणि वसई-वांद्र्याचा प्रदेश जेसुइटांनीं बाटवला. फ्रान्सिस्कनांनीं गोव्यांतला तिसवाडी महाल आणि वसईच्या बाजूचीं माहीम-आगाशी हीं गांवें खिस्तानुयायी केलीं. "ठाणें म्हणजे बिंबस्थान. फिरंगीयानें घेऊन कुबुद्ध धरिली. गांवचे गांव बाटविलें. किरिस्तान केलें," असें साष्टीचा बखरकार म्हणतो. १५७८ सालापर्यंत एकट्या वसईंत सुमारें दहा हजार हिंदूंना सक्तीनें बाप्तिस्मा दिला गेला. पोर्तुगालच्या हिंदुस्थानांतील वसाहतींत हे 'धर्ममार्तंड' कशासाठीं आले तर धर्मप्रसारासाठीं. कोणतें तंत्र घेऊन आले, तर रक्तपात, जाळपोळ, कत्तल, विध्वंस आणि जुलूम!

हिंदूंना लुटून त्यांनीं अमाप धनदौलत मिळवली. हे संन्यासी भिक्षुक पुढें पुढें तर मुलखाचे दुराचारी आणि व्यसनी बनले. त्यांनीं बाया बाळगल्या. विलासांची आतषबाजी सुरू केली. ते पदरीं सैन्य बाळगूं लागले. ज्यानें वरदान दिलें, त्या फिरंगी सरकारलाच ते भस्मासुर झाले. बडे बडे राजकीय अधिकारी त्यांना भिऊन दिवस काढूं लागले. यांच्या अनिर्बंध थैमानामुळें गोवें ओस पडलें. वांद्र्याचे सर्व ब्राह्मण परागंदा झाले. जमिनी ओस पडल्या. व्यापार बसला. कोणाला कशाचीच शाश्वती वाटेनाशी झाली. गोव्याचे मोठमोठे व्यापारी गोव्यांतून उठून मुंबईस आले आणि त्यांनीं तिथें नवी पेठ वसवली.

१६२९ सालीं गोव्यांतल्या अधिकाऱ्यांनीं पोर्तुगालच्या राजाला तळतळून कळवलें की, "या पाद्र्यांनीं आपल्या हिंदुस्थानांतील वसाहतींचा जितका नाश केला तितका दुसऱ्या कोणींहि केला नसेल. तेच आपले खरेखुरे हितशत्रु......"

शेवटीं पोर्तुगालच्या बादशहाकडून फर्मान मिळवून गोव्यांतल्या फिरंगी सत्तेनें या मिशनरी पाद्र्यांना इकडून हद्दपार केलें. त्यांनीं छलबलानें लुबाडलेली सर्व संपत्ति सरकारजमा करून टाकली. त्यांना सुतळीचा तोडासुद्धां इथून नेऊं दिला नाहीं. त्यांनीं एक गांठोडें बरोबर नेलें ते फक्त दुष्कीर्तीचें!

१६१८ त वसईवर एक दैवी चक्र कोसळलें. प्रथम कसली तरी दुःसाध्य रोगाची सांथ फैलावली. तिच्या महामारींत हजारों लोक बळी पडले. वसई उजाड, कालग्रस्त झाली. तिथला मुख्य पाद्रीहि त्या वाख्यांत खपला. पुढचा उत्पात याहून भयंकर होता. अचानक आकाश काळ्या ढगांनीं भरलें. विजांचीं जुंबाडें तळपूं लागलीं. वावटळी उठल्या. झंजावातानें समुद्रहि उधाणला. वरून

हत्तीच्या सोंडेसारखी पावसाची अनुधार सुरू झाली. खाडीतलीं तारवें एकमेकांवर आदळून फुटलीं. घरांवरचीं छपरें उडालीं. मोठमोठे वाडेहुडे कोसळले. ताड-माड उन्मळून घरांवर, रस्त्यांवर आडवे पडले. धरणीकंपाचा धक्का बसला, तो तर जीवघेणाच ! त्या महाभूतांच्या प्रकोपांत दगडहि उडूं लागले. हजार माणसें या वादळांत प्राणास मुकलीं. पुढें अवर्षण पडलें. त्यांतून भीषण दुष्काळ उगवला. आईबाप आपले पोटचे गोळे मुसलमान व्यापाऱ्यांना विकून आपलीं पोटें जाळूं लागले.

वसईचा राज्यडोलारा पतनाकडे झुकूं लागला. फिरंगी गर्वानें फुगले. सुभेदार अप्रामाणिक बनले. पाद्री लोक उन्मत्त होऊन 'कोऽन्योऽस्ति सदृशो मया' म्हणून दशदिशांवर डोळे वटारूं लागले. त्यांतच मस्कतच्या चांच्यांनीं वसईची लूट मारली. इकडे मराठ्यांचें बळ वाढत चाललें. त्यांनीं फिरंग्यांच्या अत्याचारां-विरुद्ध रणयज्ञ आरंभला. प्रथम अर्नाळा, वरसोवा, धारावी हीं बेटें हस्तगत केलीं. वसईच्या दोहीं अंगांच्या खाड्या आपल्या ताब्यांत घेऊन फिरंग्यांचें दळणवळण बंद पाडलें. वसईभोंवतींचे पाश आंवळले जाऊं लागले. त्याच वेळीं पेशव्यांनीं व्यंकटराव घोरपड्यांना मोठी कुमक देऊन गोव्यावर धाडलें. त्यानें तिकडे रणचंडीला आवाहन केलें. त्यामुळें गोव्याहून वसईला सैन्यबळ मिळेनासें झालें. फिरंग्यांनीं जिवावरचा प्रसंग ओळखून मुंबईकर इंग्रजांना मदतीस पाचारलें. पण वांद्र्याचे जेसुइट पाद्री त्यांना सतावीत होते; त्यामुळें तेहि फिरंग्यांवर बिथरलेलेच होते. अर्थात् त्यांनीं काडीचीहि मदत करण्याचें नाकारलें. अशा रीतीनें सर्व बाजूंनीं वसईच्या फिरंग्यांचे पाय उफावले आणि अखेर १७३९ त चिमाजीअप्पा त्यांचा कर्दनकाळ बनून त्यांच्यापुढें उभा ठाकला.

पण चिमाजीअप्पांनाहि पहिल्या धडकेला विजय मिळाला नाहीं. तसा तो मिळाला असता, तर त्याचें इतकें मूल्यहि ठरतें ना. कारण गनीम मातब्बर होता. आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सज्ज होता आणि एका भक्कम दुर्गाचा आश्रय करून मांडलेला होता. म्हणजे शस्त्रबळाबरोबरच त्याला स्थानबळहि होतें.

१७३० सालीं मे महिन्याच्या ३० तारखेस मराठ्यांनीं वसईवर पहिला आघात केला. किल्ल्याच्या नैऋत्येकडून रेजमागुष् आणि गोंसालो या दोन बुरुजांच्या मध्यें त्यांनीं शिड्या लावल्या. पण वर चढायच्या आंतच फिरंग्यांनीं मराठ्यांना परतवून लावलें. त्यानंतर दुसरा हल्ला लगेच एक महिन्यानें झाला. आणि तोहि

आषाढाच्या अनुधार पावसांत. पण शिड्या चिखलांत रुतल्या आणि त्या तटाला नीटपणें लागेचनात. शत्रूला चाहूल लागली. त्यानें वरून आगीचा मारा सुरू केला. तशाहि स्थितींत प्रहरभर रणधुमाळी झाली. पण अखेर मराठ्यांना पाठ दाखवावी लागली. बरेच शिपाई कामास आले. बरेच जायबंदी झाले. मोहीम अंगाशीं आली. तिसरा हल्ला पुनश्च त्याच वर्षाच्या सप्टेंबरांत झाला. बाजी भिवराव हा मोहिमेचा पुढारी होता. रात्रौ आठ वाजतां तटाला शिड्या लागल्या. हशम चौफेर तटावर चढूं लागले. या मोहिमेंत ' जीव तरी देऊं किंवा कोट तरी घेऊं ' असा कृतनिश्चय होता. सभोंवतीं तीनशें राउतांचें कडें उभें केलें होतें. जो कच खाऊन पळेल, त्याला कापून काढा, असा त्या राउतांना हुकूम होता. मराठ्यांनीं आपल्यापरी सर्व सिद्धता केली होती. पण नशिबाची तयारी अजून झाली नव्हती. फिरंग्याला या मोहिमेचा अगोदरच सुगावा लागला आणि तो सावध राहिला. लगेच बंदुका, तोफा दणाणूं लागल्या. मराठ्यांचे वीर तटावरून खालीं कोसळूं लागले. खुद्द बाजी भिवरावही जायबंदी झाला. पांचशें माणसें मेलीं. तितकींच जखमी झालीं. उपाय चालला नाहीं. शेवटीं माघार घेणेंच भाग पडलें.

चौथ्या आणि शेवटच्या मोहिमेस १७३९ च्या फेब्रुवारींत खुद्द चिमाजी-अप्पाच तिथें येऊन दाखल झाले. लढाऊ सैनिक, हशम, बाजारबुणगे, पेंढारी, कबिले हे सर्व धरून त्यांच्या तळावर दोन लक्ष माणसें होतीं. आले तसे त्यांनी मोर्चे बांधायला प्रारंभ केला. पश्चिम-दक्षिण खाडी आणि पूर्वेस खाजणाचा चिखल; तेव्हां मोर्चे उभारणें तें फक्त उत्तरेस सॅबॅस्टिअन बुरुजांच्या बाजूनेंच केवळ शक्य होतें. मोर्चे-धमधमे उभारल्यावर अप्पासाहेबांनीं त्यावर तोफा चढवून गोळे टाकायला सुरुवात केली. उलट बाजूनेंहि अग्न्यस्त्र चालूं झालें. नुसता तोफखाना चालवून काम भागणार नाहीं, हें त्यांना थोड्याच काळांत कळून आलें. मग सुरुंग लावून तट उडवण्याचा बेत ठरला. कामास प्रारंभ झाला. सगळीकडे वाळूची जमीन, त्यामुळें सुरुंग खणून तटापर्यंत नेणें मुष्कील होऊं लागलें. मोठ्या प्रयासानें बारा-चौदा सुरुंग तटापर्यंत पोंचले. हें सगळें सुरुंगांचें काम रमेदी बुरुजापासून तों सॅबॅस्टिअन् बुरुजापर्यंतच्या घेऱ्यांत म्हणजे किल्ल्याच्या पश्चिमोत्तर दिशांना चाललें होतें. फिरंगी वरून चंद्रूस, गंधक टाकीत होता. लांकडें लोटीत होता. उकळतें पाणी ओतीत होता. पण सुरुंग लावणाऱ्या मराठ्यांनीं त्याची तमा बाळगली नाहीं.

सर्व बाजूंनीं जय्यत तयारी झाल्यावर मेच्या दुसऱ्या तारखेस भर दुपारीं अप्पासाहेबांनीं सुरुंगांना बत्ती देण्याचा हुकूम सोडला. रमेदीचा सुरुंग प्रथम उडाला. तटाला भगदाड पडतांच मराठ्यांनीं एकदम एल्गार केला. शत्रु त्यांना लगटला. कापाकापी सुरू झाली. दुसरें पथक सॅबॅस्टिअन बुरुजाच्या खालीं तयार होऊन राहिलें होतें. थोड्या वेळानें तिथला सुरुंग उडाला. तटाला भलें मोठें भगदाड पडलें. फुटलेल्या धरणांतल्या जलौघाप्रमाणें मराठे वीरगर्जना करीत एकदम किल्ल्यांत घुसले. चहूंबाजूंनीं तटावर, बुरुजांवर भराभरा सैन्य चढलें. पण दुर्दैव असें कीं, एवढा वेळ न उडालेला आणखी एक सुरुंग तेवढ्यांतच उडाला आणि त्यावरचे मराठे शिपाई गोळ्यासारखे आकाशांत फेकले गेले. कित्येक मेले. कित्येक दडपले. कित्येकांच्या चिंधड्या झाल्या. कित्येक इतस्ततः उडाले. पण अप्पासाहेबांनीं कोण मेले, कोण राहिले याचा विचार क्षणभरहि मनांत न आणतां उरलेलें सैन्य किल्ल्यांत लोटलें. सरमिसळ होऊन हातघाई सुरू झाली.

फिरंगी सैन्य आटत चाललें. दारूगोळ्याचीं कोठारें खलास झालीं. सैन्यांतले अधिकारीहि धारातीर्थी निजले. बुरूज ढांसळले. तट कोसळले. कुठून कुमक येण्याची आशा उरली नाहीं. सर्व बाजूंनीं आकाश फाटलें. फिरंग्यांचा गर्वज्वर उतरला. आणि चार तारखेस उजाडतांच फिरंग्यांनीं सॅबॅस्टिअन बुरुजाच्या खिंडारांतच शरणागतीचें पांढरें निशाण उभें केलें. दुसऱ्याच क्षणाला लढाई थांबली. तोफा-बंदुकांचे आवाज बंद पडले. पांच हजार माणसें त्या लढाईत कामाला आलीं खरीं; पण चिमाजीअप्पांना विजय मिळाला तोहि त्याच मोलाचा होता. 'यतो धर्मस्ततो जयः' हें पुन्हा एकदां सिद्ध झालें.

लगेच बारा कलमी तह झाला. सात दिवसांत वसईचें ठाणें फिरंग्यांनीं खालीं करून चालतें व्हावें, असें ठरलें. तहाच्या अंमलबजावणींत फिरंग्यानीं कसूर करूं नये म्हणून त्यांचा एक बडा सरदार अप्पासाहेबांनीं स्वतःकडे ओलीस ठेवून घेतला. सारे फिरंगी किल्ल्याच्या मुख्य दरवाजानें नव्हे, तर सॅबॅस्टिअन बुरुजाच्या भगदाडांतून बाहेर पडले आणि गलबतांत बसून गोव्याला रवाना झाले. अप्पासाहेब रणतुरा मिरवणारा वीरपुंगव खरा, पण फिरंगी निघून जातांना त्यानें त्यांच्या केसासहि धक्का लागूं दिला नाहीं. पाद्र्यांना आपापली मालमत्ता घेऊन जाण्याची त्यानें परवानगी दिली. वसईतल्या ख्रिस्ती मंदिरांना आणि

त्यांतल्या मूर्तींना अभंग राखलें. जे ख्रिस्ती वसईत राहणार असतील त्यांना अभय दिलें. फिरंग्यांनीं वसई घेतल्यावर जें केलें तें आणि अप्पासाहेबांनीं वसई जिंकल्यावर जें केलें तें, यांची जर तुलना केली तर काळे आणि गोरे यांच्या व्याख्याच आपणांला बदलाव्या लागतील.

चिमाजीअप्पांच्या हालचाली किल्ल्याच्या उत्तर प्रदेशांतून झाल्या. त्यांनीं सुरुंगानें उडवलेला सॅब्रस्टिअन बुरूज थेट उत्तरेलाच आहे. किल्ल्यांतून मांडवीकडे जाणारा रस्ता जिथें कोटांत शिरतो, तिथेंच डाव्या हाताला काव्हालेरो बुरूज आहे. त्यावर चढावें आणि तिथून सरळ तटावरून सॅब्रस्टिअन बुरुजावर जावें. या उत्तर तटाखालच्या रस्त्याच्या अलीकडचा सगळा भाग ओसाडच आहे. तिथें थोडीबहुत शेती होते, असें दिसलें. कवायतीचें मैदान म्हणून फिरंग्यांनीं मुद्दाम हा भाग मोकळा ठेवला होता. सॅब्रस्टिअन बुरूज हा त्या काळीं इथल्या सर्व बुरुजांचा दादा शोभेल असा होता. किल्लेदाराचा वाडा याला लागूनच होता. इकडच्या तटाला बाहेरच्या बाजूनें गोळीबाराच्या खुणा दिसतात. इथें सुरुंगांनीं पाडलेलें भगदाड किल्ला हातीं येतांच मराठ्यांनीं पुनश्च बांधून काढलें. या बुरुजाच्या आंतल्या अंगाचें चोरदार अजूनहि दिसतें. ती सगळी जागा आम्हांला तीर्थरूप वाटली. तिकडून येणारा वारा वसईविजयाचें सूक्त गात आहे, असें भावलें. तिथल्या दगडादगडाबद्दल जिव्हाळा निर्माण झाला. तिथलीं झाडेंझुडुपें जणूं अश्वत्थ-औदुंबरांसारखीं वाटलीं. आम्ही तिथें बराच वेळ हिंडलों, फिरलों. त्या हिंडण्यांत कांटेकुटे आणि ताडाच्या पात्या अंगाला बोंचल्या. पण ते ओरखाडे आम्हांला चुरचुरले नाहींत. तिथून पुढें एलिफण्टा बुरुजापर्यंत गेल्यावर आमची तटप्रदक्षिणा पुरी झाली. आणि तिथूनच खालीं उतरून आम्ही परतीचा मार्ग धरला.

# ८.

# बिंबस्थान-महिकावती

मुंबई-बडोदें लोहमार्गावर माहीम नांवाचीं दोन गांवें आहेत. एक वांद्र्याजवळचें माहीम नि एक पालघर-जवळचें केळवें-माहीम. दुसरें आधीं वसलें आहे नि पहिलें नंतर. केळवें-माहीमचें मूळ नांव मत्स्यमत्. त्याचें झालें माहीम आणि त्याचें पुनश्च संस्कृतीकरण होऊन बनलें तें महिकावती. प्रताप बिंब नांवाच्या राजानें दमणपासून वाळुकेश्वरापर्यंतच्या समुद्रकिनाऱ्यावर आपलें नवें राज्य स्थापलें आणि त्याची राजधानी म्हणून महिकावती हें नवें शहर वसविलें. बिंबानें निर्मिलेलें म्हणून याला बिंबस्थान अशीहि संज्ञा आहे. याच्या इतिहासावर ओझरती नजर टाकायची म्हटलें तरी इ. स. ११४० पर्यंत मागें जायला हवें.

बाराव्या शतकाच्या प्रारंभीं सरस्वतीच्या तीरावर पाटण नांवाचा प्रांत होता. त्या प्रांतांतल्या चांपानेर महालांत बिंब या आडनांवाचें एक मराठा क्षत्रियकुल राज्य करीत होतें. गोवर्धन बिंब हा तिथला राजा होता. त्याच्या धाकट्या भावाचें नांव प्रताप बिंब. प्रताप बिंबाच्या मनांत नवें राज्य कमावण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण झाली. त्यानें उत्तरकोंकणावर स्वारी करण्याबद्दल भावाकडे परवानगी मागितली आणि भावानें ती दिली. प्रताप बिंब लगेच तयारीला लागला. घोडेस्वार, पाईक, बाजारी, बुणगे असें दहा हजार दळ त्यानें उभारलें. माघांतल्या रथसप्तमीला प्रस्थान ठेवलें. तो प्रथम पैठणला आला. तिथें त्या वेळीं विक्रम भौम नांवाचा राजा राज्य करीत होता आणि तो बिंबकुलाचा संबंधी होता. प्रताप बिंबानें उत्साहाच्या भरांत मोहीम तर काढली; पण सैन्यबळाला लागणारें द्रव्यबळ त्याजपाशीं नव्हतें. 'सैन्यें पोटावर चालतात' हें त्याला लवकरच कळलें आणि तो हवालदिल झाला. बाळकृष्णराव सोमवंशी हा त्याचा प्रधान मोहिमेंत होता. त्यानें बिंबाला धीर दिला आणि तो द्रव्याची जुळवाजुळव

करूं लागला. पण त्यासाठीं तब्बल दोन वर्षें बिंबसैन्याला स्वस्थ बसावें लागलें. या काळांत विक्रम भौमानें त्याचें दहा हजार चतुरंग दळ अविच्छिन्न पोसलें. विक्रम धनंतर होता म्हणून ठीक. नपेक्षां बिंबाचे राज्य कमावण्याचे मनोरथ 'उत्पद्यन्ते विलीयन्ते' झाले असते.

मग प्रताप बिंबानें मजला मारायला प्रारंभ केला. नेवासें-जुन्नर या मार्गें तो घाटाखालीं दमण प्रांतांत उतरला. त्या वेळीं उत्तरकोंकणाची राजधानी ठाणें शहरांत होती. मोडकें तोडकें कां होईना, पण शिलाहारांचें तिथें अस्तित्व होतें. कऱ्हाडचा महाप्रतापी विजयादित्य शिलाहार पडल्या प्रसंगीं धांव घ्यायला समर्थ होता. पहिल्याप्रथम बिंबाला जर त्याच्याशीं झुंज देण्याची वेळ आली असती तर 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' होण्याचा संभव होता. तेव्हां तो धोका टळावा म्हणून बिंबानें दूरच्या दमण महालांतून चंचुप्रवेश करण्याची मुत्सद्देगिरी दाखवली.

दमण महालांत त्या वेळीं काळोजी सीरण्या नांवाचा कोणी एक पुंड राजा म्हणून मिरवीत होता. बिंबाच्या दर्शनमात्रें त्याचा नूर उतरला. त्यानें ताबडतोब शरणागति पत्करली. दमणमहाल बिंबाच्या पदरांत पडला. केळवेंभागांत विनाजी घोडेल नांवाचा असाच एक गुंड राजा निर्माण झाला होता. बिंब चालून येतो असें कळतांच त्यानेंहि दांतीं तृण धरलें. तोहि प्रदेश विनासायास बिंबाच्या हातीं आला. मग तिथें कांहीं काळ राहून त्यानें देशस्थितीचें अवलोकन केलें.

दमणपासून तों वाळुकेश्वरापर्यंतची ती किनारपट्टी नयनमनोहर होती. निसर्गाची तिच्यावर कृपा होती. तिथली जमीनहि सुपीक होती. शिलाहारांनीं तो प्रांत वैभवाला चढवला होता. तिथें संस्कृति निर्माण केली होती. पण पुढें त्यांचाच पडता काळ आला आणि पावरी, घोडेल, ठाकर, कोळी या वन्य जमातींतले पुंड बळिवंत होऊन हातीं सांपडला तेवढा मुलूख बळकावून बसले. बोलून चालून रानटी लोक. त्यांना कुठली राज्य चालविण्याची अक्कल! त्यामुळें सर्वत्र सांवळा-गोंधळ निर्माण झाला. धुमश्चक्री चालू राहिली. पूर्वीची व्यवस्था कोसळून पडली. आणि त्यामुळें सगळा देश वैराण झाला. जमिनी ओसाड पडल्या. लोक अन्न अन्न करीत दाही दिशां निघून गेले.

प्रताप बिंबानें हें सगळें पाहिलें. त्याच्याजवळ सामर्थ्य होतें. त्यानें एकेका पुंडाला झोडपून काढलें. अठ्ठावीस कोसांचा किनाऱ्याचा मुलूख ताब्यांत आणला.

आणि मग या मुलखाचा मध्यबिंदु केळवें-माहीमास पडतो, असें पाहून तिथें नवी राजधानी उभी केली.

पण त्या वेळीं तो केवळ ओसाडगांवचा राजा होता. वस्तीच उठली तर राज्य कोणावर करायचें ! मग त्यानें त्या प्रदेशाची ऊर्जा करण्याचें ठरवलें. पैठण आणि चांपानेर इथून त्यानें रयत, पंचायत मागविली. तदनुसार नावाणिक अशीं सहासष्ट कुळें घेऊन त्याचा पुत्र मही बिंब महिकावतीला आला. त्यांच्या साहाय्यानें प्रताप बिंबानें या उजाड देशांत व्यापार, उदीम, शास्त्र आणि संस्कृति यांची उभारणी केली.

प्रताप बिंबानंतर मही बिंब गादीवर आला. त्याच्या अमदानींत चौलच्या भोज राजानें बिंबराज्यावर स्वारी केली. उरणापासून परगणे मारीत मारीत तो केळव्या-पर्यंत पोंचला. तिथें मही बिंबानें रणशिंग फुंकलें. थोड्याच काळांत त्यानें भोजाचा पुरता निकाल लावला आणि मग निष्कंटक राज्य केलें. त्याचा पुत्र केशवदेव. बाप मेला त्या वेळीं हा अवघा पांच वर्षांचा होता. त्याच्या नांवानें त्याची आई कामाई राज्यकारभार पाहूं लागली. ती वयानें तरुण नि रूपानें देखणी होती. त्यामुळें प्रधानाला तिच्याविषयीं पापवासना उत्पन्न झाली. प्रसंग कठिण होता. त्यांतून निभावून जाणें आवश्यक होतें. हरद पुरो नांवाचा एक गृहस्थ तिच्या विश्वासांतला होता. राणीनें आपली व्यथा त्याच्या कानीं घातली. त्यानें देशांतले राणे-राऊत मिळवले. कुसुंबा भांग चढवून त्यांच्या मनांत त्वेष निर्माण केला. त्यांच्यासह रात्रीं प्रधानाच्या महालाला वेढा घातला. प्रधान झुंजास येतांच हरद पुरोनें त्याचें शिर उडवलें आणि तें कामाईच्यापुढें नेऊन ठेवलें.

केशवदेव वयांत येतांच स्वतः राज्यधुरा वाहूं लागला. त्याला आत्मगौरव फार होता. त्यानें आसपासच्या राजांचा आजा अशा अर्थाचें 'राजपितामह' हें बिरुद धारण केलें. तशा अर्थाचे पोवाडे रचून ते गाऊन दाखविण्यासाठीं राजमंडळांत भाट रवाना केले. अनेकांनीं ते ऐकून घेतले. पण चंपावतीच्या भोजराजाला तें सहन झालें नाहीं. केशवदेवाला धडा शिकवायचें ठरवून त्यानें त्याच्यावर मोठें सैन्य घातलें. युद्ध मोठें खणाखणीचें झालें. त्या प्रसंगाचा बखरींतल्या भाषेचा आवेश पाहण्याजोगा आहे.

"परदळ देखतां केशवदेवानें देसायांना हाकारा केला. देसाय देसाय देश मिळाला. सिंव्याचा जमाव थोर जाला. नगाऱ्या घाव घातला. कर्णे, बाकें, शिंगें,

काहाळा, विराणीं वाजलीं. पाइका पाइका जाली. कळव्या युद्ध थोर जालें. देवनरचे विनायक म्हाताऱ्यानें राया भोजाच्या छत्रीची खीळ एका बाणें विंधोन पाडिली. दुसऱ्या बाणें भोजाच्या शिरींचा गंगाळटोप पाडिला. ऐसें युद्ध थोर जालें. राजा भोज अपेशी जाला... केशवदेव यशवंत जाला."

केशवदेवला पुत्रसंतान नव्हतें. त्यामुळें त्याच्या मृत्यूनंतर सर्व देसायांनीं मिळून जनार्दन प्रधान याला गादीवर बसवलें. पण त्या बिचाऱ्याचें दैवच खोटें. घणदिवीचा वैश्य राजा नागरशा यानें माहीमवर स्वारी करून त्याला जिंकलें. राज्य स्वतःकडे घेऊन त्यालाच परत प्रधान केलें. आर्य चाणक्यानें राक्षसाला केलें तसें. नागरशाचा पुत्र त्रिपुरकुमार वयांत येऊन बापाच्या बरोबरीनें कारभारांत भाग घेऊं लागला. नागरशाचे तीन मेहुणे होते. माहीमवर परचक्र आल्या वेळीं त्यांनीं रणमैदान गाजवलें होतें. त्यांना वाटलें कीं, आपल्याला प्रत्येकीं एक गांव तरी बक्षीस मिळावें. पण नागरशानें त्याची मागणी नाकारली. ते रागावून राज्यांतून निघाले आणि सरळ देवगिरीच्या रामदेवराव जाधवाच्या छत्राखालीं गेले. 'नागरशाचें राज्य तूं मोडून टाक,' म्हणून त्यांनीं रामदेवरावास भरीस घातलें. रामदेवराव दळभारासह कोंकणांत उतरला. पण त्रिपुरकुमारानें ठायीं ठायीं सामोरा होऊन त्याला खडे चारले. रामदेवराव म्हणजे सर्व दक्षिणापथाचा सम्राट्! निदान नामधारी तरी. त्याचा पराभव केल्यावर नागरशाला स्वर्ग दोन बोटें उरला.

पण पुढें कांहीं काळानें रामदेवरावाचा पुत्र बिंबदेव यानें मागच्या या पराभवाचें उट्टें काढलें. ठाणें-कोंकण तर त्यानें जिंकलेंच; शिवाय महिकावतीवरहि आपली सत्ता स्थापली. त्रिपुरकुमाराला पेण–पनवेल भागांत पळून आसरा घ्यावा लागला. बिंबदेवाचा पुत्र प्रतापशा हा बापामागून महिकावतीचा राजा झाला. पण चौलच्या नागरशानें त्याचें राज्य हिसकावून घेऊन आपल्या राज्याला जोडलें. पुढें वडनगरच्या मलिकाशीं त्याची कांहीं तरी कुरापत निघाली. तो मलिक हा तत्कालीन दिल्लीश्वर महंमद तुघलख याचा हस्तक होता. त्यानें बादशाहाकडे नागरशाविरुद्ध कागाळी केली. महंमद तुघलखानें निका मलिक नांवाच्या सरदाराला बाराशें घोडेस्वारांनिशीं नागरशावर पाठविलें. रात्रीच्या थंड वेळीं चालावें आणि दिवसां दबा धरून बसावें, असें करीत करीत बारा खाड्या ओलांडून तो कान्हेरीस आला. तिथून पुढें शिंवावर उतरून त्यानें वांद्याजवळचें

माहीम गांठलें. तिथें नागरशाची राणी होती. तिनें निका मलिकाशीं जातीनें सामना दिला. दहा घटिका युद्ध करून ती धारातीर्थी पडली. नागरशा त्या वेळीं वाळुकेश्वरीं होता. त्याची आणि मलिकाची गांठ भायखळ्यास पडली. मलिकानें नागरशास ठार केलें आणि त्याचें राज्य घेतलें. इ. स. १३४८ त अशा रीतीनें ठाणें-कोंकणांत तुर्काण झालें. पुढें १४२९ त अहमदाबादचा सुलतान अहमदशहा याच्याकडे माहीमची सत्ता गेली. इ. स. १५०० अखेर त्याचा वंश माहीमसह ठाणें-कोंकणावर नांदला.

त्या सालीं पोर्तुगालहून कांहीं फिरंगी दोन तारवें घेऊन भारताच्या पश्चिम किनाऱ्याला लागले. त्यांनीं प्रथम कोची बंदर घेतलें. मग गोवें काबीज केलें. पुढें बारा वर्षांनीं ते दमणास आले. नफ्याचें आमिष दाखवून त्यांनीं वसईस 'फेतोरी' उघडली. अडत बाजारहि स्थापला. मग हळूच गोव्याहून आरमार आणलें. वसईच्या मुसलमान सुभेदाराला विश्वासघातानें ठार मारलें. हळूहळू सर्व कोंकणकिनारा काबीज केला. मग बाटाबाट आरंभली. अमानुषपणांत राक्षसांनाहि लाजवलें आणि......पण तो इतिहास मागील वसईच्या प्रकरणांत येऊन गेला आहे. इथें पुनश्च तो कोळसा उगाळणें नको.

बाराव्या शतकापासून तों सोळाव्या शतकापर्यंतचा हा माहीम आणि ठाणें-कोंकण यांचा इतिहास केशवाचार्यांनीं आपल्या माहिकावतीच्या बखरींत सविस्तर लिहून ठेवला आहे.

माहीमच्या प्रवासाला मी निघालों ते नवरात्राचे दिवस होते. या सहलींत मला सोबत करण्याचा माझ्या अनेक मित्रांनीं संकल्प सोडला होता. पण तो सत्यसंकल्प ठरला नाहीं. माझ्याबरोबर बॉंबे सेंट्रल स्टेशनवर गाडींत चढले ते एकटे श्री. जनाप्पा कामत. गोमंतकाच्या सेवेसाठीं तिळातिळानें झिजलेला हा सत्तरीच्या आसपासचा पुरुष उत्साहाच्या बाबतींत अजूनहि पंचविशींतल्या तरुणांना लाजवतो. अजूनहि त्यांची हौस आणि जिज्ञासा प्रफुल्ल आहे.

सौराष्ट्र एक्स्प्रेसनें आम्ही दोघे पालघरला उतरलों तेव्हां सकाळचे दहा वाजले होते. माहीमला जाणारी बस बाहेर उभी होती, ती आम्हांला घेऊन लगेच मार्गस्थ झाली. तिथून माहीम पश्चिमेस पांच मैलांवर होतें. शरद् ऋतु सर्वत्र विलसत होता. मधूनच दिसणाऱ्या लहानथोर जलाशयांत कमळांचा थाट मांडला होता. निळ्या आभाळांतून सूर्यनारायण चांगलेच चटके देत होता. पाऊस

भरपूर आणि हंगामशीर पडल्यामुळें भातें सोळा आणे पिकलीं होतीं. बहुतेक शेतांतून कापणी चालू झाली होती. ढवळे-पवळे, रंगारूपानें सारखे बैल रस्त्याच्या कडेला वृक्षमूळांत बांधून ठेवलेले दिसत होते. त्यांच्याच शेजारीं गाड्या होत्या आणि त्या भाताच्या पेंढ्यांनीं भरण्याचें काम चालू झालें होतें. सगळीकडे पिकलेल्या भातशेताचा किंचित् उग्र पण हवा हवा असा वास सुटला होता. या भागांत गोंडेण गवतहि चांगलें वाढतें. त्याचा व्यापार फार मोठ्या प्रमाणावर होतो. तें पूर्ण सुकायच्या आंत अर्धवट ओलसर असतांनाच कापतात आणि पेंढ्या बांधून त्याच्या गंज्या रचतात. या भागांतली आदिवासी जनता हें गवतकापणीचें काम करते.


आम्ही माहीमच्या तळावर उतरून किल्ल्याची चौकशी करूं लागलों. आम्ही किल्ला पाहायला आलों आहों, याचेंच कित्येकांना आश्चर्य वाटलें. एवढासा टीचभर तर भुईकोट; त्यांत काय पाहायचें, अशीच बहुतेकांची समजूत. ‘ सरळ रस्त्यानें पुढें चला, म्हणजे सरकारी दवाखान्याजवळ किल्ला दिसेल. ’ कोणीं तरी अंगुलिनिर्देश केला. फकिराच्या झोपडीवरून अमिराचा प्रासाद निर्देशिला जावा, तसाच हा प्रकार मला वाटला. वस्तुतः किल्ल्यापाशीं सरकारी दवाखाना आहे असें सांगायला हवें होतें. यावरून तो किल्ला किती उपेक्षित असेल त्याची कल्पना करा.

आम्ही बाजारांतून सरळ पुढें निघालों. वाटेंत एक दळवी नांवाचे तरुण गृहस्थ भेटले. त्यांनीं आमची चौकशी केली. आमचा उद्देश समजल्यावर ते म्हणाले, ‘ चला, मी तुम्हांला किल्ला दाखवतों. ’ आम्ही त्यांच्या पावलावर पाऊल टाकून निघालों. प्रथम ते आम्हांला आडवाटेनें एका गढीकडे घेऊन गेले. हिची एकच भिंत आजमितीस उभी आहे. आंत सर्वत्र झाडी दाटली आहे. माहीमच्या किल्ल्याजवळ एक दुसरा लहानसा मेंढेकोट होता, असें मीं वाचलें होतें तो बहुधा याच गढीभोंवतीं असावा.

तिथून मागें वळून आम्ही पुन्हा रस्त्याला लागलों. थोड्याच वेळांत सरकारी दवाखाना दिसला. एक गडगा ओलांडून आम्ही किल्ल्याच्या आवारांत शिरलों. आंत सगळें गवत आणि गचकल माजलें होतें, आणि एक अक्षुण्ण अशी पायवाट किल्ल्याच्या प्रवेशद्वाराकडे जात होती. हें द्वार पूर्वेला आहे. द्वार म्हणजे नुसती एकेरी कमान. तिला ना रुबाब, ना भव्यता, ना कारागिरी. समोर

आंब्या-फणसाचीं झाडें आहेत, त्यांची गार छाया आहे, म्हणूनच तिथें क्षणभर थांबावेंसें वाटतें.

आंत शिरलों तर तिथेंहि सगळीकडे रान आणि कांटेरी झुडुपें. मीं एकदा सगळीकडे नजर टाकली. मला वाटलें कीं, याला किल्ला म्हणण्यापेक्षां एखाद्या उमरावाचा वाडा म्हणणेंच जास्त शोभेल. दगड आणि चिखल यांनीं हा कोट उभारलेला आहे. तटाची उंची अवघी अठ्ठावीस फूट. लांबी पांचशेंपन्नास अन् रुंदी दोनशेंपन्नास फूट. मध्यें प्रशस्त राजांगण. तीन बाजूंनीं तट आणि पश्चिम अंगास दुमजली इमारत, असें त्याचें स्वरूप आहे. उजव्या बाजूस एक विहीर



**कोटाचा आंतला भाग**

आहे आणि तिच्यांतून एक उंबराचें झाड वाढून वर आलें आहे. डाव्या अंगास ओळीनें तीन-चार खोल्या आहेत. समोरच्या इमारतींत जायला जिना आहे.

तो दोन्ही बाजूंनीं वर नेलेला आहे. इमारतींत दालनाच्या मध्यभागीं एक स्तंभ आहे. तो कसला आणि कशासाठीं तें कळलें नाहीं. वरच्या मजल्यावर जाणारा जिना दालनांतूनच आहे. पण नुकताच सरकारी संरक्षक-खात्यानें दुसरा मजलाच अजीबात काढून टाकल्यामुळें तो जिना अधांतरीं खंडित झाला आहे. स्वतः दयनीय आणि दुसऱ्याला धोकेबाज.

फिरंग्यांनीं हा किल्ला बांधला त्या वेळीं त्याच्याभोंवतीं तिकोनी तट होता. त्याच्या आंत पूर्व, दक्षिण, उत्तर या तिन्ही दिशांना शिबंदीसाठीं घरें होतीं. तोंडाशीं पंचकोनी दोन मजबूत बुरूज होते. पण आतां तें सगळें स्मृतिशेष झालें आहे. मागच्या अंगानें वाहणाऱ्या खाडीनेंहि किल्ल्याचा बराचसा भाग वाहून नेला आहे. आज शिल्लक आहे तो फक्त मूळच्या कोटांतला लहानसा बालेकिल्ला. आम्हीं तटावरून एक प्रदक्षिणा घातली आणि मग खालीं उतरलों. तटाचा मार्ग हा आतां मानवाचा मार्ग राहिला नसून घुशींचा आणि सरपटणाऱ्या किरडुवांचा मार्ग झाला आहे.

वरच्या दालनांतल्या खिडकींतून मागचें खाजण व त्यामागची रुंद खाडीहि नजरेंत भरते. त्याच बाजूला जरा दृष्टि स्थिर केली कीं खाडीच्या मुखाशीं कसलें तरी काळें शिल्प उभें दिसतें. तपशील कांहीं कळत नाहीं. फक्त स्थूल, अस्पष्ट आकार तेवढा प्रतीत होतो. केळव्याचा जंजिरा किल्ला तो हाच. माहीमपासून तो सुमारें दोन-अडीच मैलांवर आहे. या दोन्ही किल्ल्यांवर एका काळीं फिरंग्यांचा कब्जा होता.

माहीमचा किल्ला तर विशेष बंदोबस्ताचा. तिथें एक फिरंगी सरदार होता आणि त्याच्या हाताखालीं काळेंगोरें सैन्य होतें. किल्ल्याला लागूनच गांव असल्या-मुळें गांवांतहि पन्नास फिरंगी कुटुंबें राहात होतीं. शिवाय बाटलेल्यांचीं कुटुंबें आणि दोनशें हत्यारबंद गुलाम.

१७३९ त चिमाजीअप्पानें इथून फिरंग्यांचा उठावा केला. पण तत्पूर्वीं १७३७ सालींच त्यांना या ग्रहणाचा वेध लागला. शंकराजीपंतानें माहीमचें रान तोडून, झापें मोडून किल्ल्याभोंवतीं गोळीच्या टप्प्यावर मोर्चे बसवले. फिरंगी त्यांच्यावर चालून आले. मराठ्यांनीं त्यांच्यावर घोडीं घातलीं. रेटीत रेटीत त्यांना तटापर्यंत पोंचवलें. पण त्या वेळीं मराठ्यांचें बळ अपुरें पडलें. फिरंगी चांगलाच उलटला. त्यानें रेटा मागें फिरवला. पेशव्यांना हें कळतांच त्यांनीं

रा. रामचंद्र हरि पटवर्धन या मातबर सरदाराला पुण्याहून मदतीसाठीं रवाना केलें. तो आल्यावर पुनश्च वेढ्याचें काम नेटानें सुरू झालें. पण फिरंग्यानें वसईहून कुमक मागवली. चव्वेचाळीस गलबतें सैन्य भरून माहीमच्या खाडींत आलीं. किल्ल्यांतल्या कप्तानाला बळ चढलें. त्यानें एकदम तीन हजार सैन्य किल्ल्यांतून बाहेर लोटलें. मराठ्यांचे तीन मोर्चे बसले होते, त्या तिघांवरहि एकदम हल्ला केला. समोर गनीम बंदुका रोखून उभा आणि मागें पळायला वाट नाहीं. त्यामुळें मराठ्यांना जिवावर उदार होऊन लढणेंच भाग पडलें. तो आणीबाणीचा प्रसंग पाहून रामचंद्रपंतांना वीरश्री चढली. म्यानांतली तलवार उपसून त्यांनीं शत्रूच्या कंठाशींच खेळ मांडला.

पण त्याहि वेळीं मराठ्यांना ग्रहबळ अनुकूल नव्हतें. रामचंद्रपंतांच्या दंडाला फिरंग्यांची गोळी लागली. हात वेंबळ गेला, तलवार गळून पडली आणि पडतां पडतां ती त्यांच्याच गुडघ्याला चाटून गेली. रामचंद्रपंतांना परत फिरावें लागलें. युद्धाचें पारडें फिरलें. मराठ्यांचें अवसान खचलें. गनिमाला रान मोकळें झालें. त्यानें मराठ्यांचे मोर्चे मोडून तुडवून काढले. दोनशें मराठ्यांना कंठस्नान घातलें. उरलेल्यांनीं पळ काढून शिरगांवच्या लष्करी छावणीचा आश्रय घेतला, म्हणून ते वांचले.

मराठ्यांच्या सैन्यांत कांहीं अरब होते. त्यांचा पगार थकला होता. बोलून चालून भाडोत्री सैनिक ते! त्यांना कुठली जयपराजयाची पोटतिडीक! त्यांनीं तगादा चालवला आणि तरीहि त्यांचा पगार चुकता करणें पेशवे सरकारला अशक्य झाल्यामुळें, त्यांनीं फिरंग्यांशीं संगनमत केलें. रणखाई पेटली, तेव्हां तेच उलटून मराठ्यांना मारूं लागले.

पण फिरंग्यांना मिळालेला हा जय पुढच्या यथासांग पराभवाचाच सूचक ठरला. १७३९ च्या डिसेंबरांत खुद्द चिमाजीअप्पांनींच ही मोहीम हातीं घेतली. कोटाभोंवतीं घेरा धरून त्यांनीं मोर्चे-बातेऱ्या बांधल्या. त्यांवर तोफा चढवून त्यांना बत्ती दिली. दोन-तीन ठिकाणीं तट ढांसळून पडला. फिरंग्यांनीं रात्रीचा दिवस करून पुनश्च तीं भगदाडें बुजवलीं. आग ओकूनहि फिरंगी दमेना. मग अप्पासाहेबांना वाटलें कीं, केवळ खुष्कीच्या बाजूनें ही मोहीम यशस्वी होणार नाहीं. सबब त्यांनीं आपलें आरमार मागवलें. लढाऊ गलबतांचा एक काफिला माहीम बंदरांत दाखल झाला. दुसऱ्या बाजूनें सुरुंग

खणायचेंहि काम चालू केलें. त्यांतले कांहीं तटापर्यंत येऊन पोंचलेहि. फिरंग्यांचा कप्तान डिमेलो यानें हा सगळा बनाव पाहिला. त्यांतला एखादा सुरुंग उडाला तरी आंतल्या लोकांसह सगळाच किल्ला हवेंत उडेल याची कल्पना येऊन त्याच्या पोटांत गोळा उठला. मग तो ताबडतोब शरण आला. माहीमचा कोट मराठ्यांच्या हस्तगत झाला. फिरंग्यांचें तिथून उच्चाटन झालें. त्यानंतर दुसऱ्याच दिवशीं केळव्यावर हल्ला झाला. तेंहि फिरंग्यांचेंच ठाणें होतें. तिथला किल्लेदार निकरानें झुंजला. मराठ्यांनीं कोणत्या तरी युक्तीनें कोटांतल्या दारूच्या कोठारासच आग घातली. मग जो स्फोट झाला, त्यांत कोटांतलें एकूण एक माणूस अस्मानांत उडालें. अशा प्रकारें केळवेंहि सर झालें.

किल्ला पाहून परत येईतों बारा वाजले. मग आम्हीं थोडा वेळ गांवांतल्या व्यंकटेशाच्या देवळांत विश्रांति घेतली. नवरात्र असल्यामुळें त्याचा उत्सव चालू होता. पालखी दारांत काढून ठेवलेली होती. दर्शन करून आम्ही सभामंडपांत बसलों. देवस्थानच्या व्यवस्थापकांपैकीं एका तरुणानें आमच्या हातीं उत्सवाची कार्यक्रमपत्रिका दिली. बोलतां बोलतां त्यानें त्या देवाविषयीं एक अद्‌भुत कथा आम्हांला ऐकविली.

पूर्वकाळीं पश्चिम समुद्रावर चांचे लोकांचा फार धुमाकूळ होता. ते समुद्रमार्गें जाणारा माल लुटीत आणि खून मारामाऱ्याहि करीत. किनाऱ्यावरच्या गांवांनाहि त्यांचा उपद्रव होता. कोणत्या वेळीं त्यांची धाड पडेल आणि गांव लुटलें जाईल याचा नेम नसे. एक दिवस असेच ते माहीमवर धडकले. राऊळ सुशोभित पाहून आंत घुसले. त्यांना देव मोठा श्रीमंत दिसला. त्याच्या अंगावरचे माणकामोत्यांचे दागिने पाहून त्यांच्या तोंडाला पाणी सुटलें. बोलूनचालून समुद्रावरचे असंस्कृत लुटारूच ते. त्यांना कुठला देव नि धर्म! त्यांनीं चौथऱ्यावरून मूर्ति निखळवली आणि तिला घेऊन ते पसार झाले.

ते अचानक आले आणि हें निंद्य कर्म करून बोल बोल म्हणतां पसार झाले. मग ती बातमी राजाला कळली. त्यानें दहा गांवच्या लोकांना हांकारा केला. गांवागांवांतून होड्या बाहेर निघाल्या. शस्त्रसज्ज होऊन त्या लोकांनीं चांच्यांचा पाठलाग सुरू केला. माहीम प्रांतांतल्या सगळ्या गांवांची या देवावर श्रद्धा होती. देव चोरून नेला म्हणजे आपल्या काळजाचा लचकाच तोडून नेला, असें त्यांना वाटलें.

आपल्याला आज घबाड मिळालें या आनंदांत चांच्यांनीं गलबत हांकारलें होतें. पण थोड्याच वेळांत एक महान् अरिष्ट त्यांच्यावर ओढवलें. मूर्ति उखडून आणून गलबतावर घालतांना तिचें एक बोट तुटलें आणि त्यांतून भळाभळा रक्त वाहूं लागलें. 'हें काय आश्चर्य!' म्हणून एकजण बाकीच्यांचें लक्ष तिकडे वेधतो तों, तांडेल 'गलबत रुतून बसलें' म्हणून ओरडूं लागला. पाहतात तों खरेंच! एवढ्यांत पाठीमागून अनेक होड्या पाठलाग करीत येत असल्याचें त्यांनीं पाहिलें. त्यांच्या पोटांत आवळे शिजले. ते जडमूढ झाले. त्यावर कोण्या तरी शहाण्या चांच्यानें कप्तानाला सांगितलें कीं, 'दैवी कोपामुळें आपल्यावर हें संकट आलें आहे. ही मूर्ति टाकून दिल्याशिवाय आपलें गलबत सुटणार नाहीं.'

प्राणांवरच आलें, तेव्हा त्यांनीं धनाचा लोभ सोडला आणि ती व्यंकटेशाची मूर्ति जशीच्या तशी समुद्रांत टाकून दिली. त्यासरसें गलबत चालूं झालें. चांचे वाऱ्याच्या सोसाट्यावर हां हां म्हणतां दृष्टीच्या टप्प्याबाहेर पसार झाले. पाठीमागून येणाऱ्या गांवकऱ्यांना समुद्रांत मध्येंच एक कोरडी जागा दिसली. त्यांना त्या गोष्टीचें नवल वाटलें. पुढें जाऊन पाहतात तों व्यंकोबा तिथें उभा आहे. लुबाडलेला नव्हे; तर जसा होता तसा सालंकृत. लोकांना परमानंद झाला. त्यांनीं त्याला मिरवीत देवळांत आणून स्थापलें. त्या दिवसापासून या देवस्थानांत त्या दहा गांवांना मान आहे. नवरात्रांत प्रत्येक दिवशीं एकेका गांवच्या लोकांनीं देवाला पालखींत बसवून वाजत गाजत समुद्रस्नानाला न्यायचें.

मुळांत कांहीं तरी सत्य घटना असेल; पण आजमितीस या वृत्तान्ताला लोक-कथेचें स्वरूप आलें आहे. कोंकणकिनाऱ्यावरच्या बहुतेक गांवांतून अशा लोक-कथांची सरस्वती गुप्तरूपानें वाहत आहे. अद्‌भुताच्या आवरणाखालीं अशा कथांनीं बराचसा इतिहास जतन करून ठेवला आहे.

अशाच पण पुराणांतरीं समाविष्ट झालेल्या अद्‌भुत कथेचें दुसरें एक जन्मस्थान इथून जवळच आहे आणि तें म्हणजे महिकावतीचें मंदिर. मातृकामंदिर या नांवानें तें ओळखलें जातें. माहीमहून दोन मैलांवर समुद्रकिनारीं खाडीच्या मुखावर तें स्थान आहे. उन्हाची वेळ म्हणून आम्ही टांगा करून तिकडे निघालों. पण जातांना कळलें कीं, पायीं गेलों असतों तरी कांहीं बिघडलें नसतें. केळवें-माहीम हा बागायती प्रदेश आहे. तिथल्या केळींच्या बागा पुरातनकाळापासून

प्रसिद्ध आहेत. ' कदलीवह ' या संस्कृत नांवाचा अपभ्रंश म्हणजेच केळवें. याच केळीच्या बागांमधून आमचा रस्ता जात होता. मधूनमधून पानमळेहि दिसत होते. त्या नागवेली खुंटाच्या आश्रयानें वर चढल्या होत्या आणि कोळसर निळ्या जाड पानांनीं सर्वांगीं घवघवीत झाल्या होत्या. जणूं देवेंद्राच्या दरबारांत मुजऱ्यासाठीं हारीनें उभ्या राहिलेल्या चिरतरुणी, मनरमणी अप्सराच. शेजारचे माड प्रेमळ पित्याच्या वात्सल्यानें त्यांच्यावर कृपाछत्र धरीत होते आणि त्याच वेळीं रस्त्यावरहि छाया करीत होते. उभय बाजूंच्या कुंपणांत खुंट म्हणून पुरलेले पण तिथेंच मूळ धरून वाढलेले अंबाडे, शेवगे, पांगारे, भेंड हेहि आपापल्यापरी सूर्यकिरणांना अडवून मार्गावरची शीतळता कायम ठेवायला मदत करीत होते. या बागायतींतलीं तुरळक, अलग तांबड्या कौलांचीं घरें मंगलांचीं माहेरें वाटत होतीं. त्या घरांत राहणाऱ्या सानथोर माणसांचा आणि त्यांच्या परिसरांतल्या विविध वृक्षांचा जणूं कसला तरी अतूट असा आध्यात्मिक संबंध आहे असें मनाला जाणवत होतें. रहाटाची कुंईकुंई चालवणारे बैल, गोठ्यांतल्या गायी-म्हशी, दारींचीं कुत्रीं-मांजरें, ताड आणि माड, केळी आणि पानवेली आणि हें सर्व अखरखणारा माणूस, मिळून हें एका सूत्रांत गोवलेलें अविभक्त, एकजीव कुटुंब आहे, आणि यांत प्रत्येकाची प्रत्येकाशीं सहवेदना आहे, अशी कांहीं तरी भावना होत होती. मला तर एकदां असेंहि वाटलें कीं, आपणहि यांतलाच एक बनून कांहीं काळ इथें रहावें आणि मनबुद्धींना फुलवून घ्यावें. मी देहानें टांग्यांत असलों तरी मालकाची परवानगी न घेतां मनानें त्या बागांत स्वैरपणें हिंडत होतों. ' उतरा साहेब ! ' म्हणून टांगेवाल्यानें जेव्हां सुनावलें तेव्हां मी भानावर आलों आणि मनाला मुरडून घेतलें.

आमच्या डाव्या हाताला निळा दरिया लहरत होता, फेंसाचीं फुलें उधळीत होता, आणि समोर आटपसर अशी एक खाडी पसरली होती. सागराला उराउरीं भेटायला निघालेली कोणती सरिता ऐन संगमाच्या स्थळीं दुसऱ्याला आंत पाय ठेवूं देईल ! पण ही खाडी कांहीं मुलुखावेगळीच होती. तिला धड गुडघाभर-सुद्धां पाणी नव्हतें. आणि जें होतें तें पांगलेल्या प्रवाहांनीं वाहत होतें. आंतल्या खडकांच्या पाठी निखालस कोरड्या. हरीची दुरत्यय माया भक्त ज्या लीलेनें तरुन जातो, तितक्या सहजपणें आम्ही त्या खाडीच्या पैलपार गेलों.

आतां वातावरण बदललें. समोर बैठ्या झुडपांचें विरळ रान, त्यांत आंखूड वाटोळ्या पानांचे उंच ताडमाड आणि तिथेंच खाडीकांठीं तें एकुलतें मातृकामंदिर. त्याला कळस नाहीं, आंखीव-रेखीव बांधणी नाहीं, हंड्याझुंबरें नाहींत, चौघडे-नौबती नाहींत, कांहीं नाहीं. आहे तो समोर एक मांगर आणि त्यामागें एक लहानसें गर्भागार. ती मातृकादेवी तरी उभी आहे असें म्हणावें तर तसेंहि नाहीं. तिला मारुतीनें लाथ मारल्यामुळें ती अजूनहि तशीच पालथी पडून आहे. आम्हीं दिवा लावून घेतला आणि त्या पालथ्या पाषाणमूर्तीला समग्र न्याहाळून मग पायां पडलों.

रामायणकाळीं अहीमहींचें राज्य होतें तें याच प्रदेशांत. हीच देवता त्यांची कुलस्वामिनी. हे दोघे रावणाचे जिवलग मित्र. त्यांचें प्रिय करण्यासाठीं या




मातृकामंदिर

दोघांनीं राम-लक्ष्मणांना सुवेळेवरून पळवून आणलें. ते ज्या शिळेवर रात्रीं झोपले होते, तिच्यासकट त्यांना उचललें. आपलें हित करण्यासाठीं याच देवी-पुढें त्यांना बळीं द्यायचें ठरवलें. पण भक्त मारुति त्यांचा माग काढीत निकुंभिलेहून निघाला आणि त्यांच्या आधीं इथें पोंचला. त्याच्याच समयसूचकतेमुळें राम-लक्ष्मणांवरचा अनर्थ टळला. देवीचा बायकी आवाज काढून राम-लक्ष्मणांना

झरोक्यांतून आंत सोडायला लावणें, त्यांच्या हातीं लगेच शस्त्रें देणें, एकदम दार उघडून अहीमहीवर तुटून पडणें, ते दैत्य अनाटोप होणें, मारुतीनें अहीची भार्या चंद्रसेना हिला अहीमहींच्या मृत्यूचा उपाय विचारणें, तिनें रामप्रभूशीं एकान्त करण्याच्या अटीवर तो सांगणें, भुंग्यानें तिचा पलंग कोरून ठेवणें, रामप्रभूचा पदस्पर्श होतांच तो मोडून पडणें, आणि तिथून सत्त्व संभाळून परत फिरतांना चंद्रसेनेला वर प्राप्त होणें, हें सर्व रोमहर्षक आख्यान या ठिकाणीं घडल्याचें सांगतात.

ज्या शिळेसह राम-लक्ष्मणांना वायुमार्गें आणलें, ती शिळाहि त्या खाडींत टाकलेली दाखवतात. दोन व्यक्तींना डुलकी घेण्याइतकी ती लांब-रुंद निश्चित



IRBK-0108128

राम-लक्ष्मणांना जिच्यावरून आणलें ती शिला

आहे. ती मंदिराच्या बाजूच्या किनाऱ्याला अगदीं जवळ आहे. तिच्या एका अंगाला लहानसा मूर्तीचा ओबडधोबड आकार कोरलेला आहे. आजमितीचें हें देऊळ पेशव्यांनीं बांधलेलें आहे. पूर्वीचें पडलेलें किंवा मुद्दाम पाडलेलें देऊळ लहान असलें तरी चांगल्या बांधणीचें नि कोरीव कलेचें असावें आणि त्याची

स्तंभरचना वेरूळच्या लेण्यांतल्या स्तंभांसारखी असावी, याची साक्ष देणारी एक वस्तु आजहि त्या खाडीच्या मध्यभागीं उभी आहे, आणि ती म्हणजे एक मोडका खांब. शेंकडों वर्षें पाण्याचे ओघ आले, धडकले आणि गेले तरी त्या भग्न स्तंभानें आपल्या अंगावरची मूर्तिकला इतिहाससंशोधकासाठीं शाबूत ठेवली आहे.

पारायणे आडनांवाचे एक गृहस्थ त्या देवीची पूजावृत्ति संभाळून तिच्या शेजारींच राहतात. एकटें एक कुटुंब. ना शेजार ना सांभार. पुजारी म्हणून त्यांना नगद वेतन नाहीं, आहे तें एक देवीचें शेत. तें पिकवावें आणि निर्वाह चालवावा. श्री. केशवराव पारायणे हे आतिथ्यशील गृहस्थ दिसले. आम्ही नको नको म्हणत असतांना त्यांनीं गौरवून आमचा परामर्श घेतला. आम्हीं देऊं केलेली दक्षिणा तर त्यांनीं घेतली नाहींच; उलट एक जुनाट काळचें, तिथेंच खणत असतांना सांपडलेलें तांब्याचें नाणें त्यांनीं आमच्या हातावर ठेवलें. म्हणजे दक्षिणा घेतली ती आम्हीं. संशोधकाच्या ऐटींत मी तें नाणें आंतल्या खिशांत ठेवलें आणि त्यांचा निरोप घेतला.